| येतात का, यावर ताईने लक्ष द्यावे.<br>• वस्तूंची नावे बरोबर ओळखून सांगता येतात का, कुठे मदत लागते का, यावर लक्ष द्यावे.<br>• ताईने बालकांना चित्र पुस्तकांचे अनुभव रोज दयावेत.<br>• ताईने चित्र पुस्तकांचे अनुभवही बालकांना रोज दयावेत.<br>• रोज वेगवेगळ्या प्रकारची चित्र पुस्तके देण्याचा प्रयत्न करावा. | • पुस्तकातील पहिले चित्र पाहून त्यावर चर्चा करावी.<br>• चित्रावर चर्चा झाल्यावर खालील वाक्य जमल्यास बालकाचे बोट ठेऊन वाचावे,<br>• अशा प्रकारे संपूर्ण पुस्तक (जास्तीतजास्त १० पाने) वाचून झाल्यावर प्रश्न विचारून चर्चा करावी. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्ष** |
| **विविधता** | याच प्रकारे गाय, कुत्रा, मांजर, फळे, फुले, पाऊस अशा वेगवेगळया विषयांवर गोष्टी उपक्रमांसाठी घ्याव्यात.. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | प्रकल्पनिहाय गोष्टी सांगण्यास प्रोत्साहन दयावे | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-10 बालके भाषा एक (LI) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.<br>C-10.5 स्वतःहून पात्रांची ओळख, कथाबीज व लेखकाला जे सांगायचे आहे, ते समजून कथा वाचतो व त्याचा अर्थ समजून घेतो.<br>अ) LO 10.5.1 प्रकटवाचन ऐकतो आणि ताईंनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतो.<br>अ) LO 10.5.2 चित्र पुस्तके वाचतो आणि कृती व वस्तू ओळखतो.<br>ब) LO 10.5.1 शिक्षकांसोबत सहभागी वाचनात भाग घेतो आणि वाचलेल्या भागाविषयीच्या चर्चेत सहभागी होतो.<br>CG-10 बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.<br>C-10.9 बालकांसाठी असलेली विविध पुस्तके वाचण्यात रुची दर्शवितो. अ) LO 10.9.1 वाचून दाखविलेल्या कविता आणि गोष्टी यांच्यामध्ये रुची दर्शवितो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | अ) निरीक्षण क्षमता, घटनाक्रम लक्षात ठेवणे, संभाषण कौशल्य ही कौशल्ये विकसित होण्यास मदत होईल.<br>ब) आवडीची चित्रे, पुस्तके घेऊन त्यातील वस्तूंची नावे भराभर सांगता येतात का याचे निरीक्षण करावे. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) पुस्तके निवडताना बालके काय काय शोधतात याचे निरीक्षण करावे. ब) पुस्तकाचे मुखपृष्ठ बघून घेतात का? याचे निरीक्षण करावे. | |
| | | |
| | | |

| आधारशिला कृती क्र.: 2. बडबडगीत म्हणूया. (Singing Rhymes) | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **बडबडगीत म्हणूया.** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **टाळ, खंजिरी, घुंगरू, चमचा, वाटी, दगड अशा विविध वस्तू तालासाठी** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| **कृती: साधी बडबडगीते ऐकविणे.**<br><br>**कृती :**<br>• बालकांना वर्तुळाकार बसवावे किंवा अभिनय गीतासाठी उभे करावे.<br>• घरात परिसरात ऐकली जाणारी बडबडगीते, साधी गाणी, योग्य हावभावांसह, योग्य ताल आणि आवाजातील योग्य चढउतारांसह ऐकवावी.<br>• तंत्रज्ञानाच्या (मोबाईल, टीव्ही, प्रोजेक्टर, साऊंड इत्यादी) मदतीने गाणी, बडबडगीते बालगीते ऐकवावीत.<br>• ऐकवलेली साधी गाणी, बडबडगीते योग्य हावभावांसह म्हणण्याची बालकांना संधी दयावी. | **कृती -बडबडगीते ऐकूया म्हणूया.**<br><br>**कृती :**<br>• बालकांना वर्तुळाकार बसवावे किंवा अभिनय गीतासाठी उभे करावे.<br>• बालकांना परिसरातील विविध भाषेतील, बोलीभाषेतील गाणी ऐकवून त्यांना म्हणण्याची संधी दयावी.<br>• पारंपरिक गाणी उदा. ओव्या, अभंग, भुलाबाई, मंगळागौर इत्यादी गाणी घ्यावी.<br>• चित्रे ध्वनिफीतीच्या साहाय्याने सोपी बडबडगीते ऐकवावीत.<br>• तंत्रज्ञानाच्या (मोबाईल, टीव्ही, प्रोजेक्टर, साऊंड इत्यादी) मदतीने गाणी, बडबडगीते बालगीते ऐकवावीत | **कृती -बडबडगीते ऐकूया म्हणूया.**<br><br>**कृती :**<br>• बालकांना वर्तुळाकार बसवावे किंवा अभिनय गीतासाठी उभे करावे.<br>• बालकांच्या भावविश्वातील परिसरातील, संबंधित पूर्वानुभव लक्षात घेऊन गाणी, बडबडगीते म्हणून घ्यावी.<br>• बालकांकडून योग्य हावभावांसह, तालासुरांत गाणी म्हणून घ्यावी.गाणी, बडबडगीते, कविता यांविषयी अनौपचारिक गप्पा- गोष्टी गट करून वारंवार कराव्या.<br>• बालकांच्या बोलीभाषेतील मूळ गाणे त्याच गाण्याचे माध्यम वापरून (मराठी) भाषेत भाषांतर करून दोन्ही भाषांमधील गाणी कृतियुक्त पद्धतीने म्हणून घ्यावीत. |
| **विविधता** | टाळ, खंजिरी, घुंगरू, ढोलक व परिसरातील उपलब्ध साहित्याचा वापर करून अशी वादये तालासाठी व पेटी सुरासाठी वापरावी. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस,वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | आपल्याकडे उपलब्ध असलेल्या बडबडगीतांच्या संग्रहातील गीत घ्यावे. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व**<br><br>**अध्ययन निष्पत्ती** | CG-9 बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवादकौशल्य विकसित करतात.<br>C-9.1 साधी गाणी, बडबडगीते आणि कविता ऐकतो आणि आवड व्यक्त करतो.<br>LO 9.1.1 विविध प्रकारची गाणी आणि कविता ऐकतो. | |
| | अ) LO 9.1.2 साधी गाणी, बडबडगीते ऐकून म्हणतो.<br>ब) LO 9.1.1 घरात आणि परिसरात वारंवार म्हटली जाणारी विविध भाषांमधील गाणी ऐकतात आणि आनंद घेतो.<br>ब) LO 9.1.2 हावभाव व आवाजातील चढउतारासह गाणी म्हणतो.<br>क) LO9.1.1 जास्त लांबीची (४ ते ८ ओळी) परिचित गाणी / बडबडगीते, कविता लक्ष देऊन ऐकतो, त्याबद्दल संभाषण करतो. क) LO 9.1.2 लहान (४. ते ५ ओळी) | |

| | | |
|---|---|---|
| | गाणी / कविता बडबडगीते गातो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | अ) श्रवणक्षमतेचा विकास, मौखिक भाषा विकास, शब्दसंपत्तीत वाढ होऊन स्मरणशक्तीचा विकास होण्यास मदत होईल. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) बालके गाणी लक्षपूर्वक आणि आनंदाने ऐकत आहेत का? याचे निरीक्षण करावे. | |
| | | |
| **आधारशिला कृती क्र.: 2.1 Singing Rhymes** | | |
| **उपक्रमाचे नाव** | **बडबडगीत म्हणूया L2.** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **टाळ, खंजिरी, घुंगरू, चमचा, वाटी, दगड अशा विविध वस्तू तालासाठी** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृतीचे : परिचित इंग्रजी गाणी घ्यावीत.ताईने बालकांना वर्तुळाकार बसवावे किंवा अभिनय गीतासाठी उभे करावे. बालकांच्या परिसरातील, भावविश्वातील संबंधित पूर्वानुभव लक्षात घेऊन इंग्रजी गाणी म्हणून घ्यावी. बालकांकडून योग्य हावभावांसह, तालासुरांत गाणी म्हणून घ्यावी. | | |
| **विविधता** | टाळ, खर्जिरी, घुंगरू, ढोलक व परिसरातील उपलब्ध साहित्याचा वापर करून अशी वादये तालासाठी व पेटी सुरासाठी वापरावी. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले. शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन. | |
| **ताईसाठी सूचना** | आपल्याकडे उपलब्ध असलेल्या इंग्रजी गीतांच्या संग्रहातील गीत घ्यावे. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-11 बालके भाषा वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात.<br>C11.1 शब्दध्वनीची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे एकत्र करून, शब्द तयार करतो व शब्दांमधील शब्द ध्वनी/अक्षरे वेगळी करतो.<br>क) LO 11.1.1 बडबडगीते म्हणतो | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | अ) श्रवणक्षमतेचा विकास, मौखिक भाषा विकास, शब्दसंपत्तीत वाढ होऊन स्मरणशक्तीचा विकास होण्यास मदत होईल. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) बालके गाणी लक्षपूर्वक आणि आनंदाने ऐकत आहेत का? याचे निरीक्षण करावे. | |
| **आधारशिला कृती क्र.: 3 Let' describe pictures talk and discuss what one can see** | | |
| **उपक्रमाचे नाव** | चित्रगप्पा | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | चित्रवर्णनासाठी मोठ्या आकाराचे रंगीत चित्र | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |

| | |
|---|---|
| **चित्रगप्पा**<br>• बालकांना चित्र दाखवावे.<br>• त्यांना चित्राचे डावीकडून उजवीकडे आणि वरून खाली असे निरीक्षण  करण्यास सांगावे.<br>• चित्रात दिसणाऱ्या वस्तू, व्यक्ती, गोष्टींची नावे सांगण्यास सांगावे.<br>• बालकांना दीर्घप्रतिसादाचे प्रश्न विचारून चित्रातील व्यक्तींविषयी, घटनेविषयी बोलते करावे.<br>• बालकांच्या भावभावनांना चालना दयावी<br>• बालकांना चित्रातील घटनेविषयी स्वतःचे अनुभव सांगण्यास प्रोत्साहित करावे.<br>• चित्राविषयी नेहमीच्या वापरातील शब्द फळ्यावर किंवा चार्टपेपरवर लिहावे आणि त्यांचे साईट रीडिंग पद्धतीने वाचन घ्यावे. | **चित्रगप्पा**<br>• बालकांना चित्र दाखवावे.<br>• त्यांना चित्राचे डावीकडून उजवीकडे आणि वरून खाली असे निरीक्षण करण्यास सांगावे.<br>• चित्रात दिसणाऱ्या वस्तू, व्यक्ती, गोष्टींची नावे सांगण्यास सांगावे.<br>• बालकांना दीर्घप्रतिसादाचे प्रश्न विचारून चित्रातील व्यक्तींविषयी, घटनेविषयी बोलते करावे.<br>• बालकांच्या भावभावनांना चालना दयावी,<br>• बालकांना चित्रातील घटनेविषयी स्वतःचे अनुभव सांगण्यास प्रोत्साहित करावे.<br>• चित्राविषयी नेहमीच्या वापरातील शब्द फळ्यावर किंवा चार्टपेपरवर लिहावे आणि त्यांचे साईट रीडिंग पद्धतीने वाचन घ्यावे. |
| **विविधता** | अ) चित्रास नाव देण्यास सांगावे.<br>ब) चित्रातील आवडलेल्या गोष्टीचे चित्र काढण्यास सांगावे. |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, परिसर, पाऊस-पाणी, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन |
| **ताईसाठी सूचना** | आपल्याकडे उपलब्ध असलेल्या मोठ्या आकाराच्या चित्रांच्या संग्रहातील चित्र घ्यावे. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-9 बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवादकौशल्ये विकसित करतात.<br>C-9.7 दैनंदिन संवाद परिणामकारकरीत्या साधण्यासाठी पुरेसे शब्द आत्मसात करतो व आत्मसात केलेल्या शब्दसंग्रहाचा वापर करून नवीन शब्दांचा अर्थ लावतो.<br>अ) LO 9.7.1 दैनंदिन परिचयातील काही वस्तू आणि अनुभव यांसाठी योग्य शब्दांचा वापर करतो. (उदा. स्वतःचे व मित्राचे नाव, सामान्य वस्तू, चित्रे, गोड आंबट, वर्तुळ मोठा इ. ची नावे सांगतो.<br>ब) LO 9.7.1 विशिष्ट प्रसंग किंवा वर्गामध्ये अनुभवलेल्या विषयातून रायरीक्षक्षणिक संताप्राप्त शब्दसंग्रहाचा उपयोग त्याच्या संभाषणात करतो.<br>क) LO 9.7.1 वाढीव शब्दसंग्रहाचा वापर करून कृतियुक्त, वर्णनात्मक व कालदर्शक शब्दांचा हेतुपुरस्सर वापर करतो. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | अ) परिचित वस्तू, अनुभव मांडण्यासाठी योग्य शब्दांची निवड करण्यास मदत होईल |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | अ) शब्द मांडणी योग्य करतो की नाही, भावना योग्य शब्दांत सांगता येतात का हे निरीक्षण करावे. |

## आधारशिला कृती क्र:4 Free Picture Book / Story Book Reading Time

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **गोष्ट वाचूया.** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **मोठे चित्र असलेले पुस्तक** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • ताईंनी बालकांना आपल्या जवळ बसवून गोष्ट सांगावी.<br>• गोष्ट सोप्या भाषेत किंवा बालकांच्या बोलीभाषेत असावी.<br>• गोष्टीचा कालावधी ५-६ मिनिटे इतका असावा.<br>• गोष्ट सांगताना आवाजाचा चढउतार करत, हावभावांसह गोष्ट सांगावी. | | • वयोगटाप्रमाणे पुस्तकांमधील काही सामान्य शब्दांवर चर्चा करा. उदाहरणार्थ, आकाशात खूप काळेकाळे ढग दाटून आले. |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| **कृती**<br>• ताईने बालकांना आवडतील अशी मोठमोठी चित्रे असलेली गोष्टींची पुस्तके द्यावीत.<br>• एका पानावर एक वाक्य आणि मोठे चित्र असे पुस्तक दयावे.<br>• बालकांना त्यांची स्वतःची पुस्तके निवडू दयावीत. बालकांना पुस्तके वाचण्यासाठी त्यातील चित्रांची नावे सांगावीत, चित्राद्वारे नावे वाचावीत.<br>• बालकांना पुस्तके वाचण्याचे नाटक करू दयावे, पुस्तकातील पाने उलटा काय गोष्ट आहे ते वाचा. अशाप्रकारे बालकांना पुस्तके वाचण्यास प्रवृत्त करावे.<br>• गोष्टीशी संबंधित प्रश्न विचारून बालकांना बोलते करावे.<br>• बालक जे पुस्तक वाचत आहेत त्याबद्दल बोला जसे की, "तुम्ही कोणते पुस्तक वाचत आहात? गोष्टीत कोण आहे? काय आहे? या चित्रात काय काय दिसत आहे. याबद्दल चर्चा करावी.<br>• बालकांच्या वाचनाच्या प्रयत्नांची कौतुक करावे. | | • बालकांना पुस्तकांमध्ये गुंतण्याची संधी दयावी.<br>• पुस्तकाचे वाचनगटातील सगळया बालकांबरोबर एकत्रित घ्यावे.<br>• एकमेकांसोबत एक पुस्तक.<br>• पुस्तकाबद्दल चर्चा करावी. जसे की 'पुस्तकाचे शीर्षक/नाव कुठे आहे?', 'पुस्तक कोणी लिहिले आहे?' 'कथा/गोष्ट कशाची आहे?', 'कोणते तुम्हाला पात्र आवडते?', 'आपण पुस्तक डावीकडून उजवीकडे किंवा उजवीकडून डावीकडे कसे वाचू शकतो? |
| **विविधता** | मोठमोठी चित्रे असलेली गोष्टीची पुस्तके, विविध मुखवटे, पपेट, कळसूत्री पराज बाहुल्या, तंत्रज्ञानाचा वापर करून विविध गोष्टी सांगाव्या. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, परिसर, पाऊस-पाणी, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन. | |
| **ताईसाठी सूचना** | आपल्याकडे उपलब्ध असलेल्या मोठ्या आकाराच्या चित्रपुस्तकांच्या संग्रहातील चित्रपुस्तक घ्यावे. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-10 बालके भाषा एक L1 मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.<br>C-10.5 स्वतःहून पात्रांची ओळख, कथाबीज व लेखकाला जे सांगायचे आहे ते समजून कथा वाचतात व त्याचा अर्थ समजून घेतात.<br>अ) LO 10.5.1 प्रकटवाचन ऐकतो आणि ताईंनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतो.<br>ब) LO 10.5.2 चित्र पुस्तके वाचतो आणि कृती व वस्तू ओळखतो.<br>ब) LO 10.5.1 शिक्षकांसोबत सहभागी वाचनात भाग घेतो आणि वाचलेल्या भागाविषयीच्या चर्चेत सहभागी होतो.. | |

| | | |
|---|---|---|
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | अ) श्रवण विकास, अभिव्यक्ती विकास, भावनात्मक विकास, अनुभव मांडण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होईल, गोष्टीतील घटनाक्रम सांगणे. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) स्वतःच्या शब्दांत गोष्टी सांगता येतात का ते पाहावे, कथेतील घटनाक्रम लक्षात ठेवून सांगतो की नाही याचे निरीक्षण करावे. | |
| | | |
| **आधारशिला कृती क्र. 5. Croft your own creative stories.** | | |
| **उपक्रमाचे नाव** | **गोष्ट सांगूया.** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **गोष्टीची पुस्तके, गोष्टीचा घटनाक्रम असलेली चित्रे** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • ताईने बालकांना त्यांच्या वयोगटाला अनुसरून, गोष्ट ऐकवावी. कथा छोटी आणि रंजक असावी. कथा निवडताना त्यातील पात्रे, घटना परिचित असाव्या.<br>• ही गोष्ट बालकांच्या बोलीभाषेतील असावी.<br>• बालकांना मधूनमधून प्रश्न विचारून कथानक, गोष्टीतील पात्रे, घटना यांचे स्मरण राहते आहे का हे पाहावे.<br>• सांगितलेली गोष्ट बालकांना परत सांगण्यास प्रोत्साहित करावे. त्यासाठी सुरुवातीला काय झाले?<br>• मग काय झाले? नंतर काय घडले? कोण भेटले? असे प्रश्न विचारावेत,<br>• बालकांना चित्रकार्ड देऊन त्यावरून गोष्ट प्रोत्साहित करावे | • ताईने बालकांना एक गोष्ट ऐकवावी. बालकांनी ऐकलेली गोष्ट स्वभाषेत क्रमशः सांगण्यास सांगावे. यासाठी बालकांना प्रश्न विचारावेत. आवश्यकता असल्यास ताईने मदत करावी.<br>• ऐकलेली गोष्ट त्याच पात्रांसकट तशाच क्रमाने बालकाने सांगितली पाहिजे, असा अट्टाहास न धरता बालकाला त्याच्या भाषेत, त्याला वाटते तशी गोष्ट सांगू दयावी.<br>• बालकांना त्यावरून चित्रकार्डे देऊन गोष्ट प्रोत्साहित करावे. | (बालकांना परिचित असणाऱ्या गोष्टी सांगाव्या. उदाहरणार्थ, टोपीवाला आणि माकडे)<br>• ताईने बालकांना गोष्ट सांगून तीच गोष्ट क्रमाने सांगण्यास प्रोत्साहित करावे.<br>• ऐकलेल्या गोष्टीत कोण कोण होते, असे विचारावे.<br>• गोष्टीतील पात्रे एकमेकांशी काय काय बोलतात असे विचारावे.<br>बालकाना चित्रकार्ड देऊन त्यावरून त्यांची स्वतः बनवलेली गोष्ट सांगण्यास प्रोत्साहित करावे.<br>• बालकांना ताईने अर्धी गोष्ट पूर्ण करण्यासाठी सांगावे. ताईने बालकांना नवीन गोष्ट अर्धी सांगावी. गोष्टीत पुढे काय घडेल, काय वाटते हे बालकांना सागण्यास सांगावे. प्रत्येक बालकाला समान संधी दयावी |
| **विविधता** | ऐकलेल्या गोष्टींचे सादरीकरण घटनाक्रम असलेली वेगवेगळी चित्रे दाखवून गोष्ट सांगण्यास सांगावी. | |
| **थीम/विषय** | पाऊस-पाणी, भाज्या व फळे, वनस्पती आणि फुले, प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, वाहन (आकार), मदतनीस | |

| | | |
|---|---|---|
| **ताईसाठी सूचना** | यासाठी आपल्या कल्पकतेने आपल्याकडे उपलब्ध असलेली चित्रकार्ड, फ्लॅशकार्डे, पपेट, नाट्यीकरण यांचा वापर करावा. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-9 बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवादकौशल्ये विकसित करतात.<br>C-9.5 कथनं केलेल्या/वाचलेल्या गोष्टी समजून घेतो आणि त्यातील पात्रे, गोष्टींची मध्यवर्ती कल्पना आणि लेखकाला काय सांगायचे आहे ते लक्षात घेतो.<br>अ) LO 9.5.1 अल्प कालावधीसाठी छोट्या गोष्टी लक्षपूर्वक ऐकतो (५-७ मिनिटे)<br>ब) LO 9.5.1 गोष्टीतील पात्रे व काही प्रसंग आठवतो ते स्वतःच्या भाषेत सांगतो.<br>क) LO 9.5.1 गोष्टीची सुरुवात, मध्य व शेवट लक्षात घेऊन गोष्ट स्वतःच्या शब्दांत सुसंगतपणे सांगतो, गोष्ट सांगताना पथदशा गोष्टीतील महत्त्वाच्या शब्दांचा वापर करतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | अ) गोष्टीतील घटनाक्रम सांगणे, श्रवण, भावनात्मक विकास इत्यादीमध्ये वाढ होण्यास मदत होईल. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) ऐकलेली गोष्ट स्वभाषेत आणि घटनाक्रमाने सांगता येते की नाही हे पाहावे. याचबरोबर गोष्टीत नवी पात्रे, नव्या घटना बालकाने घातल्या, तर त्याचेही निरीक्षण करावे. | |
| | | |
| **आधारशिला कृती क्र.: 6.Animals around us: Identify and describe common animals.** | | |
| **उपक्रमाचे नाव** | प्राणी, पक्षी, कीटक ओळखूया. | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | प्राणी, प्राण्यांची घरे, त्यांची पिले यांची चित्रकार्डे, बोटातील पपेट. | |
| **प्राणी, प्राण्यांची घरे, त्यांची पिले यांची चित्रकार्डे.** | प्राणी, पक्षी यांचे कटआउट | प्राणी, प्राण्यांची घरे, त्यांची पिले यांची चित्रकार्ड |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • छोटे गट तयार करून बालकांना चित्रे, चित्रकार्डे दयावीत.<br>• बालकांच्या असणा-या अवतीभोवती प्राण्यांविषयी बोलण्यास चालना दयावी.<br>• पाळीव प्राणी आणि उपयुक्त प्राण्यांमधील फरक, साम्य सांगण्यास प्रेरणा दयावी. चर्चा घडवून आणावी. | • बालकांना छोट्या गटात विभागावे.<br>• प्राणी, पक्षी आणि कीटक यांची चित्रे बालकांना द्यावे.<br>• बालकांना चित्राचे निरीक्षण करून, काय दिसते, ते सांगण्यास सांगावे.<br>• प्राणी, पक्षी, कीटक असे वर्गीकरण करण्यास बालकांना प्रोत्साहन दयावे.<br>• प्राणी, पक्षी, कीटक हे मानवापासून वेगळे कसे, यावर ताईने बालकांमध्ये चर्चा घडवून आणावी. | • बालकांचे घर ते अंगणवाडीपर्यंत येताना कोणकोणते प्राणी, पक्षी पाहिले यावर मुक्त चर्चा घडवून आणावी.<br>• अपरिचित प्राणी, पक्षी ओळखण्यास ताईने प्रोत्साहन दयावे.<br>• जंगलातील प्राणी आणि पाळीव प्राणी यांवर ताईने चर्चा घडवून आणावी. बालकांना प्राण्यांबद्दल माहिती सांगून ते जंगलातील आहेत की पाळीव, असे विचारावे व प्रश्नोत्तरे स्वरूपात चर्चा घडवून आणावी.<br>• हे प्राणी मानवापासून वेगळे कसे, यावर चर्चा घडवून आणावी. प्राणी, पक्षी अंघोळ कशी करत असतील, प्राणी, पक्षी आजारी |

| | | |
|---|---|---|
| | | पडल्यावर काय करत असतील, अशा स्वरूपांचे प्रश्न विचारून चर्चा घडवून आणावी.<br>• प्राण्यांचे खाद्य, त्यांचे घर, त्यांची पिले, प्राणी आणि पक्षी यांतील फरक याची बालकांना ओळख करून द्यावी. |
| **विविधता** | बालकांना भूमिकाभिनय करण्यास दयावे. बालकांना त्यांच्या आवडीचे पात्र भूमिका करण्यास संधी दयावी. गोष्टीचा क्रम लावण्यास सांगणे. गोष्टीचा क्रम लावताना चित्र माध्यमाचा वापर करता येईल.<br>प्रकल्पाला अनुसरून चित्रे घेऊन सर्व प्रकल्पांसाठी ही कृती वापरावी. उदाहरणार्थ, घरातील वस्तू ओळखूया. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| **थीम/विषय** | प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, | |
| **ताईसाठी सूचना** | वरील सर्व कृती करून घेतल्यावर आपल्याकडे यासंबंधी उपलब्ध<br>वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.1 वेगवेगळया वर्गातील / गटांतील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध याचे निरीक्षण करतात व समजून घेतात.<br>अ) LO. 7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना या इतरांच्या मदतीने नावांसहित ओळखतो.<br>ब) LO 7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इ. नावासह ओळखून स्वतः त्याचे वर्णन करतो.<br>क) LO 7.1.1 लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती, चित्रे ओळखतो. त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (घराचा मोठा दरवाजा) | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | अ) बालकांना प्राणी, पक्षी, कीटक यांचे वर्गीकरण करता येते. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) बालके परिसरातील परिचित प्राणी, पक्षी, कीटक यांचे निरीक्षण करून कसे व्यक्त होतात याचे निरीक्षण करावे.<br>ब) बालकांनी केलेले निरीक्षण ते योग्य शब्दांत व्यक्त करतात काय, याचे निरीक्षण करावे.<br>क) बालकांच्या स्मरणशक्तीचे, कल्पनाशक्तीचे निरीक्षण करावे. बालकांच्या उच्चारांचे निरीक्षण करावे. | |
| | | |
| | | |

<table>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. :7. Colours around us: Identify, Find and Sort.</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">रंग ओळखूया.</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य</td></tr>
<tr><td>वेगवेगळया रंगांच्या वस्तू ठोकळे, खडू, कागद, पेन, कापडाचे तुकडे, स्केच पेन इत्यादी</td><td>ओले रंग निळा, पिवळा, लाल, केशरी, हिरवा, जांभळा या रंगाच्या वस्तू</td><td>लाल, निळया, पिवळया रंगांच्या वेगवेगळया छटा असलेल्या वस्तू,</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• बालकांना वर्गात वेगवेगळया मूळ रंगांच्या वस्तू दयाव्यात.<br>किंवा घरून एकेका बालकाला एकेका रंगाची वस्तू आणायला सांगावे.<br>• त्या वस्तू वर्गात विखरून ठेवाव्यात.<br>• पळा पळा पळा थांबा हा खेळ घेऊन बालके थांबल्यावर त्यांना एका रंगाचे नाव सांगून त्या रंगाच्या वस्तू एका वर्तुळात ठेवायला सांगावे.<br>• सर्वांनी वर्तुळात त्या रंगाच्या वस्तू ठेवल्यावर त्या परत वर्गात विखरून ठेवाव्यात.<br>• पुन्हा खेळ सुरू करून दुसरा रंग सांगावा.</td><td>• सर्व रंग बालकांसमोर ठेवावे.<br>मूळ आणि मिश्र रंग बालकांना ओळखण्यास सांगावे.<br>• आपण दिलेले रंग त्यांना आजूबाजूला, परिसरात कोठे दिसतात, हे सांगण्यास प्रोत्साहन दयावे.<br>• रंगांचा परिचय झाल्यावर वैयक्तिक आणि गटांमध्ये रंग ओळखण्याची कृती करून घ्यावी.<br>•ओळखलेल्या रंगांचे गट तयार करून घ्यावे.<br>• बालकाला रंग आणि त्यासंबंधित वस्तू ओळखण्यास, आठवण्यास सांगावे.</td><td>• सर्व रंग बालकांसमोर ठेवावे. मूळ आणि मिश्र रंग तसेच त्यांच्या फिकट आणि गडद छटा बालकांना ओळखण्यास सांगावे.<br>• आपण दिलेले रंग त्यांना आजूबाजूला, परिसरात कोठे दिसतात, हे सांगण्यास प्रोत्साहन दयावे.<br>• रंगांचा परिचय झाल्यावर वैयक्तिक आणि गटांमध्ये रंग ओळखण्याची कृती करून घ्यावी.<br>•ओळखलेल्या रंगांचे गट तयार करून घ्यावे.<br>• बालकाला रंग आणि त्यासंबंधी पद वस्तू ओळखण्यास, आठवण्यास सांगावे,</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">कागदाचे विविध भौमितिक आकार कात्रीने कापण्यास सांगणे व त्याचे कोलाज निसर्गचित्र तयार करून घेणे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">भाज्या व फळे, वनस्पती आणि फुले, प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, ऋतू (कपडे), वाहन (आकार),</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">रंग ओळखून त्यासंदर्भात रंगाच्या जोड्या जुळविणे, वर्गीकरण करणे यासारख्या कृतीपत्रिका सोडवून घ्याव्यात.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.<br>C-2.1 आकार, रंग आणि त्याच्या छटा यांमधील फरक ओळखतो.<br>अ) LO 2.1.1 मूळ प्राथमिक रंग (लाल, निळा आणि पिवळा) आणि परिसरातील इतर रंग यांच्यातील फरक ओळखतात आणि त्यांची नावे सांगतात. (काळा, पांढरा, तपकिरी इत्यादी.</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">ब) LO 2.1.1 मूळ प्राथमिक व दुय्यम रंगांमधील छटा यातील फरक ओळखतात.<br>उदाहरणार्थ: फिकट निळा, गडद निळा, फिकट हिरवा, गडद हिरवा.<br>क) LO 2.1.1 दोन रंग मिसळल्यावर एकत्र केल्यावर कोणता नवीन रंग तयार होईल याचा अंदाज लावण्याचा प्रयत्न करतात. (उदाहरणार्थ, निळा आणि पिवळा एकत्र</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | केल्यावर हिरवा दिसतो आणि लाल आणि पांढरा एकत्र केल्यावर गुलाबी दिसतो.) | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | अ) संभाषण, वर्गीकरण, विश्लेषण, निर्णयक्षमता, तर्कक्षमता, कार्यकारणसंबंध, रंगज्ञान, शोधकवृत्ती. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) विशिष्ट रंग आणि आकाराच्या वस्तू ओळखता येतात का ? व वेगळया करता येतात का हे पाहावे. | |
| | | |
| **आधारशिला कृती क्र.: 8. Shapes around us: Identify, Find ond Sort.** | | |
| **उपक्रमाचे नाव** | आकारांची ओळख करून देणे | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | | |
| वर्तुळ, त्रिकोण, चौकोन यांची फ्लॅश काईस किंवा कटआऊट्स घ्यावे. त्याच ट्रेमध्ये बांगड्या, त्रिकोणी व चौकोनी पुठ्ठा, ताट, बटणे, त्रिकोणी आकाराचे फोमचे तुकडे, पुढे, चोळीचा त्रिकोनी खण असलेले चित्र, ताटली, लाकडी ठोकळयांमधील / रंगोमेटरी तुकडे. | वर्तुळ, त्रिकोण, दंडगोल, चौरस, लंबवर्तुळ, आयत, चांदणी या आकारांचे फ्लॅशकाईस किंवा कटआऊट, विविध आकारांच्या वस्तू-मोठ्या आकाराची बटणे, झाकणे, कपाळाला लावायची मोठ्या आकाराची टिकली, ताटली, चौरस आणि आयत कागदाचे किंवा पुठ्ठ्यांचे तुकडे, आयताकृती पिशवी, पतंग, वर्तमानपत्राची घडी, रुमाल, वही, त्रिकोणी पताका, हँगर, अंडे, पायपुसणे, बॅडमिंटन रॅकेट, चांदणीसाठी त्या आकाराचे वेगवेगळे कटआऊट्स, ओरिगामी कागदाच्या विविध आकाराच्या घड्या. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती : आकार व वस्तूची जोडी लावणे.<br>(या वयोगटाला फक्त वर्तुळ, त्रिकोण, चौरस हे तीनच आकार शिकवावेत.) | कृती : आकाराचे खेळ<br>कृती १<br>• बालकांना विविध आकारांचे कटआऊट्स हाताळायला दयावे | कृती : आकाराचे खेळ कृती १<br>बालकांना विविध आकारांचे कटआऊट दयावे व प्रत्येक आकाराला किती |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • बालकांना बसवावे. ताईने ट्रेमध्ये वर्तुळ, त्रिकोण, चौकोन यांचे फ्लॅश कार्डस किंवा कटआऊट घ्यावे. त्याच ट्रेमध्ये बांगड्या, खोके, झाकण, बटणे, त्रिकोणी- पेन्सिलचे रिकामे खोके, सामोसा असलेले चित्र, ताटली, लाकडी ठोकळयांमधील / रंगोमेटरी तुकडे घ्यावेत व वर दिलेले इतर साहित्य घ्यावे.<br>• बालकांना एका वेळी एका आकाराचा कटआऊट किंवा क फ्लॅशकार्ड हाताळायला द्यावा. आकाराच्या कडेवरून बोटे फिरवण्यास उत्तेजन द्यावे. त्या आकाराचे नाव सांगावे. | • वर्तुळ, चौकोन, त्रिकोण हे आकार सारखेच आहेत का, त्यात काही फरक आहे, हे बालकांना विचारावे. काय फरक आहे, हे एक एक करून बालकांना विचारावे.<br>• चौकानाला ४ टोके आहेत, वर्तुळाचा आकार घेऊन त्याला टोके नाहीत, हे सांगावे. त्रिकोणाला किती टोके आहेत, हे मोजायला सांगावे.<br>कृती २<br>आधीच्या पद्धतीने लंबवर्तुळ, आयत व चांदणी या आकारांची ओळख करून द्यावी व त्या आकाराच्या वस्तू ट्रेमध्ये | कडा/बाजू आहेत आणि किती कोन आहेत यावर बोलावे. त्यांना कटआऊटला स्पर्श करून, त्याचा अनुभव घेण्यास सांगावे.<br>कृती २<br>• बालकांना वर्तुळात उभे करावे. ट्रेमध्ये विविध आकारांच्या वस्तू मांडाव्यात. खंजिरी वाजवावी. तेव्हा बालकांनी वर्तुळात पळावे. खंजिरी वाजवायची थांबवून ताईंनी एका आकाराचे नाव घ्यावे. त्या आकाराची वस्तू ट्रेमध्ये ठेवलेल्या वस्तूंमधून बालकांनी शोधून आणावी व ताईला दयाव्यात. सर्व बालकांना पुरतील एवढ्या वस्तू ट्रेमध्ये ठेवाव्यात. |

| | | |
|---|---|---|
| • ट्रेमधील वस्तू बालकांच्या समोर ठेवाव्यात व एका एका बालकाला जो आकार शिकवला असेल, त्या आकाराच्या वस्तू शोधून काढण्यास सांगावे. उदाहरणार्थ, वर्तुळ - बांगडी, ताटली; चौकोनी-खोके. | ठेवलेल्या वस्तूंमधून शोधायला सांगावे. | |
| **विविधता** | बालकांना रांगोळीमध्ये किंवा वाळूमध्ये विविध आकार काढण्यास सांगावे.<br>बालकांनाविविध आकार सांगून, त्या आकाराच्या वस्तू घरून घेऊन येण्यास सांगावे.<br>बालकांना खडूने विविध आकार काढण्यास सांगावे. | |
| **थीम/विषय** | भाज्या व फळे, वनस्पती आणि फुले, वाहन (आकार), | |
| **ताईसाठी सूचना** | आकाराची ओळख होण्यासाठी वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| | C-8.12 राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संकल्पनांचे आकलन होण्यासाठी आणि संकल्पना व्यक्त करण्यासाठी सुयोग्य व पुरेशी शब्दसंपत्ती विकसित करतो.<br>अ) LO 8.12.1 आकारांची नावे व त्यांचे काही गुणधर्म सांगतो.<br>ब) LO 8.12.1.1 संख्यानामे आणि आकारांच्या नावांचा उपयोग करून साध्या सूचनांचा अर्थ लावतो.<br>ब) LO 8.12.2 संख्यानामे, आकारांच्या नावांचा योग्य प्रकारे उपयोग करतो.<br>क) LO 8.12.1 योग्य मापन क्रियेसाठी संख्या, आकारनामे व क्रिया यांचा उपयोग करतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | अ) आकारांची नावे व त्यांचे काही गुणधर्म सांगतात, प्रभावी संवाद, साक्षरताविषयक कौशल्ये माहिती, चिकित्सक विचार. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) दिलेले आकार ओळखता येतात का याचे निरीक्षण करावे. परिसरातील दिसणाऱ्या आकाराचे नाव घेतात का, हे बघावे. | |
| | | |
| **आधारशिला कृती क्र.:8.1 Shapes around us: Identify, Find and Sort.** | | |
| **उपक्रमाचे नाव** | आकारांच्या जोड्या लावूया. | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | | |
| **खडू, वाळू, माती, रांगोळी** | आकारांचे कटआउट्स वर्तुळ, त्रिकोण, लंबवर्तुळ, चौरस, आयत, चांदणी या आकारांचे फ्लॅशकाईस किंवा कटआऊट्स, | वर्तुळ, त्रिकोण, लंबवर्तुळ, चौरस, आयत, चांदणी या आकारांचे फ्लॅशकार्ड्स किंवा कटआऊट्स, प्रत्येक आकाराच्या वस्तू- |

| | | |
|---|---|---|
| | प्रत्येक आकाराच्या वस्तू - मोठ्या आकाराचे बटण, झाकण, टिकली इत्यादी | मोठ्या आकाराचे बटण, झाकणे, कपाळाला लावायची मोठ्या आकाराची टिकली ताटली, चौरस आणि आयत कागदाचे किंवा पुठ्ठ्याचे तुकडे, आयताकृती पिशवी, पतंग, वर्तमानपत्राची घडी, रुमाल, वही, त्रिकोणी पताका हँगर, अंडे पायपुसणे, बॅडमिंटन रॅकेट, चांदणीसाठी त्या आकाराचे वेगवेगळे कटआऊट्स वापरावेत. |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • बालकांना रांगोळीमध्ये किंवा वाळूमध्ये विविध आकार काढण्यास सांगावे.<br>•जमिनीवर काही मोठी वर्तुळे, चौकोन व त्रिकोण काढावे. ताईने एका आकाराचे नाव घ्यावे व बालकांना त्या आकारामध्ये उडी मारण्यास सांगावे.<br>•वरील कृतींचा सराव झाल्यावर ताईने बालकांना त्यांतील फरक विचारावा. | कृती : आकाराचे खेळ<br>• ताईने वर्गाच्या बाहेर समोरासमोर दोन रेषा काढाव्यात. एका रेषेवर वर्तुळ, त्रिकोण, चौकोन आकाराच्या १५: ते २० वस्तू ठेवाव्यात.<br>• दुसऱ्या रेषेवर त्यातील वस्तू ठेवण्यास सांगव्यात. उदाहरणार्थ, ४ बांगड्या समोरच्या रेषेवर ठेवून ये, २ चौकोनाच्या वस्तू रेषेवर ठेवून ये, ५ त्रिकोणाच्या वस्तू समोरच्या रेषेवर ठेवून ये.<br>कृती २<br>•जमिनीवर काही त्रिकोणी, वर्तुळाकृती, चौकोनी आकार काढावे व ते एका रेषेने जोडून असा मजेचा खेळ तयार करावा. त्यानंतर बालकांकडून कृती करून घ्यावी.<br>• वर्तुळात दोन उड्या मार, त्रिकोणात तीन उड्या मार, चौकोनात टाचेवर चालत जा.<br>• मधल्या रेषेवर टाचेला दुसऱ्या पायाची बोटे जोडून चालत जा. अशा प्रकारे एकेका बालकांकडून कृती करून घ्यावी | कृती : आकाराचे खेळ<br>• दिलेल्या मोठ्या चौकोनी आकारात (आयताकार) छोटे चौकोन ठेवण्यास सांगावे.<br>• चौकोन पूर्ण भरण्यास किती चौकोन लागले हे विचारावे.<br>• गरज भासल्यास ठेवण्यास मदत करावी. चौकोन<br>• ताईने बालकांना वर्गाच्या बाहेर न्यावे. बालकांना एकमेकांचे हात धरून मोठे वर्तुळ करण्यास सांचे. वर्तुळ करून झाल्यावर हात सोडण्यास सांगावे.<br>• ताईने बालकांच्या मोठ्या वर्तुळाच्या आत एक लहान वर्तुळ काढून त्यात विविध आकारांचे तुकडे ठेवावेत.<br>• खेळ सुरू करण्याआधी सूचना दयाव्यात.<br>• ताईने टाळ्या वाजवायला - सुरुवात केली, की मोठ्या वर्तुळावर पळायचे आहे.<br>• ताईने टाळ्या वाजवणे बंद केले, की ताईने सांगावे. ३ चौकोन उचल, ४ वर्तुळ उचल, ६ त्रिकोण उचल, २ वर्तुळ उचल अशा प्रकारे हा खेळ पूर्ण करावा. (बालकांच्या संख्येनुसार आकारांचे प्रमाण असावे.) |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| | | किमान १५ ते २० आकारांचे तुकडे घ्यावेत.) बालकांना असे आकार खेळण्यासाठी दिल्यास आकार आणि संख्यानामे लक्षात राहण्यासाठी मदत होईल. |
| **विविधता** | अ) बालकांना विविध आकार सांगून घरून त्या आकाराच्या वस्तू घेऊन येण्यास सांगा. | |

| | |
|---|---|
| | ब) बालकांना खडूने विविध आकार काढण्यास सांगा. |
| **थीम/विषय** | भाज्या व फळे, वनस्पती आणि फुले, वाहन (आकार), |
| **ताईसाठी सूचना** | आकाराची ओळख होण्यासाठी वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.12 राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संकल्पनांचे आकलन राज शेक्षणि होण्यासाठी आणि संकल्पना व्यक्त करण्यासाठी सुयोग्य व पुरेशी शब्दसंपत्ती विकसित करतो.<br>अ) LO 8.12.1 आकारांची नावे व त्यांचे काही गुणधर्म सांगतात.<br>व) LO 8.12.1.1 संख्यानामे आणि आकारांच्या नावांचा उपयोग करून साध्या सूचनांचा अर्थ लावतात.<br>ब) LO 8.12.2 संख्यानामे, आकारांच्या नावांचा योग्य प्रकारे उपयोग करतात.<br>क) LO 8.12.1 योग्य मापन क्रियेसाठी संख्या, आकारनामे व क्रिया यांचा उपयोग करतो. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | अ) आकारांची नावे व त्यांचे काही गुणधर्म सांगतात, प्रभावी संवाद, साक्षरताविषयक कौशल्ये माहिती, चिकित्सक विचार. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) दिलेले आकार ओळखता येतात का, याचे निरीक्षण करावे. परिसरातील दिसलेल्या आकारांची नावे घेतात का, हे बघावे |

## आधारशिला कृती क्र. : 9. Exploring my Anganwadi Centre

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **प्रत्येक वस्तूला जागा व प्रत्येक वस्तू जागेवर.** |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **अंगणवाडीत सर्वसाधारणपणे असणारे साहित्य** |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| • डबा, बाटली, चप्पल या वस्तूंच्या नियोजित ठिकाणी ताईने चित्रे किंवा स्टिकर्स लावावीत.<br>• बालके वर्गात आल्यानंतर ताईने त्यांना एकत्र बसायला सांगावे.<br>• ताईने डबा, बाटली हातात घेऊन तसेच पायात बूट घालून उभे राहावे.<br>• ताईने चप्पल काढण्याच्या जागी जाऊन चपला ठेवाव्या. तसेच डबा, बाटली यांच्यासाठी ठरवलेल्या जागी त्या त्या वस्तू नेऊन ठेवाव्यात, हे करत असताना आपण काय करतो आहोत, ते ताईने | • ताईने बालकांना एकत्र बसवावे एका वेळी अंगणवाडीमध्ये उपलब्ध असलेल्या चमचा, वाटी, ताट, खेळणी अशा परिचित वस्तूंची नावे घेऊन वैयक्तिक आणि गटाने आणण्यास सांगावे.<br>• एका वेळी एका बालकाला तुझा 'डबा घेऊन ये, डबा जागेवर नेऊन ठेव' अशा सूचना द्याव्या. प्रत्येक बालकाला संधी देत विविध वस्तू जागेवरून घेण्याची आणि नेऊन ठेवण्याची कृती करून श घ्यावी. जेणेकरून अंगणवाडीमधील गोष्टींचा कळतनकळत परिचय | • ताईने अंगणवाडीतील वस्तू बालकांना दाखवून त्यांच्या उपयोगाबद्दल चर्चा करावी.<br>• ताईने प्रत्येक वस्तूचा वापर कसा करावा याबद्दल कृती करून दाखववावी. उदाहरणार्थ, बाटलीचे झाकण कसे उघडावे-कसे बंद करावे, वस्तू योग्य जागी नीट कशा ठेवाव्या, नळ कसा बंद करावा. हात पुसल्यावर नॅपकिन कुठे ठेवावा. तसेच वस्तूंची फेकाफेक केली, तर काय पद होईल? वस्तू नीट हाताळल्या, तर काय होते? अशा प्रकारची चर्चा बालकांबरोबर |

| | | |
|---|---|---|
| सांगावे. उदाहरणार्थ, 'येथे चप्पल असे लिहिले आहे. चपलांचे स्टीकर लावले आहे. आता मी येथे चपला ठेवते.'<br>• ताईने बालकांना त्यांच्या वस्तू ठरवलेल्या जागी ठेवण्याच्या सूचना दयाव्या. तसेच वस्तू ठेवताना तिथे लावलेली चित्रे किंवा स्टिकर्स बालकांना दाखवावी. जेथे जे चित्र आहे तेथेच ती वस्तू ठेवा असेही सांगावे. | होईल | करावी. |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| **विविधता** | अ) रोज वर्गात आल्यावर, जेवणानंतर ताईने प्रत्येक बालकाकडून वरील कृती करून घ्यावी.<br>बालके वर्गात वापरत असणाऱ्या वस्तूंच्या जागा ठरवाव्या आणि त्या ठिकाणी स्टिकर/चित्रे लावून बालकांना त्याची ओळख करून द्यावी. उदाहरणार्थ, खेळणी ठेवण्याच्या जागा, पुस्तके ठेवण्याच्या जागा इत्यादी.<br>ब) वर्गातील विविध साहित्य बाटली, डबा, पुस्तके, खेळणी एकत्र करावी. बालकांना साहित्याभोवती बसवावे. बालकांना योग्य जागी योग्य वस्तू ठेवण्यास सांगावे.<br>क) रोज वर्ग आवरण्याच्या कामात बालकांना सामावून घ्यावे.<br>ड) बालकांच्या पाण्याच्या बाटल्या व दप्तरे एकत्र ठेवावीत व त्यांना घरी जायच्या वेळी स्वतःच्या वस्तू व दप्तरे घेण्यास सांगावे. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब व परिसर | |
| **ताईसाठी सूचना** | बालकांना स्वतःच्या वस्तू ओळखण्यास व त्या व्यवस्थित ठेवण्यास प्रोत्साहन दयावे. यासंदर्भाने वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता वअध्ययन निष्पत्ती** | CG1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>C-1.3 वर्ग, शाळा व परिसर इत्यादी स्वच्छ आणि नीटनेटका ठेवतो.<br>अ) LO 1.3.1 स्वतःच्या वस्तू जसे की, पिशव्या, बाटल्या, बूट, रुमाल इत्यादी यांच्याबद्दल सजग असतो.<br>ब) LO 1.3.1 स्वतःच्या वस्तू योग्य जागी ठेवतो आणि योग्य जागेवरून घेतो.<br>क) LO 1.3.1 स्वतःच्या वस्तूंची चांगल्या प्रकारे देखभाल करतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | अनुकरण, नीटनेटकेपणा, स्वावलंबन, वस्तूचे मूल्य जाणणे. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकांना वस्तू ओळखता येतात का, त्या नीटनेटक्या ठेवतात का, वस्तूंची काळजी घेतात का, ठरलेल्या जागी व्यवस्थित ठेवतात का याचे निरीक्षण करावे. दिलेल्या सूचना समजतात का, हे पाहावे. | |
| | | |
| | | |

| आधारशिला कृती क्र.: 9.1 Exploring my Anganwadi Centre | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | वस्तू जागेवर ठेवूया. | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | अंगणवाडीत सर्वसाधारणपणे असणारे साहित्य : बाहुली, भातुकली गोष्टींची पुस्तके, चित्रकार्डे इत्यादी. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • बालके वर्गात वापरत असणाऱ्या वस्तूंच्या जागा ठरवाव्या आणि त्या ठिकाणी स्टिकर/चित्रे लावून बालकांना त्याची ओळख करून दयावी.<br>• उदाहरणार्थ, खेळणी, पुस्तके, पाण्याची बाटली इत्यादी ठेवण्याच्या जागा.<br>• ब) रोज वर्ग आवरण्याच्या कामात बालकांना सामावून घ्यावे. | • अंगणवाडीमध्ये बाहुलीघर, वाचन कोपरा, कलेचा कोपरा असे कोपरे तयार करावेत. प्रत्येक कोपऱ्यामध्ये योग्य त्या वस्तू ठेवाव्यात. उदाहरणार्थ, बाहुलीघरामध्ये भातुकली, वाचन कोपऱ्यांमध्ये पुस्तके व चित्रकार्डे.<br>• बालकांना अंगणवाडीतील ताईची भूमिका देऊन त्याप्रमाणे अभिनय करण्यास प्रोत्साहन द्यावे. अंगणवाडीमध्ये दररोज ताई व मदतनीस ज्याप्रमाणे उपक्रम घेतात तशी नक्कल करण्यास बालकांना प्रोत्साहन द्यावे. | • रोज वर्गात आल्यावर, जेवणानंतर ताईने प्रत्येक बालकाकडून वरील कृती करून घ्यावी.<br>• बालके वर्गात वापरत असणाऱ्या वस्तूंच्या जागा ठरवाव्या आणि त्या ठिकाणी स्टिकर/चित्रे लावून बालकांना त्याची ओळख करून दयावी.<br>• बालकांना अंगणवाडीचे चित्र काढण्यास सांगावे व तिथे रोज काय काय होते, याबाबत चर्चा करून बालकांना त्याबद्दल स्वलिपीमध्ये लिहिण्यास सांगावे. |
| **विविधता** | रोज वर्गात आल्यावर, जेवणानंतर ताईने प्रत्येक बालकाकडून वरील कृती करून घ्यावी. उदाहरणार्थ, खेळणी ठेवण्याची जागा, पुस्तके ठेवण्याची जागा इत्यादी. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब व परिसर, ऋतू (कपडे), वाहन (आकार) | |
| **ताईसाठी सूचना** | बालकांना स्वतःच्या वस्तू ओळखण्यास व त्या व्यवस्थित ठेवण्यास प्रोत्साहन दयावे. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>C-1.3 वर्ग, शाळा व परिसर इत्यादी स्वच्छ आणि नीटनेटका ठेवतो.<br>अ) LO 1.3.1 स्वतःच्या वस्तू जसे की, पिशव्या, बाटल्या, बूट, रुमाल इत्यादीबद्दल सजग असतो.<br>ब) LO 1.3.1 स्वतःच्या वस्तू योग्य जागी ठेवतो आणि योग्य जागेवरून घेतो.<br>क) LO 1.3.1 स्वतःच्या वस्तूंची चांगल्या प्रकारे देखभाल करतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता /कौशल्ये** | अ) अनुकरण, स्वावलंबन, वस्तूचे मूल्य जाणणे, नीटनेटकेपणा | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकाला वस्तू ओळखता येते का, नीटनेटकी ठेवतो का, वस्तूंची काळजी घेतो का, ठरलेल्या जागी व्यवस्थित ठेवतो का याचे निरीक्षण करावे. | |
| | | |
| | | |

| आधारशिला कृती क्र. : 10.. Vegetables Around Us: Identify and name vegetables. | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **खाण्यास योग्य व अयोग्य पदार्थ** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **फळे, पाणी, दूध, चित्रकार्डे, अन्नपदार्थांची चित्रकार्डे इत्यादी** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| (आधी प्रत्यक्ष पदार्थ वापरावेत व संकल्पना समजल्यावर वापरावी.) चित्रकार्डे<br><br>विविध अन्नपदार्थ / त्यांची चित्रकार्डे बालकांचे डबे वर्गात मांडावेत.<br><br>बालकांना प्रत्येक पदार्थाचे नाव विचारून हा पदार्थ आपण खातो का, हे विचारावे. | • बालकाला रोजच्या जेवणातील वेगवेगळ्या प्रकारच्या अन्न- पदार्थांचा प्रत्यक्ष वस्तू दाखवून, त्याची चव देऊन किंवा ते शक्य नसल्यास चित्रपत्त्यांच्या आधारे वस्तूचा परिचय दयावा. उदाहरणार्थ, त्या पदार्थाचे नाव काय, तो पदार्थ कशापासून बनतो, तू कधी खातोस, तुला आवडतो का इत्यादी. | • ताईने बालकांना डब्यात रोज वेगवेगळे पदार्थ आणण्यास सांगावे. पोषक आहार मिळत असेल, तर पालकांना घरी पदार्थ करण्यास सांगावे. उदाहरणार्थ, पालेभाजी, डाळ/वरण/आमटी, भाकरी इत्यादी. |
| **विविधता** | खाऊसंदर्भात काही बडबडगीते म्हणवून घ्यावीत. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब व परिसर, भाज्या व भाज्या व फळ, ऋतू, वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | बालकांना त्यांच्या आवडीचे पदार्थ सांगण्यास सांगावे. त्या पदार्थांची माहिती विचारावी. आपल्याकडील अन्नपदार्थ दर्शविणारे चित्रकार्ड यांचा वापर करावा. बालकाने खाताना उजव्या हाताने खावे. एकच हात वापरावा, अन्न सांडू नये याबाबत प्रात्यक्षिकातून त्यांना सजग करावे | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>C-1.1 पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवतो व अन्नपदार्थ वाया घालवत नाही.<br>अ) LO 1.1.1.2 मोठ्यांच्या सूचनेप्रमाणे वेगवेगळे अन्नपदार्थ खाण्यास सुरुवात करतो व त्यांची नावे सांगतो.<br>ब) LO 1.1.1 मोठ्यांच्या मदतीने वेगवेगळे अन्नपदार्थ खातो (उदाहरणार्थ, धान्य, भाज्या, फळे, डाळी, शेंगा, सुकामेवा (nuts), दुधाचे पदार्थ.<br>क) LO1.1.1 स्वतःहून विविध अन्नपदार्थ खातो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता /कौशल्ये** | अ) संभाषण, वर्गीकरण, विश्लेषण, निर्णयक्षमता, तर्कक्षमता, कार्यकारणसंबंध, सादरीकरण, अभिनय. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) खाण्यायोग्य आणि खाण्यायोग्य नसलेल्या वस्तू वेगळया ओळखू शकतात का?<br>ब) बालके त्यांच्या पोषणास आवश्यक सर्व पदार्थ, सर्व चवी असलेले पदार्थ व्यवस्थित खातात का?<br>क) बालके त्यांच्या पोषणास आवश्यक सर्व पदार्थ, सर्व चवी असलेले पदार्थ व्यवस्थित खातात का? | |

## आधारशिला कृती क्र. : 10.1 Vegetables Around Us: Identify and name of vegetables.

<table>
<tr><td>**उपक्रमाचे नाव**</td><td colspan="2">**काय खातो; काय पितो**</td></tr>
<tr><td>**उपक्रमाला लागणारे साहित्य**</td><td colspan="2">**विविध अन्नपदार्थ, अन्नपदार्थांची चित्रकार्डे.**</td></tr>
<tr><td>**वयोगट ३ ते ४ वर्षे**</td><td>**वयोगट ४ ते ५ वर्षे**</td><td>**वयोगट ५ ते ६ वर्षे**</td></tr>
<tr><td>(आधी प्रत्यक्ष पदार्थ वापरावेत व संकल्पना समजल्यावर चित्रकार्डे वापरावीत.)<br>• ताईने पदार्थाचे नाव सांगून बालकांना 'खातो, खातो', राज 'पितो, पितो' असे म्हणण्याचा खेळ घ्यावा. उदाहरणार्थ, भाजी खातो - खातो, पोळी खातो खातो, पाणी - - पितो पितो, दूध पितो पितो.</td><td>• ताईनी बालकांना वर्तुळाकार बसवून खाण्यायोग्य आणि खाण्यायोग्य नसलेल्या पदार्थांची नावे प्रत्येक बालकाच्या कानात सांगावी. ही नावे ऐकल्यावर तो पदार्थ खाण्यायोग्य आहे किंवा नाही हे ठरवून बालकाने मोठ्याने पदार्थाचे नाव उच्चारावे आणि तो खाण्यास योग्य की अयोग्य ते सांगा सांगावे आणि जागेवर जाऊन बसावे.<br>खाऊचे वर्गीकरण : फरशीवर एक चौकोन आखावा. त्याचे दोन भाग करावे. एका भागात खाण्यायोग्य पदार्थ ठेवण्यास सांगावे. दुसऱ्या भागात खाण्यास अयोग्य असणारे पदार्थ ठेवण्यास सांगावे.</td><td>• ताईनी बालकांना काही पदार्थांची नावे सांगावी.<br>खाण्यायोग्य पदार्थ असल्यास एक टाळी आणि खाण्यायोग्य नसल्यास दोन टाळ्या वाजवण्यास सांगावे.</td></tr>
<tr><td>**विविधता**</td><td colspan="2">खाऊचे नाटक :<br>बालकांना काही पदार्थ प्यावे लागतात, काही पदार्थ चावून खावे लागतात, काही पदार्थ चोखून खावे लागतात. पदार्थांच्या खाण्याबाबतची विविधता बालकांना मूकाभिनयातून दर्शवावी. मूकाभिनयाद्वारे हे गमतीदार सादरीकरण करून घ्यावे.</td></tr>
<tr><td>**थीम/विषय**</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब व परिसर, भाज्या व फळे, ऋतू,</td></tr>
<tr><td>**ताईसाठी सूचना**</td><td colspan="2">बालकांना त्यांच्या आवडीचे पदार्थ सांगण्यास सांगावे. त्या पदार्थांची माहिती विचारावी.<br>बालकाने खाताना उजव्या हाताने खावे. खाण्यासाठी एकच हात वापरावा. सांडू नये याबाबत प्रात्यक्षिकातून सजग करावे.</td></tr>
<tr><td>**अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती**</td><td colspan="2">CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>C-1.1 पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवतात व अन्नपदार्थ वाया घालवत नाहीत.<br>अ) LO 1.1.1.2 मोठ्यांच्या सूचनेप्रमाणे वेगवेगळे अन्नपदार्थ खाण्यास सुरुवात करतो व त्यांची नावे सांगतो.<br>ब) LO 1.1.1 मोठ्यांच्या मदतीने वेगवेगळे अन्नपदार्थ खातो. (उदाहरणार्थ, धान्य, भाज्या, फळे, डाळी, शेंगा, सुकामेवा (nuts), दुधाचे पदार्थ इत्यादी.)<br>क) LO1.1.1 स्वतःहून विविध अन्नपदार्थ खातो.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | अ) संभाषण, वर्गीकरण, विश्लेषण, निर्णयक्षमता, तर्कक्षमता, कार्यकारणसंबंध, | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) खाण्यायोग्य आणि खाण्यायोग्य नसलेल्या वस्तू वेगळ्या ओळखू शकतो का?<br>ब) बालके बालकांच्या पोषणास आवश्यक सर्व पदार्थ, सर्व चवी असलेले पदार्थ व्यवस्थित खातात का? | |
| | | |
| **आधारशिला कृती क्र. : 10.2 Vegetables Around Us: Identify and name of vegetables.** | | |
| **उपक्रमाचे नाव** | **भाज्या ओळखूया आणि खाऊया** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **वेगवेगळ्या भाज्या आणि भाज्यांची चित्रे.** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती १<br>• बालकांना वेगवेगळ्या भाज्या दाखवून, त्यांची नावे सांगावी.<br>कृती २<br>• बालकांना वेगवेगळ्या भाज्या दाखवून त्यांच्या घरी कोणकोणत्या | कृती १<br>कांदे व बटाटे एकत्र करून त्यांना वेगवेगळे करण्यास सांगावे.<br>कृती २<br>वेगवेगळ्या भाज्यांची चित्रे काढण्यास सांगावे. | कृती १ :<br>• पालेभाजी, शेंगाभाजी, फळभाजी असे भाज्यांचे प्रकार सांगून त्यांची चित्रे देऊन वर्गीकरण करण्यास सांगावे. |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| भाज्या करतात, त्यांना त्यातल्या कोणत्या भाज्या आवडतात ते विचारावे. | कृती ३<br>• भाज्या खाणे कसे चांगले आहे, याबाबत गप्पा माराव्यात.<br>कृती ४<br>भाज्यांचे रंगाप्रमाणे, आकाराप्रमाणे वर्गीकरण करण्यास सांगावे. | |
| विविधता | बालकांना एक दिवस भाज्यांचे वेगवेगळे प्रकार रंगाप्रमाणे, प्रकाराप्रमाणे डब्यात आणायला सांगावे.<br>बालकांना भाजी बाजारात किंवा मळ्यात घेऊन जावे आणि भाज्यांचे निरीक्षण करण्यास सांगावे. | |
| थीम/विषय<br>ताईसाठी सूचना | भाज्या व फळे,<br>बालकांना त्यांच्या आवडीचा पदार्थ सांगण्यास सांगावे. त्या पदार्थाची माहिती विचारावी.खाताना उजव्या हाताने खावे. एकच हात वापरावा. सांडू नये याबाबत प्रात्यक्षिकातून बालकांना सजग करावे. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>C-1.1 पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवतात व अन्नपदार्थ वाया घालवत नाहीत.<br>अ) LO-1.1.1.2 मोठ्यांच्या सूचनेप्रमाणे वेगवेगळे अन्नपदार्थ खाण्यास सुरुवात करतो व | |

| | | |
|---|---|---|
| | त्यांची नावे सांगतो.<br>ब) LO-1.1.1 मोठ्यांच्या मदतीने वेगवेगळे अन्नपदार्थ खातो. (उदाहरणार्थ धान्य, भाज्या, फळे, डाळी, शेंगा, सुकामेवा (nuts), दुधाचे पदार्थ.)<br>क) LO-1.1.1 स्वतःहून विविध अन्नपदार्थ खातो. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता /कौशल्ये | अ) संभाषण, वर्गीकरण, विश्लेषण, निर्णयक्षमता, तर्कक्षमता, कार्यकारणसंबंध, सादरीकरण, अभिनय. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | अ) बालके त्यांच्या पोषणास आवश्यक सर्व पदार्थ, सर्व चवी असलेले पदार्थ व्यवस्थित खातात काय?<br>ब) बालके त्यांच्या पोषणास आवश्यक सर्व पदार्थ, सर्व चवी असलेले पदार्थ व्यवस्थित खातात काय? | |
| | | |
| **आधारशिला क्रिया क्र. : 11. Let's Compare - Understand and Compare Basis Number, Length. Size, Weight and Volume** | | |
| **उपक्रमाचे नाव** | **लहान मोठे समजून घेऊया.** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | | |
| **चमचे, चेंडू, फळे, बशा, वाट्या इत्यादी** | **(लहान-मोठ्या) अशा तीन वस्तू (ताटे, चमचे, खडू, चेंडू, फळे, बशा, वाट्या इत्यादी)** | **(लहान-मोठे चेंडू पाचचा सेट, एकात एक बसू शकणाऱ्या पाच वाट्या, एकात एक बसणारी पातेली. अशा प्रकारची चित्रकार्डे.** |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • ताईने बालकांना आकाराने (लहान-मोठ्या) अशा वस्तू (चमचे, चेंडू, फळे, बशा, वाट्या इत्यादी) हाताळण्यास द्याव्या.<br>बालकांना या वस्तूंचे निरीक्षण करण्यास सांगावे.<br>• एकसारख्या वस्तूच्या जोड्या (चमचे चमचे, वाट्या वाट्या) लावण्यास सांगावे. जोडीत लहान काय, मोठे काय हे विचारावे. (लहान चमचा - मोठा चमचा) ताईने बालकांना दोन सारख्या दिसणाऱ्या बाटल्यांमध्ये किंवा पिशव्यांमध्ये कमी-जास्त दगड घालावेत. दोन्ही बाटल्या किंवा पिशव्या बालकांच्या दोन हातांवर ठेवून कोणती जड व कोणती हलकी आहे, ते विचारावे. | • लहान-मोठी क्रमवारिता ताईने बालकांना आकाराने (लहान- मोठ्या) तीन वस्तू (ताटे, चमचे, खडू, चेंडू, फळे, बशा, वाट्या इत्यादी) हाताळण्यास द्याव्या.<br>बालकांना या वस्तूंचे निरीक्षण करण्यास सांगावे.<br>• एकसारख्या वस्तूंचा क्रम (मोठी ताटली, माध्यम ताटली आणि छोटी ताटली.) लावण्यास सांगावे. जोडीत लहान-मोठे क काय, त्यापेक्षा मोठे काय, हे विचारावे. (उदाहरणार्थ, मोठा चमचा, मध्यम चमचा, लहान चमचा याप्रमाणे).<br>• मोठ्यापासून लहान क्रम लावता यायला लागल्यावर लहानापासून मोठा क्रम लावण्याचा सराव करून घ्यावा. | वय वर्ष ३ ते ४ व ४ ते ५ या गटातील कृती सुरुवातीस करून घ्याव्यात.<br>• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. बालकांना एकात एक बसणाऱ्या पाच वाट्या द्याव्यात. बालकांच्या डाव्या हाताला जमिनीवर एक रेष काढावी. षद, (लेखन-वाचनाची दिशेनुसार) बालकांना वस्तू मोठी ते लहान या क्रमाने ठेवायला सांगाव्या. प्रत्येक बालकाला संधी द्यावी. |

| | |
|---|---|
| **विविधता** | लहान-मोठ्या अशा वस्तू दाखवून तुलना करावी. |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), वाहन |
| **ताईसाठी सूचना** | प्रत्यक्ष वस्तू देऊन संकल्पना स्पष्ट करा. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.9 लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व घटक निवडतो.<br>अ) LO 8.9.2 कविता आणि कथांद्वारे वजन संकल्पना व्यक्त करण्यासाठी शब्दसंग्रह वापरतो.<br>ब) LO 8.9.2 दोन वस्तूंची तुलना त्यांच्या वजनाच्या सदंर्भात करतो. च्या पेक्षा जड, च्या पेक्षा हलका.<br>क) LO 8.9.2 तीन वस्तूंची तुलना त्यांच्या वजनाच्या सदंर्भात करतात. सर्वात जड सर्वात हलके. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता /कौशल्ये** | तुलनात्मक शब्दसंग्रह, तार्किक विचारशक्ती. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालक वस्तूची तुलना कशी करते हे पाहावे. बालकांना काही मुक्त प्रश्न विचारावेत. जसे की, तुला हे कसे माहीत? तू हे कसे ठरवले? या वस्तू मोजण्यासाठी आपण आणखी काय वापरू शकतो? |

## आधारशिला क्रिया क्र. : 11.1 Let's Compare - Understand and Compare Basis Number. Length, Size, Weight and Volume

| | | |
|---|---|---|
| उपक्रमाचे नाव | लांब-आखूड समजून घेऊया | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | | |
| चमचे, शेंगा, काड्या, दोरी, पट्टी | चमचे, शेंगा, काड्या, पेन्सिल, खडू. | वजनाच्या वस्तू जड, हलक्या, कापूस, ठोकळे, माती, वाळू, कापड. |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| ताईने बालकांना लांबीने (लांब- आखूड) अशा वस्तू (चमचे, शेंगा, काड्या इत्यादी) हाताळण्यास द्याव्या. कृती १<br>बालकांना या वस्तूंचे निरीक्षण करण्यास सांगावे. एकसारख्या वस्तूंच्या जोड्या (चमचे-चमचे, शेंगा-शेंगा, काड्या-काड्या) लावण्यास सांगावे. | लांब-आखूड क्रमवारिता बालकाला लांब-आखूड अशी तीन वस्तूंची तुलना करता येते.<br>लांब-आखूड क्रमवारिता : कृती १<br>• ताईने बालकांना लांबीने (लांब - अकूड) अशा तीन वस्तु (चमचे, शेंगा, काड्या, पेन्सिल, खडू | • ताईने बालकांना पाच वस्तूंमध्ये तुलना करण्यास सांगावे.<br>हलके-जड क्रमावारिता :<br>कृती १<br>• तुलनात्मक शब्दसंग्रहाचा परिचय करून दयावा. हळूहळू हा शब्दसंग्रह विकसित करावा. जसे : सर्वांत आखूड, सर्वांत लांब. |

| | | |
|---|---|---|
| | इत्यादी) हाताळण्यास दयाव्या. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती २<br>• त्या वस्तू एका शेजारी एक मांडण्यास सांगावे. जोडीत लांब काय, आखूड काय हे विचारावे. (उदाहरणार्थ हिरवी शेंग, लांब शेंग, पिवळी शेंग, आखूड शेंग.) | बालकांना या वस्तूंचे निरीक्षण करण्यास सांगावे एकसारख्या वस्तू क्रमाने (मोठ्यापासून लहान अशा क्रमाने लावण्यास सांगावे<br>कृती २<br>जोडीत लांब काय, आखूड काय हे विचारावे. हाच क्रम उलट घ्यावा. याप्रमाणे योग्य तेथे मदत करावी | कृती २<br>बालकांना पाच वस्तूंमध्ये वरील प्रमाणे तुलना करण्यास संधी, प्रोत्साहन द्यावे. |
| **विविधता** | लांब-आखूड अशा वस्तू दाखवून तुलना घ्याव्यात. | |
| **थीम/विषय** | भाज्या व फळे, वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | लांब-आखूड या संकल्पनेची क्रमाक्रमाने ओळख करून द्या. प्रत्यक्ष वस्तू देऊन संकल्पना स्पष्ट करा. यासंदर्भातील वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.9 लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व घटक निवडतो.<br>अ) LO 8.9.1 कविता आणि कथांद्वारे लांबी व्यक्त करण्यासाठी शब्दसंग्रह मसुदवापरतो. (लांबी, रुंदी, उंची, अंतर)<br>ब) LO 8.9.1 दोन वस्तूंच्या लांबीच्या सदंर्भात तुलना करतो. च्या पेक्षा लहान, च्यापेक्षा उंच, च्यापेक्षा आखूड.<br>क) LO 8.9.2 तीन वस्तूंची त्यांच्या लांबीच्या दृष्टीने तुलना करतो. सर्वांत लांब, सर्वांत लहान, सर्वांत उंच, सर्वांत आखूड | |
| साध्य होणाऱ्या क्षमता /कौशल्ये | तुलनात्मक शब्दसंग्रह विकास, तार्किक विचारशक्ती. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | बालक वस्तूंची तुलना कशी करतात ते पाहावे. बालकांना काही मुक्त प्रश्न विचारावेत. जसे की, तुला हे कसे माहीत? तू हे कसे ठरवले? या वस्तू मोजण्यासाठी आपण आणखी काय वापरू शकतो? | |
| | | |
| **आधारशिला क्रिया क्र. : 11.2.Let's Compare: Understand and compare Basis Number. Length, Size,Weight, Volume** | | |
| **उपक्रमाचे नाव** | **उंच-बुटका समजून घेऊया.** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | | **कागद, तेली खडू** |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| • ताईने बालकांना (उंच-बुटका) उंच बुटका अशा दोन, तीन बालकांना उभे करावे. यातील उंच बालकाला पुढे करावे. इतर बालकांना हा उंच आहे, हे सांगावे.<br>• दुसऱ्या बालकाला पुढे करावे आणि सांगावे, हा बुटका आहे. असे करून वर्गातील सगळ्या बालकांना उंच आणि बुटका याप्रमाणे उभे करून त्यातील फरक सांगावा. घरात उंच कोण कोण आहे हे विचारावे. | • ३ ते ४ वर्षे या वयोगटाची कृती घ्यावी. परिसरात उंच- बुटके काय काय दिसते, हे बघण्यासाठी वर्गाबाहेर न्यावे. परिसरातील झाडे दाखवावी. त्यामध्ये उंच झाडे आणि बुटकी झाडे दाखवावी. | • ३ ते ४, ४ ते ५ या वयोगटांची कृती घ्यावी. परिसरात उंच-बुटके काय काय दिसते हे बघण्यासाठी वर्गाबाहेर न्यावे.<br>• परिसरातील झाडे दाखवावी त्यामध्ये कोणती झाडे उंच आणि कोणती बुटकी आहेत, हे विचारावे.<br>• वर्गात आल्यावर त्याचे उंच-बुटके अजून काय काय असते हे विचारावे आणि चित्र काढण्यास द्यावे.<br>(इमारत, झाडे, मुले अशी चित्रे) |
| **विविधता** | उंच, बुटका, अशा वस्तू दाखवून तुलना करावी. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब व परिसर वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व कुटुंब व परिसर वनस्पती जंगलातील), | |
| **ताईसाठी सूचना** | उंच-बुटका या संकल्पनेची क्रमाक्रमाने ओळख करून द्या.प्रत्यक्ष वस्तू देऊन संकल्पना स्पष्ट करा. यासंदर्भातील वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.9 लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व घटक निवडतात.<br>अ) LO-8.9.1.1 कविता आणि कथांद्वारे लांबी व्यक्त करण्यासाठी शब्दसंग्रह वापरतो. (लांबी, रुंदी, उंची, अंतर)<br>ब) LO-8.9.1.1 दोन वस्तूंच्या लांबीच्या सदंर्भात तुलना करतात. च्या पेक्षा लहान, च्या पेक्षा उंच, च्या पेक्षा आखूड. | |
| | क) LO-8.9.1.1 तीन वस्तूंची त्यांच्या लांबीच्या दृष्टीने तुलना करतो. सर्वांत लांब, सर्वांत लहान, सर्वांत उंच, सर्वांत आखूड | |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | तुलना करता येणे. तुलनात्मक शब्दसंग्रह विकसित करणे, तार्किक विचारशक्ती. | |
| | | |

**आधारशिला क्रिया क्र. : 11.1 11.3. Let's Compare: Understand and compare Bosis Number. Length, Size, Weight, Volume**

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | जड हलके समजून घेऊया. | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | | |
| जड-हलक्या वजनाच्या वस्तू स्पंज चेंडू, रबरी चेंडू, कापूस, दगड, फरशीचे तुकडे, | जड हलक्या वजनाच्या पिशव्या, दगड, कापूस, दोरा, वाळू, धान्य, माती, कापड, | दगड, कापूस, दोरा, वाळू, माती, कापड, काड्या, इत्यादी. |

| | | |
|---|---|---|
| कापड इत्यादी. | काड्या इत्यादी. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • ताईने जड हलक्या वस्तू बालकांना हातळण्यास द्याव्या. उदाहरणार्थ, स्पंज चेंडू, रबरी चेंडू, कापूस, दगड, फरशीचे तुकडे, कापड इत्यादी बालकांना या सगळ्या वस्तू हातात दयाव्या. त्यातील जड काय आहे, ते सांगावे.<br>• हलके काय काय आहे, ते सांगावे. परिसरात अशा कोणत्या वस्तू आहेत का, हे शोधण्यास सांगावे.<br>• घरी असे जड-हलके काय आहे, ते शोधण्यास सांगावे त्यांची नावे दुसऱ्या दिवशी विचारावी. | • सुरुवातीला वयोगट ३ ते ४ ची कृती घ्यावी. त्यानंतर पुढील कृती करून घ्यावी<br>कृती :<br>• वेगवेगळया वजनाच्या पिशव्या तयार कराव्यात. वाळू २ पिशव्या, काड्या २ पिशव्या, दगड २ पिशव्या, कापूस २ पिशव्या, दोऱ्याच्या २ पिशव्या, धान्य २ पिशव्या, माती २ पिशव्या, बिया २ पिशव्या, दोन्ही पिशव्या सारख्याच वजनाच्या करायच्या.<br>• बालकांना अर्धवर्तुळात बसवून त्यांना सारख्या वजनाच्या पिशव्यांच्या जोड्या लावण्यासाठी द्यायच्या. वाळू-वाळू, काड्या-काड्या, दगड-दगड अशा प्रकारे प्रत्येक बालकाला उपक्रमात सहभागी करून घ्यावे. | • सुरुवातीला वयोगट ३ ते ४ ची कृती घ्यावी. त्यानंतर पुढील कृती करून घ्यावी<br>कृती :<br>• वेगवेगळया वजनाच्या पिशव्या तयार कराव्यात. वाळू २ पिशव्या, काड्या २ पिशव्या, दगड २ पिशव्या, कापूस २ पिशव्या, दोऱ्याच्या २ पिशव्या, धान्य २ पिशव्या, माती २ पिशव्या, बिया २ पिशव्या, दोन्ही पिशव्या सारख्याच वजनाच्या करायच्या.<br>• बालकांना अर्धवर्तुळात बसवून त्यांना सारख्या वजनाच्या पिशव्यांच्या जोड्या लावण्यासाठी द्यायच्या. वाळू-वाळू, काड्या- काड्या, दगड-दगड अशा प्रकारे प्रत्येक बालकाला उपक्रमात सहभागी करून घ्यावे. |

| | |
|---|---|
| **विविधता** | जड-हलका अशा वस्तू दाखवून तुलना करावी. |
| **थीम/विषय** | पाणी-पाऊस, भाज्या व फळे. |
| **ताईसाठी सूचना** | जड-हलका या संकल्पनेची क्रमाक्रमाने ओळख करून दया.<br>प्रत्यक्ष वस्तू देऊन संकल्पना स्पष्ट करा. यासंदर्भातील वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.9 लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व घटक निवडतो.<br>अ) LO 8.9.1.2 कविता आणि कथांद्वारे वजन संकल्पना व्यक्त करण्यासाठी शब्दसंग्रह वापरतो.<br>ब) LO 8.9.1.2 दोन वस्तूंची तुलना त्यांच्या वजनाच्या सदंर्भात करतो. च्यापेक्षा जड, च्यापेक्षा हलका.<br>क) LO 8.9.1.2 तीन वस्तूंची तुलना त्यांच्या वजनाच्या संदर्भात करतो. सर्वांत जड, सर्वांत हलका. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | तुलना करता येणे. तुलनात्मक शब्दसंग्रह विकसित करणे, तार्किक विचारशक्ती. |

<table>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालके वस्तूंची तुलना कशी करतात हे पाहावे. बालकांना काही मुक्त प्रश्न विचारावेत. जसे की, तुम्हांला हे कसे माहीत? तुम्ही हे कसे ठरवले? या वस्तू मोजण्यासाठी आपण आणखी काय वापरू शकतो?</td></tr>
<tr><td colspan="3"></td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 11.4 Let's Compare: Understand and compare Basis Number, Length, Size, Weight, Volume</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">आकारमान ओळखूया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>चमचे, मणी, काड्या, बिया, झाकण, बांगड्या, लाकडी ठोकळे</td><td colspan="2">वर्तुळ, त्रिकोण, चौकोन लहान, मध्यम, मोठ्या आकाराचे तुकडे</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>● ताईने बालकांना अर्धवर्तुळाकार बसवावे.<br>● ताईने या गटातील बालकांना</td><td colspan="2">• आकारमान या संकल्पनेचा अध्ययन अनुभव देण्यासाठी<br>• ताईने प्रत्येक आकारासाठी एक फासा तयार करायचा आहे. एका फास्यावर वेगवेगळया रंगाचे व आकारमानाने लहान, मोठे वर्तुळ, मध्यम आकारमानाचे</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>वस्तूंचे गट करण्यासाठी वेगवेगळया वस्तू दयाव्यात. चमचे, मणी, काड्या, बिया, झाकणी, बांगड्या, लाकडी ठोकळे.</td><td colspan="2">पिवळे वर्तुळ असे सर्व बाजूने काढावे. याचप्रमाणे चौकोन व त्रिकोण या आकारांसाठी देखील स्वतंत्र फासा तयार करून घ्यावा.<br>• ताईने पुठ्ठ्याचे, कार्डशीटचे, लग्नपत्रिकांचे, शुभेच्छापत्रांचे कडक कागद यांचे फास्यावर असलेल्या रंगाचे व आकारमानाचे वर्तुळ, त्रिकोण किंवा चौकोन असे तुकडे कापावेत. हे तुकडे किमान वर्गातील पटसंख्येइतके असावेत. त्यावर त्या त्या रंगाचे घोटीव कागद चिकटवावेत किंवा पोस्टर कलरने रंगवावेत.<br>उदा.<br>• पूर्वतयारीनंतर ताईने बालकांबरोबर कृतीसाठी वर्तुळाकार बसावे. तयार केलेले सर्व तुकडे त्या वर्तुळमध्ये विखरून ठेवावेत.<br>• प्रत्येक बालकाला हातात एक फासा घेऊन टाकायला दयावा आणि त्यावर ज्या आकारमानाचे व रंगाचे चित्र आले असेल तो तुकडा त्याला उचलून स्वतःजवळ ठेवण्यास सांगावा.<br>● फास्यावरील आकारांचे रंग व आकारमानाविषयी ताईने बालकांना माहिती दयावी.<br>● यानंतर बालकांना आपापल्या हातातील आकारांच्या तुकड्यांचे त्यांच्या आकारमानानुसार गट करून ठेवण्यास सांगावे. बालकांकडून आकारमानाप्रमाणे गट मांडून घ्यावे.</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">लहान, मोठे, मध्यम आकारमान या विविध वस्तू वापरून समजावून सांगणे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">पाणी-पाऊस, प्राणी (पाळीव व जंगलातील)</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| **ताईसाठी सूचना** | आकारमान लहान, मध्यम, मोठा या संकल्पनेची क्रमाक्रमाने ओळख करून दया. प्रत्यक्ष वस्तू देऊन संकल्पना स्पष्ट करा. यासंदर्भातील वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.9 लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व घटक निवडतात.<br>ब) LO 8.9.3 आकारमान संकल्पना कविता/कथा यांच्याद्वारे व्यक्त करतो.<br>क) LO 8.9.3 दोन भांड्यांच्या आकारमानाची तुलना करतो. (उदा. पिंप, बादली, तांब्या) |
| **साध्य होणाऱ्या क्षमता /कौशल्ये** | तुलना करता येणे. तुलनात्मक शब्दसंग्रह विकसित करणे, तार्किक विचारशक्ती. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालके वस्तूंची तुलना कशी करतात हे पाहावे. बालकांना काही मुक्त प्रश्न विचारावेत. अजून कोठे अशा वस्तू सांगता येतात, याचे निरीक्षण करावे. |

## आधारशिला कृती क्र. : 12. Fruits Around Us: Identify and name fruits

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **भोवतालच्या फळांची नावे सांगूया.** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **फळांची चित्रकार्डे** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती १<br>• विविध फळांच्या चित्रांची मांडणी करावी. (सफरचंद, केळी, आंबा, संत्री यांची नावे सांगण्यास आणि ओळखण्यास बालकांना प्रोत्साहन दयावे.) | कृती १<br>• विविध फळांची चित्रे दाखवून त्यांची नावे, रंग, चव यांवर लक्ष केंद्रित करून चर्चा घडवून आणावी.<br>कृती २<br>• पूर्ण फळाचे चित्र आणि कापलेल्या फळाचे चित्र यांची जोडी लावण्यास दयावी.<br>कृती ३<br>• फळांचे सेवन करण्याचे फायदे आणि ते खाण्यापूर्वी फळे धुवून घेण्याचे महत्त्व यांवर चर्चा घडवून आणावी.<br>• कोणती फळे सालीसकट खातो, कोणती फळे साल काढून खातो, कोणत्या फळामध्ये बी असते आणि केवढे असते यांवर चर्चा घडवून आणावी. | कृती १<br>• विविध फळांची चित्रे दाखवून त्याचे नाव, रंग, चव यांवर लक्ष केंद्रित करून चर्चा घडवून आणावी.<br>कृती २<br>• पूर्ण फळाचे चित्र आणि कापलेल्या फळाचे चित्र यांची जोडी लावण्यास दयावी<br>कृती ३<br>• फळांचे सेवन करण्याचे फायदे आणि ते खाण्यापूर्वी फळे धुवून घेण्याचे महत्त्व यांवर चर्चा घडवून आणावी.<br>• कोणत्या ऋतूमध्ये कोणती फळे मिळतात यांवर चर्चा घडवून आणावी. |
| **विविधता** | बालकांना अंगणवाडीजवळील बाजारात घेऊन जा. त्यांना विविध फळे पाहू दवा, निरीक्षण करू दया, त्याचे आकार, रंग पाहू दया. विविध भाज्यांचे सुद्धा निरीक्षण करण्यास सांगा, फळांना, भाज्यांना स्पर्श करून अनुभव घेण्यास | |

| | |
|---|---|
| **थीम/विषय** | प्रोत्साहन दया. मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन, |
| **ताईसाठी सूचना** | विशेष गरजा असलेल्या बालकांना प्रत्यक्ष फळे दाखवून त्यांना स्पर्श करता येईल, अनुभवता येईल, अशी संधी दयावी. आवश्यक तिथे गृहभाषेचा वापर करावा. बहुभाषेचा वापर आवश्यकतेप्रमाणे करावा. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>C-1.1 पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवतो व अन्नपदार्थ वाया घालवत नाहीत.<br>अ) L.O1.1.1.1.2 मोठ्यांच्या सूचनेप्रमाणे वेगवेगळे अन्नपदार्थ खाण्यास सुरुवात करतात व त्यांची नावे सांगतो.<br>ब) 1.0-1.1.1 मोठ्यांच्या मदतीने वेगवेगळे अन्नपदार्थ खातो. (उदाहरणार्थ धान्य, भाज्या, फळे, डाळी, शेंगा, सुकामेवा (NUTS),दुधाचे पदार्थ)<br>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये<br>क) LO 1.1.1 स्वतःहून विविध अन्नपदार्थ खातो. |
| संभाषण कौशल्य, तार्किक विचार | कोणते बालक कृतिशील आहे, त्याचे भाषिक कौशल्य, शारीरिक हालचाली, आंतरक्रिया करूयाची पद्धत तसेच, दुकानदाराशी कोणते संवाद करते, याचे निरीक्षण ताईने करावे. |

## आधारशिला कृती क्र. 13. Experiment with water: See what sinks, floats, dissolves, settels, changes colour etc.

| | |
|---|---|
| उपक्रमाचे नाव | पाण्यात कोण विरघळते, चला पाहूया. |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | रंग, मीठ, साखर, पीठ, न विरघळणारे साहित्य, पारदर्शक डबा, ग्लास, पाणी, दगड, बाळू |

| | | | |
|---|---|---|---|
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे | |

ताईने बालकांना छोट्या गटात विविधता आणून डबा / ग्लास पाण्याने भरलेले पुरवावे. (रंग, मीठ, साखर, पीठ, न विरघळणारे साहित्य) उपरोक्त साहित्य वेगवेगळया ग्लास /भांड्यातील पाण्यात टाकण्याची संधी लहान वयोगटातील बालकांना द्यावी. बालकांना अंदाज बांधण्यास आणि एकमेकांना सांगण्यास प्रवृत्त करावे. प्रोत्साहन द्यावे. त्यात होणारे बदल काळजीपूर्वक सांगण्यास प्रोत्साहित करावे. बालकांना त्यांनी बांधलेले अंदाज तपासण्याची संधी द्यावी.

| | |
|---|---|
| **विविधता** | बालकांना काही ग्लासमध्ये पाणी दयावे. विविध पदार्थ स्वतंत्रपणे पाण्यात टाकण्यास सांगून कोणती वस्तू विरघळण्यास जास्त वेळ लागतो, कोणत्या पदार्थास विरघळण्यासाठी कमी वेळ लागतो हे निरीक्षण करण्याची संधी दयावी. |
| **थीम/विषय** | पाऊस-पाणी. |
| **ताईसाठी सूचना** | विशेष गरजा असणाऱ्या बालकांना स्पर्श करण्यास, अनुभवण्यास विविध संधी उपलब्ध करून दयाव्या. विविध कृती करण्यास प्रोत्साहित करावे. बालकांना सुरक्षित वातावरण दधावे. बालकांचे कौतुक करावे. छोटे छोटे प्रश्न विचारावे. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. |

| | | |
|---|---|---|
| | | C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतात व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता / पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो.<br>क) LO-7.2.1.1 एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूवर होणारा परिणाम ओळखतो. (उदाहरणार्थ मीठ पाण्यात घातले तर ते विरघळेल, मी बर्फ उन्हात ठेवला तर तो वितळेल.) |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | | भाषा कौशल्ये, तुलनात्मक शब्दसंग्रह वापरण्याचे संज्ञानात्मक कौशल्य पर्यावरणीय जागरूकता. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | | बालक कृतिशीलता, भाषिक कौशल्ये दाखवते, शारीरिक हालचाली, आंतरक्रिया करण्याची सहजता यांबाबत निरीक्षण करावे. कोणती वस्तू हलकी आहे? काय विरघळेल आणि पुढे काय होईल? असे का वाटते? यांसारख्या प्रश्नांना उत्तरे देताना बालक वापरत असलेल्या शब्दसंग्रहाचे निरीक्षण करा. |
| | | |
| **आधारशिला कृती क्र. : 13.1 Experiment with Water: See what sinks, floats, dissolves, settles, changes colour etc.** | | |
| **उपक्रमाचे नाव** | | **पाण्यात कोण तरंगते, चला पाहूया.** |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य :** | | **मोठा टब भरून पाणी, कागद, दगड, बिया, झाडांची पाने, फुले, लाकडी ठोकळा, कापूस, खडू, काड्या, प्लॅस्टिक चेंडू, रबरी खेळणी,** |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| ● ताईने बालकांना रोज वापरात येणाऱ्या वस्तू आणि पाण्याने भरलेला टब बालकांना दयावा. एकेक वस्तू पाण्यात टाकण्यास मार्गदर्शन करावे. कागद, दगड, बिया, झाडांची पाने, फुले, लाकडी ठोकळा, कापूस, खडू, काड्या, प्लास्टिक चेंडू, रबरी खेळणी, यांमध्ये होणार्या बदलांचे काळजीपूर्वक निरीक्षण करून एकमेकांना सांगण्यास प्रोत्साहित करावे.<br>● वयोगट ५ ते ६ वर्षातील बालकांना अंदाज बांधायला आणि प्रयोग करायला प्रोत्साहन द्यावे. तसेच यातील काही वस्तू का बुडाल्या किंवा तरंगल्या असतील, यांविषयी कारणे विचारावीत आणि संवाद साधावा. | | |
| **विविधता** | | बालकांना पाणी आणि साबण देऊन बुडबुडे करण्यास द्यावे, कागदी बोट पाण्यावर ठेवावी, ती तरंगत असताना त्यामध्ये दगड ठेवावा किंवा बोटीवर पाणी ओतावे. होणाऱ्या बदलांचे बालकांना निरीक्षण करण्यास सांगावे. |
| **थीम/विषय** | | पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), वाहन |
| **ताईसाठी सूचना** | | विशेष गरजा असणाऱ्या बालकांना स्पर्श करण्यास, अनुभवण्यास विविध संधी उपलब्ध करून दद्याव्या. विविध कृती करण्यास प्रोत्साहित करावे. बालकांना सुरक्षित वातावरण दयावे. बालकांचे कौतुक करावे. छोटे छोटे प्रश्न विचारावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | | CG- बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतात व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता / पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो.<br>अ) LO-7.2.1.4 एका वस्तूचा दुसऱ्यावर होणारा परिणाम ओळखतो. (उदाहरणार्थ, मीठ पाण्यात घातले तर ते विरघळेल, मी बर्फ उन्हात ठेवला तर तो वितळेल.) | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | | भाषा कौशल्ये, तुलनात्मक शब्दसंग्रह वापरण्याचे संज्ञानात्मक कौशल्य पर्यावरणीय जागरूकता | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | | बालकांची कृतिशीलता, भाषिक कौशल्ये, शारीरिक हालचाली, आंतरक्रिया करण्याची सहजता याचे निरीक्षण करावे. कोणती वस्तू हलकी आहे? काय तरंगते आणि पुढे काय होईल? असे का वाटते? यांसारख्या प्रश्नांना उत्तरे देताना बालक वापरत असलेल्या शब्दसंग्रहाचे निरीक्षण करा. | |
| | | | |
| **आधारशिला कृती क्र. 14. Colors and Shades: Identify, Create, Compare and Match** | | | |
| **उपक्रमाचे नाव** | | रंग तयार करूया. | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य :** | | परिसरात मिळणाऱ्या आणि घरात उपलब्ध असणाऱ्या लाल, निळया आणि पिवळया रंगाच्या वस्तू उदाहरणार्थ, टोमॅटो, हळद, रंगीत खडू, कागद, टॉर्च, लाल, निळा, पिवळा या रंगाचे जिलेटिन कागद, जलरंग, क्रेयोन. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | वयोगट ५ ते ६ वर्षे | |
| • विशिष्ट रंगांचे रंग दिवस साजरे करावे.प्रत्येक महिन्यात एक दिवस रंग दिवस साजरा करावा.<br>• सर्वप्रथम ताईने कोणताही एका रंगाच्या बऱ्याच वस्तू जमा कराव्यात. त्या वस्तू दाखवून त्या रंगाचे नाव बालकांना सांगावे. आजूबाजूला त्या रंगाच्या कोणत्या त्या वस्तू दिसत आहेत ते विचारावे.<br>• वर उल्लेख केलेल्या रंगांच्या वस्तू दुसऱ्या | प्रत्येक रंगाचे गडद आणि फिका अशा दोन रंग छटांची कार्डे घ्यावी. त्यानंतर बालकांना फिका, आणि गडद रंग कोणता ते सांगावे.<br>• बालकांना दोन रंगछटांमधला फरक रंगकार्डांमधून कळायला लागल्यावर, फिका आणि | • मिश्र रंग वेगवेगळया रंगाचे जिलेटीन पेपर टॉर्चच्या समोर धरून त्याचा जमिनीवर किंवा भिंतीवर प्रकाश पाडून वेगवेगळे रंग दाखवावे.<br>• दोन रंगाचे कागद एकत्र धरून तयार होणारा नवीन रंग कसा तयार होतो ते दाखवावे.<br>(लाल + निळा, लाल + पिवळा, पिवळा + निळा)<br>• तयार झालेल्या रंगछटा घर / अंगणवाडी परिसरात कोठे दिसतात त्याचा शोध घेण्यास सांगावे.<br>https://www.facebook.com/watch//2-255962422724556 | |

| | | |
|---|---|---|
| दिवशी अंगणवाडीमध्ये घेऊन येण्यास सांगावे. अंगणवाडी ताईनेसुद्धा त्या रंगाच्या वस्तू आणून मांडाव्या.<br>• साधारण १५ दिवस ही मांडणी करून रंगकोपरा तयार करावा. शक्य असल्यास बालकांना त्या रंगाचे कपडे घालून येण्यास सांगावे. | गडद रंगाच्या वस्तू लावून दाखवाव्या व त्यातील फरक ओळखण्यास सांगावे.<br>• बालके एकाच रंगाच्या दोन छटा ओळखायला लागल्यावर, क्रमाने फिका, मध्यम आणि गडद रंगाच्या वस्तू लावण्यास सांगावे. रंग तयार करायला सांगावे.<br>लाल + निळा,<br>लाल + पिवळा | |
| **विविधता** | | लाल, पिवळा, निळा, हिरवा, केशरी, गुलाबी इत्यादी रंगांच्या वेगवेगळया छटा दाखवाव्यात. |
| **थीम/विषय** | | पाणी-पाऊस, वनस्पती (फुले, शेती, रंग), |
| **ताईसाठी सूचना** | | या संदर्भात वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | | CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.<br>C-2.1 आकार, रंग आणि त्याच्या छटा यांच्यामधील फरक ओळखतात.<br>अ) LO 2.1.1 मूळ प्राथमिक रंग (लाल, निळा आणि पिवळा) आणि परिसरातील इतर रंग यांच्यातील फरक ओळखतो आणि त्यांची नावे सांगतो. (काळा, पांढरा तपकिरी)<br>ब) LO 2.1.1 मूळ प्राथमिक आणि दुय्यम रंगांच्या छटा यातील फरक ओळखतो. फिकट निळा, गडद निळा, फिकट हिरवा, गडद हिरवा.<br>क) LO 2.1.1 दोन रंग मिसळल्यावर /एकत्र केल्यावर कोणता रंग तयार होईल, याचा अंदाज लावण्याचा प्रयत्न करतो. निळा आणि पिवळा एकत्र केल्यावर हिरवा दिसतो. पांढरा आणि लाल एकत्र केल्यावर गुलाबी दिसतो |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | | रंग ओळखता येणे, रंगांनुसार त्याच्या छटा ओळखणे. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | | रंग ओळखता येतात का? याचे निरीक्षण करावे. |
| | | |
| | | |

| आधारशिला कृती क्र. 15. Explore Technology: Identify, Tools and Understand Uses | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **तंत्रज्ञान समजून घेऊया.** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य :** | **तंत्रज्ञान साधनाची चित्रकार्ड व कटआउट** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| **ताईने बालकांना रिमोट, टीव्ही, मिक्सर, फ्रीज यांची चित्रकाड्‌र्स दाखवून त्या वस्तू ओळखण्यास व त्याचे नाव सांगण्यास सांगावे.** | • ताईने बालकांना विविध तंत्रज्ञान साधने चित्रकाड्‌र्स दाखवावी आणि त्याची नावे ओळखण्यास सांगावे.<br>• त्याच्या वापराबाबत, तसेच या साधनांचे फायदे, तोटे सुरक्षेबाबत प्रश्न विचारावेत.<br>• प्रत्येक साधनाचे कार्डबोर्डचे कटआउट तयार करावेत. बालकांना त्यांच्या परिसरात ते कसे वापरतात याबाबत सादरीकरण करण्यास प्रोत्साहन<br>• ताईने मोबाइल, स्मार्ट टीव्ही, संगणक यांची चित्रे किंवा ते प्रत्यक्ष दाखवून, त्यांचा वापर करण्याची पद्धत सांगून, त्यांच्या उपयोगांविषयी चर्चा करावी. | |
| **विविधता** | बालकांना साधनासंबंधी कोडे सोडवण्यास देता येईल. बालकांना क्ले, कागद, कार्डबोर्ड किंवा अन्य साधनांपासून अशी साधने करण्यास दया. त्यांना त्यांच्या कल्पनाशक्तीनुसार वस्तू तयार करू दया. त्यांचे कौतुक करा. प्रोत्साहन द्या. त्यांनी केलेले काम वर्गात इतरांना दाखवा. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब व परिसर | |
| **ताईसाठी सूचना** | | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.3 दैनंदिन जीवनातील परिस्थितीमध्ये व अध्ययन करण्यासाठी सुयोग्य साधने व तंत्रज्ञान वापरतो.<br>ब) LO 7.3.1.2 डिजिटल व दृक्श्राव्य साहित्य वापरताना लक्ष देतो.<br>क) LO 7.3.1.2 शिक्षकांच्या मदतीने डिजिटल तंत्रज्ञान जसे की, स्मार्ट फोन व टॅब यांचा वापर करतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | कृतीमध्ये सहभागी होण्याची सहजता, भाषिक कौशल्य. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकाची कृतीमध्ये सहभागी होण्याची सहजता, भाषिक कौशल्य, आंतरक्रिया करण्याची पद्धती याचे निरीक्षण करा. ते कसे संभाषण करते, संवाद साधते याचेही निरीक्षण करा. | |

| आधारशिला कृती क्र.: 16. Fun with Colours: Sort, Match, Mix and Create Colours | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | रंगासोबत खेळूया. |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य :** | रंग, रंगाचे ब्रश, प्लेट, प्रथम श्रेणी रंग चित्रकार्डे, वस्तूंची चित्रकार्डे, रंगीत खेळणी, विविध फळांची चित्रकार्डे, पालेभाज्यांची चित्रकार्डे. |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| कृती १<br>● ताईने सारख्या रंगाच्या वस्तू मांडाव्या आणि बालकांना त्याचे नाव सांगण्यास सांगावे, रंगाप्रमाणे जोडी आणि वेगळे करण्यास दयावे.<br>कृती २<br>● प्रथम श्रेणीचे रंगकार्ड बालकोनों दाखवावे. रंगाप्रमाणे आजूबाजूला असणाऱ्या वस्तू शोधण्यास सांगावे. | कृती १<br>● बालकांचे छोटे छोटे गट तयार करावे. त्यांना विविध रंग देऊन त्यांचे मिश्रण करण्यास सांगावे. दोन किंवा तीन रंग एकत्र केल्यावर होणाऱ्या बदलांचे निरीक्षण करण्यास आणि कथन करण्यास प्रोत्साहन द्यावे.<br>कृती २<br>● नवीन तयार झालेल्या रंगासारख्या दिसणाऱ्या वस्तू सांगण्यास, ओळखण्यास प्रोत्साहन दयावे. | |
| विविधता | डफली किंवा खंजिरी वाजवून रंग, नाव याचा खेळ घ्यावा. संबधित रंगकोपरा शोधण्यास किंवा वस्तू शोधण्यास प्रोत्साहित करावे. | |
| थीम/विषय | मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, वाहन | |
| ताईसाठी सूचना | | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.<br>C-2.1 आकार, रंग आणि त्याच्या छटा यांच्यामधील फरक ओळखतो. अ) 1.0 2.1.1 मूळ प्राथमिक रंग (लाल, निळा आणि पिवळा) आणि परिसरातील इतर रंग यांच्यातील फरक ओळखतो आणि त्यांची नावे सांगतो. (काळा, पांढरा, तपकिरी)<br>ब) 1.0 2.1.1 मूळ प्राथमिक आणि दुय्यम रंगांच्या छटा यांतील फरक ओळखतो. फिकट निळा, गडद निळा, फिकट हिरवा, गडद हिरवा.<br>क) 1.0 2.1.1 दोन रंग मिसळल्यावर / एकत्र केल्यावर कोणता रंग तयार होईल याचा अंदाज लावण्याचा प्रयत्न करतो. निळा आणि पिवळा एकत्र केल्यावर हिरवा रंग तयार होतो. पांढरा आणि लाल एकत्र केल्यावर गुलाबी रंग तयार होतो. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | भाषा कौशल्य तुलनात्मक शब्दसंग्रह. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | रंगांची नावे सांगता येतात का? दोन रंग मिसळल्यावर तयार होणाऱ्या रंगाचे नाव सांगता येते का ते पाहावे | |

## आधारशिला कृती क्र. 17. Find the Odd Picture/Object Out

| **उपक्रमाचे नाव** | **पाहुणा ओळखूया.** | |
|---|---|---|
| **उपक्रमाला लागणारे साहित्य :** | **वस्तू, प्राणी, पक्षी, यांची चित्रकार्डे** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |

| | |
|---|---|
| कृती १<br><br>● बालकांपुढे चार सारखी चित्रे आणि एक वेगळे चित्र असलेली चित्रपट्टी ठेवावी. उदा. ३ वेगळ्या रंगाचे चेंडू आणि बॅट. तीन हिरवी पाने आणि एक पिवळे पान, एका प्रकारची तीन फुले आणि एक वेगळे फूल इत्यादी.<br>कृती २<br>● बालकाला या चित्रातील वेगळे काय आहे, ते ओळखण्यास सांगावे. बॅट, पिवळे पान, वेगळे फूल हे वेगळे ओळखता आले नाही, तर त्याचे कारण समजावून दधावे. | कृती १<br>● बालकांपुढे चार सारखी चित्रे आणि एक वेगळे चित्र असलेली चित्रपट्टी ठेवावी उदाहरणार्थ, तीन एका रंगाच्या वस्तू आणि एक वेगळया रंगाची वस्तू, तीन प्राणी आणि एक प्राण्याचे पिल्लू, तीन जंगली प्राणी आणि एक पाळीव प्राणी तीत एका लांबीच्या पेन्सिली आणि एक आखूड किंवा जास्त लांब पेन्सिल, तीन स्वयंपाक घरातल्या वस्तू आणि एक वेगळी वस्तू (दप्तरे) इत्यादी.<br>कृती २<br>● बालकाला या चित्रातील वेगळे काय आहे ते ओळखण्यास सांगावे. वेगळे चित्र ओळखता आले नाही, तर त्याचे कारण समजावून दयावे. |
| **विविधता** | वस्तूंची अनेक वैशिष्ट्ये वापरून विविधता आणता येते.<br>● ३ मुली - १ मुलगा<br>● ३ रस्त्यावरची वाहने आणि एक पाण्यातील वाहन,<br>● ३ लहान मुले आणि एक मोठा माणूस.<br>● रंगानुसार फुले वापरून पाहुणा ओळखूया.<br>● कमीजास्त पाकळया असलेली फुले यातील पाहुणा ओळखूया. |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, प्राणी (पाळीव व जंगलातील) |
| **ताईसाठी सूचना** | प्रकल्पनिहाय चित्रकार्डे किंवा प्रत्यक्ष वस्तू दाखवून पाहुणा ओळखण्यास सांगावे तसेच त्यांचे स्पष्टीकरण करण्यास सांगावे. पुरेसा सराव झाल्यावर यावर आधारित प्रकल्पनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात्<br>C-7.1 वेगवेगळया वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.<br>अ, ब, क 1.0-7.1.3.1 गटात आणि श्रेणीबद्ध संबंध ओळखतो.<br>अब अ, ब, क 1.0-7.1.3.2 गटात आणि गटांमध्ये तुलना करतो. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | वर्गीकरण, वस्तूंचे गणुधर्म व गुणधर्मानुसार वस्तूंची गटनिर्मिती, वस्तूंची अनेक वैशिष्ट्ये |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकाच्या तुलनेच्या विविधतेचे निरीक्षण करावे? बालकांना पाहुणा का आहे, त्याचे सकारण सांगता येते का याचे निरीक्षण करता येते का हे पाहणे. |
| | |
| | |

| आधारशिला कृती क्र.: 18. Pattern Making: Recognize, Repeat, Extend and Create Patterns. | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | अवतीभोवती पाहू बोलू.. | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य :** | लाल, पिवळा, हिरवा, रंगांचे ठोकळे, खडे, पाने, मणी, ग्लास, चमचे. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती : आकृतिबंध<br>● बालकांसमोर लाल, पिवळा, हिरवा अशा रंगांचे ठोकळे मांडावे.<br>● ताईने एक हिरवा ठोकळा त्यापुढे एक लाल ठोकळा अशी मांडणी ३-४ वेळा सलग करून दाखववावी.<br>याप्रमाणे इतर रंगांचे ठोकळे घेऊन बालकांकडून अशा पद्धतीने मांडणी करून घ्यावी. | कृती : आकृतिबंध<br>● बालकांसमोर खडे, पाने असे साहित्य मांडून ठेवावे.<br>● ताईने दोन पाने त्यापुढे एक खड़ा अशी मांडणी ३-४ वेळा सलग करून दाखववावी.<br>याप्रमाणे इतर इतर वस्तू घेऊन बालकांकडून अशा पद्धतीने मांडणी करून घ्यावी. | कृती : आकृतिबंध<br>● बालकांसमोर ग्लास, चमचे, मणी अशा वस्तू मांडाव्या.<br>● ताईने मणी, मणी, मणी, ग्लास, चमचा अशी मांडणी ३-४ वेळा सलग करून दाखववावी.<br>● मणी चित्र, मणी चित्र, मणी चित्र, ग्लास चित्र, चमचा चित्र, मणी चित्र मणी चित्र, मणी चित्र, ग्लास चित्र, चमचा चित्र याप्रमाणे इतर वस्तू घेऊन बालकांकडून अशा पद्धतीने मांडणी करून घ्यावी. |
| **विविधता** | विविध माध्यमे / साहित्य / पर्याय निवडून उपरोक्त कृतीत विविधता आणता येईल. | |
| **थीम/विषय** | भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | ताईने या कृती वारंवार घ्याव्यात. प्रत्येक बालकाला संधी मिळेल याची खबरदारी घ्यावी. भाज्या, फळे, फुले, पाने यांचा वापर करून आकृतिबंध करून घ्यावा या संदर्भात प्रकल्पनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचो वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.2 आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्यातील साधे आकृतिबंध ओळखतो आणि त्यांचा विस्तार करतो.<br>अ) 1.0 8.2.1.1 आकृतिबंध ओळखतो. आकार पाने-फुले यांचा जोड्यांमधील पुनरावृत्तीनुसार आकृतिबंध तयार करतो. (पान, फूल, अ..ब... अ..ब..)<br>ब) LO 8.2.1.1 आकृतिबंधातील पुनरावृत्ती असणारा घटक ओळखतो. ३ ते ४ वस्तू, आकार, चित्रे यांचा वापर करून, विविध प्रकारचे आकृतिबंध तयार करतो. (पेन-पुस्तक- पेन्सिल, पेन-पुस्तक पेन्सिल, अबक, अबक)<br>क) LO 8.2.1.1 रंग, आकार, माप या विविध वैशिष्ट्यांनुसार नवीन आकृतिबंध स्वतः तयार करतो.<br>क) LO 8.2.1.2 आकृतिबंधातील नियम सांगतात आणि वेगवेगळया वस्तूंमध्ये नवीन आकृतिबंध तयार करतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | कृतीतून वस्तूंची समज, उपयुक्तता समजून घेण्याची क्षमता कलाभिरुचीचा विकास होतो. मेंदू | |

| | | |
|---|---|---|
| | आणि हात यांचा समन्वय साधण्याची कौशल्ये. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकाच्या मांडणीचे निरीक्षण करावे. आकाराची व रंगांची समज विचारात घ्यावी. | |
| | | |
| **आधारशीला कृती क्र. 18.1 Pattern Making : Recognize, Repeat, Extend and Create Patterns.** | | |
| उपक्रमाचे नाव | बनवू तोरण | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य : | विविध आकारांची पाने, विविध फुले, गोट्या, साबणाची औषधांची रिकामी वेष्टणे, रबर, पेन्सिल, पेन, खडू, पेले, वाट्या, बशा, काटे, चमचे इत्यादी. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती १<br>● बालकांना विविध वस्तू हाताळण्यास दया. बालकांना या वस्तू रांगेत मांडायला सांगा. (जसे- पेला, वाटी, बशी/खडू, रबर, पेन्सिल, पेन) अशा प्रकारे बालकांकडून आकार, प्रमाण, रंग, वजन असे वैविध्य देऊन आकृतिबंधांची मांडणी करवून घ्यावी. | कृती १<br>● बालकांना विविध वस्तू हाताळण्यास दया. बालकांना या वस्तू रांगेत मांडायला सांगा. (जसे-पान-फूल, पान-फूल- फूल, पान-पान-फूल अशा प्रकारे बालकांकडून आकार, प्रमाण, रंग, वजन असे वैविध्य देऊन आकृतिबंधाच्या सांडणीचा विस्तार करवून घ्यावा. | कृती १<br>● बालकांना विविध वस्तू हाताळण्यास दया. बालकांना या वस्तू दोन दोन गटात रांगेत मांडायला सांगा. (जसे पान- पान-फूल-फूल, पान-पान- फूल/पेन्सिल पेन्सिल-पेन- पेन खडू-खडू) अशा प्रकारे बालकांकडून आकार, प्रमाण, रंग, वजन असे वैविध्य देऊन आकृतिबंध मांडणीचा अधिक विस्तार करवून घ्यावा. |
| **विविधता** | बालकांच्या कल्पनशक्तीला वाव देऊन आणि त्यांना मांडणीचे स्वातंत्र्य देऊन या कृतीत विविधता आणता येईल. | |
| **थीम/विषय** | वनस्पती (फुले, शेती, रंग), | |
| **ताईसाठी सूचना** | बालकांची मांडणी चुकीची वाटत असेल, तर त्याबद्दल त्याला बोलते करावे. त्यांचा मांडणीबद्दलचा विचार समजनू घ्यावा. यासंदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. C-8.2 आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्यातील साधे आकृतिबंध ओळखतो आणि त्यांचा विस्तार करतो. अ)LO 8.2.1.1 आकृतिबंध ओळखतात. आकार पानेफुले यांच्या जोड्यांमधील पुनरावृत्तीनुसार आकृतिबंध तयार करतो. (पान-फूल, अ.ब... अ..ब..)<br>ब)LO 8.2.1.1<br>आकृतिबंधातील पुनरावृत्ती असणारा घटक ओळखतो. ३ ते ४ वस्तू, आकार, चित्र यांचा वापर करून, ABC ABC प्रकारचा आकृतिबंध तयार करतो. (पेन- पुस्तक-पेन्सिल, पेन-पुस्तक-पेन्सिल, अब क, अबक) | |

| | | |
|---|---|---|
| | क) LO 8.2.1.1<br>रंग, आकार, माप या विविध वैशिष्ट्यांनुसार नवीन आकृतिबंध स्वतः तयार करतो.<br>क) १.० ८.२.१.२<br>आकृतिबंधातील नियम सांगतो आणि वेगवेगळया वस्तूंमध्ये नवीन आकृतिबंध तयार करतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | आकार, प्रमाण, मोजमाप या संकल्पना समजण्याच्या क्षमता, विकसित होतात, मांडणीचे कौशल्य | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकांच्या मांडणीच्या आवर्तनाचे निरीक्षण करावे. | |
| | | |
| **आधारशिला कृती क्र.19. संख्यांचा परिचय: जुळणी आणि मोजणी.** | | |
| उपक्रमाचे नाव | मोजू आनंदे | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य : | खडू, वाट्या, फुले, चमचे, फळे. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती १<br>• ताईने तीन वस्तू मांडून ठेवाव्या. (तीन खडू, वाट्या, फुले, चमचे,फळे इत्यादी.) बालकांना या वस्तू क्रमाने मोजून दाखवाव्या, (उदाहरणार्थ, एक वाटी, दोन वाट्या, तीन वाट्या इत्यादी) ताईने हे गणन बालकांकडून समूहात व वैयक्तिक म्हणवून घ्यावे. | • कृती १<br>• ताईने पाच वस्तू मांडून ठेवाव्या. (तीन खडू, वाट्या फुले, चमचे, फळे इत्यादी)<br>• बालकांना या वस्तू क्रमाने मोजून दाखवाव्या, (उदाहरणार्थ, एक वाटी, दोन वाट्या, तीन वाट्या इत्यादी.)<br>• ताईने हे गणन बालकांकडून म्हणवून घ्यावे.<br>• ताईने हे गणन बालकांकडून समूहात व वैयक्तिक म्हणवून घ्यावे<br>• ताईने बालकाना योग्य तेथे मार्गदर्शन करावे | कृती १<br>• ताईने दहा वस्तू मांडून ठेवाव्या. (दहा खडू, वाट्या, फुले, चमचे, फळे इत्यादी.)<br>• बालकांना या वस्तू क्रमाने मोजून दाखवाव्या, (उदाहरणार्थ, एक वाटी, दोन वाट्या, तीन वाट्या, चार वाट्या, पाच वाट्या इत्यादी.)<br>• ताईने हे गणन बालकांकडून म्हणवून घ्यावे.<br>• ताईने हे गणन बालकांकडून समूहात व वैयक्तिक म्हणवून घ्यावे.<br>• ताईने बालकांना योग्य तेथे मार्गदर्शन करावे. |
| **विविधता** | विविध माध्यमे/साहित्य/पर्याय आणि अंकाची गाणी निवडून उपरोक्त कृतीत विविधता आणता येईल. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब व परिसर, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), पक्षी व कीटक, वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | ताईने या कृती वारंवार घ्याव्यात. प्रत्येक बालकाला संधी मिळेल याची खबरदारी घ्यावी. यासंदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोहवून घ्यावी, | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>CG-83 १० आणि २० या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या (दोन्ही प्रकारे पुढे आणि, मागे) मोजतो.<br>अ) LO 83.1.2 तीनपर्यंत संख्यांची नावे आणि वस्तूंमधील एकास एक सगंती वापरून मोजणी करताना मोठ्यांचे अनुकरण करतो. | |

| | | |
|---|---|---|
| | ब) 10.8.3.7 १० पर्यंतची संख्याताने योग्य क्रमाने सांगतो/गातो आणि ५ पर्यंतची संख्यानामे व वस्तु, यांची एकास एक संगती लावतो.<br>ब) 1.0 8.3.1.2 संख्येचे मूल्य समजनू घेऊन वस्तूंची मोजणी करतो. (५) मस्तपर्यवार संच ओळखतात)<br>ब) LO 8.3.1.3 संख्येबाबतची समज दर्शवतो. (उदाहरणार्थ, ५ म्हणजे ५ विविध वस्तू ५ व्यक्ती, ५ पेन्सिली इत्यादी)<br><br>क) 1.0 8.3.1.1 २० पर्यंत संख्यानामे म्हणतो आणि मोजतो. संख्यांनामे आणि वस्तू यांची १० पर्यंत एकास एक संगती लावतो.<br>क) 1.0.8.3.1.2 संख्यांचे मूल्य समजून घेऊन १० पर्यंत वस्तूंची मोजणी करतो | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता /कौशल्ये** | गणिती कौशल्य विकसित होतात. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकाच्या गणनक्षमतेचे निरीक्षण करावे. | |
| | | |
| **आधारशिला कृती क्र.: 20. Spatial Concepts: Understand in/out, over/under top/bottom, front/back etc.** | | |
| **उपक्रमाचे नाव** | वर-खाली | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | विविध वस्तू, खेळणी, कागद, पेन्सिल, खडू, इत्यादी. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • वर्गात काही वस्तू विखरून ठेवाव्यात. बालकांना या वस्तूंची ठिकाणे पाहण्याची संधी दयावी. एकेकाला बोलते करावे. प्रश्न विचारावे. (टेबलवर काय आहे? टेबलच्या बाजूला काय आहे? टेबलाच्या खाली काय दिसते? इत्यादी.) | • सराव म्हणून वयोगट ३ ते ४ वर्षे च्या कृतीची पुनरावृत्ती करावी. नंतर बालकांना प्रत्येकी एक कोरा कागद आणि रंगीत पेन्सिल दयावी. काही सूचना कराव्यात. (जसे-कागदावर मधोमध वर्तुळ काढ., त्याच्या खाली चौकोन काढ., वर त्रिकोण काढ.) त्याच्या खाली चौकोन काढ, वर त्रिकोण काढ. वर्तुळात आयत काढ याप्रमाणे.) कृती करावयास दयावी | • सराव म्हणून वयोगट ३ ते ४ आणि ४ ते ५ वर्षे च्या कृतीची पुनरावृत्ती करावी. ताईने बालकांना एकेक कृती करण्यास सांगावे. उदाहरणार्थ, टेबलावर सगळयात खाली निळया रंगाचे पुस्तक ठेव. टेबलावर ४ ते ५ पुस्तके ठेव, त्यावर पान ठेव. |
| **विविधता** | विविध कल्पना, युक्त्या वापरून आणि बालकांच्या कल्पकतेला वाव देऊन या कृतीत विविधता आणता येईल. टोपलीचे चित्र काढून दयावे. त्यात फुले, पाने काढायला सांगावे<br>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्य वर, खाली स्थानदर्शक शब्दांची समज<br>निरीक्षण करावयाच्या बाबी<br>बालकांच्या निरीक्षण क्षमतेकडे लक्ष द्यावे. उत्तरांचे निरीक्षण करावे. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | ताईने या कृती वारंवार घ्याव्यात. प्रत्येक बालकाला संधी मिळेल याची खबरदारी घ्यावी. या संदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. | |

<table>
<tr><td colspan="2">अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td>CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.8 मूलभूत भौमितिक आकार ओळखतो ते तयार करतो, त्याचे वर्गीकरण करतो, समजून घेतो आणि समजावून सागतो.<br>ब) LO 8.8.1.4<br>स्थितिदर्शक शब्द समजून आकृतिबंध तयार करण्यासाठी आकार, रंग, स्थान यांचा वापर करून टप्प्याटप्प्याने दिलेल्या सूचनांचे पालन करतो. जसे की ठिपक्यांची रांगोळी काढणे, कोलाज बनवणे, त्यासाठी मध्यभागी, वर, खाली हे स्थानदर्शक शब्द समजून घेतो.<br>क) 1.0 8.3.1.3<br>वस्तुमाप, आकार यांचे वर्णन करण्यासाठी स्थलदर्शक शब्द वापरतो. (वर, खाली, आत, बाजूला)</td></tr>
<tr><td colspan="2"></td><td></td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र.: 20.1 Feel the difference: Experiment, Explore, Compare Temperature Differences</td></tr>
<tr><td colspan="2">उपक्रमाचे नाव</td><td>आत - बाहेर</td></tr>
<tr><td colspan="2">उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td>विविध वस्तू, खेळणी, कोगुद, पेन्सिल, खडू इत्यादि</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>● ताईने बालकांचा तळयात -मळयात हा खेळ घ्यावा, ताईने बालकांना वर्गाच्या बाहेर न्यावे.<br>● बालकांना एकमेकांचे हात धरून मोठे वर्तुळ करून उभे करावे तळयात म्हटल्यावर आत उही मारायची हे सांगावे. मळयात म्हटल्यावर बाहेर उडी मारावी हे सांगावे</td><td>● ताईने बालकांना एकमेकांचे हात धरून मोठे वर्तुळ करून उभे करावे. पेरू म्हणाले की आत उड़ी मारायची, आंबा म्हणाल्यावर बाहेर उडी मारायची अशी सूचना दयावी.<br>● ताई पेरू म्हणाली, की आत उही मारायची. ताईने सूचना देताना पेरू आबा, आंबा पेरू, पेरू आंबा, आंबा पेरू, पेरू पेरू अशा सूचना द्याव्या.</td><td>● ताईने पासिंग द पार्सल खेळ घेण्यासाठी बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. ट्रेमधील वस्तू ठोकळे, खडू, बिया, झाकण, पुस्तक, कागद, ट्रेबाहेरील वस्तू - काड्या, मणी, रंगीत कागद,<br>● ताईने खंजिरी वाजवावी. खंजिरी वाजवताना बालकांनी चेंडू पुढे बालकांकडे देत राहावे. ताईने खंजिरी वाजायची थांबली, की ज्या बालकाकडे चेंडू येईल त्या बालकाला ताईने सूचना दयावी. जसे, ट्रेच्या आत असलेला लाल ठोकळा बाहेर काढून ठेव. रंगीत कागद ट्रेच्या आत ठेवाव्या. ट्रेच्या आत ठेवलेला खडू बाहेर काढून ठेवा.</td></tr>
<tr><td colspan="2">विविधता</td><td>विविध कल्पना, युक्त्या वापरून आणि बालकांच्या कल्पकतेला वाव देऊन या कृत्तीत विविधता आणता येईल. टोपलीचे चित्र काढून दबावे त्यात फुले, पान काढायला सांगावे.</td></tr>
<tr><td colspan="2">थीम/विषय</td><td>मी, माझे कुटुंब, भाज्या व फळे, वाहन</td></tr>
</table>

<table>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">ताईने या कृती वारंवार घ्याव्यात. प्रत्येक बालकाला संधी मिळेल याची खबरदारी घ्यावी. यासंदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.8 मूलभूत भौमितिक आकार ओळखतात ते तयार करतो, त्याचे वर्गीकरण करतो, समजून घेतो आणि समजावून सांगतो.<br>ब) LO88.1.3 स्थितिदर्शक शब्द समजून आकृतिबंध तयार करण्यासाठी आकार, रंग, स्थान यांचा वापर करून टप्प्यादेप्याने दिलेल्या सूचनांचे पालन करतो. जसे की ठिपक्यांची रांगोळी काढणे, कोलाज बनवणे त्यासाठी मध्यभागी, वर, खाली हे स्थानदर्श शब्द समजून घेतो.<br>क) ५०१७ मा व आकार यांचे वर्णन करण्यासाठी स्थलदर्शक शब्द वापरतो. वर, खाली, आत, बाजूला.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये</td><td colspan="2">आत, बाहर स्थलदर्शक शब्दांची समज</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बावी</td><td colspan="2">बालकांच्या निरीक्षणक्षमतेकडे लक्ष द्यावे. उत्तरांचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशीला कृती क्र. : 21. Feel the difference: Experiment, Explore, Compare Temperature Differences</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">गरम आणि गारची गंमत</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">चित्रे गरम, गार पदार्थांची चित्रे, गरम (कोमट) पाणी</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>कृती: थंडीत काय बाऊया.<br>• ताईनी बालकांना अर्धवर्तुळात बसवावे.<br>• बालकांच्या गटात वेगवेगळे अन्नपदार्थ असलेली चित्रांची कार्डे देणे.<br>• गार व गरम अन्नपदार्थ या चित्रांचे वर्गीकरण करण्यास सांगावे,<br>• घेतलेल्या अनुभवांवर चर्चा करावी.</td><td>कृती: गार-गरमची गंमत<br>• ताईनी बालकांना अर्धवर्तुळात बसवावे<br>• भांड्यामध्ये गरम (पाणी कोमट असावे) पाणी, बर्फ हे घ्यावे.<br>• एक एक करून सर्व बालकांना<br>• दोन्ही भांड्याला हात लावण्यास सांगावे.<br>• ताईने सर्व बालकांनी एक एक करून भांड्याला हात लावल्यावर काय त्यांना जाणवले हे विचारावे. घेतलेल्या अनुभवांवर चर्चा करावी.<br>• अपेक्षित उत्तर (गरम पाण्याला हात लावल्यावर पाणी गरम लागले आणि बर्फाला हात लावल्यावर खूप गार लागले)</td><td>वयोगट ३ ते ४. ४ ते ५ वर्षेच्या कृती आधी घ्याव्या<br>कृती क्रम लावूया.<br>• चहा, बिस्किट, आईस्क्रिम अशी चित्रे बालकांसमोर मांडावी,<br>• बालकांना गरम ते गार अशा क्रमाने चित्रे लावण्यास सांगावे,<br>• तसेच गरम पदार्थातून वाफ येते, मग ती कुठे जात असेल अशी कुठ चर्चादेखील करावी.<br>• ताईने गार पाणी, गरम पाणी, कोमट पाणी अशी तीन भांडी ठेवावीत. एकेका बालकाला पुढे<br>• बोलावून डोळे मिटून पाण्यात बोटे बुडवायला सांगावे, आणि पाणी गरम, कोमट, की गार लागले ते विचारावे. असे पाणी कुठे आणि केव्हा अनुभवले आणि वापरले ते विचारावे.</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• आपण कोणते गार/थंड पदार्थ खातो हे विचारावे.<br>• आपण कोणते गरम पदार्थ खातो हे विचारावे.<br>• उन्हाळा आणि हिवाळा यांची वेगवेगळी चित्रे वापरून गप्पा/चर्चा उपक्रम घेणे,</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| **थीम/विषय** | पाणी पाऊस, भाज्या व फळे, ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), मदतनीस, वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | यासंदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. C-2.5 विविध प्रकारच्या स्पर्शामधील फरक करण्याची क्षमता विकसित होते.<br>अ) 1.00 2.5.1 कठीण / कडक मऊ, गार गरम, खरखरीत, खडबडीत. गुळगुळीत स्पर्शामधील फरक समजतो.<br>ब) LO 2.5.1 दोन वस्तूंमधील कठीण/कहक-मऊ, गार-गरम, खरखरीत, खडबडीत व गुळगुळीत अशी स्पर्शाची तुलना करू शकतो.<br>क) LO 2.5.1 ३ ते ५ वस्तूंची कठीण/कहक-मऊ, गार-गरम, खरखरीत, गुळगुळीत अशा स्पर्शानुसार क्रमवार मांडणी करू शकतो. (उदाहरणार्थ, अतिमऊ, मऊ, टणक, अतिटणक) | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | अ) गार, गरम, कोमट हे स्पर्श संवेदन | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | गार, गरम, कोमट स्पर्श अनुभवल्यानंतर कोणती प्रतिक्रिया देतात याचे निरीक्षण करावे. | |
| | | |
| **आधारशिला कृती क्र. : 22. Identical Object Challenge: Observe and Compare Object Basic Change in Appearance** | | |
| **उपक्रमाचे नाव** | **सारखे की वेगळे** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | | |
| **मणी** | **सारख्या दोऱ्या** | **वेगवेगळया आकारांची व उंचीची भांडी** |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • बालकांसमोर दोन पद्धतीने मणी ठेवूया. तीन मणी एकत्र ठेवूया आणि तीन मणी ओळीने सुटेसुटे मांडून ठेवूया. गटात ठेवलेले मणी आणि ओळीने ठेवलेले मणी सारखेच आहेत याकडे मुलांचे लक्ष वेधून घ्यावे | • बालकांना समान लांबीच्या दोन दोऱ्या द्याव्या, त्या जमिनीवर आडव्या मांडाव्या. दोऱ्या मांडताना पहिल्या दोरी पेक्षा दुसऱ्या दोरीचे टोक थोडे पुढे ठेवावे. बालकांना निरीक्षण करून कोणती दोरी लांब आहे, असे विचारावे चर्चेच्या अंती दोन्ही दोऱ्या समान लांबीच्या आहेत. पुढे मागे जरी ठेवल्या तरी त्यांची लांबी समान आहे, हे लक्षात आणून दधावे. | • तीन वेगवेगळया उंचीची भांडी घ्यावी. त्यात समान मापाचे पाणी भरावे. बालकांना तीनही भांड्यांतील पाण्याचे निरीक्षण करून कोणत्या भांड्यात पाणी जास्त आहे, असे विचारावे. बालकांची उत्तरे लक्षात घेऊन एकाच मापने तीनही भांड्यातील पाणी मोजून दाखवावे. उंचीने तीनही भांडी वेगळी असली तर त्यात असणाऱ्या पाण्याचे प्रमाण सारखेच होते हे लक्षात आणून द्यावे |
| **विविधता** | • पाने, फुले बिया अशा वस्तू सुट्या तसेच गटात मांडून बालकांना अंदाज करायला सांगावे. वस्तू सारख्या आहेत की नाही असे विचारावे. समान लांबीच्या पट्ट्या, पाईप, काठ्या यांचा वापर करून एका खाली एक न मांडता, मांडणी करताना पहिल्या वस्तूपेक्षा दुसऱ्या वस्तूचे टोक थोडेपुढे ठेवावे. | |

| | |
|---|---|
| | • बालकांनी निरीक्षण केल्यानंतर कोणती वस्तू लांब आहे, असे विचारावे. वेगवेगळी भांडी वापरून पाण्याचे प्रमाण सारखे आहे की नाही याचा अंदाज बांधायला सांगावे. उदाहरणार्थ, तांब्या, पिंप, बाटली, माठ इत्यादी. |
| **थीम** | पाऊस-पाणी, प्राणी (पाळीव व जंगलातील), |
| **ताईसाठी सूचना** | वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतो.<br>C-7.1 वेगवेगळया वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतात.<br>C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारण भाव समजून घेऊन, ती दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/ पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो.<br>G.-४ बालकांची समज विकसित होते आणि ती विविध राशी, CG-8 बालकांची गणितीय सम आकार, मापे, यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.3 १० आणि २० या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या (पुढे आणि मागे) दोन्ही मोजतो.<br>अ) LO 8.3.1.6 दोन किंवा तीन वस्तूंचा गट ओळखून निरीक्षणापेक्षा तात्काळ सांगतो.<br>C- 8.9 लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व एकक निवडतो.<br>ब)LO 8.9.1 दोन वस्तूंच्या लांबीच्या सदंर्भात तुलना करतो. च्यापेक्षा लहान, च्यापेक्षा उंच, च्यापेक्षा आखूड.<br>क) LO 8.9.3 दोन भांड्यांच्या आकारमानाची तुलना करतो. (उदाहरणार्थ, पिंप, बदली, तांब्या) |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | निरीक्षण, तार्किक विचार, तुलना करणे या क्षमता साध्य होण्यास मदत होते. |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | अ) बालके कृती करत असताना सारखे आणि वेगळे ओळखतात का ते बघावे. |

## आधारशिला कृती क्र. : 23. Playing with shape tangrams and making different figures

| | | |
|---|---|---|
| उपक्रमाचे नाव | TANGRAM आकारांची कोडी | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | पांढरे कागद, कैची, रंग, ब्रश, Tangram आकार इत्यादी. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • बालकांना पांढरा कागद आणि कात्री असे साहित्य दयावे. कागदाचे विविध आकार कापण्याची सूचना करावी. बालकांनी कापलेल्या आकारास त्याच्या मनाप्रमाणे रंगवण्यास सांगावे. या रंगीत कागदापासून विविध आकृत्या | • बालकांना Tangrams आकार दयावेत, त्यांचे निरीक्षण करण्यास सांगावे, प्रत्येक आकाराचे नाव विचारावे. Tangrams च्या मदतीने त्याच्या मनाप्रमाणे विविध आकार तयार करण्याची कृती करवून घ्यावी. | • ताईने Tangrams च्या मदतीने स्वतः विविध आकृत्या बालकांच्या समोरच बनवाव्यात. बालकांना या आकृत्यांचे निरीक्षण करण्यास सांगावे. (तुला हे काय दिसते? याला काय म्हणतात? तुला हे आवडते काय? तुला हे बनावट येते का? |

| | | |
|---|---|---|
| तयार करण्यासंदर्भात तयार आकृतीच्या संदर्भात बालकांना बोलते करावे. (उदाहरणार्थ, तू हे काय बनवले? कशापासून बनवले ? तू हे कुठे पाहिले? असे प्रश्न विचारावे.) | तयार आकृतीच्या संदर्भात बालकांना बोलते करावे. पद (उदाहरणार्थ, तू हे कुठे पाहिले ? याला काय म्हणतात? असे प्र प्रश्न विचारावे.) | असे प्रश्न विचारावे) प्रत्येक बालकाला स्वतंत्र वेगळे Tangrams देऊन त्याने ताईने तयार केलेल्या आकृत्यांसारखेच आकार बनवण्याची कृती करवून घ्यावी. |
| **विविधता** | वर्तुळ, त्रिकोण, चौकोन, आयत आकाराचे फोमचे तुकडे दयावेत. त्यातून रचना करायला सांगाव्यात. | |
| **थीम/विषय** | वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | कागद कापताना, बालकांनी कात्रीचा वापर करताना विशेष काळजी घ्यावी. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.3 १० आणि २० या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या (दोन्ही प्रकारे पुढे आणि मागे) मोजतात.<br>C-8.13 राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संदर्भात सोपी गणिते सोडवितात व तयारही करतात.<br>ब) LO 8.13.1 टॅनग्रामचा वापर करून विशिष्ट आकृत्यांची रचना करतात. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | आकार, अवकाश आणि मापन या गणितीय संकल्पना समजतात. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | आकार, अवकाश आणि मापन या गणितीय संकल्पना समजून वापरता येतात काय याचे निरीक्षण करावे. | |

## आधारशिला कृती क्र.: 24. Monday Matters: Understand and Transact

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **बाजाराला जाऊ** |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **नोटा, नाणी, खेळातील नाणी-नोटा** |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| • अंगणवाडीताईने पैशांच्या उपयोगासंबंधाने संवाद घडवून आणावा. (उदाहरणार्थ, आपल्याला पैसे का लागतात? आपण पैशांचे काय करतो ? खाऊ घेण्यासाठी काय हवे असते? दुकानात सामान कसे मिळते? इत्यादी.) अंगणवाडीताईने बालकांना काही खऱ्या नोटा व नाणी दाखवावी. | • अंगणवाडी ताईने वेगवेगळी नाणी बालकांच्या पुढ्यात ठेवावी. अंगणवाडी ताईने बालकांना एक नाणे उचलण्याची सूचना करावी. या नाण्यांची किंमत विचारावी.योग्य तेथे मदत करावी | • अंगणवाडीताईने वर्गात छोटासा बाजार आयोजित करावा. अंगणवाडीताईने काही बालकांना दुकानदार नेमावे. काही बालकांना गिऱ्हाईक करावे. खेळणीतील नाणी, नोटा यांच्या साहाय्याने खरेदी-विक्री करण्याची कृती करवून घ्यावी. वस्तू व पैसे यांची देवाणघेवाण समजावून दयावी. योग्य तेथे मदत करावी. |
| विविधता | बालकांना वेगवेगळया ठिकाणी क्षेत्रभेटीसाठी न्यावे. उदाहरणार्थ, फूल बाजार, भाजी | |

<table>
<tr><td></td><td colspan="2">बाजार, मार्केट, भांड्यांचे, कपड्यांचे दुकान इत्यादी.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">भाज्या व फळे, मदतनीस</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">यासंदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.11 १०० रुपयांपर्यंतचे साधे व्यवहार करतो.<br>अ) LO 8.11.1 कविता आणि गोष्टींच्या आधारे पैशाशी संबंधित शब्दसंपत्तीचा वापर करतात.<br>ब) LO 8.11.1 भारतीय चलनातील नाणी ओळखतो.<br>क) LO 8.11.1 भारतीय चलनातील नोटा ओळखतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">बालकांची गणन क्षमता विकसित होते. व्यवहारातील गणिती कौशल्ये</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">विकसित होण्यास मदत होते. खरेदी-विक्रीची माहिती होते. बालकाच्या व्यवहारक्षमतेचे निरीक्षण करावे. पैशाची देवाणघेवाण यांकडे लक्ष दयावे.</td></tr>
<tr><td colspan="3"></td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 25. Number Vocabulary: Understanding and Counting in Correct Sequence</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">चला क्रमाने मोजूया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">खडू, पाटी, दोरी, लेस, धूळपाटी, काटकी, गोट्या, खडे, चिंचोके, अंककार्ड इत्यादी.</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• बालकांना एक ते पाचपर्यंत अंक तोंडी म्हणण्यास सांगावे. एक, दोन अशा वस्तू दाखवून अंक ओळखण्यास सांगावे. पाटीवर, फरशीवर, एक ते तीन अंकांचे आकार काढण्यास सांगावे. वाळू, हवा, पाण्यावर एक ते तीन अंकांचे आकार काढण्यास सांगावे.</td><td>• बालकांना एक ते नऊपर्यंत अंक तोंडी म्हणण्यास सांगावे. एक, दोन अशा नऊपर्यंत वस्तू दाखवून अंक ओळखण्यास शे सांगावे. पाटीवर, फरशीवर, एक ते नऊ अंकांचे आकार काढण्यास सांगावे. वाळू, हवा, पाण्यावर एक ते तीन अंकांचे आकार काढण्यास सांगावे</td><td>• एक ते नऊ वस्तू (गोट्या, खडे, चिंचोके इत्यादी) मांडून ठेवाव्या. प्रत्येक बालकाला एक ते नऊ अंकांची कार्डे दयावी. वस्तू मोजून अंककार्ड ठेवण्यास सांगावे. (हीच कृती उलट घेता येईल.) अंककार्ड दाखवावे. त्यावरील अंक ओळखण्यास सांगावे. अंकाएवढ्या वस्तू मोजून कार्ड जवळ ठेवण्यास सांगावे.</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">जिना चढताना, उतरताना पायऱ्या मोजण्यास सांगणे, चालताना पावले किती झाली हे मोजण्यास सांगणे, जेवायला बसताना ताटे, वाट्या मोजण्यास सांगणे, जेवायला किती माणसे बसणार आहेत ते मोजायला सांगणे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), पक्षी व कीटक, वाहन</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">वर्गात सर्व ठिकाणी अंककार्डे लावून ठेवणे, जाता येता सहज कोणत्याही वस्तू मोजायला</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| | सांगणे. यासंदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.3 १० आणि २० या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या (दोन्ही प्रकारे पुढे आणि मागे) मोजतो.<br><br>अ) LO 8.3.1.1 संदर्भासह क्रमाने पाच पर्यंतच्या संख्यांचे गाणे गातो/ संख्यानामे सांगतो.<br><br>ब) LO 8.3.1.1 १० पर्यंतची संख्यानामे योग्य क्रमाने सांगतो/गातो आणि ५ पर्यंतची संख्यानामे आणि वस्तू यांची एकास एक संगती लावतो.<br>ब) LO 8.3.1.2 संख्येचे मूल्य समजनू घेऊन वस्तूंची मोजणी करतो. (५ पर्यंतचा संच ओळखतो.)<br>ब) LO 8.3.1.3 संख्येबाबतची समज दाखवितो. (उदाहरणार्थ, ५ म्हणजे ५ विविध वस्तू ५ व्यक्ती, ५ पुस्तके, ५ पेन्सिली इत्यादी.)<br>क) LO 8.3.1.1 २० पर्यंत संख्यानामे म्हणतो आणि मोजतो. संख्यानामे आणि वस्तू यांची १० पर्यंत एकास एक संगती लावतो.<br>क) LO 8.3.1.2 संख्यांचे मूल्य समजनू घेऊन १० पर्यंत वस्तूंची मोजणी करतो. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | अ) मोजणी आणि अंक ओळखणे या क्षमता विकसित होण्यास मदत होईल. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) बालक बोटे ठेवून वस्तू मोजतात का? एकावेळी एकच अंक मोजला जातोय का? याचे निरीक्षण करावे. |

## आधारशिला कृती क्र. : 26 Measure and Compare: Length, Weight and Height

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **अप्रमाणित एकक ओळख** |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **वर्गात आणि भोवताली उपलब्ध काही वस्तू, पेन, पेन्सिली, वेगवेगळया लांबीच्या दोऱ्या, लेस इत्यादी मोजपट्टी, शिवणकामासाठी लागणारा टेप, लाकूड बांधकाम यांमध्ये वापरला जाणारा टेप, वजन मोजण्याचा काटा,<br>उंची मोजण्याचे साधन** |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| कृती : माजून बघूया.<br>• बालकांना वर्गात दिसणाऱ्या लांबी असणाऱ्या वस्तू शोधून एकत्र करण्यास सांगावे. या वस्तू ओळीने मांडून ठेवण्याची सचूना करावी. या वस्तूंची लांबी (बोटे, वीत, पाऊल, दोरी, हात या अप्रमाणित साधनांनी) मोजण्यास सुचवावे. नंतर आखूड-लांब या | कृती : माजाचे कसे.<br>• ताईने बालकांना अर्धवर्तुळाकार बसवावे. हाताची वीत, पाऊल, दोरी, बोटे या अप्रमाणित साधनांनी एखादी वस्तू कशी मोजता येते, याविषयी बोलून सुरुवात करावी. आता एकेक प्रमाणित वस्तू दाखवून त्या वस्तूबद्दल बोलावे. त्यावर कसे आकडे लिहिलेले असतात, ती वस्तू कशी | कृती : माजण्यासाठी काय ?<br>• ताईने बालकांना अर्धवर्तुळाकार बसवावे. हाताची वीत, पाऊल, दोरी, बोटे या अप्रमाणित साधनांनी एखादी वस्तू कशी मोजता येते यांविषयी बोलून सुरुवात करावी. आता एकेक प्रमाणित वस्तू दाखवून त्या वस्तूबद्दल बोलावे त्यावर कसे आकडे लिहिलेले असतात, ती वस्तू कशी धरतात, कोण कुठली |

| | | |
|---|---|---|
| क्रमाने मांडणी करण्यास सांगावे. (जसे- आखूड पेन्सिल-लांब पेन्सिल, आखूड दोरी-लांब दोरी याप्रमाणे) | धरतात, कोण कुठली वस्तू जास्त वापरतो. म्हणजेच कोणत्या व्यवसायात ते साधन वापरले जाते. एकाच वस्तूची मापे मोजण्यासाठी किती जास्तीतजास्त उपयोग होतात, याविषयी सांगावे. | वस्तू जास्त वापरतो. म्हणजेच कोणत्या व्यवसायात ते साधन वापरले जाते. एकाच वस्तूची मापे मोजण्यासाठी किती जास्तीतजास्त उपयोग होतात, याविषयी सांगावे. |
| **विविधता** | वर्गात सर्व बालकांसमोर उंची, महा असताना त्याविषयी बोलत रहावे. वजन, शरीराची मापे घ्यावीत मापे घेत | |
| **थीम/विषय** | पाणी-पाऊस, भाज्या व फळे, ऋतू | |
| **ताईसाठी सूचना** | भाषा सोपी असावी. दिव्यांग बालकांना जवळ बसवावे. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.9 लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व एकक निवडतो.<br>ब) LO 8.9.1.1 दोन वस्तूंच्या लांबीच्या सदंर्भात तुलना करतो. च्यापेक्षा लहान, च्यापेक्षा उंच, च्यापेक्षा आखूड.<br>क) LO 8.9.1.1 तीन वस्तूंची त्यांच्या लांबीच्या दृष्टीने तुलना करतो. सर्वात लांब, सर्वात लहान, सर्वात उंच, सर्वात आखूड. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | प्रमाणित मोजमापे वापरण्याचे कौशल्य | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकांच्या चेहऱ्यावर किती उत्सुकता आहे, याचे निरीक्षण करावे. | |
| | | |
| **आधारशिला कृती क्र. : 26.1 Measure and Compare : Length, Weight and Height** | | |
| **उपक्रमाचे नाव** | प्रमाणित एकक ओळख | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | वर्गात आणि भोवताली उपलब्ध काही वस्तू (उदाहरणार्थ, खेळणी, खडू, वही, पुस्तक, खुर्ची, टेबल, पिंप, ग्लास, ताट, वाट्या, बूट इत्यादी) | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • बालकांना वर्गात दिसणाऱ्या काही वस्तू शोधून एकत्र करण्यास सांगावे. या वस्तू ओळीने मांडून ठेवण्याची सूचना करावी. नंतर लहान-मोठी या क्रमाने मांडणी करण्यास सांगावे. (जसे- लहान वाटी-मोठी वाटी, लहान खेळणे-मोठे खेळणे याप्रमाणे) | • बालकांना मापनाच्या साधनांची चित्रे (वजने, मापे, फुटपट्टी, तराजू इत्यादी) दाखवावी. याबाबत त्यांना बोलते करावे. (ही चित्रे ओळखण्यास सांगावे.) ही साधने कुठे दिसतात व कशासाठी वापरतात हे विचारावे. बालक चुकल्यास मार्गदर्शन करावे. कागदी वस्तूंचे मापन करण्याची कृती प्रत्येकाकडून करवून घ्यावी. (उदाहरणार्थ, दगडाचे वजन करणे. लीटरने पाणी मोजणे, रिबनीची लांबी मोजणे इत्यादी) | |
| **विविधता** | या कृतीत वेगवेगळया वस्तू व मापनाची साधने वापरून विविधता आणता येते. ज्ञानसवा तु साफल्यम् | |

| | |
|---|---|
| **थीम/विषय** | पाणी-पाऊस, भाज्या व फळे आणि ऋतू |
| **ताईसाठी सूचना** | साधनांच्या चित्राचा तक्ता वर्गात लावून ठेवावा. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. मसूदा प्रत<br>C-8.12 राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संकल्पनांचे आकलन होण्यासाठी आणि संकल्पना व्यक्त करण्यासाठी सुयोग्य व पुरेशी शब्दसंपत्ती विकसित करतो.<br>क) LO 8.12.1 योग्य मापनक्रियेसाठी संख्या, आकारनामे व क्रिया यांचा उपयोग करतो. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | मापनाचे विविध पदार्थ व मापन करण्याचे कौशल्य विकसित होते. मापनातील अचूकता निश्चित करण्याची क्षमता विकसित होते. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकांच्या कृती व व्यवहारांचे बारकाईने निरीक्षण करावे. |

## आधारशिला कृती क्र. : 27. Playing with jigsaw puzzles : Complete and Identify missing Parts

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **चित्रकोडी** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | | |
| **२ ते ६ तुकड्यांचे चित्र** | **८ ते ११ तुकड्यांचे चित्र** | **१८ ते २० तुकड्यांचे चित्र** |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • प्रथम २ तुकड्यांचे चित्र एका बालकासमोर ठेवावे. ते त्याला जुळवण्यास सांगावे.<br>• ते चित्र कशाचे आहे, हे विचारावे.<br>याचप्रमाणे सराव झाला, की तीन तुकड्यांचे चित्र, चार तुकड्यांचे चित्र, जास्त तुकड्यांचे चित्र दयावे.<br>• लक्षात ठेवू : बालकांना चित्र स्वतंत्रपणे जुळवू दया; तुम्ही मदत करू नका. तुम्हीही वर्तमानपत्रातील मोठी चित्रे कापून पझल तयार करा. | • बालकांना ८ तुकड्यांचे चित्र एका बालकांसमोर ठेवावे. ते त्याला जुळवण्यास सांगावे.<br>• ते चित्र कशाचे आहे, हे विचारावे. त्याच प्रमाणे सराव झाला, की दहा तुकड्यांचे चित्र, जास्त तुकड्यांचे चित्र द्यावे.<br>• लक्षात ठेवू : बालकांना चित्र स्वतंत्रपणे जुळवू दया; तुम्ही मदत करू नका. तुम्हीही वर्तमानपत्रातील मोठी चित्रे कापून पझल तयार करा. | • प्रथम १८ तुकड्यांचे चित्र एका बालकांसमोर ठेवावे. ते त्याला जुळवण्यास सांगावे.<br>• ते चित्र कशाचे आहे, हे विचारावे. याच प्रमाणे सराव झाला, की २० तुकड्यांचे चित्र, २२ तुकड्यांचे चित्र, जास्त तुकड्यांचे चित्र दयावे.<br>• लक्षात ठेवू : बालकांना चित्र स्वतंत्रपणे जुळवू दया; तुम्ही मदत करू नका. तुम्हीही वर्तमानपत्रातील मोठी चित्रे कापून पझल तयार करा. |
| विविधता | दोन चित्रांतील फरक शोधण्याचा फरक शोधण्याचा खेळ खेळवून या कृतीत विविधता आणता येईल. | |
| थीम/विषय | मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी-पाऊस, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस वाहन | |
| ताईसाठी सूचना | सावकाश बोलावे, प्रत्येकाला समजत आहे, याची खात्री करून घ्यावी. | |

| | | |
|---|---|---|
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.1 वेगवेगळया वर्गातील/गटातील वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.<br>अ) LO 7.1.2.1 परिचित वस्तूच्या चित्रातील हरवलेला भाग ओळखतो.<br>ब) LO 7.1.2.1 परिचित वस्तूच्या चित्रातील हरवलेले ३ ते ५ भाग ओळखतो.<br>क) LO 7.1.2.1 परिचित वस्तूच्या चित्रातील हरवलेले ५ ते ६ भाग ओळखतो. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | निरीक्षण क्षमता, स्मरणशक्ती | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | बालकांच्या प्रत्येक कृतीचे निरीक्षण करा. त्यांच्या उत्तराकडे विशेष लक्ष ठेवा. त्यांच्या निरीक्षणाला आणि उत्तराला लागणारा वेळ लक्षात घ्या. | |
| आधारशिला कृती क्र. : 27.1 Playing with jigsaw puzzles: Complete and Identify Missing Parts | | |
| उपक्रमाचे नाव | हरवलेला भाग ओळखा | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | | |
| निसर्ग चित्रे | पाण्याचे चित्र (काही अवयव नसलेले) | चित्रातील फरक ओळखण्यासाठी काही समान चित्रे |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • व्यक्तीचे किंवा निसर्गाचे चित्र, •एखादा कोणतेही प्राणी, पक्षी चित्र घ्यावे.<br>• चित्र असलेला कागद प्रत्येक बालकाला दयावा. हा कागद दोन किंवा चार तुकडे करण्याची सूचना करा. फाडलेला कागद पुन्हा जोडण्यास सांगा. | • अवयव नसलेल्या प्राण्याचे चित्र बालकांना दाखवा. चित्राचे निरीक्षण करण्यास सांगा. चित्राबद्दल बालकांना बोलते करा. (चित्रात काय दिसते ? पण चित्रातील प्राणी कोणता? या चित्रात प्राण्याला काय काढायचे राहून गेले? असे प्रश्न विचारा.) | • दोन सारखीच दिसणारी चित्रे बालकांना दाखवा. (पैकी एका चित्रात काही बाबी कमी असतील.) त्यांना दोन्ही चित्रांचे करण्यास सांगा. चित्रांबद्दल बोलते करा. (चित्रात काय काय दिसते? कोणत्या चित्रात काय कमी झाले/राहून गेले? असे प्रश्न विचारा.) दोन्ही चित्रातील कमी-अधिक शोधण्यास बालकांना प्रेरित करा. योग्य वेळी मदत करा. |
| **विविधता** | दोन चित्रातील फरक शोधण्यासाठी खेळ खेळवून या कृतीत विविधता आणता येईल. | |
| **थीम/विषय** | वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | सावकाश बोलावे, प्रत्येकाला समजत आहे याची खात्री करून घ्यावी. यासंदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.1 वेगवेगळया वर्गातील/गटातील वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.<br>अ) LO 7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना या इतरांच्या मदतीने नावासहित ओळखतो.<br>ब) LO 7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इत्यादी नावासहित ओळखून स्वतः त्याचे वर्णन करतो.<br>क) LO 7.1.1 लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती, | |

| | | |
|---|---|---|
| | चित्रे ओळखतो, त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (उदाहरणार्थ, घराचा मोठा दरवाजा) | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | निरीक्षण क्षमता, स्मरणशक्ती विकसित होण्यास मदत होते. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकांच्या प्रत्येक कृतीचे निरीक्षण करा. त्यांच्या उत्तराकडे विशेष लक्ष ठेवा. त्यांच्या निरीक्षणाला आणि उत्तराला लागणारा वेळ लक्षात घ्या. | |
| | | |
| **आधारशिला क्रिया क्र. : 28. माझ्याकडे किती आहेत? ऑब्जेक्ट द्या, घ्या, विभाजित करा आणि मोजा** | | |
| **उपक्रमाचे नाव** | मिळवू मिळवू एकात एक | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | चेंडू, गोट्या, पाने, दगड, फुले इत्यादी. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • बालकांना अर्धवर्तुळात बसवून घ्यावे किंवा टेबलाभोवती एकत्रित करावे. मध्ये वेगवेगळया रंगांच्या वस्तू व एक वाडगा ठेवावा.<br>• प्रथम एका बालकाला एका रंगाची (हिरवा) एक वस्तू (चेंडू) वाडग्यात टाकण्यास सांगावे.<br>• दुसऱ्या बालकाला दुसऱ्या रंगाच्या (लाल) दोन वस्तू (दोन चेंडू) • वाडग्यात टाकण्यास सांगावे. | • बालकांना अर्धवर्तुळात बसवून घ्यावे किंवा टेबल भोवती एकत्रित करावे. मध्ये वेगवेगळया रंगांच्या वस्तू व एक वाडगा ठेवावा.<br>• प्रथम एका बालकाला एका रंगाच्या (पिवळा) दोन वस्तू (चेंडू) वाडग्यात टाकण्यास सांगावे.<br>• दुसऱ्या बालकाला दुसऱ्या रंगाच्या (निळा) तीन वस्तू (तीन चेंडू) वाडग्यात टाकण्यास सांगावे. | • बालकांना अर्धवर्तुळात बसवून घ्यावे किंवा टेबलभोवती एकत्रित करावे. मध्ये वेगवेगळया रंगांच्या वस्तू व एक वाडगा ठेवावा.<br>• प्रथम एका बालकाला एका रंगाच्या (गुलाबी) चार वस्तू (चेंडू) वाडग्यात टाकण्यास सांगावे.<br>• दुसऱ्या बालकाला दुसऱ्या रंगाच्या (जांभळा) पाच वस्तू (पाच चेंडू) वाडग्यात टाकण्यास सांगावे. |
| **विविधता** | वेगवेगळया वस्तू वापरून आणि बालकांना कृतीचे स्वातंत्र्य देऊन विविधता आणत येईल. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक,मदतनीस वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | ही कृती प्रत्येक बालकाकडून समूहात व स्वतंत्रपणे वारंवार करवून घ्यावी. नऊपर्यंत बेरीज येणाऱ्या सर्व बेरजा अशा पद्धतीने करवून घ्याव्या. या संदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.6 संख्यांची जोड (composition) व फोड (decomposition) आणि संख्यांचे गट करणे यांसारख्या लवचिक कार्यनीतींचा वापर करून दोन अंकी संख्यांची बेरीज आणि वजाबाकी अचूकपणे करतो.<br>अ) LO 8.6.1 तोंडी उत्तर देण्याऐवजी ३ पर्यंतच्या वस्तू बाजूला काढतो किंवा गट करतो.<br>ब) LO 8.6.1.1दा ५ पर्यंत वस्तूंचे दोन गट एकत्र करतो, पुन्हा मोजतो. (उदाहरणार्थ, माझ्याकडे आणि माझ्या बहिणीकडे चॉकलेट आहेत. तर आता एकत्र करून मोजून माझ्याकडे एकूण किती चॉकलेट आहेत?) | |

<table>
<tr><td></td><td colspan="2">ब) LO 8.6.1.2 वस्तूंच्या गटातनू ५ पर्यंतच्या वस्तू बाजूला काढतात व पुन्हा मोजतात.<br>क) LO 8.6.1.1 ९ पर्यंत वस्तूंचे दोन गट एकत्र करतो व पुन्हा मोजतो. उदाहरणार्थ, माझ्याकडे आणि माझ्या बहिणीकडे चॉकलेट आहेत. तर आता एकत्र करून मोजून सांग माझ्याकडे एकूण किती चॉकलेट आहेत ?<br>क) LO 8.6.1.2 वस्तूंच्या गटातून ९ पर्यंतच्या वस्तू बाजूला काढतो व पुन्हा मोजतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये</td><td colspan="2">अवधान कक्षा वाढेल, एकाग्रता वाढेल.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालकांच्या वस्तू मोजण्याकडे लक्ष ठेवावे. कौशल्य, गतीचे अधिकत्व किंवा कृती करण्यास लागणारा वेळ याचे निरीक्षण करावे. बालकांची वस्तू मोजण्याची क्रिया व गती यांची निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3"></td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र. : 29. First, Then and After : Sequencing of Events</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">घटना</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">घटनाक्रमानुसार चित्रे</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>• बालकाच्या नेहमीच्या व्यवहारातील तीन कृतींची (दात घासणे, अंघोळ करणे, शाळेत जाणे अशी) चित्रकार्डे त्याला दाखवावीत.<br>• याबाबत बालकाला बोलते करावे. (यापैकी तू काय काय करतो? कसे करतो? कधी करतो? असे प्रश्न विचारावे.)<br>• नंतर या कृतींचा क्रम विचारावा (तू यापैकी आधी काय करतो? त्यानंतर काय करतो? असे प्रश्न विचारावे.)<br>• कृतीच्या क्रमाप्रमाणे कार्डाचा क्रम लावून घ्यावा.<br>• या कृतीच्या संदर्भात/अनुषंगाने स्वच्छतेची चर्चा घडवून आणावी.</td><td colspan="2">• बालकाच्या नेहमीच्या व्यवहारातील पाच कृतींची (झोपून उठणे, अंघोळ करणे, जेवण करणे, शाळेत जाणे, खेळणे अशी) चित्रकार्डे त्याला दाखवावीत.<br>• याबाबत बालकाला बोलते करावे. (यापैकी तू काय काय करतो? कसे करतो? कधी करतो? असे प्रश्न विचारावे.)<br>• नंतर या कृतींचा क्रम विचारावा. (तू यापैकी आधी काय करतो? त्यानंतर काय करतो? असे प्रश्न विचारावेत.<br>• कृतीच्या क्रमाप्रमाणे कार्डाचा क्रम लावून घ्यावा.<br>• या कृतीच्या संदर्भात / अनुषंगाने स्वच्छतेची चर्चा घडवून आणावी.</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">अ) झाडावरचे फळ<br>ब) झाडावरचे फूल, ते वाळलेले फूल<br>क) बी, ते झाड<br>ड) कोंबडीचे अंडे ते पिल्लू<br>इ) प्राण्याचे पिल्लू, पिल्लू खाणे खाते, मोठा प्राणी<br>फ) वेगवेगळ्या गोष्टी/कथातील घटनाक्रम<br>ग) फुलपाखराचा जीवनक्रम<br>h) जलचक्र<br>य) शेतकरी ते भाजी</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| | ज) गहू ते पोळी<br>झ) रस्ता ओलांडणे व सिग्नल<br>यासारख्या घटनाक्रमाचा समावेश होतो. |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगलातील) |
| **ताईसाठी सूचना** | दैनंदिन जीवनातील वेगवेगळया कृती घ्याव्यात. रटाळपणा येणार नाही याची दक्षता घ्यावी. या संदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C 8.4 चढत्या आणि उतरत्या क्रमाने ९९ पर्यंतच्या संख्यांची मांडणी करतो.<br>अ) LO 8.4.1 परिचित घटना/वस्तू क्रमाने मांडतो. (उदा. दैनंदिन जनसेवा दिनचर्या, कथा, आकार, २-३ आकार)<br>ब) LO 8.4.1 तीन स्तरांपर्यंत आकाराच्या आधारावर वस्तूंची क्रमवारी लावतो आणि त्यांचे स्तर शब्दबद्ध करतो. (मोठे- लहान के सर्वांत लहान, लांब-आखूड सर्वांत आखूड)<br>क) LO 8.4.1 आकार, लांबी, वजनावर आधारित पाच वस्तू चढत्या क्रमाने मांडतो |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | सखोल निरक्षण, स्मरणशक्तीचा विकास, सारासार आणि तर्कसंगत विचार |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालक कृतीतील स्वच्छतेबद्दल काय आणि कसा विचार करतात याचे निरीक्षण करावे. |

## आधारशिला कृती क्र. : 30. Models and Maps : Create, Read, Understand

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | नकाशा तयार करूया | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | कागद, क्रेयॉन इ. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • वर्गातील विविध वस्तू कुठे ठेवल्या याचे निरीक्षण करण्यास सांगावे. यासाठी प्रश्नांची मदत घेता येईल जसे टेबल कुठे?<br>• वर-खाली, पुढे-मागे यांसारखी शब्दावली बालके वापरतील या करिता प्रयत्न करावे. बालकांना मुक्तपणे वर्णन करू दयावे. वर्णन करताना शब्दावलीसाठी आवश्यक तेव्हा मदत करावी.<br>• वर्गातील विविध वस्तू कुठे याचा एक सोपा नकाशा बालकांचा सहभागातून कागदावर काढून | • बालकांना त्यांच्या घरापासून केंद्रापर्यंतच्या मार्गाबाबत प्रश्न विचारावे, जसे तू शाळेत कसा येतो, कोणत्या रस्त्याने येतो<br>• इत्यादी बालकांच्या वर्णनात गरज पडल्यास त्याला मदत करावी<br>• वस्तू लपविण्याचा खेळ घ्यावा. एका बालकाला वस्तू लपवायला सांगून त्याने दिलेल्या सूचनेनुसार इतरांना वस्तू शोधायला सांगावे. जसे, वर्गाबाहेर,पायरीच्या बाजूला याप्रमाणे | • एखादे ठिकाण निवडून तेथे भेट दयावी. बालकांना त्या ठिकाणांपर्यंत कसे पोहोचलो हे विचारावे. सरळ, पुढे, यांसारखे शब्द बालकांना वर्णन करताना वापरायला सांगावे.<br>• परिसरातील एखादया ठिकाणापर्यंत जाण्याचा रस्ता कागदावर काढण्यास सांगावे. |
| **विविधता** | स्थळ तसेच वस्तू लपविण्याच्या ठिकाणांत विविधता आणता येईल. | |

| | |
|---|---|
| **थीम/विषय** | मी. माझे कटब |
| **ताईसाठी सूचना** | या संदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br><br>C 8.8 मूलभूत भौमितिक आकार ओळखतात ते तयार करतात, त्याचे प वर्गीकरण करतात, समजून घेतात आणि समजावून सांगतात.<br>अ) LO 8.8.1 साध्या सूचनांचे पालन करतो आणि वस्तू आकार, रंग आणि माप यांनुसार जागेवर ठेवतो. उदा. लाल फुगा इथे आण आणि गोल चेंडू टेबलावर ठेव.<br>ब) LO 8.8.4 स्थितिदर्शक शब्द समजून आकृतिबंध तयार करण्यासाठी आकार, रंग, स्थान यांचा वापर करून, टप्प्याटप्प्याने दिलेल्या सूचनांचे पालन करतो.<br>क) LO 8.8.3 वस्तूचे माप, आकार वर्णन करण्यासाठी स्थलदर्शक शब्द वापरतो. (उदाहरणार्थ, वर, खाली, आत, बाजूला,) |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | शब्दसंग्रह आणि भाषिक कौशल्ये, बोधात्मक कौशल्ये |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकांच्या सहभागाचे निरीक्षण करणे, दिशानिर्देश सामायिक करण्यासाठी बालके वापरत असलेल्या शब्दसंग्रहाचे निरीक्षण करणे. |

## आधारशिला कृती क्र. : 31. Let's Construct : Houses, Bridges, Roadways and More

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **घरांच्या प्रकाराची ओळख.** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **कच्चे, पक्के तसेच सिमेंट काँक्रिटचे, बांबूचे घर अशी विविध प्रकारच्या घरांची, पूल, रस्ते यांची चित्रकार्डे, लाकडी ठोकळे, प्लास्टिक ठोकळे, रिकामी खोकी, पुठ्ठा, बाटल्यांची झाकणे.वयोगट** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • ताईने विविध प्रकारच्या साहित्यातून बनविलेल्या घरांची, रस्त्यांची, पूलांची चित्रकार्डे बालकांना दाखवावीत.<br>• अशाप्रकारची घरे, पूल, रस्ते त्यांनी कुठे पाहिले आहेत यावर चर्चा करावी.<br>• ताईने बालकांना लाकडी ठोकळे, प्लास्टिक ठोकळे, रिकामी खोकी, पुठ्ठा, बाटल्यांची झाकणे असे साहित्य देऊन पूल, रस्ता, घर तयार करायला सांगावे. | | |
| **विविधता** | पूल, रस्ते इत्यादींकरिता वरीलप्रमाणे कृती घेऊन विविधता आणता येईल. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, | |
| **ताईसाठी सूचना** | – | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात, C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारण भाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता / पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार | |

| | |
|---|---|
| | घेतो.<br>अ) LO 7.2.2 निरीक्षणावर आधारित कल्पनांचा, युक्त्यांचा उपयोग करतो.<br>ब) LO 7.2.2.2 ज्ञात माहितीचा नवीन संदर्भात वापर करतो.<br>क) LO 7.2.3.2 निरीक्षण करून सामान्यीकरण करतो. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | समस्या निराकरण, सकारात्मक विचार |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | प्रतिसादाचे निरीक्षण करावे. |

| **आधारशिला कृती क्र. : 32. Identify Common Symbols/Logos: Road Safety, Washroom, Food, Danger etc.** | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **सांकेतिक चिन्हे** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **विविध चिन्ह असलेली फ्लॅशकार्डे** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • केंद्रासाठी सांगणारी विविध ठिकाणे काही संकेतचिन्हे ताईंनी तयार करून लावावी. त्यांची ओळख मुलांना सहजपणे करून दयावी. जसे, हात धुण्याचे चिन्ह हात धुण्याच्या जागी इत्यादी. | • परिसरात बालकांना फिरायला न्यावे असे चिन्ह दिसतायेत का ते बघावे त्यांचे महत्त्व सांगावे. | • वस्तूवर विविध संकेतचिन्हे असतात. त्यांचा अर्थ त्यांना सांगावा.<br>• बालकांच्या सहभागातून विविध संकेतचिन्हे तयार करून घ्यावी. |
| **विविधता** | वाहतुकीच् या विविध चिन्हांची ओळख, तशी रचना वर्गात तयार करून करता येईल. बालकांना खेळणीतील गाड्या चालविण्यास सांगता येईल. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, मदतनीस, वाहन | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.<br>C-2.2 चिन्हे आणि प्रतीके याकरिता दृकस्मृती (visual memory) विकसित करतो. प्रत<br>अ) LO2.2.1 दोन सारखे आकार, चिन्हे यांच्या समान दिशा यांनुसार जोड्या लावतो. उदाहरणार्थ +<br>ब) LO 2.2.1 समान रचना परंतु भिन्न आकार व दिशा असणारी चिन्हे / प्रतीके जोडतो.<br>क) LO2.2.1 समान रचना परंतु भिन्न आकार व दिशा असणारी चिन्हे / प्रतीके जोडतो.<br>CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>C-1.5 हालचालींमध्ये सहजता दाखवतो आणि योग्यरितीने वागतो. (चालणे, धावणे, सायकल चालवणे)<br>अ) LO 1.5.1.2 वाहतुकीची चिन्हे ओळखतो. (सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग, यूटर्न, पूल/रेल्वेपूल इत्यादी.) | |

| | |
|---|---|
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | भाषा क्षमता, समस्या निराकरण |

| | | |
|---|---|---|
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | विविध चिन्हांना ओळखतो का ते बघावे. बालकांच्या सहभागाचे निरीक्षण करावे. | |
| | | |
| **आधारशिला कृती क्र. : 33. Clock Quest: Understand and explore concepts of time, types of clocks, watches** | | |
| उपक्रमाचे नाव | उपक्रमाला लागणारे साहित्य | |
| **ओळख घड्याळाची** | **वेगवेगळया प्रकारची घड्याळे** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती: घड्याळाची ओळख<br>•बालकांना वर्तुळाकार बसवावे.<br>•वेगवेगळया प्रकारची घड्याळे दाखवावी.<br>•हे काय आहे? उपयोग काय ? काय सारखे आहे? काय वेगळे आहे? तुम्ही कुठे पाहिले आहे? असे प्रश्न विचारावे.<br>•मोबाईल आणि कॉम्प्युटरवरील घड्याळ दाखवावे. | कृती: घड्याळाची ओळख<br>•बालवाटिका 'अ' ची कृती घ्यावी.<br>•बालकांना घड्याळातील आकडे ओळखण्यास सांगावे<br>•वेगवेगळे काटे दाखवावे. कोणता काटा जोरात पळतो, कोणता हळू ते ओळखण्यास सांगावे. | कृती : घड्याळाची ओळख<br>•बालवाटिका 'ब' ची कृती घ्यावी.<br>•किती वाजले ते कसे ओळखायचे ते सांगावे. उदाहरणार्थ, ९ वाजले, ९ वाजून गेले, १० वाजायला आले.<br>•सेकंद काट्याबरोबर सेकंद मोजून किती सेकंदाने मिनिट काटा<br>हलतो ते सांगावे,<br>•सेकंद काट्याबरोबर चालण्यास सांगावे.<br>•ताईने बालकांना घरातून अंगणवाडीत यायला किती वेळ लागला, हे विचारावे.<br>•किती वाजता जेवतात, हे<br>विचारावे. बालकांना अंदाजे वेळ सांगता येते का हे बघावे. |
| **विविधता** | रोजच्या कामात घड्याळाचा वापर करणे १० मिनिटे खेळूया<br>, १ मिनिटांत हात धुवून येऊ, १० मिनिटांत चित्र रंगवूया. | |
| **थीम/विषय** | ऋतू | |
| **ताईसाठी सूचना** | प्रत्यक्ष घड्याळ दाखवून हे खेळ घ्यावेत. | |

| | |
|---|---|
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व**<br><br>**अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.10 मिनिटे, तास, दिवस, आठवडे आणि महिने, वेळेची मोजमापे या एककामध्ये कालमापन करतो. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | घड्याळातून वेळ बघता येणे हे समजणे या क्षमतेच्या विकासास मदत होईल. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालके घड्याळाचे विविध प्रकार सांगू शकतात का? (मनगटावरचे, भिंतीवरचे, डिजिडल) |
| | |

## आधारशिला कृती क्र. : 34. Picture Hunt: Observe and match basic criteria

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **वर्णनानुसार चित्र ओळखूया.** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **परिसरातील परिचयातील वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी, घटना यांची चित्रे** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. चित्रकार्डे बालकांना दिसतील अशी ठेवावे.<br>•चित्रकार्डावर असलेल्या चित्राचे वर्णन बालकांना करून सांगावे. जसे, पिवळा रंग असलेली वस्तू.<br>•मी पक्षी आहे. आकाशात उडतो, कावकाव करतो.<br>• माझा रंग हिरवा, मी पक्षी आहे.<br>•मी आहे फळ, आधी असतो हिरवा.<br>•जंगलात राहतो, काळ्या पिवळ्या पट्ट्या असलेला.<br>•संबंधित वर्णनाच्या वस्तूचे कार्ड बालकास शोधून आणून देण्यास सांगावे.<br>•त्यानंतर बालकांना या खेळात वस्तूचे वर्णन करून शेजारील बालकास त्यानुसार वस्तूचे चित्रकार्ड शोधण्याची संधी दयावी.<br>•सर्व बालकांना वस्तूचे वर्णन करणे व वर्णनानुसार वस्तू शोधण्याची संधी दयावी. | | |
| **विविधता** | परिसरातील वस्तू, प्राणी, पक्षी याबद्दल कोडी तयार करणे. उदाहरणार्थ, माझा रंग हिरवा, मी सगळ्या झाडांवर आहे? ओळखा मी कोण | |
| **थीम/विषय** | भाज्या व फळे, प्राणी (पाळीव व जंगलातील), मदतनीस, वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | – | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.1 वेगवेगळया वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो | |

| | |
|---|---|
| | अ) LO 7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना या इतरांच्या मदतीने नावासहीत ओळखतो.<br>ब) LO 7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इत्यादी नावांसह ओळखून स्वतः त्याचे वर्णन करतो.<br>क) LO 7.1.1 लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती, चित्रे ओळखतो. त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (घराचा मोठा दरवाजा) |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | अ) सामाजिक-भावनिक विकास, साहचर्याची भावना, निरीक्षणशक्तीचा विकास, भाषिक (श्रवण आणि भाषण) विकास होण्यास मदत होईल.<br>ब) सूचनांचे अनुपालन करण्याची क्षमता विकसित होते.<br>क) कुटुंब, घर, परिसर यांतील वस्तू, सजीव यांबद्दल साहचर्याची भावना विकसित होते.<br>ग) कल्पनाशक्ती, स्मरणशक्ती बालकांना वस्तू, प्राणी, पक्षी यांची वैशिष्ट्ये कळण्यास मदत |

| | | |
|---|---|---|
| | होईल. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) परिसरातील परिचित वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी, घटना यांचे निरीक्षण करून व्यक्त होतात याचे निरीक्षण करावे.<br>ब) बालकांनी केलेले निरीक्षण ते योग्य शब्दांत व्यक्त करतात, याचे निरीक्षण करावे.<br>क) बालकांच्या स्मरणशक्तीचे, कल्पनाशक्तीचे निरीक्षण करावे. बालाकांच्या उच्चारांचे निरीक्षण करावे. | |
| | | |
| **आधारशिला कृती क्र. : 35. My family and me : Introduce, talk about self and family** | | |
| उपक्रमाचे नाव | असा मी असा मी | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | | |
| दैनंदिन वापरातील वस्तू, फळे, भाजीपाला, रंग, खेळण्यातील प्राणी, खाद्यपदार्थांचे चित्र, आवडती वस्तू नावासह चित्रकार्डे इत्यादी.उपक्रमाला लागणारे साहित्य | बालकांच्या नावांची व आडनावांची कार्डे तयार कुरून ठेवावी. | बॉल, खंजिरीबॉल , खंजिरी |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| कृती १ :मला काय आवडते - चित्र<br>• बालकांना वर्तुळात बसवून एका मुलाचे नाव घ्यावे.<br>• नाव घेतलेल्या बालकाने उभे राहावे.<br>• जमवलेल्या वस्तू एक गट किंवा चित्रकार्ड दाखवून त्यातले त्याला काय आवडते ते विचारावे.<br>• त्याने सांगितलेली वस्तू त्याला का आवडते, ते विचारावे.<br>• बालकाने चॉकलेटसारखी वस्तू सांगितल्यास छान म्हणून नंतर त्याने दात किडतात हं...! असे त्याचे परिणाम सांगावे.<br>• मला काय आवडते-खाऊ मला काय आवडते-प्राणी<br>• मला काय आवडते-पक्षी मला काय आवडते-फूल याप्रमाणे, आवडता पदार्थ, प्राणी, पक्षी, फूल, आवडत्या व्यक्तीचे नाव विचारावे. | कृती : शोध आपले नाव<br>• बालकांना परिसरात फिरण्यास न्यावे.<br>• तेथे असणाऱ्या झाडांची, फळा- फुलांची, पक्षांची नावे सांगावी. आपल्यालादेखील असे नाव आहे का, असे विचारावे.<br>• एकेका बालकाकडून त्याचे नाव व आडनाव विचारून घ्यावे.<br>• नाव सारखे असल्यास वेगळे आडनाव आहे, हे समजून सांगावे.<br>• वर्गात आल्यानंतर त्यांच्या नवाच्या पाट्या त्यांना दयाव्या/ गळयात घालाव्या.<br>• बालकाच्या स्वतःच्या नावासह असलेले कार्ड खोक्यामध्ये टाकून हजेरी घ्यावी.<br>गप्पा - माझे कुटुंब<br>• बालकांशी ताईंनी कुटुंब, शाळा, याबाबत गप्पा माराव्या. प्रश्न विचारावे. घरातील व्यक्ती कोणकोणते व्यवसाय करतात ते विचारावे.<br>• जसे : तुझ्या घरी कोणकोण आहे? तुझी आई काय करते? तुझा मित्र, मैत्रीण कोण? तुमच्या शेजारी कोण राहते? ते काय करतात ?गप्पा - माझी शाळा | कृती १खेळ : सांगा सांगा लवकर सांगा.<br>तुमच्या आईचे नाव सांगा.<br>• मुलांना गोलात उभे करावे.<br>एका मुलांच्या हातामध्ये बॉल दयावा.<br>• खंजिरी वाजवायला सुरुवात करावी. खंजिरी वाजताना मुलांनी बॉल शेजारच्या मुलाकडे देत जावे.<br>• खंजिरी वाजवताना ताईंनी 'सांगा सांगा पटकन सांगा तुमच्या आईचे/बाबांचे/दादाचे/ताईचे नाव सांगा,' असे म्हणत राहावे.<br>• खंजिरी वाजवायचे थांबल्यांवर ज्या मुलांच्या हातामध्ये बॉल पद असेल त्यांनी विचारलेले नाव सांगावे. नंतर खेळ पुन्हा पुढे सुरू ठेवावा.<br>• अशा त-हेने सर्व आई बाबा, आजी आजोबा, ताई दादा, अंगणवाडी ताई इत्यादींचे नावे विचारून घ्यावी.<br>• सर्व बालकांना नावे सांगण्याची संधी दयावी.<br>कृती २ : माझा पत्ता<br>• बालकांना त्यांचे घर कोठे आहे ते विचारावे.<br>प्रत्येक बालकाला त्याचा पत्ता सांगून तो म्हणवून घ्यावा.<br>बालकांना स्वतःचा पत्ता पाठ होईपर्यंत रोज सराव |

| | | |
|---|---|---|
| | शाळेविषयी माहिती विचारता येईल.<br>शेजारी कोण राहते याविषयी माहिती विचारता येईल. | घ्यावा. |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| | - | पत्ता सांगता यायला लागल्यावर 'सांगा सांगा लवकर सांगा' हा खेळ घेऊन स्वतःचा पत्ता सांगण्यास सांगावे.<br>कृती २ : माझे कुटुंब<br>• प्रत्येक बालकाला त्याच्या घरात किती व्यक्ती रहातात ते विचारावे.<br>• वरील प्रकारे खेळ घेऊन त्या व्यक्ती काय काम करतात, कोणते कपडे घालतात, ते विचारावे.<br>टाळया वाजवू-माहिती सांगू<br>बालकांना वर्तुळाकार बसवून टाळयांची संख्या व अपेक्षित माहिती यांविषयी मार्गदर्शन करावे.<br>बसलेल्या बालकांनी जेवढ्या टाळया वाजतील. त्याप्रमाणे माहिती सांगावी.<br>उदाहरणार्थ, एक टाळी शाळेचे नाव सांगा, दोन टाळया कुटुंबातील व्यक्तींची संख्या सांगा, तीन टाळया करतात ते सांगा. बाबा काय करतात ते सांगा. |
| **विविधता** | रंग, आकार, कपडे, खाऊ, कोणत्या गावाला जायला आवडते याबद्दल चर्चा करावी. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब | |
| **ताईसाठी सूचना** | या संदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी | |

| | |
|---|---|
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>CG-4.1 कुटुंब आणि समाजाचा एक घटक या नात्याने स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करतो.<br>अ) LO - 4.1.1 स्वतःची स्वतंत्र व्यक्ती म्हणून ओळख दर्शवतो आणि आवड सांगतो. (उदाहरणार्थ, आवडता शर्ट, बॅग, वस्तू)<br>अ) LO-4.1.2 स्वतःचे नाव व आडनाव सांगतो.<br>ब) LO - 4.1.2 स्वतःच्या ओळखीबाबतची इतर माहिती देतो. जसे, पालकांचे नाव.<br>बवक) LO - 4.1.1 स्वतःला कुटुंब, शेजारी, शाळा आणि शहर यांचा एक घटक म्हणून ओळखतो. जेथे वेगवेगळया व्यक्ती वेगवेगळया भूमिका निभावत असतात.<br>क) LO - 4.1.2 ओळखी बाबतची वैयक्तिक माहिती देतो. जसे, घरचा पत्ता, कुटुंबातील व्यक्तींची माहिती, शाळेची माहिती. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | बौद्धिक विकास होतो, स्वचे भान, सहकार्य, आदर भाषिक विकास स्व- कुटुंब, परिसर यांचे ज्ञानआधारशिला कृती क्र. :<br>36. Guess the sound : Create, recognize and differentiate |

| | |
|---|---|
| | उपक्रमाचे नाव<br>आवाज ऐकू आणि ओळखू.<br>उपक्रमाला लागणारे साहित्य<br>मोबाईल आणि स्पीकर्सच्या साहाय्याने प्राणी, पक्षी, वाहने असे विविध आवाज. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) बालके स्वतःच्या वैशिष्ट्यांनुसार नाव उच्चारल्यावर उभे राहतात का ? स्वतःची आवड सांगतात का पाहणे<br>ब) बालके स्वतःचे नाव व आडनाव बिनचूक सांगतात का? हे पहावे.<br>क) बालके आपल्या कुटुंबातील नावे व्यवस्थित सांगतात का हे पहावे. |

## आधारशिला कृती क्र. :36. Guess the sound : Create, recognize and differentiate

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **आवाज ऐकू आणि ओळखू.** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **मोबाईल आणि स्पीकर्सच्या साहाय्याने प्राणी, पक्षी, वाहने असे विविध आवाज.** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती : परिसरातील विविध आवाज ऐकणे आणि वेगळेपण ओळखणे.<br>कृती १ :<br>• ताईने मोबाइल आणि स्पीकर्सच्या साहाय्याने प्राणी, पक्षी, वाहने असे विविध आवाज ऐकवावे. | कृती : वस्तू/वाद्य यांचे विविध पातळीतील आवाज ऐकणे.<br>• वरील साहित्यापैकी कोणतेही साहित्य वापरून ताई आधी हळू आवाज ऐकवेल.<br>• त्यानंतर आवाजाची पातळी वाढवून वस्तूचा आवाज ऐकवेल. | कृती : मध्यम आवाज ओळखणे.<br>• वरील पैकी एक वस्तू वापरून तीन पातळयांमध्ये त्या वस्तूचा आवाज ताईने करून दाखवावे.<br>• मध्यम पातळीचा आवाज ऐकू आला, की बालकांनी ताईला आवाज थांबवायला सांगावे. |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| • आवाज ऐकवून झाल्यावर कोणता आवाज कशाचा आहे, असे ताईने बालकांना विचारावे.<br>• बालकांना रोज ऐकत असणाऱ्या विविध आवाजांबद्दल ताईने विचारणे आणि आवाज काढून दाखवायला सांगावे.<br>• प्राणी, पक्षी यांचे आवाज बालकांना काढायला सांगावे.<br>• विविध वस्तूंनी आवाज करायला सांगावे. | • खूप मोठ्या आवाजात वस्तूचा आवाज ऐकवेल.<br>• ताई वस्तू वापरून ज्या पातळीचा आवाज करेल तो ऐकून बालकांनी त्याच पातळीच्या आवाजात टाळ्या वाजवण्याची कृती करावी.<br>• बालकांना विविध पातळीमध्ये पक्षी, प्राणी यांचे आवाज काढायला सांगावे. | • बालकांचे गट करून गटांमध्ये तीनही पातळयांमधील विविध आवाज (प्राणी, पक्षी) काढायला सांगावे. |
| **विविधता** | परिसरातील आवाज, ओल्या-वाळलेल्या पानांचे, कागदांचे, प्लॅस्टिक पिशव्यांचे आवाज ऐकवा. | |
| **थीम/विषय** | पाणी-पाऊस, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, वाहन | |

| | |
|---|---|
| **ताईसाठी सूचना** | अ) आवाज ऐकवण्यासाठी मोबाइल फोनचा व साहित्याचा वापर करावा.<br>विशेष बालकांसाठी हावभाव करून त्यांना सांगावे. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.<br>CG-2.3 आवाजातील चढ-उतार (आरोह-अवरोह) सूर-ताल-लय पथथ्यांनुसार आवाजातील फरक ओळखतो.<br>अ) LO - 2.3.1 मानव, प्राणी, वाहने, टाळया यांचा आवाज, पाण्याचा आवाज, वस्तूंचा आवाज, इत्यादी. वातावरणातील आवाज यातील वेगळेपणा ओळखतो.<br>ब) LO-2.3.1 पक्षी, प्राणी, वादय आणि मानवी आवाज यांच्या आवाज पातळीमधील चढ-उतारातील फरक ओळखतो.<br>क) LO - 2.3.1 आवाजाच्या पातळीमधील माध्यम स्वर ओळखतो. |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | श्रवणक्षमता, वर्गीकरण |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | अ) परिसरातील विविध प्रकारचे आवाज ओळखता येतात की नाही, हे पाहणे. ।<br>ब) बालके विविध पातळीमधील आवाज ओळखू शकतात की नाही, हे पाहणे.<br>क) बालके तीनही पातळीतील आवाज ओळखू शकतात की नाही, ते पाहणे. |

| **आधारशिला कृती क्र. : 37. Who Am I?: Guess, Identify and describe object** | | |
|---|---|---|
| | ओळखा मी कोण? भाषिक कोडी | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | खिडकी, फळा इत्यादींची चित्रे | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| • खिडकी, फळा इत्यादींची चित्रे बालकांसमोर ठेवावीत.<br>• बालकांना वर्गातील वस्तूंची नावे भाषिक कोडी तयार करून विचारावी. उदाहरणार्थ, माझा रंग आहे काळा त्यावर तुम्ही खडूने लिहिता ओळखा मी कोण?<br>• माझे नाव आहे 'क' मी आहे फूल पाण्यात येणारे. ओळखा मी कोण ?<br>• मी आहे भिंतीवर तुम्हाला देतो उजेड. ओळखा मी कोण? | ताईने बालकांना फळांबद्दल कोडी तयार करून विचारावी.<br>• भाषिक कोडी :<br>> माझा रंग आहे पिवळा मला सोलून खातात. ओळखा मी कोण? (केळी)<br>> मी आतून असतो लाल वरून हिरवा, माझ्यात असते पाणी खूप. ओळखा मी कोण ? (कलिंगड)<br>> माझा रंग आहे केशरी. ओळखा मी कोण ? (संत्री)<br>> माझे नाव आहे 'प' या अक्षरावरून ओळखा मी कोण ? (पपई)<br>> मी कधी असतो लहान कधी खूप मोठे फळ, ओळखा मी कोण?<br><br>(फणस) | |
| विविधता | प्राणी, पक्षी, भाज्या, फुले, वस्तू इत्यादी | |
| थीम/विषय | भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन | |
| ताईसाठी सूचना | – | |

| | |
|---|---|
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C7.1 वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.<br>अ) LO-7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी घटना इत्यादी इतरांच्या मदतीने नावांसहित ओळखतो.<br>ब) LO - 7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी घटना इत्यादी नावासहित ओळखून स्वतः त्याचे वर्णन करतो.<br>क) LO-7.1.1 लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, आणि त्यांच्या प्रतिकृती चित्रे ओळखतो. त्याची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (उदाहरणार्थ, घराचा मोठा दरवाजा) |

| | |
|---|---|
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | भाषिक कोडी सोडवता येणे, वर्णनावरून प्राणी, पक्षी, भाज्या, फुले हे ओळखणे. |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | अ) भाषिक कोडी सोडवता येतात का? वर्णनावरून प्राणी, पक्षी, भाज्या, फुले हे ओळखता येतात का? |

**आधारशिला कृती क्र. : 38. Playing with sounds : Identify and differentiate beginning and ending sound**

| **उपक्रमाचे नाव** | **शब्दातील ध्वनी ओळखूया.** | |
|---|---|---|
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| **गाण्यातील सारखे शब्द ओळखूया.**<br>• ताईने ओळीच्या शेवटी समान आवाज ऐकू येणारे शब्द असणाऱ्या बडबडगीतांचा संग्रह करावा.<br>• बडबडगीत ऐकवल्यानंतर ओळीच्या शेवटी ऐकू येणाऱ्या शब्दांमध्ये सारखेपणा आहे, हे लक्षात आणून दयावे.<br>• सुरुवातीला बालकांना अपरिचित शब्द असलेले बडबडगीत ऐकवावे.<br>• हे शब्द समूहात म्हणून घ्यावे.<br>• हे शब्द वैयक्तिक म्हणून घ्यावे.<br>• या शब्दांतील प्रथमध्वनी पुन्हा ऐकवून त्याप्रमाणे उच्चार करावयास लावावा.<br>• या शब्दातील अंतिमध्वनी पुन्हा ऐकवून त्याप्रमाणे उच्चार करावयास लावावा.<br>• बालकांना त्यांच्या परिचयातील शब्द ऐकवावे.उपक्रमाला लागणारे साहित्य | **गाण्यातील सारखे शब्द ओळखूया.**<br>• ताईने ओळीच्या शेवटी समान आवाज ऐकू येणारे शब्द असणाऱ्या बडबडगीतांचा संग्रह करावा.<br>• बडबडगीत ऐकवल्यानंतर ओळीच्या शेवटी ऐकू येणाऱ्या शब्दांमध्ये सारखेपणा आहे, हे लक्षात आणून दयावे.<br>• बालकांना यमक साधणारी शब्दयोजना असणारे बडबडगीत सोबत गाऊन घ्यावे.त<br>• त्यानंतर वरीलप्रमाणे विविध बडबड गीते ऐकवून त्यातील यमक असणारे शब्द ओळखण्याची संधी बालकांना दयावी.<br>**कृती : बडबड गीतातील ओळींमध्ये वारंवार येणारी अक्षरे किंवा शब्द ओळखूया.**<br>ताईने बडबड गीतातील ओळींमध्ये वारंवार येणारी अक्षरे किंवा शब्द असणाऱ्या बडबडगीतांचा संग्रह | • बालकांना समान ध्वनी असणाऱ्या शब्दांची काही उदाहरणे दयावीत. बालकांना शब्दाच्या सुरुवातीला समान ध्वनीने सुरू होणारे शब्द सांगण्यास सांगावे.<br>• अशा समान ध्वनींचे शब्दचक्र तयार करून घ्यावे. मुलांनी पद सांगितलेले लिहावेत. शब्द फळयावर<br>• बालाकांना शब्दाच्या शेवटचे ध्वनी समान असणाऱ्या शब्दांच्या जोड्या सांगण्यास सांगावे. बालकांनी सांगितलेले शब्द फळयावर लिहावेत.<br>• असे काही शब्द असणारे (यमक असणारे) बडबडगीत आठवून सांगण्यास सांगावे.<br>• सामूहिक पद्धतीने बडबडगीत गाऊन घ्यावे.<br>• बालकांना चिऊ-काऊ-माऊ, पोळी-टाळी-विळी असे शब्द म्हणून दाखवावे. बालकांना या शब्दांसारखे अधिक शब्द विचारावे. |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| | • सुरुवातीला बालकांना अपरिचित शब्द असलेले बडबडगीत ऐकवावे.<br>• या शब्दांतील प्रथमध्वनी पुन्हा ऐकवून त्याप्रमाणे उच्चार करावयास लावावा.<br>• या शब्दांतील अंतिमध्वनी पुन्हा ऐकवून त्याप्रमाणे उच्चार करावयास लावावा.<br>• बालकांना त्यांच्या परिचयातील शब्द ऐकवावे. | करावा. व म्हणवून घ्यावे. योग्य तेथे योग्य दुरुस्ती करून हे शब्द बालकांकडून म्हणवून घ्यावे. |
| विविधता | गाणी, गोष्टी यांमधून वेगवेगळया शब्दांची ओळख करून द्यावी. | |
| थीम/विषय | पाणी-पाऊस, भाज्या व फळे, मदतनीस | |
| ताईसाठी सूचना | या संदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-10 बालके भाषा एक (11) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.<br>CG-10.1 शब्दध्वनीची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गंफुतो आणि शब्दांपासून शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो.<br>अ) 1.0-10.1.2 शब्दांची नक्कल आणि निर्मिती करतो.<br>ब) 1.0-10.1.2 शब्दांतील प्रारंभिक आणि अंतिम अक्षरे ओळखतो क) 1.0-10.1.2 अक्षरे स्वर आणि व्यंजने यामध्ये वेगळी करतो. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | अ) श्रवणकौशल्य, सूचना समजून पालन करणे या कौशल्यांचा विकासास मदत होईल.आधारशिला कृती क्र.: 38.1 Playing with sounds: Identify and differentiate beginning and ending sound | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | अ) शब्दांची नक्कल करताना बालके शब्दध्वनींचे नीट श्रवण करत आहेत का याचे निरीक्षण करावे. | |

## आधारशिला कृती क्र.: 38.1 Playing with sounds: Identify and differentiate beginning and ending sound

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **शब्दातील ध्वनी ओळखूया 1.2** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | — | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| **बालकांना इंग्रजी गाणे ऐकण्याची व सोबत म्हणण्याची संधी दयावी** | ही कृती इंग्रजीसाठी आहे. L2<br>• ताईने इंग्रजी गाणी म्हणताना ओळींमध्ये वारंवार येणारी अक्षरे किंवा शब्द असणाऱ्या इंग्रजी गीतांचा संग्रह करावा.<br>• सुरुवातीला बालकांना त्यांच्या परिचयातील शब्द ऐकवावे, या शब्दांतील प्रथमध्वनी पुन्हा ऐकवून त्याप्रमाणे उच्चार करावयास लावावा. या शब्दांतील अंतिमध्वनी पुन्हा ऐकवून त्याप्रमाणे उच्चार करावयास लावावा. बालकांना त्यांच्या परिचयातील शब्द म्हणण्यास सांगावे. इंग्रजी गाणी - | |

| | |
|---|---|
| | Rabbits one Red, Action Song, Rain, The Fat Cat, Clouds |
| **विविधता** | गाणी, गोष्टी यामधून वेगवेगळ्या शब्दांची ओळख करून दधावी. |
| **थीम/विषय** | पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग). |
| **ताईसाठी सूचना** | या संदर्भात प्रकल्पनिहाय व वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-11 बालके भाषा दोन (L3) मध्ये वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात. C11.1 शब्दध्वनींची जाणीव होऊन शब्दध्वनी / अक्षरे शब्दात गंफुतो आणि शब्दांपासून शब्दध्वनी / अक्षरे वेगळी कस्तो.<br>(क) 10-11.11 बडबड से म्हणतो.<br>क) LO-11.1.1 अक्षरध्वनींची नक्कल करतो. |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | अ) Alphabet अक्षर आणि त्याचा ध्वनी याची सांगड घालणे आणि ते स्मरणात ठेवणे |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | अ) घ्वनीवरून शब्द ओळखता येतो का याचे निरीक्षण करावे, |
| | |

## आधारशिला कृती क्र.: 39 smell and tell: Identify, distinguish pleasant/unpleasant

| | |
|---|---|
| उपक्रमाचे नाव | सुगंध व दुर्गंध समजून घेऊया. |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | अत्तर, फुले, साबण, पावडर, चंदन, कापूर, अगरबत्ती, परफ्यूम, साबण,<br>अ) ध्वनीवरून शब्द अळिखता येतो का याचे निरीक्षण करावे.<br>ओली माती, लसूण, लोणचे, कुजलेली फुले, कुजलेली पाने, कारखान्यातून निघणाऱ्या धुराचे चित्र. भाजी मंडईत सडलेल्या भाज्यांचे चित्र. कचराकुंडीचे चित्र, ओसंडून वाहणाऱ्या गटाराचे चित्र इत्यादी. |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| कृती : विविध सुगंधित आणि दुर्गंधित वस्तूंची ओळख करून देणे.<br>• सगळ्या बालकांना वर्तुळात बसवावे. अत्तर, फुले, साबण, पावडर, चंदन, कापूर, अगरबत्ती अशा सुगंधी वस्तूंची ओळख वास देऊन प्रत्यक्ष करून देवी.<br><br>• आणखी काही सुगंधी वस्तू, फुले, पाने यांचा सुगंध बालकांना प्रत्यक्ष दयावा.<br>• कोणकोणत्या गोष्टींचा वास/ दुर्गंध आपल्याला नकोसा वाटतो, अशा गोष्टींची उदाहरणे दयावी. उदाहरणार्थ, खराब झालेली भाजी, | कृती: विविध सुगंधित आणि दुर्गंधित वस्तूंची ओळख करून देणे.<br>• ताईने बालकांना वस्तूंचा वास घेऊ दयावा आणि नाव देऊ दयावे.<br>• काही वेगळ्या वासाच्या वस्तू शोधा. जसे : परफ्यूम, साबण, ओली माती, लसूण, लोणचे, कुजलेली फुले, कुजलेली पाने इत्यादी.<br>• बालकांना त्यांचे डोळे बंद करण्यास सांगा आणि एक-एक करून त्यांना वास घेण्यासाठी वस्तू दया.<br>• बालकांना वासांमध्ये फरक शे करण्यास सांगा. व फुले आणि परफ्यूमसारखे वास्<br>• सुगंध आणि दुर्गंधाबद्दल चर्चा करा. कोणत्या वासाशी मिळताजुळता आहे का, हे | • बालकांना वर्तुळात बसवून विविध धोकादर्शक गंध निर्माण होणाऱ्या स्रोतांची चित्रे दाखवणे व माहिती सांगणे. उदाहरणार्थ, कारखान्यातून निघणाऱ्या धुराचे चित्र.<br>• भाजी मंडईत सडलेल्या भाज्यांचे चित्र.<br>• कचराकुंडीचे चित्र / ओसंडून वाहणाऱ्या गटाराचे चित्र.<br><br>• गाडीतील धूर, पेट्रोलपंपावरील वास, मॉसकिटो कॉईल इत्यादी.<br>• कीटकनाशक रसायने, रासायनिक खते चर्चा-वास<br>• आणखी माहिती असलेल्या किंवा त्यांच्या अनुभवतील धोकादायक गंधाची चर्चा करावी. |

| | | |
|---|---|---|
| कचऱ्याचा डब्बा, शू केल्यावर पानी नाही टाकले तर.... इत्यादी.<br>बास ओळखूया.<br>• बालकांना वासाची ओळख झाली की सराव घ्यावा.<br>• बालकांना डोळे बंद करायला सांगा आणि एका-एका वस्तूचा गध दया, त्यानंतर सुगंध आहे की दुर्गंध है. त्यांना ओळखायला सांगा. | विचारा. जसे अत्तर काही लोकांना सुगंधी वाटते, तर काहींना त्या वासाचा त्रास होतो म्हणून त्यांना अत्तरचा दुर्गंध येतो.<br>• गुलाब सुगंधी वास आहे, तर पेट्रोलचा वास बहुतेक लोकांसाठी आवडता आहे, तर काही लोकांना आवडत नाही याबद्दल चर्चा करावी. | |

| | |
|---|---|
| **विविधता** | फुले, भाज्या, मसाल्याचे पदार्थ, फळांचे असे विविध सुगंध व दुर्गंध दयावेत. |
| **थीम/विषय** | पाणी-पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), |
| **ताईसाठी सूचना** | प्रत्यक्ष वस्तू दाखवून ही कृती करून घ्यावी |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.<br>CG-2.4 वेगवेगळे गंध आणि चव यांतील फरक ओळखतो.<br>अ) 1.0-2.4.1 सुगंध आणि दुर्गंध ओळखतो.<br>ब) 1.0-2.4.1 फूल, अत्तर, खाद्यपदार्थ यांच्या सुगंधामधील फरक ओळखतो.<br>क LO-2.4.1 धोकादायक गंध ओळखतो. उदाहरणार्थ, धूर, सडलेली अंडी इत्यादी. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता कौशल्ये** | अ) सुगंध आणि दुर्गंध यांमध्ये फरक करण्याची क्षमता |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) बालकांना सुगंध आणि दुर्गंध यांतील फरक समजतो की नाही याचे निरीक्षण करावे. |

**आधारशिला कृती क्र. : 40. Health and hygiene: Discussion on routine, body parts, tools to clean**

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **हात स्वच्छ करूया आणि छान दिसूया** |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **चित्रकार्ड साबण, हात पुसायला टॉवेल / नॅपकिन, आरसा, कंगवा** |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| •हात धुण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवावे.<br>•चित्रफीत किंवा फ्लॅशकार्ड दाखवावे.<br>•बालकांशी चर्चा करावी<br>•'शी' करायला जाण्यापूर्वी व नंतर इतरांची मदत घेऊन हात धुवायला व पुसायला सांगावे.<br>•जेवणापूर्वी व नंतर इतरांची मदत घेऊन हात धुवायला व पुसायला | •जेवणापूर्वी व जेवणानंतर हात स्वच्छ धुणे व पुसणे या क्रियांसाठी बालकाला नियमितः प्रोत्साहित करत रहावे,<br>• 'शी' करायला जाण्यापूर्वी व नंतर हात धुवायला व पुसायला ताईने नियमित सांगत रहावे.<br>•बालकाकडून योग्य पद्धतीने हात धुण्याची क्रिया नियमित करून घ्यावी.<br>**आवश्यक पूर्वतयारी :** वर्गात आरसा करावा अशा वस्तू | •टुथब्रश, कंगवा, दप्तर अशा स्वतःच्या वस्तूंचा नीटनेटकेपणाने वापर कसा करावा, हे कृती / गोष्टींच्या स्वरूपात दाखवावे.<br>•आरसा, कंगवा अशा वस्तू बालकाना वापरण्यास सांगाव्या व वापरून झाल्यावर जाग्यावर ठेवण्यास सांगावे. |

| | | |
|---|---|---|
| सांगावे | ठेवाव्या | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| • डोळयांची स्वच्छता<br>• नाकाची स्वच्छता<br>• पायांची स्वच्छता<br>• डोळे, नाक व पाय या इतर अवयवांची स्वच्छता करण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवणे. | कृती : छान दिसूया<br>• टुथब्रश, कंगवा, दप्तर अशा स्वतःच्या वस्तूंचा नीटनेटकेपणान वापर कसा करावा, हे कृती/ गोष्टींच्या स्वरूपात दाखवावे.<br>• आरसा, कंगवा या वस्तू बालकांना वापरण्यास सांगाव्या व वापरून झाल्यावर जाग्यावर ठेवण्यास सांगावे, | |
| विविधता | जेवणाच्या आधी-नंतर, शाळेतून घरी गेल्यावर, मातीत खेळून आल्यावर हात स्वच्छ करायला सांगावे. | |
| थीम/विषय | मी, माझे कुटुंब, ऋतू | |
| ताईसाठी सूचना | या संदर्भात प्रकल्पनिहाय च वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>C-1.2. स्वतःची मूलभूत काळजी आणि स्वच्छता यांचा अवलंब करतो,<br>अ) LO-1.2.1 शौचाला आण्यापूर्वी व नंतर, तसेच जेवणापूर्वी व नंतर मस इतरांबी मदत घेऊन हात धुतो आणि पुसतो.<br>ब) 1.0-1.2.1 शौचाला जाण्यापूर्वी व नंतर, तसेच जेवणापूर्वी व नंतर, हात धुतो आणि पुसतो. या क्रिया स्वतःहून करण्यास सुरुवात करतो.<br>ब) 1.0-1.2.3 स्वतःहून वैयक्तिक वापराच्या वस्तूंचा योग्य वापर करतो. क) 1.0-1.2.3 स्वतःहून वैयक्तिक वापराच्या वस्तूंचा योग्य वापर करतो. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | स्वतःच्या अ<br><br>वयवांची स्वच्छता राखण्याची क्षमता विकसित होईल. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | बालक स्वतःची योग्य पद्धतीने स्वच्छता करत आहे की नाही याचे निरीक्षण करावे व त्याप्रमाणे बदल सुचवावे. | |

| **आधारशिला कृती क्र: 41. Our community helpers: Name, identify role, tools used** | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **आपले मदतनीस** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **मदतनीसांची चित्रकार्ड** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |

| | |
|---|---|
| **आपले मदतनीस -**<br>**मदतनीस-ओळख**<br>**परिचय कुटुंबातील व्यक्तींच्या माध्यमातून समाजातील विविध मदतनिसांची ओळख चित्रकार्डाच्या माध्यमातून घ्यावी.** | • विविध मदतनिसांना अंगणवाडी/बालवाडीत बोलावून मुक्त गप्पा गोष्टी करण्यास प्रोत्साहित करावे. मदतनिसांना लागणाऱ्या वेगवेळया अवजारांची माहिती बालकांना दयावी.<br>• जोड्या लावा<br>• मदतनीस व साहित्य व्यावसायिक आणि त्यांची अवजारे यांच्या चित्रकार्डाच्या जोड्या लावून घ्यावात. |
| **विविधता** | परिसरातील मदतनिसांची ओळख करून दयावी. |
| **थीम/विषय** | मदतनीस |
| **ताईसाठी सूचना** | आपल्या परिसरातील जो मदतनीस आपणास सहज उपलब्ध होईल त्याला त्याच्या कामाशी / व्यवसायाशी संबंधित साहित्य/अवजारे घेऊन बालेकांशी संवाद साधण्यासाठी बोलवावे. यासंदर्भात वयोगटनिहाय उपलब्ध "कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>C-4.1 कुटुंब आणि समाजाचा एक घटक या नात्याने स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करतो.<br>बवक) LO- 4.1.1 स्वतःला कुटुंब, शेजारी, शाळा आणि शहर यांचा एक घटक म्हणून ओळखतो. जेथे वेगवेगळया व्यक्ती वेगवेगळया भूमिका निभावत असतात. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | भाषिक कौशल्ये, स्वतःभोवतीच्या व्यक्ती व वस्तूंची माहिती घेण्याची क्षमता |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | विविध मदतनीस ओळखतो का? याचे निरीक्षण करावे. |

## आधारशिला कृती क्र. : 41.1. Our community helpers: Name, identify role, tools used

| | | |
|---|---|---|
| उपक्रमाचे नाव | मदतनीस - गप्पा व वेशभूषा सोधूया. | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | — | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| मदतनीस - वेशभूषा कशी असते याचे काही चित्र/फोटो दाखवावे.<br><br>बालकांना बालवाटिकेत पोस्टमन, शेतकरी यांच्यासारखी वेशभूषा करून दाखवावी. | कृती<br>२: मदतनिसांशी गप्पा<br>समाजातील मदतनिसांना फुलवाला, वेगवेगळया उदाहरणार्थ, भाजीवाला, सुतारदादा यांना त्यांचे साहित्य घेऊन शाळेत बोलवावे. त्यांची ताईने ओळख करून द्यावी.<br>मदतनिसांनी आपल्या कामाची माहिती सांगत बालकांशी संवाद साधावा. | मदतनीस वेशभूषा (नक्कल करणे) बालकांना बालवाटिकेत विविध मदतनिसांच्या वेशभूषेत तयार होऊन येण्यास सांगावे. मदतनीस कोडी गीतरूपी कोडी घालावी. उदाहरणार्थ, चाक मी फिरवतो, मडकी मी बनवतो भराभरा, ओळखा पाहू मी कोण ? |
| विविधता | चांभार, शिंपी, रस्ता झाडणारे, लोहार इत्यादी मदतनिसांची ओळख करून दयावी. | |

| | |
|---|---|
| थीम/विषय | मदतनीस |
| ताईसाठी सूचना | — |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>C-4.1 कुटुंब आणि समाजाचा एक घटक या नात्याने स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करतात.<br>अ) 1.0 4.1.1 स्वतःची स्वतंत्र व्यक्ती म्हणून ओळख दर्शवितों पंचदशी प्रकआणि आवड सांगतो.<br>ब व क) 10.4.1.1 स्वतःला कुटुंब, शेजारी, शाळा आणि शहर यांचा एक घटक म्हणून ओळखतो. जेथे वेगवेगळ्या व्यक्ती वेगवेगळ्या भूमिका निभावत असतात.<br>C-43 इतर बालके आणि प्रौढ याच्याशी सहजतेने संवाद साधतो.<br>अवव) LO-4.3.1.2 परिचित मोठ्या व्यक्तींशी सहजतेने संवाद साधतो.<br>क) LO-4.3.1 अल्पपरिचित मोठ्यांशी सहजपणे संवाद साधायला सुरुवात करतो |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | भाषिक कौशल्य, स्वतः भोवतीच्या व्यक्ती व वस्तूंची माहिती |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | विविध मदतनीस ओळखतो का? याचे निरीक्षण करावे. |

**आधारशिला कृती क्र.: 42, Food Chart: Name, Identify Taste, Distinguish and Healthy and Unhealthy**

| | | |
|---|---|---|
| उपक्रमाचे नाव | पोषक खाऊ ओळखू | |
| • उपक्रमाला लागणारे साहित्य | • खाण्यास योग्य असलेले व खाण्यास अयोग्य असणारे पदार्थ/चित्रकार्ड जसे फळे, पाणी, दूध, कागद, टरफले, खडू, पेन्सिल इत्यादी. | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| • कृती १ : कुरकुर की कचकचकच / चकचक ?<br>• चित्रकार्डांच्या साहाय्याने दिलेल्या पदार्थांतून योग्य पदार्थ निवडण्यास सांगावे. जसे पोळी - ब्रेड, दूध बाटलीबंद दूध, घरातील पदार्थ बाजारातील पदार्थ, यांप्रमाणे उदाहरणे देऊन योग्य पदार्थ निवडीस संधी दयावी.<br>• खाताना पाकीटबंद पदार्थाचा आवाज कसा येतो ? - कुरकुर काकडी/फळे/पोळी खाताना आवाज कसा येतो? चकचक कुरकुर करायची नाही म्हणजेच पाकीटबंद, पोषणमूल्ये नसलेले पदार्थ खाऊ नये | कृती १ :<br>पोषक शिदोरी<br>• ताईने बालकांना डब्यात रोज वेगवेगळे पदार्थ आणण्यास सांगावे. पोषक आहार मिळत असेल, तर पालकांना घरी पदार्थ करण्यास सांगावे. उदाहरणार्थ, पालेभाजी, डाळ वरण/आमटी,<br>• भाकरी इत्यादी.<br>• बालकांना काय आणले/खाल्ले,<br>• तो पदार्थ कशाचा बनवला होता, ते विचारावे. तो पदार्थ का पोषक आहे, ते सांगावे आणि सरावाच्या वेळी बालकांना पोषक पदार्थ<br>• सांगता येतात का ते पहावे. कृती | • कृती १: अन्नघटक ओळख.<br>• ताईने वर्गात वेगवेगळ्या अन्नघटकांची ओळख करून दयावी. उदाहरणार्थ, भात, पोळी यांनी सगळ्या शरीराला साखर आणि त्यातून शक्ती मिळते. अंडी, डाळी, मोड आलेली कडधान्ये यातून हातांना आणि पायांना शक्ती मिळते, बळकटी येते. तूप, तेल यांमुळे शरीराला गरम राहायला मदत होते. फळे आणि भाज्या यांतूने क्षार आणि जीवनसत्त्वे मिळतात आणि पोट<br>• साफ व्हायला मदत होते.<br>• कृती २ : वर्गीकरण खेळ<br>• सकस अन्न खादद्यपदार्थचि वर्गीकरण वेगवगेळया खेळातून घ्यावे. उदाहरणार्थ, चित्रे वर्तुळात ठेवावी. वर्तुळावर बालकांना बसवावे. संगीताच्या तालावर चेंडू एकेका बालकाला पुढे दधायला सांगावा, संगीत थांबले |

| | | |
|---|---|---|
| • चकचक करायचे म्हणजेच काकडी, गाजर, फळे, पोळी इत्यादी पदार्थ पोषक असतात. ते खायचे शक्ती मिळते/मिळत नाही, पोषक खाद्यपदार्थ जसे की भात, भाजी, पोळी आणि अपोषक खादयपदार्थ उदाहरणार्थ, पिझ्झा, बर्गर, पास्ता, बिस्कीट, कुरकुरे, बटाटा वेफर्स, चॉकलेट या पदार्थाची चित्रे दाखवा | • २: पोषक शिदोरी चित्र<br>• ताईने पदार्थाचे चित्र दाखवून<br>• तो पदार्थ पोषक आहे की नाही आणि त्याचे कारण विचारावे. रंगीत शिदोरी ताईंनी घरून बालकांना वेगवेगळ्या रंगाचे पदार्थ आणण्यास सांगावे व त्यांचे पोषणमूल्य सागावे. लाल/ केशरी (टोमॅटोची कोशिंबीर, पपई, गाजर कोशिंबीर) हिरवा (पालेभाजी, काकडी कोशिंबीर) पांढरा (ज्वारी, तांदूळ भाकरी,<br>• भात, मुळयाची कोशिंबीर) | की, बालकाला एक चित्र घेऊन वर्गीकरण करायला सांगावे गुणवैशिष्ट्ये सांगण्यास सांगावे. |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| पोषक पदार्थ दाखवला की, 'शक्ती मिळते' असे म्हणायला सांगावे आणि अपोषक पदार्थ दाखवला की, 'शक्ती मिळत नाही' ते सांगण्यास सांगावे. | | |

| | |
|---|---|
| विविधता | घरी वेगवेगळ्या खाऊच्या कृती करायला सांगाव्यात. चित्रपत्ते दाखवून कोणते अन्न आपल्याला चांगले किंवा वाईट आहे हे सांगावे. |
| थीम/विषय | पाणी पाऊस, भाज्या व फळे, |
| ताईसाठी सूचना | या संदर्भात वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>C-1.1 पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवतो व अन्नपदार्थ वाया घालवत नाहीत.<br>अ) 1.0-1.1.1.1 खाण्यायोग्य आणि खाण्यास अयोग्य अन्नपदार्थ ओळखतो,<br>अ) LO-1.1.1.2 मोतांच्या सूचनेप्रमाणे वेगवेगळे अन्नपदार्थ खाण्यास सुरुवात करतो व त्यांची नावे सांगतो.<br>अ)LO-1.1.2 आरोग्यास पोषक आणि अपायकारक अशा काही पदार्थांची नावे सांगतो.<br>ब) 1.0-1.1.2.1 दुकानातील आरोग्यासाठी पोषक आणि अपायकारक अन्नपदार्थ स्पष्ट करतो.<br>ब) 1.0-1.1.2.1 काही पदार्थ पोषक असण्यामागाची कारणे स्पष्ट करतो.<br>ब) LO-1.1.2.1 वेगवेगळ्या खाद्यपदार्थातील अन्नघटक ओळखतो आणि त्यांचे फायदे व तोटे स्पष्ट करतो<br>ब) LO-1.1.2.2 पोषक आहाराची काही गुणवैशिष्ट्ये सांगतो. (अंडी आणि डाळी शरीरास शक्ती देतो. पालकाची भाजी<br>रक्त शुद्ध करते, दुधामुळे दात मजबूत होतात.) |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | पोषक आणि अपायकारक अन्नपदार्थ स्पष्ट होणे, |
| निरीक्षण करावयाच्या बादी | पोषक आणि अपायकारक अन्नपदार्थ याची नावे सांगता येतात का, याचे निरीक्षण करावे, |

| आधारशिला कृती क्र. : 43. Family: Talk about relationships, draw family tree, role play | | |
|---|---|---|
| उपक्रमाचे नाव | माझे कुटुंब | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | चित्रपत्ते, पपेट, फोटो इत्यादी. | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| • बालकांना कुटुंबाचा फोटो आणावयास सांगावे.<br>• बालकांना वर्तुळाकार बसवावे. घरी कोण कोण आहे, हे विचारावे.<br>• बालकांशी अनौपचारिक गप्पा माराव्यात.<br>• फोटोतकोण कोण आहे हे विचारावे. फोटोतील व्यक्तींची नावे विचारावी. | • बालकांना चित्रकार्ड, पपेट यांच्या साहाय्याने आई, बाबा, आजी, आजोबा, दादा, ताई, बहीण, भाऊ, बाळ यांची कार्ड/पपेट्स दाखवावी.<br>• ताईने तिच्या घरी कोण कोण आहे, ते सांगून तशी चित्रकार्डे, पपेट्स उचलावी.<br>• एकेका पपेट कार्डला हातात धरून त्या व्यक्तीचे नाव सांगावे.<br>• प्रत्येक बालकाला त्याच्या घरातील व्यक्तींची चित्रकार्ड, पपेट्स उचलण्यास सांगावे<br>• प्रत्येक बालकाला त्याच्या घरातील व्यक्तींची सागण्यास, नावे त्याच्याबद्दल बोलण्यास प्रोत्साहित करावे. | • पालक मेळावा भरवताना कुटुंबातील सर्वांना आमंत्रित करावे. बालकाला कुटुंबातील व्यक्तींची नावे विचारावी.<br>• सांगा सांगा, लवकर सांगा, माझ्या आजीचे नाव सांगा, असा खेळ घेता येईल.<br>• बालकांकडून घरातील माणसांचे चित्र काढायला सांगून नावे विचारून घेता येईल.<br>• फॅमिली ट्री कुटुंबातील व्यक्तींचे फोटो लावणे, नावे लिहिणे, आई, वडील, आजी- आजोबा, काका-काकू भाऊ- बहीण, आत्या यांचे फोटो लावून फॅमिली ट्री तयार करणे, |
| विविधता | नाट्यीकरण खेळ घेऊन किंवा फॅन्सी ड्रेस घेऊन वेगवेगळया भूमिकेत अंगणवाडीत यायला सांगावे | |
| थीम/विषय | मी माझे कुटुंब | |
| ताईसाठी सूचना | घरातील व्यक्तींचे फोटो उपलब्ध न झाल्यास बालकांकडून चित्रे काढून घ्यावी. यासदर्भात वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>C-4.3 इतर बालके आणि प्रौढ यांच्याशी सहजतेने संवाद साधतो.<br>अ व ब) LO-4.3.1.1 कुटुंबातील जवळच्या ठरावीक सदस्याना ओळखतात, नावे सांगतात. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | बौद्धिक विकास, भाषिक विकास होण्यास मदत होईल. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | बालक कुटुंबातील किती आणि कोणत्या व्यक्तींना ओळखते? याचे निरीक्षण करावे. | |

| आधारशिला कृती: 44 Daily Routine: Talk, Identify, Relate time of day and other activities. | | |
|---|---|---|
| उपक्रमाचे नाव | दिनचर्या | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| • ताईने दिनचर्यादर्शक काही चित्रकार्ड बालकांना दाखवावीत. चित्रातील बाबींसंदर्भात चर्चा | • बालकांकडून वयोगट ३ ते ४ वर्षे च्या कृती करून घ्याव्यात. बालकांना आपण दिवसभरात कोणती कामे सकाळी, कोणती कामे | कृती १ : गोष्ट सांगूया.<br>• ताईने बालकांना एक गोष्ट ऐकवावी. |

| | | |
|---|---|---|
| करावी. चित्रातील गोष्टी आपण कधी करतो, यांवर प्रश्न विचारावेत.<br>• सकाळी उठल्यापासून काय काय केले यांवर चर्चा करावी. ताईने आधी तिची दिनचर्या सांगावी, बालकांना एक एक करून दिनचर्या विचारावी.<br>• दिनचर्येची चित्रकार्डे उलटसुलट ठेवावीत. सकाळी उठण्यापासून केल्या जाणाऱ्या कृतींच्या आधारे त्यांचा योग्य क्रम लावण्यास सांगावे.<br>• ताईने बालकांना काही प्रश्न विचारावेत. उदाहरणार्थ, आपण शाळेत कधी येतो? चंद्र आकाशात कधी दिसतो? सूर्य आकाशात कधी दिसतो ?<br>• याप्रमाणे, ताईने बालकांना जेव्हा अंधार होतो, सूर्य मावळतो तेव्हा रात्र होते आणि जेव्हा सूर्य | दुपारी च कोणती कामे संध्याकाळी करतो, यांविषयी प्रश्न विचारून त्यांच्याशी गप्पा<br>• माराव्यात दिवसाच्या वेगवेगळ्या वेळांत घरातील कोणकोणत्या व्यक्ती काय काय करतात या संदर्भात<br>• चर्चा करावी. बालकांशी बोलताना आधी व नंतर या शब्दांचा/संकल्पनांचा वापर करावा<br>• बालकांशी बोलताना काल तुम्ही काय केले? परवा कुठे गेला होतात? उद्या काय करणार आहात? आज काय भाजी आणली आहे? असे कालवाचक शब्द वापरून प्रश्न विचारावेत व गप्पा माराव्यात. | बालकांनी ऐकलेली गोष्ट स्वभाषेत क्रमशः सांगण्यास सांगावे, आवश्यकता असल्यास ताईंनी मदत करावी.<br>• ऐकलेली गोष्ट त्याच पात्रांसकट, तशाच क्रमाने बालकाने सांगितली पाहिजे, असा अट्टाहास न करता बालकाला त्याच्या भाषेत त्याला वाटते तशी सांगू दयावी.<br>• गोष्टीच्या आधारे मुलांना आधी काय झाले? नंतर काय झाले? अशा प्रश्नांच्या आधारे आधी व नंतर या संकल्पनांची ओळख करून दयावी.<br>• बालकांना पुठ्ठ्याचे घड्याळ खेळायला दयावे. त्याआधारे बालकांना एकमेकांना घड्याळातील वेळ ओळखायला सांगण्याचा खेळ खेळण्यास संधी दयावी. |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| उगवतो तेव्हा दिवस होतो, यावर चर्चा करावी.<br>• याप्रमाणे आपण दिवसा काय काय करतो, रात्र झाल्यावर कोणत्या कृती करतो, यावर चर्चा करावी.<br>• वेगवेगळी दिवस आणि रात्र असलेली चित्रे घेऊन, त्यावरून वर्गीकरण करून, खेळ घेणे. उदाहरणार्थ, झोपतो, ट्यूब लावतो, अंघोळ इत्यादी. | | |

| | |
|---|---|
| विविधता | बालकांना वर्तुळाकार बसवावे. प्रत्येकाच्या हातात सकाळी उठल्यापासून पार पाडल्या जाणाऱ्या दिनचर्येच्या चित्रांची कार्डे दयावीत. सर्वांत पहिले कार्ड कोणते असेल, असे बालकांना विचारावे. त्या बालकापासून पुढे क्रमाने करायच्या कृतींचे चित्र ज्याच्याकडे असेल, ती मुले पुढे पुढे बसत जातील, जागा बदलत जातील म्हणजे पहिले कार्ड जर सकाळी झोपून उठण्याचे असेल तर शेवटचे कार्ड रात्री झोपण्याचे आले पाहिजे. |
| थीम/विषय | मी माझे कुटुंब, ऋतू |
| ताईसाठी सूचना | यासंदर्भात वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.4 चढत्या आणि उतरत्या क्रमाने ९९ पर्यंतच्या संख्यांची मांडणी |

| | | |
|---|---|---|
| | करतो. अ) 1.0-8.4.1 परिचित यस्तू, घटना क्रमाने सांगतात. उदाहरणार्थ, दैनंदिन दिनचर्या, कथा, आकार.<br>CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात<br>C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता / पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो.<br>अ) 1.0-7.2.3 दिवस-रात्रीत फरक करतो. क) 1.0-7.2.3.2 दिवस-रात्रीचा संबंध, सूर्योदय आणि सूर्यास्त यांच्याशी संबंध जोडतो. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | दिचर्येचा घटनाक्रम सांगता येणे. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | दिचर्येचा तर्कसंगत घटनाक्रम व्यक्त करतो का? | |
| आधारशिला कृती क्र.: 45 Rood safety: Understand and role play rules | | |
| उपक्रमाचे नाव | पादचारी नियम | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | रहदारी चिन्हे, खडू, रांगोळी, चुना, खेळणीतील वाहने | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| कृती: ट्रॅफिक सिग्नल खेळ<br>• लाल, पिवळा व हिरवा हे सिग्नल समजणे, मुलांना सहज दिसतील व समजतील अशाप्रकारे (खडू, रांगोळी, चुना) रस्ते व चौक आखावेत.<br>• चौकामध्ये झेब्रा क्रॉसिंग आखावे. बालकांना लाल सिग्नल म्हणजे थांबा, पिवळा म्हणजे सावधपणे चाला व हिरवा म्हणजे पुढे जा. असे सिग्नलचे अर्थ समजावून सांगावेत.<br>• बालकांना खेळण्यातील गाड्या घेऊन रस्त्यावर चालायला सांगावे. ताईनी लाल सिग्नल दाखवावा व क्रॉसिंग लाईनच्या पूर्वी थांबण्याची सूचना करावी, पिवळा सिग्नल दाखवावा व बालकांना सावधपणे पुढे जाण्यास सांगावे. नंतर हिरवा सिग्नल दाखवावा व बालकांना पुढे जाण्यास सांगावे. बालकांना सिग्नल चांगले समजल्यावर वर्गातील एखाद्या बालकाला | कृती: रस्त्याच्या उजव्या बाजूने चालू:<br>• वर्गामध्ये किंवा वर्गाबाहेर खडूने सरळ तसेच वळणावळणांचा रस्ता आखावा.<br>• बालकांना रस्त्याच्या उजव्या बाजूने चाला अशी सूचना दयावी. 'उजव्या बाजूने चालल्यावर आपल्याला समोरून येणारी वाहने दिसतात व अपघात होत नाहीत'<br>• ताईने उजव्या बाजूने म्हणजे कोठून ते चालून दाखवावे. मुलांना रस्त्यावर विविध ठिकाणी<br>• उभे करावेंादा प्रत ताईने टाळ्या वाजवल्यावर बालकांनी रस्त्याच्या उजव्या बाजूला येऊन, चालायलासुरूवात करावी.<br>• टाळ्या वाजवायचे थांबल्यावर<br>• बालकांनी रस्त्याच्या बाहेर जाऊन उड्या मारायला आणि टाळ्या वाजवायला सुरुवात केल्यावर पुन्हा उजव्या बाजूने चालायला सुरुवात करावी. | कृती १ : झेब्रा क्रॉसिंगचा खेळ<br>• झेब्रा क्रॉसिंग व क्रॉस लाईन आखावी. बालकांना खेळण्यातील गाड्या घेऊन चालवायला सांगावे. रस्त्यावर<br>• ताईंनी लाल सिग्नल दाखवावा व क्रॉसिंग लाईनच्या पूर्वी थांबण्याची र सूचना करावी. क्रॉस लाईनच्या आधी वाहने थांबल्यांवर इतर बालकांना झेब्रा क्रॉसिंगवरून पद रस्ता पार करण्यास सांगावे. जे नंतर हिरवा सिग्नल दाखवावा व बालकांना पुढे जाण्यास सांगावे. त्यावेळी बालकांना रस्ता पार करू बालकाना नये, म्हणून सांगावे. नंतर पिवळा सिग्नल दाखावावा व बालकांना सावधपणे पुढे जाण्यास सांगावे.<br>• बालकांना सिग्नल चांगले समजल्यावर वर्गातील एखादया र बालकाला सिग्नल दाखवण्यास सांगावे. |

| | | |
|---|---|---|
| सिग्नल दाखवण्यास सांगावे. | | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| | • रस्ता संपल्यावर उलट्या दिशेने चालण्यास सुरुवात करावी तेव्हा डावी बाजू कोणती आहे, हे बालकांच्या लक्षात आणून द्यावे. | कृती २ : रहदारी चिन्ह परिचय<br>• यूटर्न, अरुंद पूल आहे, पुढे शाळा आहे, पुढे दवाखाना आहे, नो पार्किंग, पुढे रेल्वे क्रॉसिंग आहे अशी चिन्हे कार्डबोर्डवर तयार करावीत.<br>• रस्त्यावर ही चिन्हे लावावीत व बालकांना त्याचा अर्थ सांगून त्याप्रमाणे कृती करवून घ्यावी.<br>https://www.youtube.com/ watch?v=UDfYSz6EHEE |

| | |
|---|---|
| विविधता | वर्गामध्ये सिग्नलचा खेळ खेळून घ्यावा. |
| थीम/विषय | मदतनीस वाहन |
| ताईसाठी सूचना | अधिक संदर्भासाठी उपलब्ध कार्यपुस्तिकेचा वापर करावा. तसेच यासंदर्भात वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात,<br>C-1.5 हालचालींमध्ये सहजता दाखवतो आणि योग्यरीतीने वागतो. (घालणे, धावणे, सायकल चालविणे)<br>) LO-1.5.1 रस्त्यावरील सुरक्षितता महत्त्वाची आहे, हे ओळखतो, रस्त्याने मोठ्यांचा हात पकडून चालतो.<br>ब) 1.0-1.5.1 रस्ता ओलांडताना दोन्ही बाजूला पाहतो, बरोबरच्या मुलांचे किंवा प्रौढांचे हात पकडून सुरक्षितपणे चालतो.<br>क) LO-1.5.1 स्वतंत्रपणे रस्ता सुरक्षिततेचे नियम पाळतो. (रस्त्याच्या कडेने चालणे, रस्ता ओलांडणे इत्यादी.)<br>क) LO-1.5.1.2 वाहतुकीची चिन्हे ओळखतो. (सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग, यूटर्न, पूल/रेल्वेपूल इत्यादी.)<br>C-1.6 असुरक्षित/धोकादायक परिस्थिती समजून घेऊन मदत मागतो.<br>अ) LO-1.6.1 परिचित आणि अपरिचित व्यक्ती यांतील फरक ओळखतो. |
| | ब) LO-1.6.1 परिचित आणि विश्वासू प्रौढांनी विचारपूस केल्यास वाटत असणारी अस्वस्थता व्यक्त करतो. |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | अ) सूचना समजून त्यानुसार वर्तन करणे.<br>ब) निरीक्षणशक्ती, सामाजिक कौशल्यविकास, स्वयंशिस्त, यांच्या विकासास मदत, निरीक्षण करणे. |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | ब) बालक स्वयंशिस्तीकडे जात आहे का याचे निरीक्षण करावे. |
| आधारशिला कृती क्र.46. : Things around us: Identify and describe fruits, vegetables, animals and birds. | |
| उपक्रमाचे नाव | परिसरात काय काय आहे बघूया. |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | चित्रकार्ड, कागद |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| • ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. बालकांना परिसरात फेरफटका मारायला जायचे आहे, हे सांगावे. परिसरात गेल्यावर काय काय दिसते, याचे बारकाव्याने निरीक्षण करण्यास सांगावे. वर्गात परत आल्यावर काय बघितले यावर चर्चा घ्यावी, परिसरातील परिचित वस्तू, ठिकाणे, व्यक्ती, प्राणी, पक्षी दाखवावेत. प्राणी, पक्षी पाहूनते काय खातात, कुठे रहातातयाची चर्चा करावी.<br>• परिसरातीलबाजार, दुकान, बस स्टॉप याठिकाणाविषयी चर्चा करावी | • ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे, परिसरात फेरफटका मारायला जायचे आहे, हे बालकांना सांगावे.<br>• परिसरात गेल्यावर काय काय दिसते याचे बारकाईने निरीक्षण पद करण्यास सांगावे. वर्गात परत आल्यावर काय काम बधितलेभाज्या दाखवून उदाहरणार्थ,<br>• मेथी, बटाटा, भेंडी, टोमॅटो, पालक, भोपळा इत्यादींविषयी चर्चा करावी.<br>• ही भाजी कशी उगवते?<br>• भाजीचा रंग कोणता आहे? या रंगाच्या आणखी कोणत्या भाज्यांची नावे तुम्हांला सांगता येतील ?<br>• तुम्हाला ही भाजी आवडते का?<br>• या भाजीमध्ये बिया आहेत का ? | • ताईने बालकांना अर्धगोलात बसवावे. बालकांना परिसरात फेरफटका मारायला जायचे आहे, हे सांगावे.<br>• परिसरात गेल्यावर काय काय दिसते याचे बारकाईने निरीक्षण करण्यास सांगावे. वर्गात परत आल्यावर काय बघितले यावर चर्चा घ्यावी.<br>• पहिला दिवस अंगणवाडीच्या आजूबाजूच्या परिसरात फेरफटका मारायला बालकांना घेऊन जावे. अंगणवाडीत आल्यावर आजूबाजूला कोणते प्राणी, पक्षी दिसतात याची यादी ताईने फळ्यावर लिहावी. |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| | ५) ही भाजी झाडावर किंवा वेलीवर कुठे येते?<br>६) या भाजीला पान आहे का?<br>७) या भाजीचा आकार कसा आहे? असे प्रश्न बालकांना विचारावे | पुढच्या आठवड्यात दुसरी परिसर भेट अंगणवाडीच्या आजूबाजूला शेतात कोणत्या भाज्या, फळे दिसतात का, यावर चर्चा करावी. कोणकोणते प्राणी पक्षी दिसतात याची यादी वहीत लिहावी. |
| विविधता | परिसरातील वस्तू, दुकाने, झाडे, भाजी-फळे विक्री करणारे याबद्दल चर्चा करावी. | |
| थीम/विषय | भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक | |
| ताईसाठी सूचना | यासाठी बालकांना अंगणवाडीच्या जवळच्या परिसरात न्यावे. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.1 वेगवेगळया वर्गातील /गटातील वस्तंमूधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.<br>अ) LO-7:41 वस्तू व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना या इतरांच्या मदतीने नावांसहित ओळखतो.<br>ब) LO-7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना, इ. नावांसहित मसदओळखून स्वतः त्याचे वर्णन करतो.<br>क) LO-7.1.1 लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती, चित्रे ओळखतो, त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो / वर्णन करतो. (उदाहरणार्थ, घराचा मोठा दरवाजा). | |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | परिसराचा परिचय करून घेण्याची क्षमता | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | परिसरातील वस्तू, दुकान, झाडे, भाजी, फळे यांचे निरीक्षण करून सांगता येते का, त्यातील बारकावे सांगता येतात का, याचे निरीक्षण करावे. | |

| आधारशिला कृती: 47. Follow the instructions: body movements | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **ऐकून कृती करूया.** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **विविध आवश्यक सूचनांचा संच, संमिश्र सूचना असलेल्या सूचनापट्ट्या** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती १ : सूचना ऐकून कृती करणे.<br><br>• बालकांना सहज सोप्या सूचना सांगव्यात. एक-एक कृती बालकाला करायला सांगावी. उदाहरणार्थ, पळ, बस, उडी मारून खाली बस, उभे राहून टाळी वाजव, खा, पाणी पी, वर बघ, खाली बघ इत्यादी.<br>• सूचनांचे पालन केल्यास प्रेरणा म्हणून टाळ्या वाजवणे अशा स्वरूपातील कृती घ्याव्यात.<br>• सूचनेप्रमाणे कृती न जमणाऱ्या बालकांना ताईने मदत करावी. सर्व बालकांना ताईंनी संधी दयावी.<br>कृती २ : सूचना-डबा<br>• एक करून सूचना-डबा त्यातील सूचनापट्टी बालकांना उचलायला लावून ती ताईने वाचून त्याप्रमाणे बालकांना कृती करण्यास सांगावे. सूचनेचे पालन केल्यास त्याला प्रेरणा दधावी.<br>बालकांना एकमेकांना सूचना देण्यास सांगावे. | कृती : सूचनांचा खेळ<br><br>• बालकांना समजणाऱ्या त्यांच्या परिचित भाषेतील अनेक कृतींचा समावेश असलेल्या छोट्या व सोप्या सूचना देऊन जाणीवपूर्वकवातावरणनिर्मिती करावी.<br>दोन कृती, तीन कृती असलेल्या सूचना देऊन त्याप्रमाणे कृती करण्यास सांगावे.<br>• सूचनांचे योग्य पालन केल्यास टाळया वाजवणे यांसारख्या कृती घ्याव्या.<br>• विविध कृतींचा समावेश असलेल्या सूचना समजावून त्यांचे अनुकरण करून घ्यावे. उदाहरणार्थ, उड्या मार, उंच उडी भार, हात वर कर व उंच उडी मार, स्वतःभोवती गिरकी मार इत्यादी. | कृती १ : सूचना ऐकून कृती<br><br>• संमिश्र सूचनेनुसार मुलांना त्यांच्या मातृभाषा, परिचित भाषा, संमिश्र भाषा यांमध्ये पुनरावृत्ती न करता अनेक सूचना देणारी कामे दयावी.<br>• बालकांना स्पष्ट सूचना देऊन त्यांच्या मित्राला मदत करण्यास सांगावे. उदाहरणार्थ, चेंडूला लाथ मारणे, कोणत्याही एका रंगाचे नाव घेणे इत्यादी.<br>• संमिश्र सूचना देऊन कृती पद करण्यास प्रेरणा दयावी. बालके सूचनेनुसार कृती करत असताना त्यामध्ये न चुकता सहजता येण्यासाठी त्यांना मदत करावी.<br>• कृती २: सूचना ऐकून त्याप्रमाणे कृती करणे.<br>• ताईंनी बालकांना वर्गाच्या बाहेर न्यावे. ताई जशी सूचना देईल त्याप्रमाणे बालकांनी कृती करावी. ही सूचना दयावी. उदाहरणार्थ, सशाप्रमाणे उड्या मारत जा, कावळयाचा आवाज काढ व त्याप्रमाणे उडत जा, बेडकाचा आवाज करत उड्या मारत जा, सरपटत जा, टेबलवरून पिवळया रंगाची बाटली घेऊन ये, |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| | | • चपला ओळीत ठेव इत्यादी.<br><br>• ताईने अशा वेगवेगळया कृतींचे खेळ घ्यावेत. बालकांना समजण्यास सोप्या जातील अशा सूचना द्याव्यात. या सूचनांचा सराव झाल्यावर थोड्या गुंतागुंतीच्या सूचना सांगव्यात. उदाहरणार्थ, कपाटातून लाल रंगाची बाटली आण. पाण्याच्या बाटल्या रंगानुसार वेगळया कर, फळा पुसून कापड जागेवर ठेव, तुझ्या बाटलीत पाणी भरून आण, राघवच्या शेजारी जाऊन बस. वर्गातील मुले आहेत तेवढे तेलखडू डब्यातून काढ इत्यादी. |

| | | |
|---|---|---|
| विविधता | रा. वेगवेगळया सूचनांचे खेळ घ्यावेत. वयोगटाप्रमाणे सूचना बदलत राहाव्या. | |
| थीम/विषय | मी, माझे कुटुंब व परिसूर, पक्षी व कीटक, मदतनीस | |
| ताईसाठी सूचना | सुलभ सदर्भासाठी सूचनांचा समावेश असणाऱ्या कार्यपुस्तिकेचा वापर करावा. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-9 बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्यै विकसित करतात.<br>C-9.4 क्लिष्ट कार्य पूर्ण करण्यासाठी मौखिक सूचना समजून घेतो व इतरांना तशाच स्पष्ट तोंडी सूचना देतो.<br>अ) LO-9.4.1 गृहभाषा/मातृभाषा/परिचित भाषा यांमध्ये दिलेल्या छोट्या सूचना समजून घेऊन व त्यांचे अनुपालन करतो. (उदाहरणार्थ, ठोकळे इकडे आण, हात स्वच्छ धू इत्यादी.)<br>ब) LO-9.4.1 गृहभाषा/मातृभाषा/परिचित भाषा/संमिश्र भाषा यामध्ये एकाच वेळी दिलेल्या दोन ते तीन सोप्या कृतींचा समावेश असलेल्या सूचना समजून घेऊन व त्यांचे अनुपालन करतो. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| | क) LO-9.4.1 गृहभाषा/मातृभाषा/परिचित भाषा/संमिश्र भाषा यांमध्ये एकाच वेळी दिलेल्या चार ते पाच सोप्या कृतींचा समावेश असलेल्या सूचना समजून घेऊन, त्यांचे अनुपालन करतो.<br>क) LO-9.4.2 साधी कामे करण्यासाठी इतर बालके व प्रौढ व्यक्ती यांना स्पष्ट सूचना देतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | अ) ध्वनींची जाणीव, आकलनशक्ती, आत्मविश्वास, स्मरणशक्ती व एकाग्रता वाढण्यास मदत होईल. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) बालके सूचनेप्रमाणे कृती करतात का हे पहावे. | |
| **आधारशिला कृती क्र.**: 48. Who am I?: Touch, Feel and Guess | | |
| **उपक्रमाचे नाव** | वस्तूवर्णन | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** : बालकांनी घरून आणलेली वस्तू | | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे.<br>• ताईने बालकांना आदल्या दिवशी एक वस्तू आणायला सांगावी.<br>• बालकांना त्यांनी घरातून आणलेली वस्तू घ्यायला सांगावी.<br>• प्रत्येक बालकाला आणलेल्या वस्तूवर ५ ते ६ वाक्ये बोलायला सांगावी.<br>• काही बालकांना मदत लागल्यास करावी.<br>• उदाहरणार्थ, वस्तू बाहुली - वस्तूचे नाव काय आहे? बाहुलीच्या कपड्यांचा रंग | • ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे.<br>• ताईने बालकांना आदल्या दिवशी एक वस्तू आणायला सांगावे.<br>• ताईने बालकांनी घरातून आणलेली वस्तू आपल्या पाठीमागे लपवावी.<br>• पण बालकांना त्या वस्तूबद्दल एक एक सूचक प्रश्न विचारावा.<br>• जसे थमी आहे लांब, माझा उपयोग तुम्ही सगळे करता.<br>• असे सूचक प्रश्न विचारून बालकांना चमच्याबद्दल माहिती द्यावी.<br>• चमचा कशाकशाला आपण वापरतो, कोण, कोण वापरतात, कुठे कुठे चमचे लागतात, सगळीकडे सारखेच चमचे असतात का? याप्रमाणे कृती घ्यावी.<br>• सगळया बालकांनी ऑणलेल्या वस्तूंबद्दल चर्चा करावी.<br>- **कृती : वस्तूवर्णन**<br>• बालकांना आपल्या जवळ अर्धवर्तुळात बसवावे. बालकांना दिसेल, अशी वस्तू ठेवावी. बालकांना त्या वस्तूचे वर्णन करण्यास सांगावे.<br>• टीप - वस्तूचे नाव, रंग, आकार, स्पर्श, ती कशाची बनली आहे, यांबाबत बालकांना बोलण्यास प्रोत्साहन | |

| | |
|---|---|
| कोणता आहे ? | दयावे. त्या वस्तूचा उपयोग काय, ती कुठे असते, आपण ती केव्हा वापरतो असे प्रश्न विचारावे. |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| | बालके प्रथम एका शब्दात उत्तरे देतील. त्यांना त्या शब्दाचा वाक्यात सुसंगत वापर करायला सांगा. दोन-तीन वेळच्या उपक्रमांनंतर या सर्व माहितीच्या आधारे, त्या वस्तूविषयी ३-४ वाक्ये तरी सलगपणे त्यांना बोलता येतील. | |
| विविधता | वस्तू: पिशवी, पाटी, पातेले, चेंडू, बॅट, फळे इत्यादी.<br>प्रकल्पांशी संबंधित वस्तू बालकांना वर्गात दयावी.<br>उदाहरणार्थ, पक्षी - अंडे, घरटे, पीस, पिसाची टोपी, मोराचे पौस, किटकाचे चित्र, अळीचे चित्र, मासा, आकाशाचे चित्र, झाडाचे चित्र इत्यादी.<br>वाहन - खेळातल्या वेगवेगळया गाड्या प्राणी चामड्याचा बेल्ट, पैसे ठेवायची छोटी पर्स, दुधाची रिकामी पिशवी, चिखलाचे चित्र, गुहेचे चित्र इत्यादी.<br>'भाज्या - फळे<br>फुले - गुलाब, मोगरा, झेंडू इत्यादी. | |
| थीम/विषय | मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी - पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस वाहन | |
| ताईसाठी सूचना | • प्रश्न विचारताना मोठी उत्तरे येणारे प्रश्न विचारावेत उदाहरणार्थ, तुम्ही पातेले कशासाठी वापरता ?<br>• बालकांना वस्तू आणायला सांगताना कधी कोणतीही वस्तू आणायला सांगावी, तर कधी प्रकल्पाशी संबंधित वस्तू आणायला सांगाव्यात. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.<br>C-2.5 विविध प्रकारच्या स्पर्शामधील फरक करण्याची क्षमता विकसित होते.<br>अ) LO - 2.5.1 कठीण/कडक - मऊ, गार-गरम, खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत स्पर्शामधील फरक समजतात.<br>ब) LO - 2.5.1 दोन वस्तंमूधील कठीण/कडक-मऊ, गार-गरम, खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत अशी स्पर्शाची तुलना करू शकतो.<br>क) LO - 2.5.1 तीन ते पाच वस्तूंची कठीण/कडक-मऊ, गार-गरम, खरखरीत, गुळगुळीत अशा स्पर्शानुसार क्रमवार मांडणी करू शकतात.<br>(उदाहरणार्थ, अतिमऊ, मऊ, टणक, अतिटणक) | |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | वस्तूचा परिचय, शब्दसंपत्तीमध्ये वाढ, वस्तूचे स्वतःच्या भाषेत वर्णन, स्पर्शाने वस्तू ओळखणे या क्षमतांमध्ये वाढ होण्यास मदत होईल. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | वस्तूची बोलीभाषेतील आणि प्रमाणभाषेतील नावे स्मरणात राहतात का? विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात का? वस्तूचा पोत, आकार, स्पर्शाने ओळखतात का याचे निरीक्षण करावे. | |

## आधारशिला कृती : 48.1 Who am I?: Touch, Feel and Guess

<table>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">जादूची पिशवी</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">जादूची पिशवी, वर्गातील आणि नेहमीच्या वापरातील छोट्या वस्तू</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td colspan="2">विविधता<br>थीम/विषय<br>कृती: स्पर्श पिशवी जादूर्च<br>• ताईने एका पिशवीत ब ओळख झालेल्या स्पर्शाच्या वस्तू जोडीने ठेवायच्या उदाहरणार्थ, छोट्या पेन्सिली, दोन पेन्सिली, वेगवगेळया प्रकाइत्यादी.<br>• बालकांचे डोळे बांध<br>• बालकाने पिशवीत हात एक वस्तू घ्यायची.<br>• त्यानंतर तशीच दुसरीशोधून काढायची. काढलेल्या वस्तूबद्दलवाक्य बोलायचे.<br>• प्राण्यांच्या, फळांच्या, फुलांच्या प्रतिकृती पिशवीत ठेवाव्या, विविध आणि वेष्टने वापरून विविधता आणता येईल.<br>• भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतूकृती: स्पर्श पिशवी जादूची<br>• ताईने एका पिशवीत बालकांना ओळख झालेल्या विविध स्पर्शाच्या वस्तू भरून ठेवायच्या.<br>• बालकांचे डोळे बांधायचे. बालकाने पिशवीत हात घालून एक वस्तू घ्यायची. अगोदर त्या वस्तूचे नाव सांगायचे. मग ती वस्तू पिशवीतून बाहेर काढायची. डोळयांवरची पट्टी बाजूला करायची.<br>• ओळखलेली वस्तू बरोबर आहे का हे बघायचे, बरोबर असली किंवा नसली, तरी त्या वस्तूबद्दल एक वाक्य बोलायचे.</td><td>कृती: स्पर्श पिशवी जादूची<br>• ताईने एका पिशवीत बालकांना ओळख झालेल्या विविध स्पर्शाच्या वस्तू जोडीने भरून ठेवायच्या उदाहरणार्थ, दोन छोट्या पेन्सिली, दोन मोठ्या पेन्सिली, वेगवगेळया प्रकारचे पेन इत्यादी.<br>• बालकांचे डोळे बांधायचे बालकाने पिशवीत हात घालून एक वस्तू घ्यायची.</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">प्राण्यांच्या, फळांच्या, फुलांच्या प्रतिकृती पिशवीत ठेवाव्या, विविध आणि वेष्टने वापरून विविधता आणता येईल.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">यासाठी कोणतीही अरुंद तोंडाची कापडी पिशवी /L आकाराची पिशवी वापरावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.<br><br>C-2.5 विविध प्रकारच्या स्पर्शामधील फरक करण्याची क्षमता विकसित होते.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये</td><td colspan="2">अ) स्पर्शसंवेदन विकसित होण्यास मदत होईल.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">वस्तू स्पर्शाने बरोबर समजते का, त्याबद्दल बोलता येते का?</td></tr>
</table>

<table>
<tr><td colspan="3"></td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र.: 49. Explore Seasons: Name and Understand Characteristics</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">ऋतूंची ओळख</td></tr>
<tr><td colspan="3">उपक्रमाला लागणारे साहित्य : ऋतूनुसार खादयपदार्थ, कपडे, पेये यांची चित्रकार्डे</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td colspan="2">• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे.<br>• भांड्यामध्ये गरम (पाणी कोमट असावे) पाणी, बर्फ हे घ्यावे.<br>• एक एक करून सर्व बालकांना दोन्ही भांड्याला हात लावण्यास सांगावे.<br>• ताईने सर्व बालकांना एक एक करून भांड्याला हात लावल्यावर काय जाणवले, हे विचारावे.<br>• घेतलेल्या अनुभवांवर चर्चा करावी.<br>• अपेक्षित उत्तर (गरम पाण्याला हात लावल्यावर पाणी गरम लागले आणि बर्फाला हात लावल्यावर खूप गार लागले.)<br>• ताईने बालकांना आपण स्वेटर, टोपी, हातमोजे, पायमोजे हे कपडे कधी घालतो हे विचारावे व प्रत्यक्ष दाखवावे.<br>• थंडीतच हे सगळे कपडे का घालतो?<br>• खूप गरम होते, तेव्हा कसे कपडे घालतो ?<br>• उन्हाळयात व हिवाळयात कोणकोणती पेये पितो ?<br>• याप्रमाणे कृती घेऊन बालकांना उन्हाळा आणि हिवाळा या संकल्पना स्पष्ट कराव्या.<br>• पावसात आपण मिजू नये म्हणून काय काय वापरतो?<br>• बालकांना वेगवेगळ्या ऋतूंमधील त्यांचे अनभुव सांगण्यास वाव दवावा.</td><td>कृती १ : थंडीत काय खाऊया.<br>• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे.<br>• २-२ बालकांच्या गटांत वेगवेगळे अन्नपदार्थ असलेली चित्रांची कार्डे देणे.<br>• थंड व गरम अन्नपदार्थ या चित्रांचे वर्गीकरण करण्यास सांगावे.<br>• घेतलेल्या अनुभवांवर चर्चाकरावी.<br>कृती २ : उन्हाळ्यात आणि<br>• हिवाळयात घालायचे कपडेताईने बालकांना आपण स्वेटर, टोपी, हातमोजे, पायमोजे है कपडे कधी घालतो, हे विचारावे व हे कपडे बालकांना घालून दाखवावे.<br>• थंडीतच हे सगळे कपडे काघालतो ?<br>• खूप गरम होते तेव्हा कसे कपडे घालतो ?<br>• याप्रमाणे चर्चेतून उपक्रम घेऊन बालकांना उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या संकल्पना स्पष्ट कराव्यात.<br>• वेगवेगळ्या ऋतूतील कपडे, खाद्यपदार्थ, सण, हवामान यांबाबत चर्चा करावी.<br>• पावसात आपण मिजू नये म्हणून काय काय वापरतो.</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">• आपण कोणते गार/थंड पदार्थ खातो, हे विचारावे.<br>• आपण कोणते गरम पदार्थ खातो, हे विचारावे.<br>• उन्हाळा आणि हिवाळा यांची वेगवेगळी चित्रे वापरून गप्पा/चर्चा उपक्रम घेणे.<br>• ऋतूनुसार गट करूया.<br>• वेगवेगळथा ऋत्तमूध्ये वापरण्याच्या वस्तू चित्रकार्ड देऊन ती वेगळी करण्यास सांगावे. उन्हाळा आणि हिवाळा याची वेगवेगळी चित्रे वापरून गप्पा/चर्चा उपक्रम घेणे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">ऋतू</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">-</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारण भाव समजून घेऊन, तो दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता / पडताळणी करिता निरीक्षणाचा आधार घेतो.<br>ब) LO-7.2.3 उन्हाळा आणि हिवाळा ओळखतो.<br>क) LO-7.2.3.1 उन्हाळा आणि हिवाळा ऋतूनुसार कपडे आणि अन्नपदार्थ ओळखतात. |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | अ) हवामानानुसार कोणते अन्नपदार्थ, खावेत कोणते कपडे घालावेत हे समजते.<br>क) वर्षात येणारे ऋतू आणि कालगणना यांची ओळख होते. |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | ऋतुंमूळे पर्यावरणात, परिसरात होणारे बदल सांगता येतात का? याचे निरीक्षण करावे. |

**आधारशिला कृती क्र. : 50. Finding Rhyming Words: Recognise, Identify, Create Strings**

| | | |
|---|---|---|
| उपक्रमाचे नाव | यमकाची गंमत. | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य : | - | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| कृती: बडबडगीते म्हणूया.<br><br>सुरुवातीला बालकांना त्यांच्या परिचयातील बडबडगीत ऐकवावे.<br><br>बडबडगीत समूहात म्हणून घ्यावे,<br><br>बडबडगीत हावभावांसह म्हणून व करून दाखवावे,<br><br>बालकांकडून बडबडगीत म्हणवून व त्याबरोबर कृती करून घ्याव्या<br><br>योग्य तेथे योग्य दुरुस्ती करून ती बालकाकडून म्हणवून घ्यावी. | कृती १: गाण्यातील सारखे शब्द ओळखूया.<br><br>ताईने ओळीच्या शेवटी समान<br><br>आवाज ऐकू येणारे शब्द असणाऱ्या बडबडगीतांचा संग्रह करावा.<br><br>बडबडगीत ऐकवल्यानंतर ओळीच्या शेवटी ऐकू येणाऱ्या शब्दांमध्ये सारखेपणा आहे, हे लक्षात आणून दद्यावे.<br><br>त्यानंतर वरीलप्रमाणे विविध बडबडगीते ऐकवून त्यातील चमक असणारे शब्द ओळखण्याची संधी बालकांना दद्यावी. | बालकांना चिऊ-काऊ माऊ,पोळी-टाळी-विळी असे शब्द म्हणून दाखवावे.<br><br>बालकांना या शब्दांसारखे अधिक शब्द विचारावे व म्हणवून घ्यावे,<br><br>योग्य तेथे योग्य दुरुस्ती करून हे शब्द बालकांकडून म्हणवून घ्यावे |

| | | |
|---|---|---|
| विविधता | वेगवेगळी बडबडगीते निवडून कृती / हावभाव करून बालकांपुढे सादर करावी. | |
| थीम/विषय | मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी - पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस वाहन | |
| ताईसाठी सूचना | बडबडगीतातील ओळींमध्ये वारंवार येणारी अक्षरे किंवा शब्द असणाऱ्या बडबडगीतांचा संग्रह करावा. | |
| Page 206 | | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-10 बालके भाषा एक (LI) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.<br><br>C-10.1 शब्दध्वनींची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गंफुतो आणि शब्दांपासून शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो.<br><br>अ) LO-10.1.1 बडबडगीते म्हणतो.<br><br>ब) LO-10.1.1 यमक व अनुप्रास ओळखतो.<br><br>क) LO-10.1.1 यमक व अनुप्रास तयार करतो. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | अ) श्रवणकौशल्य, भाषणकौशल्य, शब्दांचा अर्थ व आशय यांची समज निरीक्षण क्षमता, अभिनय क्षमता. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | छोटी छोटी बडबडगीते बालके म्हणू शकतात की नाही याचे निरीक्षण करावे, बडबडगीतातील शब्द बालके क्रमाने म्हणू शकलात की नाही याचे निरीक्षण करावे. | |

आधारशिला कृती: 51. Recognise Alphabets: Associate common alphabets of L. with sound and identify.

| | | |
|---|---|---|
| उपक्रमाचे नाव | सुरुवातीचा आवाज ओळखू | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | चित्रकार्ड, अक्षरकार्ड | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| कृती: अक्षर चित्रांची ओळख<br><br>बालकांना अकार असलेले वेगवेगळे शब्द सांगावेत आणि त्या शब्दाच्या सुरुवातीला कोणता आवाज येतो, ते विचारावे आणि सांगावे. उदाहरणार्थ, 'कऽऽऽ पऽऽऽ' मध्ये सुरुवातीला 'क SSS' हा आवाज येतो.<br><br>वेगवेगळ्या एकाच अक्षराने सुरू होणाऱ्या वस्तू किंवा क्रियेची चित्रकार्ड पाहून बालकांना त्यातील | कृती : चित्रकार्ड बघूया.<br><br>एका ताईने अकाराच्या' मुळाक्षरापासून सुरू होणाऱ्या वेगवेगळ्या चित्रांचे कार्ड दाखवावे. उदाहरणार्थ, पत्र, पपई, पतंग, पक्षी इत्यादी.<br><br>हे सर्व शब्द कोणत्या आवाजाने सुरू होतात, ते विचारावे, आणि त्या आवाजाचे चित्र आहे, असे<br><br>सांगून 'प' हे अक्षर चित्र दाखववावे आणि या | कृती : अक्षर वाचूया.<br><br>ताईने अक्षर चित्रावरील अक्षर ओळखण्याचा सराव खेळातून घ्यावा. उदाहरणार्थ, वर्तुळामध्ये कार्ड ठेवून बालकांना संगीत चालू असेपर्यंत चेंडू पुढे पुढे दयायला सांगावे. संगीत थांबले की ज्या बालकाकडे चेंडू असेल त्याने ताईने सांगितलेल्या अक्षराचे अक्षरचित्र वर्तुळातून उचलावे.<br><br>एक मुळाक्षर सांगून त्या अक्षराने सुरू होणारे |

| | | |
|---|---|---|
| वस्तूचे किंवा क्रियेचे नाव सांगण्यास सांगावे. | चित्राला 'प' म्हणतात किंवा 'प' या आवाजाचे हे चित्र आहे, अशी ओळख करून दयावी. | अनेक शब्द सांगण्याची शर्यत बालकांचे गट करून घ्यावी. |
| Page 207 | | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| योग्य नाव बालकांनी सांगितल्यावर तो शब्द कशाने / कोणत्या आवाजाने सुरू होतो, ते विचारावे.<br><br>सारख्या आवाजाने सुरू होणारी चित्रकार्ड गोळा करण्यास सांगावे.<br><br>सारख्या आवाजाने सुरू होणारे शब्द बालकांना ओळखायला सांगावे. उदाहरणार्थ, कप, कडक, कमर, लचक यात लचक हा शब्द वेगळ्या अक्षराने सुरू होतो. | अशा प्रकारे सोप्या मुळाक्षरांची अक्षरचित्रे आणि आवाज सांगावे.<br><br>अकार आणि त्यांची मुळाक्षरे यांचा पुरेसा सराव झाला, की मग बाराखडीमध्ये अक्षराला अलंकार लागले तरी मुळाक्षर एकच असते ही संकल्पना तोंडी स्पष्ट करावी. उदाहरणार्थ, पतंग, पाणी, पिशवी, पैसे, पुडी या शब्दांत सुरुवातीचा आवाज प, पा, पी, पी, पु असे वेगवेगळे आहेत पण त्यात प आहे, हे सांगावे, | |
| विविधता | भाऊ भाऊ एकत्र या, साईट रीडिंग, चित्र आणि चित्राच्या नावातील सुरुवातीच्या अक्षराचे अक्षरचित्र यांच्या जोड्या लावा, डॉमिनो, मॅचिंग सेट | |
| थीम/विषय | पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, वाहन. | |
| ताईसाठी सूचना | आवश्यकतेनुसार आपणाकडे उपलब्ध सोप्या शब्दकार्डाचा वापर करावा. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-10 बालके भाषा भाषा एक एक (LI) ( मध्ये सफाईदारपणे वाचन व करतात. लेखन<br><br>C-10.3 भाषा एक (LI) च्या लिपीतील सर्व अक्षरे व अवयव ओळखतो आणि या ज्ञानाचा उपयोग शब्द वाचन-लेखनासाठी करतो.<br><br>अ) LO 10.3.1 शब्दांतील आवाज अक्षरांद्वारे कागदावर लिहिले जातात याची समज दर्शवतो. म्हणजेच लेखी शब्दांतील काही मुळाक्षरांची संबंधित ध्वनींची सांगड घालण्यास सुरुवात करतो.<br><br>ब) LO 10.3.1 वर्णमालेतील काही अक्षरे व स्वरचिन्हे ओळखतो.<br><br>क) LO 10.3.1 वर्णमालेतील काही अक्षरे व स्वरचिन्हे ओळखतो. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | वाचन पूर्वतयारी, सूक्ष्म निरीक्षण क्षमता, तकर्काने विचार करणे, वाचन पूर्वतयारी, मुळाक्षरांची ओळख, मुळाक्षरे आणि त्यांचे ध्वनी यांची सांगड आणि स्मरण. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | पुस्तक, वर्तमानपत्र, मासिक हातात घेऊन वाचायची कृती/नक्कल करतो का? साईट रीडिंग पद्धतीने परिचयाचे शब्द वाचायचा प्रयत्न करतो का? ध्वनी आणि अक्षरे यांचा एकास एक संबंध लावू शकतो का? याचे निरीक्षण करावे | |

## आधारशीला कृती क्र. :51.1 Recognise Alphabets: Associate common alphabets of L with sound and Identify

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **शेवटचा आवाज ओळखू** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **चित्रकार्ड, अक्षरकार्ड** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती: अक्षर चित्रांची ओळख<br><br>● ताईने बालकांना 'अकार' असलेले वेगवेगळे शब्द सांगावेत आणि त्या शब्दांतील शेवटचा आवाज ओळखायला सांगावे.<br>● उदा. 'कऽऽऽ पऽऽऽ' मध्ये शेवटी 'प' हा आवाज येतो.<br>● ताईने सारख्या आवाजाने शेवट होणारे शब्द बालकांना ओळखायला सांगावे. उदा. कप, कलप, तप, सपसप, कपाट, यात कपाट या शब्दाचा वेगळ्या अक्षराने शेवट होतो.<br>● वेगवेगळया किंवा एकाच अक्षराने शेवट होणाऱ्या वस्तू किंवा क्रियेचे चित्रपत्ते पाहून बालकांना त्यातील वस्तूचे किंवा क्रियेचे नाव सांगण्यास सांगावे.<br>● योग्य नाव बालकांनी सांगितल्यावर तो शब्द कशाने / कोणत्या आवाजाने संपतो ते विचारावे.<br>● सारख्या आवाजाने शेवट होणारे चित्रपत्ते गोळा करण्यास सांगावे. | कृती : चित्रकार्डे बघूया.<br><br>● ताईने 'अकाराच्या'एका मुळाक्षराने शेवट होणाऱ्या वेगवेगळ्या चित्रांची कार्ड दाखवावी. उदाहरणार्थ, मगर, तगर, गर इत्यादी. हे सर्व शब्द कोणत्या आवाजाने संपतात ते विचारावे. त्या आवाजाचे चित्र आहे, असे सांगून 'र' हे अक्षरचित्र दाखवावे आणि या 'र' चित्राला 'र' म्हणतात. किंवा या आवाजाचे हे चित्र आहे, अशी ओळख करून द्यावी.<br>● अशाप्रकारे सोप्या मुळाक्षरांची<br>● अक्षरचित्रे आणि आवाज सांगावे.<br>● अकार आणि त्यांची मुळाक्षरे यांचा पुरेसा सराव झाला की मग बाराखडीमध्ये अक्षराला अलंकार लागले तरी मुळाक्षर एकच असते, ही संकल्पना तोंडी स्पष्ट करावी. उदाहरणार्थ, खार, परी, चारा, पेरू, या शब्दांत शेवटचा आवाज र, रा. री, रू असे वेगळे आहेत पण त्यात 'र' आहे हे सांगावे. | कृती : अक्षर वाचूया.<br><br>● ताईने अक्षरचित्रावरील अक्षर ओळखण्याचा सराव खेळातून घ्यावा, उदाहरणार्थ, वर्तुळामध्ये कार्ड ठेवून बालकांना संगीत चालू असेपर्यंत चेंडू पुढे पुढे दद्यायला सांगावे.<br>● संगीत थांबले की, ज्या बालकाकडे चेंडू असेल त्याने ताईने सांगितलेले अक्षरचित्र गोलातून उचलून वाचावे.<br>● एक मुळाक्षर सांगून त्या अक्षराने शेवट होणारे अनेक शब्द सांगण्याची शर्यत बालकांचे गट करून घ्यावी. |
| सारख्या आवाजाने शेवट होणारे शब्द बालकांना ओळखायला सांगावे. उदाहरणार्थ, कप, कडक, कमर, लचक यात लचक हा शब्द वेगळ्या अक्षराने सुरू होतो. | | |
| विविधता | भाऊ भाऊ एकत्र या, साईट रीडिंग, चित्र आणि चिऊच्या नावातील सुरुवातीच्या अक्षराचे अक्षरचित्र यांच्या जोड्या लावा, डॉमिनो, मॅचिंग सेट | |
| थीम/विषय | पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, वाहन | |
| ताईसाठी सूचना | आवश्यकतेनुसार आपणाकडे उपलब्ध सोपे शब्दकार्ड यांचा वापर करावा. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-10 बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.<br>C-10.3 भाषा एक (LI) च्या लिपीतील सर्व अक्षरे व अवयव ओळखतो आणि या ज्ञानाचा उपयोग शब्द वाचन-लेखनासाठी करतो.<br>अ) 1.0 10.3.1 शब्दांतील आवाज अक्षरांद्वारे कागदावर लिहिले जातात याची समज दर्शवतो, | |

| | | |
|---|---|---|
| | म्हणजेच लेखी शब्दांतील काही मुळाक्षरांची संबंधित ध्वनीची सांगड घालण्यास सुरुवात Karto.<br>ब) LO 10.3.1 वर्णमालेतील काही अक्षरे व स्वरचिन्हे ओळखतो.<br>क) LO 10.3.1 वर्णमालेतील काही अक्षरे व स्वरचिन्हे ओळखतो. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | अ) वाचन पूर्वतयारी, सूक्ष्म निरीक्षणक्षमता, तर्काने विचार करणे, वाचन पूर्वतयारी, सूक्ष्म निरीक्षण, मुळाक्षरांची ओळख, मुळाक्षर आणि त्याचा ध्वनी यांची सांगड आणि स्मरण. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | पुस्तक, वर्तमानपत्र, मासिक हातात घेऊन वाचायची कृती / नक्कल करतो का? दृक् शब्द (साईट रीडिंग) वाचायचा प्रयत्न करतो का? | |
| | | |
| **आधारशीला कृती क्र. : 51.2 Recognise Alphabets: Associate common alphabets of L with sound and Identify** | | |
| **उपक्रमाचे नाव** | **सुरुवातीचा आवाज ओळखू L.2.** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **चित्रकार्ड, अक्षरकार्ड** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • मुक्त खेळ ताईने वयोगट ३ ते ४ वर्षे व ४ ते ५ वर्षे अशा बालकांना मुक्त खेळ द्यावेत. | | ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे.<br>• ही कृती इंग्रजीसाठी आहे L2 Alphabet ताईने सारख्या आवाजाने सुरू होणारे शब्द बालकांना ओळखायला सांगावे.<br>• वेगवगेळया एकाच अक्षराने सुरू होणाऱ्या वस्तू किंवा क्रियेची चित्रकार्ड पाहून बालकांना त्यातील वस्तूंची किंवा क्रियेचे नाव सांगण्यास सांगावे.<br>• ताईने अक्षरचित्रावरील अक्षर ओळखण्याचा सराव खेळातून घ्यावा. उदाहरणार्थ, वर्तुळामध्ये कार्ड ठेवून बालकांना संगीत चालू असेपर्यंत चेंडू पुढे पुढे दद्यायला सांगावा, संगीत थांबले, की ज्या बालकाकडे चेंडू असेल त्याने ताईने सांगितलेले अक्षरचित्र वर्तुळातून उचलावे.<br>• एक Alphabet सांगून त्या अक्षराने सुरू होणारे अनेक शब्द सांगण्याची शर्यत बालकांचे गट करून घ्यावी.<br>• चित्रकार्ड दाखवून चित्राचे नाव बालकांना सांगावे. |
| विविधता | भाऊ भाऊ एकत्र या, साईट रीडिंग, चित्र आणि चित्राच्या नावातील सुरुवातीच्या अक्षराचे अक्षरचित्र यांच्या जोड्या लावा, डॉमिनो, मंचिंग सेट | |
| थीम/विषय | भाज्या व फळे, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन. | |

| | | |
|---|---|---|
| ताईसाठी सूचना | आवश्यकतेनुसार आपणाकडे उपलब्ध सोप्या इंग्रजी शब्दकार्डाचा वापर करावा. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-11 बालके भाषा दोन (12) मध्ये वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात.<br>C-11.1 शब्दध्वनींची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे एकत्र करून, शब्द तयार करतो व शब्दांमधील शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो.<br>क) LO 11.1.2 अक्षरध्वनीची नक्कल आणि निर्मिती करतो. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | Alphabet अक्षर आणि त्याचा ध्वनी यांची सांगड घालणे आणि ते स्मरणात ठेवणे. | |
| निरीक्षण करावयाच्या बादी | शब्दांच्या ध्वनींवरून Alphabet ओळखता येते का, याचे निरीक्षण करावे. | |
| आधारशीला कृती क्र. : 51.3 Recognise Alphabets: Associate common alphabets of L with sound and Identify | | |
| उपक्रमाचे नाव | शेवटचा आवाज ओळखू L2. | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | चित्रकार्ड, अक्षरकार्ड | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| मुक्त खेळ - ताईने वयोगट ३ ते ४ वर्षे व ४ ते ५ वर्षे अशा बालकांना मुक्त खेळ दद्यावेत. | | ● ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे.<br>● ही कृती इंग्रजीसाठी आहे 12 Alphabet ताईने सारख्या आवाजाने सुरू होणारे शब्द बालकांना ओळखायला सांगावे. वेगवेगळया एकाच अक्षराने सुरू होणाऱ्या वस्तू किंवा क्रियेची चित्रकार्ड पाहून बालकांना त्यातील वस्तूचे किंवा क्रियेचे नाव सांगण्यास सांगावे, ताईने अक्षरचित्रावरील अक्षर<br>● ओळखण्याचा सराव खेळातून घ्यावा. उदाहरणार्थ, वर्तुळामध्ये कार्ड ठेवून बालकांना संगीत चालू असेपर्यंत चेंडू पुढे पुढे द्यायला सांगावा. संगीत थांबले की ज्या बालकाकडे चेंडू असेल त्याने ताईने सांगितलेले अक्षरचित्र गोलातून उचलून वाचावे.<br>● एक Alphabet सांगून त्या अक्षराने शेवट होणारे अनेक शब्द सांगण्याची शर्यत बालकांचे गट करून घ्यावी<br>● एक Alphabet सांगून त्या अक्षराने सुरू होणारे अनेक शब्द सांगण्याची शर्यत मुलांचे गट करून घ्यावी,<br>● चित्रकार्ड दाखवून चित्राचे नाव बालकांना सांगावे. |
| Page 212 | | |
| विविधता | भाऊ भाऊ एकत्र या, साईट रीडिंग, चित्र आणि चिऊच्या नावातील सुरुवातीच्या अक्षराचे अक्षरचिन्त्र यांच्या जोड्या लावा, डॉमिनो, मॅचिंग सेंट | |

<table>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">भाज्या व फळे, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन,</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">आवश्यकतेनुसार आपणाकडे उपलब्ध सीपे शब्द कार्ड यांचा वापर करावा.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-11 बालके भाषा दोन (L2) मध्ये वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात.<br>C-11.1 शब्दध्वनींची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे एकत्र करून, शब्द तयार करतो व शब्दांमधील शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो.<br>क) LO 11.1.2 अक्षरध्वनीची नक्कल आणि निर्मिती करतो,</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता /कौशल्ये</td><td colspan="2">Alphabet अक्षर आणि त्याचा ध्वनी याची सांगड घालणे आणि ते स्मरणात Thevane.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">शब्दांच्या ध्वनींवरून Alphabet ओळखता येते का, याचे निरीक्षण करावे</td></tr>
<tr><td colspan="3"></td></tr>
<tr><td colspan="3">आधारशीला कृती क्र. 52 Role Play: Understanding family Relationships and Professions</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">नाटक करूया.</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">आरसा, कंगवा, ओढणी, साड्या इत्यादी</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>कृती : वेशभूषा करूया.<br>● वरील साहित्य ताईने बालकाच्या व पालकांच्या मदतीने गोळा करावे.<br>● एका कोपऱ्यांमध्ये जारशाची मांडणी करून गोळा केलेले साहित्य त्यासमोर मांडावे,<br>● बालकांना वरील साहित्य घेऊन वेशभूषा करण्यास सांगावे. वेशभूषा करून त्यांना मुक्तपणे वावरण्याची संधी दयावी,<br>● बालकांना आई, आजी दादा, बाबा कसे चालतात, बोलतात तशी कृती करून दाखवण्यास सांगावे,<br>● बाकीच्या बालकांना बालकाची भूमिका ओळखायला सांगावे,</td><td>कृती : वेशभूषा करूया.<br>● वरील साहित्य ताईने बालकांच्या व पालकांच्या मदतीने गोळा करावे.<br>● एका कोपऱ्यांमध्ये आरशाची मांडणी करून गोळा केलेले साहित्य त्यासमोर मांडावे.<br>● बालकांना वरील साहित्य घेऊन वेशभूषा करण्यास सांगावे. वेशभूषा करून त्यांना मुक्तपणे वावरण्याची संधी दयावी.<br>● बालकांना आई, आजी दादा,<br>● बाबा कसे चालतात, बोलतात तशी कृती करून दाखवण्यास सांगावे<br>● दैनंदिन जीवनातील व्यक्तींची पात्रे जसे की भाजीवाली, पोस्टमन,डॉक्टर, कंडक्टर, आई, आजी आजोबा, दादा, बाबा यांपैकी निवड करायला सांगून ते कसे वागतात, बोलतात, कामे करतात तसे करण्यास सांगावे.</td><td>कृती : नाटक करूया.<br>● ताईने बालकांचे दोघादोघांचे गट करावे.<br>● प्रत्येक गटाला दोन दोन कुटुंबातील व्यक्ती, मदतनीस, प्राणी/पक्षी निवडण्याची संधी दयावी.<br>● निवडलेल्या भूमिकेची वेशभूषा करून, प्राणी/पक्षांचे मुखवटे घालून त्यांच्यातील मुक्त संवाद अथवा नाट्यीकरण बालकांना करण्यास सांगावे.<br>● निवडलेल्या व्यक्ती, प्राणी अथवा पक्षी कसे चालत असतील? कसे बोलत असतील? हे प्राणी पक्षी एकमेकांशी कसे गप्पा मारत असतील? असे प्रश्न विचारून बालकांना नाट्यीकरण करण्यास ताईने मदत करावी.</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">अ) भातुकलीचे साहित्य खेळावयास उपलब्ध करून दवावे.<br>ब) साड्या, ओढणी, टॉवेल, आरसा अशा प्रकारच्या साहित्याचा कोपरा तयार करून साहित्य वापरून खेळण्याची संधी दयावी.</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| थीम/विषय | मी, माझे कुटुब प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, मदतनीस, |
| ताईसाठी सूचना | सुलभ संदर्भासाठी उपलब्ध कार्यपुस्तिका यांचा वापर करावा. |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-12 बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br>C-12.3 बालक कलेच्या माध्यमातून स्वतःच्या कल्पना आणि भावना व्यक्त करण्यासाठी सर्जनशीलता व कल्पकतेने काम करतो.<br>ब) LO 12.3.1 कलेच्या माध्यमातून स्वतःच्या कल्पना साधने आणि कार्यपद्धती यांची देवाण-घेवाण करतो व परिचित उदाहरणातून सुधारणा करतो.<br>क) LO 12.3.1 कलेच्या माध्यमातून विविध अभिव्यक्ती कल्पना व भावना लक्षात घेतो व त्यांचा अर्थ लावतो तसेच स्वतच्या कलात्मक आविष्कारांमध्ये या बाबींचा उपयोग करतो. |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | अ) सर्जनशीलता, कल्पकता, सौंदर्यदृष्टी, संभाषण, निरीक्षण क्षमता |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | अ) नाट्यीकरण करताना बालके कशाप्रकारे व्यक्त होतात? कशाप्रकारे सादरीकरण करतात याचे निरीक्षण करावे.<br>ब) एखादे पात्र तयार करण्यासाठी कोणत्या साहित्याची निवड करतात याचे निरीक्षण करावे.<br>क) बालके सर्जनशीलतेने किंवा कल्पकतेने करीत असलेल्या कृतीचे निरीक्षण करून त्यांच्या नोंदी कराव्या,<br>ड) बालके एकसेकांशी देवाणघेवाण करतात का? एकमेकांनी सुचवलेल्या सूचना ऐकून तसे बदल करतात की नाही? याचे निरीक्षण करावे. |

## आधारशीला कृती क्र. : 53 My Colourful India: Explore, Understand and Appreciate Diversity

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **लोकगीत व लोकनृत्य** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | - | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| ● परिसरातील संस्कृती लक्षात घेऊन लोकगीत ऐकवावे. ऐकलेल्या गाण्यावर बालकांना ताल धरायला सांगून नृत्य करण्यास प्रोत्साहन दयावे.<br>● असे गाणे याआधी ऐकले आहे का, असेदेखील विचारावे.<br>● नृत्य करताना कसे वाटले यावर चर्चा करावी. | | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| विविधता | अ) वेगवेगळ्या प्रांतीय लोकगीतांप्रमाणे (शक्य असतील तसे व तेवढे कपडे घालून अंगणवाडीत बोलवावे, त्या त्या भाषेतील गाणी लावावीत.)<br>ब) ५ ते ६ वर्षे वयोगटाला भारताचे उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम असे भाग दाखवून, त्यानुसार तेथील लोक कोणते कपडे घालतात, काय खातात यावर आधारित छोटे प्रदर्शन भरवावे. | |
| थीम/विषय | पाणी-पाऊस, ऋतू | |

| | | |
|---|---|---|
| ताईसाठी सूचना | सुलभ संदर्भासाठी उपलब्ध गीतांच्या पुस्तिका यांचा वापर करावा. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>C-4.6 गरजेच्या वेळी इतरांना (प्राणी आणि वनस्पतींसह) मदत करतो, दयाभाव ठरवितो<br>CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता /<br>पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो.<br>CG-12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br>C-12.5 विविध कला, स्थानिक संस्कृती आणि वारसा यांची निर्मिती<br>करताना आणि अनुभव घेताना विविध प्रकारच्या प्रतिक्रियांना प्रतिसाद देतो व प्रशंसा करतो.<br>CG-13 बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात, यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.<br>C-13.3 निरीक्षण, आश्चर्य, कुतूहल आणि अन्वेषण वस्तूंच्या सूक्ष्म बारकाव्यांचे निरीक्षण करतो. विविध ज्ञानेंद्रिय यांचा वापर करून अन्वेषण करतो व आश्चर्य दर्शवतो, वस्तू हाताळतो आणि प्रश्न विचारतो. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | श्रवण, निरीक्षण, सामाजिक, भावनिक विकास | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | बालके व्यक्त कशी होतात याचे निरीक्षण करावे. | |
| Page 216 | | |

## आधारशीला कृती क्र. : 53.1 My Colourful India: Explore, Understand and Appreciate विविधता

| | | |
|---|---|---|
| उपक्रमाचे नाव | पारंपरिक खेळ | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | | |
| वयोगट ३ ते ४ वर्ष | वयोगट ४ ते ५ वर्ष | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| पुढील पारंपरिक खेळ वर्षभरात घ्यावेत. झिम्मा, फुगडी, लगोरी, आट्यापाट्या, सापशिडी, भोवरा, सागरगोट्या, खांब खांबोली, रुमाल पळवी, लपंडाव, शिरापुरी | | |
| **विविधता** | भारत देशाच्या इतर भागात, प्रदेशात खेळली जाणारी पारंपरिक खेळांची माहिती बालकांना करून द्यावी. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन. | |
| **ताईसाठी सूचना** | सुलभ संदर्भासाठी उपलब्ध कार्यपुस्तिका यांचा वापर करावा. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव<br>करून घेतात.<br>C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता / पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो.<br>CG-12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि पर संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. | |

| | |
|---|---|
| | C-12.5 विविध कला, स्थानिक संस्कृती आणि वारसा यांची निर्मिती करताना आणि अनुभव घेताना विविध प्रकारच्या प्रतिक्रियांना प्रतिसाद देतो व प्रशंसा करतो.<br>CG-13 बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात, यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.<br>C-13.3 निरीक्षण, आश्चर्य, कुतूहल आणि अन्वेषण : वस्तूंच्या सूक्ष्म बारकाव्यांचे निरीक्षण करतो. विविध ज्ञानेंद्रिय यांचा वापर करून अन्वेषण करतो व आश्चर्य दर्शवतो, वस्तू हाताळतो आणि प्रश्न विचारतो. |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | शारीरिक विकास, सामाजिक, भावनिक विकासास मदत होईल. |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | |

## आधारशीला कृती क्र. : 54 Memory Magic: Recall Objects, Words and Patterns

| **उपक्रमाचे नाव** | **स्मरणशक्ती खेळ** | |
|---|---|---|
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | - | |
| **वयोगट ३ ते ४ वर्ष** | **वयोगट ४ ते ५ वर्ष** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती : क्रमाने कृती सांगणे.<br><br>• ताईने काही कृती क्रमाने कराव्या/सांगाव्या. उदाहरणार्थ, वर्तमानपत्रातील लहान मुलांचे चित्र शोध आणि कात्रीने ते चित्र काप व कागदावर चिकटव.<br>• बालकांना त्या कृती लक्षपूर्वक पाहण्यास सांगावे. १) वर्तमानपत्र घेतले. २) त्यात लहान बालकांचे चित्र शोधणे. ३) कात्रीने चित्र कापणे. ४) कागदावर चित्र चिकटवणे. नंतर मी काय केले? आधी काय केले? मग काय काय केले? असे प्रश्न विचारून बालकांच्या स्मृती जागृत कराव्या.<br>कृती : गोष्ट सांगणे.<br>• ताईने आधी सांगितलेल्या गोष्टी परत सांगताना बालकांना सहभागी करून घ्यावे. पुढे काय झाले? आता कोण भेटले? मग गोष्टीतले पात्र काय म्हणाले? अशा स्वरूपाचे संवाद घडवून आणावेत. अशा संवादात बालक भाग घेते का? त्याला गोष्ट आठवते का? याचे निरीक्षण करावे. | कृती : वस्तूंची यादी करणे.<br><br>• बालकाला त्याने पाहिलेल्या व हाताळलेल्या वस्तूंची नावे विचारावी.<br>• या वस्तू त्यांचे संदर्भ, ओळख, वेगळेपण अशा पद्धतीने वेगवेगळ्या करण्यास सांगावे. (उदाहरणार्थ, कंगवा, ग्लास, पेन्सिल, साबण, रबर, कप, ताट, वही, वाटी, सुगंधी तेल, शांपू इत्यादी गोष्टी बालकाने शेसांगितल्यासोधन या प्रशिवस्तूंची दप्तरातील वस्तू-पेन्सिल, रबर, वही/स्वयंपाक घरातील वस्तू- ग्लास, कप, ताट/अंघोळीच्या वस्तू साबण, कंगवा, सुगंधी तेल, शांपू याप्रमाणे.) योग्य तेथे योग्य सूचना करावी. दुरुस्ती केल्यानंतर पुन्हा यादी म्हणवून घ्यावी.<br>कृती : चला जोड्या शोधू.<br>• ताईने प्रथम या वस्तू वर्गात व्यवस्थित मांडून ठेवणे.<br>• बालकांनी एकेकाने येऊन या वस्तंचे निरीक्षण करण्यास सांगावे. या वस्तूंची नावे मोठ्याने म्हणण्यास सांगावे. | कृती : स्मरण खेळ<br><br>• ताईने बसवावे. बालकांना वर्तुळात<br>• ताईने एका बालकाच्या कानात एक शब्द सांगावा. उदा. बालकाने हत्ती शब्द ऐकून आपल्या शेजारील बालकाला सांगावा. अशी कृती करून सगळया बालकांना शब्द सांगू दयावा.<br>• शेवटी ज्या बालकाला शब्द सांगितला त्याला काय शब्द पद ऐकला ही विचारावे.<br>• ताईने जो शब्द सांगितला होता, तोच शब्द आहे की शब्द हत्तीचा पत्ती असा बदलला आहे.<br>• बालकांना त्यांनी ऐकलेला शब्द विचारावा. शेवटच्या बालकापासून शब्द विचारावा. म्हणजे कोणी शब्द बदलला हे समजते. अशाप्रकारे प्रत्येक बालकाला एक-एक शब्द सांगावा. पुढे खेळ घ्यावा. प्राणी, पक्षी, भाज्या, फळे त्यांची नावे सांगावी. |
| **वयोगट ३ ते ४ वर्ष** | **वयोगट ४ ते ५ वर्ष** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| काही वेळा गोष्टीतल्या घटना चुकीच्या क्रमाने | जोड्या लावण्यास सांगावे. उदाहरणार्थ, टुथपेस्ट- | |

| | | |
|---|---|---|
| सांगून बालक ते ओळखते का ते पाहावे. बालकांना गोष्ट सांगण्यास प्रोत्साहन दयावे. बालक गोष्ट कशी सांगतो, याचे निरीक्षण करावे. | टुथब्रश, मोबाईल-चार्जर, पेन्सिल - शार्पनर, पावडरचा डबा-पफ, वही - पेन, पाटी-पेन्सिल, डबा- बाटली, कागद-तेलीखडू)<br><br>कृती : चला जोड्या शोधू.<br><br>• ताईने प्रथम या वस्तू वर्गात व्यवस्थित मांडून ठेवणे.<br>• बालकांनी एकेकाने येऊन या वस्तूंचे निरीक्षण करण्यास सांगावे. या वस्तूंची नावे मोठ्याने म्हणण्यास सांगावे. या वस्तूंच्या जोड्या लावण्यास सांगावे.<br>उदाहरणार्थ, टुथपेस्ट-टुथब्रश, मोबाईल-चार्जर, पेन्सिल - नशेशर्पिनर, संपावडरचा प्रडबा पफ, वही-पेन, पाटी-पेन्सिल, डबा- बाटली, कागद-तेलीखडू) | |
| विविधता | वेगवेगळे घटनाक्रम असलेले कार्ड प्रत्यक्ष वस्तू हाताळल्यास कृतीत विविधता आणता येईल.<br>बालकांच्या अनुभवाला वाव दिल्यास कृतीत विविधता आणता येईल. उदाहरणार्थ, भाजीपाला, किराणा, मसाले, खेळण्याचे साहित्य इत्यादी.<br>कळी ते फूल घटनाक्रम<br>बी ते झाड घटनाक्रम<br>बागेत कोणकोणत्या वस्तू असतात?<br>वस्तू बघून सांगायचे आहे हे लक्षात ठेवून वस्तूंची नावे सांगणे. | |
| **थीम/विषय** | भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रग), प्राणी (पाळीव व जगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस | |
| **ताईसाठी सूचना** | वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घेणे. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-13 बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात. यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.<br>CG-13.2 स्मृती आणि मानसिक लवचिकता : संरचित वातावरणामध्ये अध्ययन सुलभ होण्यासाठी, योग्य कार्यकारी स्मृती, मानसिक लवचिकता (योग्य प्रकारे अवधान केंद्रित होणे किंवा बदलणे), स्व-नियंत्रण (आवेगात्मक कृती किंवा प्रतिसाद रोखणे) विकसित करतो.<br>अ) LO 13.2.1.1 गोष्ट आठवून सांगतात किंवा समोर नसणाऱ्या चित्राचे वर्णन करणे यासारख्या कृतींच्या माध्यमातून लक्षात ठेवण्याचा सराव करतात.<br>ब) LO 13.2.1.1 स्वतःला आवश्यक असणारे प्रसाधन साहित्य किंवा खेळणी यांची यादी म्हणून दाखवतो.<br>ब) LO 13.2.1.2 स्मरणशक्तीचा खेळ आणि जोड्या लावा यासारखे सोपे खेळ खेळतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | अ) स्मरणक्षमता, सामान्यतः गट बालक ओळखू शकते. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) बालक वस्तूंची नावे योग्य तऱ्हेने उच्चारतो याचे निरीक्षण करावे. नशेध वस्तूंची यादी योग्य गटात करतो काय याचे निरीक्षण करावे. वस्तूंची नावे आठवताना बालकाला येणाऱ्या अडचणींचे निरीक्षण करावे. | |
| | | |

| आधारशीला कृती क्र. 55. Weeks and Months: Name, Discuss and Associate Events | | |
|---|---|---|
| उपक्रमाचे नाव | आठवडा आणि महिना | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | - | |
| वयोगट ३ ते ४ वर्ष | वयोगट ४ ते ५ वर्ष | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| कृती १ :<br><br>• आज, काल व उद्या : अंगणवाडीच्या बाहेर झाडे लावून घ्यावीत त्याला काल पाणी घातले, उद्या पण घालायचे आहे, त्याची काळजी घ्यावी हे सांगावे. चटई, पाण्याची बाटली, झाडू या वस्तू आज आपण वापरल्या या उद्या पण लागणार आहेत हे सांगावे. | कृती १ :<br><br>• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. बालकांसमोर वार असलेला तक्ता ठेवावा. तक्त्यावर आजचा वार सोमवार हे दाखवावे. असे करून सगळ्या वारांची नावे वाचावी.<br>• ताईकडे वारांची नावे असलेली कार्डे बालकांना दयावीत. (साईट रीडिंग) तक्त्यावर आजचा वार | कृती १ : आजचा वार<br><br>• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. बालकांसमोर वार असलेला तक्ता ठेवावा. तक्त्यावर आजचा वार सोमवार हे दाखवावे. असे करून सगळ्या वारांची नावे वाचावी.<br>• ताईकडे वारांची नावे असलेली कार्डे बालकांना दयावीत. (साईट रीडिंग) तक्त्यावर आजचा वार |
| वयोगट ३ ते ४ वर्ष | वयोगट ४ ते ५ वर्ष | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| ● नम्रताने आज मेथीची भाजी खाल्ली. तिने काल भेंडीची भाजी खाल्ली होती. नम्रता आणि रवी उद्या गावाला जाणार आहेत. या प्रसंगावर आधारित खालीलप्रमाणे प्रश्न विचारून चर्चा घडवून आणावी. जसे, नम्रताने भेंडीची भाजी कधी खाल्ली होती? रवी गावाला कधी जाणार आहे | ● सोमवार हे दाखवावे. त्यासारखे कार्ड शोधायला सांगावे व तक्त्यावर आजचा वार सोमवार आहे, हे दाखवावे व कार्ड सोमवारच्या खाली ठेवावे. असे करून रोज हा उपक्रम घ्यावा.<br>● शनिवार, रविवारच्या तक्त्यावर व कार्डवर वेगळा रंग घ्यावा. जसे लाल रंग म्हणजे त्या दिवशी अंगणवाडीला सुट्टी असते, हे सांगावे. हा उपक्रम रोज घ्यावा.<br>● बालकांना वारांची नावे वाचता आल्यावर त्यांना दिनदर्शिका दाखवावी<br>.<br>कृती २ : विशेष दिन<br>● ताईने बालकांना दिनदर्शिका दाखवावी. त्यातील वारांची नावे साईट रीडिंगने वाचून घ्यावीत. त्यातील शनिवार, रविवार दाखवायला सांगात<br>● आता जसे शनिवार, रविवारला वेगळा रंग आहेत संच अजून दिनदर्शिकेत कुठे वेगळा रंग दिसतो, हे विचारावे.<br>● बालकांना वेगळा रंग का दिला आहे, हे विचारावे.<br>● ताईने ज्या दिवशी कोणाची जयंती, सण असते त्या दिवशी असा वेगळा रंग देतात हे सांगावे. हा उपक्रम अंगणवाडीत रोज घ्यावा. | ● सोमवार हे दाखवावे. त्यासारखे कार्ड शोधायला सांगावे व तक्त्यावर आजचा वार सोमवार आहे, हे दाखवावे व कार्ड सोमवारच्या खाली ठेवावे. असे करून रोज हा उपक्रम घ्यावा.<br>● शनिवार, रविवारच्या तक्त्यावर व कार्डवर वेगळा रंग घ्यावा. जसे लाल रंग म्हणजे त्या दिवशी अंगणवाडीला सुट्टी असते, हे सांगावे. हा उपक्रम रोज घ्यावा.<br>● बालकांना वारांची नावे वाचता आल्यावर त्यांना दिनदर्शिका दाखवावी.<br><br>कृती २ : आठवड्याचे वार, महिने<br>● ताईने बालकांना आता चालू असलेल्या महिन्याचे नाव रोज सांगावे.<br>● काही दिवस सराव झाल्यावर ताईने ५ ते ६ वर्षे वयोगटाच्या बालकांना आधीचा व नंतरचा महिना विचारावा.<br>● बालकांना समोर दिसेल अशी दिनदर्शिका वर्गात लावावी. अंगणवाडीत रोज आल्यावर आजचा वार, महिना हे बालकांना विचारावे.<br>● ताईने बालकांना मराठी व इंग्रजी दोन्ही महिन्याची नावे सांगावी. हा उपक्रम अंगणवाडीत रोज घ्यावा. |
| विविधता | गाणी, गोष्टी ऐकवाव्यात. दिनदर्शिका वर्गात लावावी. रोज त्यात काय वेगळे आहे का हे बालकांसमोर बघावे. जसे विज्ञान दिवस, बालदिन, मराठी भाषा दिन इत्यादी. | |

| | | |
|---|---|---|
| थीम/विषय | ऋतू | |
| ताईसाठी सूचना | यासंदर्भात वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी,<br>आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.10 मिनिटे, तास, दिवस, आठवडे आणि महिने, वेळेची मोजमापे या एककांमध्ये कालमापन करतो.<br>अ) LO 8.10.1 दैनंदिन जीवनात आज उद्या आणि काल या शब्दांचा वापर करतो.<br>ब) LO 8.10.1 विशेष दिवस ओळखतो जसे की, शनिवार, रविवार,<br>सुट्टीचा दिवस (रविवारी सुट्टी असते.)<br>क) LO 8.10.1 आठवड्यातील वार आणि वर्षातील महिन्यांची नावे ओळखतो. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | निरीक्षणक्षमता, तुलना, कार्यकारणसंबंध, अंदाज करता येण्यास मदत आणि<br>विकास | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | वारांची नावे सांगता येतात का? संदर्भाने वार सांगता येतात का? मराठी व इंग्रजी महिन्यांची नावे सांगता येतात का? सणांच्या संदर्भाने महिन्यांची नावे सांगता येतात का? हे पाहावे. | |
| **आधारशीला कृती क्र. 56. Game of Sounds: Break, Join and Replace Syllables** | | |
| उपक्रमाचे नाव | अक्षरध्वनी | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | | |
| वयोगट ३ ते ४ वर्ष | वयोगट ४ ते ५ वर्ष | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| ● सुरुवातीला बालकांना त्यांच्या परिचयातील बडबडगीत ऐकवावे.<br>● बडबडगीत समूहात म्हणवून घ्यावे.<br>● बडबडगीत हावभावांसह म्हणून व करून दाखवावे. | ● ताईने बालकांना परिचित वस्तूंचे एक चित्रकार्ड दाखवा आणि त्यांना त्या वस्तूचे नाव देण्यास सांगा.<br>● शब्दाच्या प्रत्येक अक्षरावर जोर देऊन शब्दाची पुनरावृत्ती करा | ● ताईने बालकांना चित्रकार्ड दयावे आणि त्यांना वस्तूंचे नाव देण्यासाठी प्रोत्साहित करावे.<br>● वस्तूच्या बरोबर संबंधित अक्षरकार्ड लावताना प्रत्येक अक्षराची पुनरावृत्ती करा |
| ● बडबडगीत बालकाकडून म्हणवून व त्याबरोबर कृती करून घ्यावे. योग्य तेथे योग्य दुरुस्ती करून ती बालकांकडून म्हणून घ्यावी. 'ट्रिंग ट्रिंग ट्रिंग ट्रिंग ऐकू आली फोनची रिंग कुणीच नाही फोनपाशी उंदीरमामा बिळापाशी उंदीरमामा हसले मिशीत, टेबलावरती चढले खुषीत फोन लावला कानाला।' | ● ज्यानंतर टाळी वाजवा. जसे की, बा (टाळी)... सा (टाळी) आणि बालकांना चरणांची पुनरावृत्ती करण्यास प्रोत्साहित करा.<br>● बालकांना का (टाळी)... मा (टाळी)... ला (टाळी) सारख्या भिन्न-मात्र वस्तूंचा सराव करू द्या आणि प्रत्येक बालकाला संधी मिळेल याची खात्री करा. | ● कलाचित्र वस्तूसहित शब्द बनवा, का...ला...मा... या अक्षराची पुनरावृत्ती करा आणि अक्षरकार्ड का टाका. ला...मा... असे<br>● अक्षरकार्डे ठेवण्यासाठी प्रात्यक्षिकांसह सुरुवात करा आणि चित्रकार्डासोबत आउटच शब्द बोला आणि प्रत्येक बालकाला वेगवेगळ्या वस्तूंसाठी स्वतःकडे वळण्यास प्रोत्साहित करा. उदाहरणार्थ, चित्रकार्ड व शब्दकार्ड का व ळा माळा |
| विविधता | नवनवीन बडबडगीत ऐकवावीत. | |
| थीम/विषय | वनस्पती (फुले, शेती, रंग), पक्षी व कीटक, | |
| ताईसाठी सूचना | - | |

| | |
|---|---|
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | C-10 बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.<br>C-10.1 वशब्दध्वनींची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गुंफतात आणि शब्दापासून शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो.<br>अ) LO 10.1.1 बडबडगीते म्हणतो.<br>ब) LO 10.1.2 शब्दातील प्रारंभिक आणि अंतिम अक्षर ओळखतो. |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | श्रवण कौशल्य, शब्दसंग्रह वाढतो, शब्दाचा अर्थ व आशय यांची समज, अनुकरणक्षमता विकसित होण्यास मदत होईल. |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | बालके स्वतंत्रपणे गाणी म्हणू शकतात का ते पाहावे. |

## आधारशिला क्रिया : 57. स्वतःला समजून घेणे : माझ्या निवडी/पसंती/आवडी/नापसंती

| | |
|---|---|
| उपक्रमाचे नाव | मला काय काय आवडते |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | विविध खेळणी, चित्रमय पुस्तके |

| वयोगट ३ ते ४ वर्ष | वयोगट ४ ते ५ वर्ष | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| कृती १ : माझी आवड<br><br>• ताईने वर्गात बालकांची खेळणी, मांडून ठेवावी. बालकाला तुला काय खेळायला आवडेल ते | कृती १ : माझ्या आवडीचा खेळ<br><br>• ताईने बालक यायच्या आधी वर्गाच्या बाहेर काही खेळण मांडून ठेवावीत. | कृती १ : मला आवडणारे खेळ<br>• बालक आल्यावर ते कोणत्या खेळणी घेतात याचे निरीक्षण करावे. |

| वयोगट ३ ते ४ वर्ष | वयोगट ४ ते ५ वर्ष | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| विचारावे. त्यांच्या आवडीच्या गोष्टी करण्याची संधी दयावी. खेळून झाल्यावर आज तुला काय करावेसे वाटले? असे प्रश्न विचारावे.<br><br>कृती २ : पुस्तक पाहूया.<br><br>• ताईने बालकांसाठी वर्गात भरपूर चित्र असलेली गोष्टीची पुस्तके जमिनीवर मांडून ठेवावीत.<br>• वर्गात पुस्तके मांडून बालके काय करतात याचे निरीक्षण करावे.<br>• बालकांना त्यांच्या आवडीचे पुस्तक निवडण्याचे स्वातंत्र्य दयावे.<br>• पुस्तक घेतल्यानंतर किती वेळ पुस्तक बघत आहेत, त्याबद्दल काही बोलता आहेत का, याचे निरीक्षण करावे.<br>• पुस्तकांतले तुम्हाला काय आवडले असे बालकांना ते विचारावे ? | बालके आल्यावर ते कोणती खेळणी घेतात याचे निरीक्षण करावे.<br><br>● बालक आधीपासून एकच खेळणे घेतो की वेगवेगळे घेतो हे बघावे.<br>● खेळ खेळताना त्याच बालकांच्या गटात खेळतो की रोज गट बदलतो का हे पाहावे.<br>● याप्रमाणे बालक आपले आवडता खेळ खेळतो, का तोही बदलतो याचे निरीक्षण करावे.<br>कृती २ : पुस्तक पाहूया.<br>● ताईने बालकांसाठी वर्गात भरपूर चित्र असलेली गोष्टीची पुस्तके जमिनीवर मांडून ठेवावीत.<br>● वर्गात पुस्तके मांडून बालके काय करतात याचे निरीक्षण करावे<br>● बालकांना त्यांच्या आवडीचे पुस्तक निवडण्याचे स्वातंत्र्य दयावे<br>● पुस्तक घेतल्यानंतर किती वेळ पुस्तक बघत | ● बालक आधीपासून एकच खेळ घेतो, की वेगवेगळे घेतो हे ही बघावे.<br>● खेळ खेळताना त्याच बालकांच्या गटात खेळतो, की रोज गट बदलतो का पहावे.<br>● बालक खेळ खेळताना रोज ठरावीक बालकांच्या गटातच खेळतो का बालकांचा गट बदलतो याचेही निरीक्षण करावे.<br>● कृती २ : पुस्तक पाहूया.<br>● ताईने बालकांसाठी वर्गात भरपूर चित्रे असलेली गोष्टींची पुस्तके जमिनीवर मांडून ठेवावीत.<br>● वर्गात पुस्तके मांडून बालके काय करतात याचे निरीक्षण करावे.<br>● बालकांना त्यांच्या आवडीचे पुस्तक निवडण्याचे स्वातंत्र्य दयावे.<br>● पुस्तक घेतल्यानंतर किती वेळ पुस्तक बघत आहेत, त्याबद्दल काही बोलता आहेत का, याचे निरीक्षण करावे.<br>● पुस्तकातले तुम्हाला काय आवडले ते विचारावे? |

| | | |
|---|---|---|
| | आहेत, त्याबद्दल काही बोलत आहेत का, याचे निरीक्षण करावे.<br>● पुस्तकातले तुम्हाला काय आवडले ते विचारावे ? | |
| विविधता | विविध अन्नपदार्थ, कपडे यांची चित्रे दाखवून वरीलप्रमाणे प्रश्न विचारता येतील. | |
| थीम/विषय | मी, माझे कुटुंब, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, | |
| ताईसाठी सूचना | यासंदर्भात वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>C-4.2 विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो.<br>अ) LO 4.2.1.1 स्वतःला काय हवे आहे ते सांगतो आणि स्वतःच्या भावना ओळखतो. जसे, आज मला चित्र रंगवायचे नाही. मला बाहेर जायचे आहे.<br>CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता / पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो.<br>ब) LO 7.2 स्वतःचे प्राधान्यक्रम आवड व्यक्त करतो आणि त्यानुसार निवड करतात.<br>क) LO 7.2 स्वतःची आवड आणि प्राधान्यक्रम विचारात घेऊन जबाबदारीने निवड करतात. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | भावनिक विकास, स्वतःची आवडनिवड ओळखणे, संघभावना व इतरांना मदत करण्याची भावना व्यक्त होणे या कौशल्यांच्या विकासास मदत होईल. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | बालके आपली ओळख ठामपणे सांगतात का, एकमेकांशी मिळून मिसळून वागतति का, हे पाहावे. | |
| आधारशीला कलाकृती. : 58. सूचनांचे अनुसरण करा: सूचनांनुसार वस्तू शोधा | | |
| उपक्रमाचे नाव | सूचना ऐकून वस्तू देऊया. ल्प | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | | |
| वर्गातील वस्तू : ठोकळे, मणी, बिया, फोमचे तुकडे | आकार आणि रंगाचे ठोकळे | वर्गातील वस्तू |
| वयोगट ३ ते ४ वर्ष | वयोगट ४ ते ५ वर्ष | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| कृती : ऐकूया शोधून देऊया<br><br>• बालकांना एका वाक्याची सूचना दयावी. सूचना ऐकून सांगितलेल्या रंगाची किंवा आकाराची वस्तू शोधायला सांगावी. उदाहरणार्थ, पिवळया रंगाची वस्तू दे. वर्तुळाकार वस्तू आण. | कृती : ऐकूया शोधून देऊया<br><br>• बालकांना दोन वाक्यांची सूचना दयावी. सूचना ऐकून सांगितलेल्या रंगाची आणि आकाराची वस्तू शोधायला सांगावी. उदाहरणार्थ, हिरव्या रंगाची चौकोनी आकाराची वस्तू दे. | कृती : ऐकूया शोधून देऊया<br><br>• बालकांना तीन सूचना एकत्रित दद्याव्यात. सूचना ऐकून सांगितलेल्या रंग आणि आकाराची वस्तू शोधायला सांगावी. उदाहरणार्थ, काळया रंगाची वर्तुळाकार दाराजवळ असलेली वस्तू घेऊन ये. |
| विविधता | वर्गातील वस्तू, वर्गाबाहेरील वस्तू यांचा वापर करून सूचनांचा खेळ घ्यावा. | |

<table>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन.</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">सुलभ संदर्भासाठी उपलब्ध असलेल्या कार्य पुस्तिकेचा वापर करावा.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-9 बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.<br>C-9.4 क्लिष्ट कार्य पूर्ण करण्यासाठी मौखिक सूचना समजून घेतो व इतरांना तशाच स्पष्ट तोंडी सूचना देतो.<br>CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.1 वेगवेगळया वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये</td><td colspan="2">अ) श्रवण कौशल्य</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">अ) सूचना ऐकून रंग, आकार याचे आकलन होते की नाही हे पाहावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशीला कलाकृती. : 59. चला चर्चा करूया: आपल्या सभोवतालचे सुरक्षित प्रौढ</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">परिचित-अपरिचित व्यक्ती</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">चित्र कार्ड, फ्लॅश कार्ड, चित्र कथा</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्ष</td><td>वयोगट ४ ते ५ वर्ष</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>● घरातील व्यक्ती, वर्गातील मित्र-मैत्रिणी, अंगणवाडीतील व्यक्ती यांचा परिचय मुक्त गप्पांच्या माध्यमातून जाणून घ्यावा.<br>● बालकांच्या घराशेजारी, गल्लीत, परिसरात राहणाऱ्या बालकांची नावे विचारावीत.</td><td>पूर्वज्ञान : बालक परिचित व :<br>● अपरिचित व्यक्तींविषयी माहिती सांगू शकतो.<br>● • वर्गात गप्पागोष्टी घेत असताना ताईने सर्व बालकांची आत्मीयतेने विचारपूस करावी. चर्चा करावी.<br>● • निरीक्षण करून एखादे बालक जर अस्वस्थ, घाबरलेले वाटले तर त्याला बाजूला घेऊन त्याच्याशी संवाद साधावा.<br>● • विविध प्रकारचे प्रसंग (सुरक्षित-असुरक्षित) बालकांना सांगावेत. त्यावर चर्चा करावी.</td><td>कृती : गप्पा - सुरक्षितता<br>● बालकांच्या मदतीने छोटी नाटिका, रोल प्ले सादरीकरण कुटुंबातील किंवा इतर व्यक्तींकडून अस्वस्थ वाटल्यास पालक/ताई यांच्याशी संपर्क साधण्यास सांगावे.<br>● शाळा/मैदानात जाण्यासाठी एकटे भाग, शॉर्टकट मार्ग टाळण्यास सांगावे. कोणी स्पर्श केल्यास अस्वस्थ, गोंधळल्यासारखे वाटल्यास नाही म्हणण्यास शिकवावे.</td></tr>
<tr><td></td><td></td><td>अपरिचित व्यक्तीने कसलेही आमिष दाखविल्यास त्यास नाही म्हणणे यांसारख्या घटना चर्चेतून, चित्रकार्डमधून दाखवावे/सांगावे.</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">घरातील, फोटो ओळखूया. गटातील बालकांच्या वस्तू, परिसरातील वस्तू<br>ठिकाण चित्रांद्वारे ओळखण्यासाठी दयावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी माझे कुटुंब व परिसर, मदतनीस</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| **ताईसाठी सूचना** | आकलन सुलभ करण्यासाठी कार्य पुस्तिकेतील या संदर्भातील गोष्ट बालकांना सांगावी. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात<br>C-1.6 असुरक्षित/धोकादायक परिस्थिती समजून घेऊन मदत मागतो.<br>अ) C-1.6.1 परिचित आणि अपरिचित व्यक्ती यातील फरक ओळखतो.<br>ब) LO 1.6.1 परिचित आणि विश्वासू प्रौढांनी विचारपूस केल्यास वाटणारी अस्वस्थता व्यक्त करतो.<br>क) LO 1.6.1.1 सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श कळतो. अपरिचित व्यक्तींपासून दूर राहतो. परिचित मोठ्या व्यक्तीकडे स्वतःहून अस्वस्थता भीती व्यक्त करतात. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | परिचित-अपरिचित व्यक्ती याबद्दल समज येणे. भाषिक कौशल्य विकास, सुरक्षित असुरक्षित गोष्टींची जाणीव निर्मिती, स्वावलंबन, नेतृत्व, सकारात्मक शिकण्याच्या सवयी, समस्या निराकरण, आत्मसंरक्षण. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालक परिचित व अपरिचित व्यक्ती ओळखतो की नाही याचे दैनंदिन निरीक्षण करावे. |

## आधारशीला कृती क्र. : 60. What will happen if? : Think and Apply Reasoning to Situations

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **जर आणि तर** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | | |
| **वयोगट ३ ते ४ वर्ष** | **वयोगट ४ ते ५ वर्ष** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| ● ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. बालकांना काही प्रश्न विचारावे. काय होईल/जर तुम्ही कराल तर.<br>१. उदाहरणार्थ, जर आपण 'स्वच्छता' या विषयावर चर्चा करा.<br>● ताईने बालकांना खालील प्रश्न विचारावे. चिखलात खेळल्यानंतर तुम्ही हात न धुतल्यास काय होईल ?<br>● झोपण्यापूर्वी तुम्ही दात घासण्यास विसरलात, तर काय होईल ?<br>● तुम्ही भरपूर गोड पदार्थ खाल्ले आणि तुमचे दात चिकट झाले तर तुम्ही काय कराल? काय होईल?<br>● जर तुम्ही तुमची खेळणी कपाटात न ठेवता जमिनीवर ठेवली तर?<br>● तुम्ही तेच कपडे न धुता दररोज घातल्यास काय होईल?<br>● तुम्ही तुमची नखे नियमितपणे कापली नाहीत तरज काय होईल?<br>● तुम्ही रोज अंघोळ केली नाही, तर काय होईल? जर पाणी नसेल, तर काय होईल ? वापरासाठी शौचालये नसतील तर?<br>● बालकांना विचार करायला प्रोत्साहन द्यावे. | ● ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. जर तुम्ही बी पेरले तर काय होईल ? तुम्ही रोपाला पाणी दिले नाही तर काय होईल?<br>● शहरांच्या मध्यभागी उघड्यावर वन्य प्राण्यांना पाळीव प्राणी म्हणून ठेवलेतर काय होईल? मीठ, साखर, वाळू, खडे, तेल इत्यादी वस्तू पाण्यात घातल्यास काय होईल ?<br>● नोटा उरल्या तर काय होईल?<br>● ट्रॅफिक दिव्यांनी काम करणे थांबवल्यास काय होईल?<br>● खेळण्यासाठी बाग नसतील तर काय होईल ?<br>● बालकांच्या तार्किक विचारांना प्रोत्साहन दया आणि बालकांना व्यक्त होऊ दयावे.<br>● तुम्ही खेळून घरी गेलात आणि घराला कुलूप असेल तर तुम्ही काय कराल? | ● या वयोगटातील बालकांना विविध प्रसंग सांगून तुम्हाला त्या वेळी कसे वाटेल असे विचारावे?<br>● उदाहरणार्थ, तुम्ही जास्त वेळ मोबाईल बघितला म्हणून तुमची आई रागावली तर तुम्हाला कसे वाटेल, मोठ्या बाई (सुपरवायजर) अंगणवाडीमध्ये आल्यावर तुम्ही छान गोष्ट सांगितली म्हणून त्यांनी शाबासकी दिली.<br>● तुम्हाला असा आनंद, राग, वाईट वाटणे कधी कधी होते ?<br>● तुम्ही काय केले की तुमच्या आईबाबा/मित्रांना आनंद/राग/ वाईट वाटणे असे होईल?<br>● तुम्हाला मित्रांबरोबर खेळायला जायचा कंटाळा आला असेल तर तुम्ही त्यांना काय सांगाल?<br>● तुमची मैत्रीण खूप रागावली असेल किंवा रडत असेल तर<br>● - तुम्ही तिला कसे शांत कराल?<br>● तुमच्या शेजारचा मुलगा खेळून आला आणि त्यांच्या घराला कुलूप आहे, तर तुम्ही काय कराल? |

| | | |
|---|---|---|
| प्रत्येक बालकाला मुक्तपणे व्यक्त होऊ दया. | | ● बालक त्यांच्या भावना व्यक्त करू शकेल, अशा प्रकारचे प्रश्न विचारा. |
| विविधता | अ) बालकांना त्यांच्या दैनंदिन आयुष्याशी संबंधित वेगवेगळे प्रश्न विचारावे.<br>ब) बालकांना त्यांच्या आयुष्याशी संबंधित विविध प्रसंगांचे रोल प्ले करण्यास सांगावे. | |
| थीम/विषय | पाणी-पाऊस, ऋतू, मदतनीस, वाहन. | |
| ताईसाठी सूचना | बालकांना त्यांच्याच रोजच्या आयुष्यातील घटनांचा वापर करून जर तर चे प्रश्न विचारावेत. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/ पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | तार्किक विचार, भाषिक विकास, सामाजिक विकास होण्यास मदत होईल. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालक योग्य तर्क मांडू शकते का ते पाहावे. | |
| | | |
| **आधारशीला कलाकृती. 61. अन्न शोधणे: प्रकार, चव, प्राधान्ये, पोषण** | | |
| **उपक्रमाचे नाव** | खाऊ तयार करूया. | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | भाज्या, फळे, अन्नपदार्थ यांचे कटआऊट, लिंबू सरबत व कडधान्याची भेळ यांचे घटक पदार्थ | |
| वयोगट ३ ते ४ वर्ष | वयोगट ४ ते ५ वर्ष | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| ● बालकांना विविध फळे, भाज्या, घरात केलेले व विकत घेतलेले पदार्थ देऊन विविध प्रकारे वर्गीकरण करण्यास सांगा.<br>● चवीप्रमाणे, रंगाप्रमाणे, आवडणारे व न आवडणारे, घरात केले जाणारे व विकत आणले जाणारे इत्यादी व त्यावर चर्चा करा. | कृती : भाकरी भाजी करू.<br>● भाकरी, भाजी हे कसे तयार होतात याचे वर्णन बालकांना गोष्टी/गाणी अशा रूपात व्यक्त करण्यास प्रवृत्त करावे, जसे दळून आणले, पीठ मळले, भाकरी थापली, तव्यावर टाकली, भाकरी भाजली गरमा गरम भाजली, ताटात वाढली, पोटभर खाल्ली. यांची चित्रकार्डे आणून बालकांना क्रम लावण्यास सांगावे.<br>● याप्रमाणे वेगवेगळ्या पदार्थाचे वर्णन करण्यास सांगावे.<br>● तांदूळ, डाळी, कांदे, बटाटे, टोमॅटो यासारखे पदार्थ व धान्ये दाखवून त्यापासून कोणता पदार्थ तयार होतो ते विचारावे.<br>● कोणते पदार्थ शरीराला पोषक आहेत ते सांगून बालकांपुढे | ● कडधान्यांची भेळ, लिंबू सरबत हे पदार्थ बालकांच्या मदतीने करून घ्या.<br>● बालकांना एखाद्या पदार्थाचे नाव सांगून तो पदार्थ तयार होण्यासाठी कोणकोणते घटक पदार्थ लागतात, त्यांची नावे विचारावीत. जसे : खिचडी तयार करणे. |
| वयोगट ३ ते ४ वर्ष | वयोगट ४ ते ५ वर्ष | वयोगट ५ ते ६ वर्षे |

| | | |
|---|---|---|
| | ● विविध खाद्यपदार्थांचे कटआऊट दयावेत व त्यांना शक्तिमान होण्यासाठी यातले पदार्थ (कटआऊट) तुमच्या ताटात वाढून घेण्यास सांगा.<br>● दुकानात असलेले धान्य, पीठे, कच्चे पदार्थ जे घरी नेऊन आई त्यापासून काहीतरी बनवते ते पोषक पदार्थ, तर कुरकुरे, वेफर्स हे तयार पदार्थ आणि मिरिंडा, रसना हे अपायकारक पदार्थ हे सांगावे. त्यानंतर वेगवेगळ्या पदार्थांची नावे सांगून 'छान छान' आणि 'ईऽऽऽ' असे म्हणायचे खेळ घ्यावा. उदाहरणार्थ, तांदूळ छान छान, ज्वारी छान छान, तेल छान छान, वेफर्स ईऽऽऽ, थम्स अफ ईऽऽऽ. | |
| विविधता | अ) वेगवेगळ्या पदार्थांची चित्रे असलेले घटनाक्रम, चित्रकार्डे मुक्तखेळामध्ये स्वयंपाक घरातील भांड्यांचा सेट देऊन विविध पदार्थ करण्यास सांगा.<br>ब) योग्य पदार्थाची निवड या अर्थाने एखाद्या प्रसंगाचे बालकांसमोर कथन करावे, त्यापैकी योग्य कृती कोणाची यासंबंधी चर्चा घडवून आणावी (जसे, आजोबांनी दोन भावंडांना काही पैसे दिले त्यातील एकाने त्या पैशातून बाजारातील तयार व पाकीटबंद अन्नपदार्थ जसे कुरकुरे आणि दुसऱ्या भावंडांनी फळे आणली तर दोघांपैकी कोणाची कृती योग्य आणि का यांविषयी चर्चा घडवून आणावी.)<br>क) दुकानातून जाऊन वेगवेगळे पदार्थ आणण्याचे नाट्यीकरण करावे. | |
| थीम/विषय | भाज्या व फळे, | |
| ताईसाठी सूचना | ताईने कार्यपुस्तिकेप्रमाणे कृती करून घ्यावी.<br>वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>C-1.1 पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवतो व अन्नपदार्थ वाया घालवत नाही.<br>ब) LO 1.1.3 चित्रकृतींच्या मदतीने साधा नाष्टा / स्नॅक्स बनवतो.<br>क) LO 1.1.2.1 वेगवेगळ्या खाद्यपदार्थातील अन्नघटक ओळखतो आणि त्यांचे फायदे व तोटे स्पष्ट करतो. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | संभाषण, वर्गीकरण, विश्लेषण, निर्णयक्षमता, तार्किकक्षमता, कार्यकारणसंबंध या क्षमता व कौशल्य साध्य होण्यास मदत होईल. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | बालकाला वेगवेगळ्या पदार्थांचे, पोषक आणि अपोषक पदार्थ यांमध्ये वर्गीकरण करता येते का, खाद्यपदार्थांतील अन्नघटक ओळखता येतात का? याचे निरीक्षण करावे. | |

**पायाभरणीचे काम क्र. : 63. स्टॅम्प आणि प्रिंट : फळे आणि भाज्या. छाप तयार करा आणि अंदाज लावा.**

| | |
|---|---|
| उपक्रमाचे नाव | कठोर परिश्रम करा |

| | | |
|---|---|---|
| उपक्रमाला लागणारे साहित्य | माती, पाणी, वाळू, मीठ, रंग, विविध ठसे (उदाहरणार्थ, भेंडीचे, बटाट्याचे कांदयाचे काप, बोटांचे ठसे इत्यादी. | |
| वयोगट ३ ते ४ वर्ष | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| कृती १ :<br>● परिसरामधे मिळणाऱ्या विविध वस्तू काड्या जमवण्यास - बालकांना मदत करावी व ते रंगात बुडवून त्याचे ठसेकाम करून घ्यावे.<br>कृती २ :<br>• भेंडी, बटाटा, कांदा यांचे काप करून दयावे.<br>• हे काप रंगात बुडवून कागदावर त्यांचे ठसे उमटवण्यास द्यावे. | ● बालकांना विविधत ब्लॉक्स स्टेन्सिल, परिसरात आढळणाऱ्या वस्तू उदाहरणार्थ, पाने, फुले इत्यादी गोळा करण्यास सांगावे.<br>• बालकांना विविध पानांचे, फुलांचे रंग बनवण्यास मदत करावी.<br>• ब्लॉक्स स्टेन्सिल या वस्तू रंगात बुडवून त्यांचे असे कागदावर ठसे उमटवण्यास सांगावे.<br>• बोटांचे ठसेकाम - बोटांचे ठसे काढून नवीन आकृती/चित्र बनवायला सांगावे. उदाहरणार्थ, अननसाच्या चित्रावर बोटांचे | • बालकांना विविध ब्लॉक्स स्टेन्सिल, परिसरात आढळणाऱ्या वस्तू उदाहरणार्थ, पाने, फुले इत्यादी गोळा करण्यास सांगावे.<br>• बालकांना विविध पानांचे, फुलांचे रंग बनवण्यास सांगावे. ब्लॉक्स स्टेन्सिल या वस्तू रंगात बुडवून त्यांचे असे कागदावर ठसे उमटवण्यास सांगावे.<br>• परिसरामध्ये आढळणारे दगड, बिया, पाने, फुले जमवून गटाने एकत्र सुशोभन करण्यास सांगावे. |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| | ठसे, द्राक्षाच्या घडावर बोटांचे ठसे काढावे.<br>• बालकांनी एकत्र येऊन मोठ्या आकाराच्या कागदावर एकत्र ठसेकाम करावे. | |
| विविधता | अ) उपरोक्त कृती करण्यासाठी विविध माध्यमे / साहित्य/पर्याय सुचवावेत- हळद, कुंकू, बुक्का, पालक किंवा बीट पासून होणारे रंग<br>ब) बालकांना लहान मोठ्या आकारांमध्ये ठसेकाम करण्यास प्रोत्साहन दया. | |
| थीम | मी, माझे कुटुंब परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतु, प्राणी (पाळीव व जंगली), | |
| ताईसाठी सूचना | अ) बालकांना परिसरामध्ये शोध घेण्यास प्रवृत्त करा.<br>ब) त्यांनी आणलेल्या वस्तूंबद्दल त्यांचे कौतुक करा.<br>क) ताईने यासंदर्भात उपलब्ध वयोगटनिहाय कृतित्रिका सोडवून घ्याव्यात. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.<br>C-2.1 आकार, रंग आणि त्याच्या छटा यांच्यामधील फरक ओळखतो.<br>अ) LO 2.1.1 मूळ प्राथमिक रंग (लाल, निळा आणि पिवळा) आणि परिसरातील इतर रंग यांच्यातील फरक ओळखतो आणि पथद१र्शत्यांची नावे सांगतो. (काळा, पांढरा, तपकिरी)<br>CG-12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br>C-12.1 विविध आकाराच्या द्विमितीय आणि त्रिमितीय कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्यांबरोबर खेळतो.<br>ब) LO 12.1.4 ब्लॉक्स, स्टेन्सिल, सापडलेल्या वस्तू आणि नैसर्गिक साहित्य यांचे ठसे उमटवतो.<br>क) LO 12.1.4 ब्लॉक्स स्टेन्सिल सापडलेल्या वस्तू आणि नैसर्गिक साहित्य यांच्या सोप्या रचना करतो. | |

| | | |
|---|---|---|
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | सूक्ष्म स्नायू विकास, नेत्रहस्त समन्वय हे साध्य होण्यास मदत होईल... | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | ठसा देताना बालकाने बोटांच्या स्नायूंवर किती जोर दिला आहे, याचे उठवलेल्या ठशावरून निरीक्षण करावे. | |
| | | |
| **आधारशीला कृती क्र. : 64. Artistic Adventure : Free Painting and Drawing** | | |
| उपक्रमाचे नाव | मुक्त चित्र व रंगकाम | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | रंगीत खडू, मेणकांड्या, रंगीत कागद इत्यादी. | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| • ताईने बालकांना रंगीत खडू दयावे. ताईने बालकांना फळ्यावर किंवा फरशीवर निश्चित जागा करून दयावी.<br>• बालकांना त्याच्या मर्जीने हवे ते आकार (आंबा, झाड, दगड, टेबल, वीट, पक्षी, पान इत्यादी) काढण्याची सूचना करावी. | • ताईने बालकाने काढलेल्या आकारासंबंधी प्रश्न विचारून त्याला बोलते करावे. (उदाहरणार्थ, हे काय आहे? तू हे काय काढले? याच्याबद्दल आणखी सांग.) याप्रमाणे. ताईने बालकांना रंगीत खडू दयावे.<br>• ताईने बालकांना फळ्यावर किंवा फरशीवर निश्चित जागा करून दयावी. बालकांना त्याच्या मर्जीने हवे ते आकार (आंबा, झाड, दगड, टेबल, वीट, पक्षी, पान इत्यादी) काढण्याची सूचना करावी<br>• ताईने बालकाने काढलेल्या आकारासंबंधी प्रश्न विचारून त्याला बोलते करावे. (उदाहरणार्थ, तू हे काय काढले? याच्याबद्दल तुला काय वाटते?) याप्रमाणे | • ताईने बालकांचे गट करावे. त्यांना रंगीत खडू, मेणकांड्या, रंगीत कागद इत्यादी साहित्य दयावे.<br>• ताईने गटाला फळ्यावर किंवा फरशीवर निश्चित जागा करून दयावी.<br>• गटाला सामूहिकरीत्या हवे ते चित्र, आकार काढण्याची सूचना करावी. |
| विविधता | साहित्य आणि युक्त्यांचे वेगळेपण वापरून उपरोक्त कृतीत विविधता आणत येईल. | |
| थीम | मी, माझे कुटुंब परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन (आकार) | |
| ताईसाठी सूचना | ताईने वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br>C-12.1 विविध आकाराच्या द्विमितीय आणि त्रिमितीय कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्यांबरोबर खेळतात.<br>अ) LO 12.1.1 योग्य कला साहित्य साधने आणि उपकरणे हाताळतो.<br>ब, क) LO 12.1.2 साहित्य आणि साधने वापरताना विविध प्रकारांनी पकडतो आणि हाताळतो. (उदाहरणार्थ, काड्या, बिया, दगड, खडू, दोरा, पेन्सिली, ब्रश, भुकटी, कात्री इत्यादी.)<br>क) LO 12.1.3 समन्वयक, सुलभक आणि स्थानिक समुदायाच्या साहाय्याने मोठ्या स्वरूपाची | |

| | |
|---|---|
| | कामे करतो. उदाहरणार्थ, जमिनीवरील रांगोळी, भित्ति चित्रे, शिल्प) |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | सूक्ष्म स्नायू विकास, नेत्रहस्त समन्वय हे साध्य होण्यास मदत होईल. |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | या कृतीबाबत किती उत्सुकता दाखवतात. चित्रात नवनिर्मिती करून बारकावे दाखवता येतात का याचे निरीक्षण करावे. |

| | | |
|---|---|---|
| **आधारशीला कृती क्र.: 65. Sandy Discoveries: Free Sand Play** | | |
| **उपक्रमाचे नाव** | **वाळूत खेळू** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **भिजवलेली माती, खेळण्याची माती, कागदाचा लगदा, भिजवलेली कणीक कागद इत्यादी.** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • ताईने बालकांना ट्रेमध्ये बारीक वाळू अथवा रेती उपलब्ध करून दयावी. ४-४ बालकांच्या गटांना वाळूत / रेतीमध्ये मुक्तपणे खेळू दयावे.<br>• वाळूमध्ये प्लास्टिकचे वाट्या, भांडी, चमचे, टोपल्या, नरसाळे या वस्तू वाळूत खेळण्यासाठी उपलब्ध करून दयाव्यात. | | |

| | |
|---|---|
| **विविधता** | बालकांच्या विचारांना आणि कृतींना स्वातंत्र्य देऊन आणि विविध साहित्य वापरून उपरोक्त कृतीत विविधता आणता येईल. |
| **थीम** | मी, माझे कुटुंब परिसर, पाणी-पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन (आकार) |
| **ताईसाठी सूचना** | ताईने बालकांना वाळूत खेळण्याचा प्रत्यक्ष अनुभव दयावा. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br>C-12.1 विविध आकाराच्या द्विमितीय आणि त्रिमितीय कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्यांबरोबर खेळतो.<br>अ) LO 12.1.1 योग्य कला साहित्य साधने आणि उपकरणे हाताळतो. ब, क) LO 12.1.2 साहित्य आणि साधने वापरताना विविध प्रकारांनी ज्ञानसंवा तु साफल्यम् पकडतो आणि हाताळतो. (उदाहरणार्थ, काड्या, बिया. दगड) |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | मुक्त आकारावर शिल्पे तयार करण्याचे कौशल्य, कलाकृती निर्माण कौशल्य विकसित होण्यास मदत होईल. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकाच्या शिल्पकला कोरण्याचे व साधन हाताळणीचे निरीक्षण करावे. |
| **आधारशीला कृती क्र. : 66. My Storage Box : Decorate and Create Personal Storage Box** | |
| **उपक्रमाचे नाव** | **मी सजवलेला बॉक्स** |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **कापडाचे तसेच कागदाचे तुकडे, स्टीकर, डिंक, रंग, मणी, रिबन इत्यादी** |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| --- | --- | --- |
| • बालकाना त्याच्या आजूबाजूच्या परिसरातून मोठ्यांच्या मदतीने बॉक्स गोळा करण्यास सांगावे.<br>• बॉक्सला त्यांना हवे तसे सजविण्यास सांगावे. यासाठी रंगवणे, कापडाचे तसेच कागदाचेतुकडे चिकटविणे, स्टीकर इत्यादी वापरण्यास सांगावे.<br>• बालकांशी प्रश्नांच्या मदतीने संवाद साधावा. जसे कोणता रंग, वस्तू सजविण्यासाठी वापरला ? सजविण्यात विविधता असेल त्यामुळे त्यांनी ते कसे सजविले यावर वैयक्तिकरित्या विचारावे.<br>• बालकांना त्यात विविध वस्तू ठेवायला सांगा. | • फाडकाम, चिकटकाम याद्वार बॉक्स सजविण्यास सांगावे.<br>जसे : रंगीत कागदाला फाडून चिकटविणे.<br>• प्रत्येक मुलाचा बॉक्स हा वेगळा असेल त्यामुळे त्यांनासजविण्यासाठी त्यांनी काही वेगळे केले का ते विचारावे.<br>• बॉक्सचा वापर कशासाठी करण्यात आला यावर चर्चा करावी. सर्वांचे बॉक्स, ते व्यवस्थित कसे ठेवता येतील याबाबत सहभागी करा. नियोजनात | • बालकांनी कोलाज, रंगकाम इत्यादी मध्ये नव्याने जाणून घेतलेल्या बाबींचा वापर बॉक्सला सजविण्यासाठी करण्यास सांगावा.<br>• विविध वस्तूंचा वापर करून बॉक्सला सजविण्यास सांगावे. |
| **विविधता** | परिसरात सापडणाऱ्या विविध वस्तू वापरून विविधता आणता येईल. प्रश्नांत बदल करून विविधता आणता येईल. | |
| **विषय** | मी माझे कुटुंब, वनस्पती (फुले, शेती, रंग) | |
| **थीम/माहिती** | बालकांना बॉक्स सजविताना मुक्तपणे सजवू दयावे. त्यात विविध वस्तू ठेवण्यास सांगावे. जेणेकरून वस्तू व्यवस्थित ठेवता येईल. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-1 बालके आणि त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>C-1.3 शाळा व वर्ग स्वच्छ आणि नीटनेटके ठेवतो.<br>अ) LO 1.3.1 स्वतःच्या वस्तू जसे की मसुदइत्यादीबद्दल सजग होतात. पिशव्या, बाटल्या, बूट, रुमाल<br>ब) LO 1.3.1 स्वतःच्या वस्तू योग्य जागी ठेवतात आणि योग्य जागेवरून घेतात.<br>क) LO 1.3.1 स्वतःच्या वस्तूंची चांगल्याप्रकारे देखभाल करतात. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | सूक्ष्मकारक कौशल्य, सर्जनशीलता हे साध्य होण्यास मदत होईल. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | कृतीदरम्यान सूक्ष्मकारक कौशल्य विकासाचे निरीक्षण करावे, (विशेषतः फाडकाम, चिकटकाम). | |

## आधारशीला कृती क्र. 67. Paper Ball Mosaic: Make and Paste Paper Balls on Different Drawings

| | | |
| --- | --- | --- |
| उपक्रमाचे नाव | चित्रावर कागदी गोळे चिकटवणे. | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | रद्दी कागद, ओले रंग, ब्रश, पुठ्ठे, डिंक इत्यादी. | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| • ताईने बालकांना रद्दी कागद दयावे. बालकांना ओले रंग दयावे.<br>• वेगळ्या कागदावर अथवा पुठ्ठ्यावर प्राण्याच्या चित्राची बाह्यरेषा आखून दयावी. | • वयोगट ३ ते ४ वर्षांसाठी दिलेली कृती घ्यावी.<br>• ताईने बालकांना मोठ्या कागदावर चित्राची बाह्यरेषा दयावी. | • ताईने बालकांना रद्दी कागद आणि ओले रंग दयावे.<br>• वयोगट ४ ते ५ वर्षे साठी असलेली कृती घ्यावी.<br>• ताईने बालकांना मोठ्या कागदावर चित्राची बाह्यरेषा दयावी. |

| | | |
|---|---|---|
| • बालकांना (त्याच्या मताप्रमाणे) कागद फाडण्यास सांगावे. फाडलेले कागद चुरगळून छोटे गोळे बनवण्याची सूचना करावी. बनलेल्या गोळ्यास वाटेल त्या रंगात बुडवून रंगीत करण्याची सूचना करावी. राज्<br>• हे रंगीत गोळे प्राण्याच्या चित्राच्या बाह्यरेषेत चिकटवण्यास सांगावे. | • बालकांना पतंगाचा कागद गोळे करण्यासाठी दयावा.<br>• चित्राच्या आत केलेले गोळे बालकांना चिकटवण्यास सांगावे. उदाहरणार्थ, भोपळयाच्या आत कागदाचे गोळे करून चिकटवणे. | • बालकांना बाह्यरेषेवर बालकांना पतंगाचा कागद गोळे करण्यासाठी दयावा.<br>• चित्राच्या आत केलेले गोळे बालकांना चिकटवण्यास सांगावे. |
| विविधता | बालकांच्या विचारांना आणि कृतींना स्वातंत्र्य देऊन आणि विविध साहित्य वापरून उपरोक्त कृतीत विविधता आणता येईल. | |
| थीम | परिसर, पाणी-पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगली), मदतनीस, वाहन (आकार) | |
| ताईसाठी सूचना | ताईने यासंदर्भात उपलब्ध वयोगटनिहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br>C-12.1 विविध आकाराच्या द्विमितीय आणि त्रिमितीय कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्यांबरोबर खेळतो. | |
| | अ) LO 12.1.1 योग्य कला साहित्य साधने आणि उपकरणे हाताळतो.<br>ब, क) LO 12.1.2 साहित्य आणि साधने वापरताना विविध प्रकारांनी पकडतो आणि हाताळतो. उदाहरणार्थ, काड्या, बिया, कडे, दगड, खडू, दोरा, पेन्सिली, ब्रश, भुकटी, कात्री इत्यादी.<br>ब, क) LO 12.1.3 समन्वयक, सुलभक आणि स्थानिक समुदायाच्या साहाय्याने मोठ्या स्वरूपाची कामे करतो. उदाहरणार्थ, जमिनीवरील रांगोळी, भित्तिचित्रे, शिल्प. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | सूक्ष्मकारक कौशल्य, सर्जनशीलता हे साध्य होण्यास मदत होईल. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | कृतीदरम्यान सूक्ष्मकारक कौशल्यविकासाचे निरीक्षण करा. विशेषतः<br>फडकाम, चिटकं | |

## आधारशीला कृती क्र. : 68. Origami Fun : Paper Folding

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **घडीकाम** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **कागद, वर्तमानपत्र, घोटीव कागद** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • बालकांना कागद देऊन त्याच्या घड्या घालून घ्याव्या.<br>• बालकांना रुमालाची घडी कशी घालायची ते दाखवावे.<br>• बालकांना कागद देऊन त्याच्या घड्या घालून दयाव्या. | • बालकांना वर्तुळाकार बसवावे.<br>• बालकांना घडीकामासाठी रंगीत घोटीव कागद दयावे.<br>• कागदाच्या घड्या घालून होडी नवणे ही कृती प्रथम बालकांना करून दाखवावी. | घडीकाम करू चित्रात घालू.<br>• ताईने पाणी, बाग, सण अशी चित्रे काढून दयावीत.<br>• बालकांकडून घडीकामाच्या वस्तू तयार करून घ्याव्यात. होडी, फुलपाखरू, झाड, फूल, घर, मासा दिलेल्या चित्रात योग्य ठिकाणी चिकटवण्यास द्यावे. |

| | | |
|---|---|---|
| | • बालकांना छोट्या छोट्या सूचना देऊन सूचनेप्रमाणे कृती करण्यास सांगावे.<br>• होडी तयार करण्याची कृती बालकांकडून करून घ्यावी.<br>• बालकाला प्रत्यक्ष घडीकाम कसे करायचे ते करून दाखवावे. | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| | • बालकाला घडीकाम करू द्यावे. तयार झालेला आकार काय आहे? कशाचा असावा ? याबाबत बालकाला काय वाटते ते जाणून घ्यावे.<br>• बालकाला घड्या घालून नवीन आकार करण्यास प्रोत्साहित करावे.<br>• बालकाने केलेल्या आकाराबाबत त्याच्याशी गप्पा मारून बालकाच्या कल्पना जाणून घ्याव्यात. | |

| | |
|---|---|
| **विविधता** | घडीकाम - कपाटाची घडी, रुमालाची घडी, साधी, होडी, शिडाची होडी, घर, कपबशी, राजाराणी होडी, परिवार होडी इत्यादी, |
| **थीम** | मी, माझे कुटुंब परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन (आकार) |
| **ताईसाठी सूचना** | ताईने यासंदर्भात अधिक संदर्भासाठी उपलब्ध वयोगटनिहाय कार्यपुस्तिका वापरावी व त्यानुसार कृती करून घ्याव्यात. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-3 सुदृढ आणि लवचिक शरीर विकसित होते. प्रत<br>C-3.3 हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवतो.<br>अ) LO 3.3.1 साध्या कृतीमध्ये सूक्ष्म स्नायू विकास, हस्त-नेत्र समन्वय आणि स्नायूंमधील बळकटपणा दर्शवतो. (उदाहरणार्थ, गिरगिटणे, कागद फाडणे, चिटकवणे, मुक्तपणे रंगविणे, मातीकाम)<br>ब) LO 3.3.1 ज्या कृती करताना सूक्ष्म स्नायूंना वापर केला जातो तसेच हस्त-नेत्र समन्वयात काही प्रमाणात अचूकता लागते, अशा कृती करताना स्नायूंवर नियंत्रण दर्शवतो. (उदाहरणार्थ, मोठे आकार कापणे, मोठे मणी ओवणे, बटण लावणे, स्क्रू लावणे, बाटलीचे झाकण लावणे, उघडणे, क्रेयॉन्सचा वापर करून चित्रे काढणे.) |
| | क) LO 3.3.1 जास्त अचूकता लागणाऱ्या कृती सूक्ष्म स्नायूंना समन्वयाने थोड्या मदतीसह करतो. (उदाहरणार्थ पेन्सिल चित्र काढणे, सरळ रेषेवर किंवा वक्र रेषेवर कापणे, छोटे मणी ओवणे.) |
| **साध्य होणाऱ्या क्षमता /कौशल्ये** | **साध्य होणाऱ्या क्षमता /कौशल्ये** |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | **सूक्ष्म स्नायू विकास, हस्त-नेत्र समन्वय** |

## आधारशीला कृती क्र.: 69. Animal Face Mask: Create and Role Play

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **प्राण्यांचे मुखवटे** |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **प्राण्यांचे मुखवटे, कागद, पेन्सिल, रंग, दोरी इत्यादी.** |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| • ताईने तयार केलेले विविध प्रकारचे प्राण्यांचे, फुलांचे, फळाचे, भाज्यांचे मुखवटे दयावे. मुखवटा कोणत्या प्राण्याचा आहे, ते ओळखण्यास सांगावे.<br>• प्राण्यांची नक्कल करण्यास सांगावे जसे आवाज काढणे, त्याप्रमाणे चालून दाखवणे इत्यादी.<br>• प्राण्यांविषयी त्यांच्या कल्पना जाणून घ्या. | • ताईने तयार केलेले विविध प्रकारचे प्राण्यांचे, फुलांचे, फळाचे, भाज्यांचे असे विविध मुखवटे देऊन ओळखण्यास सांगावे.<br>साफल्यम • त्यांचे वर्गीकरण करण्यास सांगावे जसे जंगलातील प्राणी, पाळीव *प्राणी, प्राण्यांचे अन्न इत्यादी. | • बालकांना त्यांना आवडेल त्या प्राण्यांचे चित्र काढण्यास सांगावे. त्याला रंगवून मुखवटा तयार करण्यास सांगावे.<br>• त्या प्राण्याविषयी त्याला सांगण्याची संधी दयावी. जसे त्याचे अन्न, निवास इत्यादी. |

| | |
|---|---|
| विविधता | प्राण्यांप्रमाणे पक्षी घेऊन विविधता आणता येईल. |
| थीम | प्राणी (घरगुती आणि वन्य), |
| ताईसाठी सूचना | बालकांना मुक्तपणे मुखवटे तयार करणे तसेच वर्गीकरण करणे यांसारख्या कृती करू दयाव्या. प्रश्नांच्या माध्यमातून बोलते करावे.<br>ताईने यासंदर्भात अधिक संदर्भासाठी उपलब्ध वयोगटनिहाय कार्यपुस्तिका वापरावी व त्यानुसार कृती करून घ्याव्यात. यासंदर्भात उपलब्ध वयोगटनिहाय कृतिपत्रिका वापरावी. |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-12 बालके दृक आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. |
| | C-12.3 बालके कलेच्या माध्यमातून स्वतःच्या कल्पना आणि भावना व्यक्त करण्यासाठी सर्जनशीलता व कल्पकतेने काम करतो.<br>अ) LO 12.3.2 वस्तू, व्यक्ती भावनिक अनुभव यांची प्रतीकात्मक अभिव्यक्ती करण्यासाठी विविध दृश्य प्रतिमा शारीरिक हालचाली आणि आवाज निर्माण करतात.<br>ब) LO 12.3.2 दृक् आणि सादरीकरण कलांच्या माध्यमातून व्यक्ती प्राणी वनस्पती वस्तू इत्यादींच्या ओळखता येण्याजोग्या शारीरिक आणि वर्तन वैशिष्ट्यांची नक्कल करतात.<br>क) LO 12.3.2 स्वतःच्या कल्पना आणि अनुभव व्यक्त करण्यासाठी रूप, रंग, भूमिका, आवाज, जागा आणि प्रसंग याची कल्पकतेने एकत्रित करून करतात.C-12.5 विविध कला, स्थानिक संस्कृती आणि वारसा यांची निर्मिती करताना आणि अनुभव घेताना विविध प्रकारच्या प्रतिक्रियांना प्रतिसाद देतो व प्रशंसा करतो.<br>अ) LO 12.5.1 कलाकृतींबाबत आवडीनिवडी व इतर मते व्यक्त करताना शाब्दिक / अशाब्दिक प्रतिसाद देतो.<br>ब) LO 12.5.1 कलाकृती किंवा स्थानिक सांस्कृतिक अभिव्यक्ती यांच्या महाराष्विविध पैलूंबाबत संवाद साधतो. (उदाहरणार्थ एखादया पात्राचा मोठा आणि थरथरणारा आवाज) |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | **सर्जनशीलता, भाषिक अभिव्यक्ती** |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | **बालकाच्या सर्जनशीलतेचे निरीक्षण करावे.** |
| **पायाभरणीचे काम क्र. : 70. थँक यू कार्ड - आमच्या सहाय्यकांसाठी कृतज्ञता** | |
| **उपक्रमाचे नाव** | **कृतज्ञता चित्र कार्ड** |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **फ्लॅशकार्ड, पांढरा कागद, क्रेयॉन, गोंद, सजावटीचे साहित्य जसे की फुले, मणी, पाने.** |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| • कुटुंबातील व्यक्ती आपल्यासाठी काय काय | • कुटुंबातील व्यक्ती आपल्यासाठी काय | • वैयक्तिक आभारकार्ड बनविताना त्यात अधिक |

| | | |
|---|---|---|
| करतात? आपल्या कामात कशी मदत करतात? याविषयी ताईने बालकांसोबत चर्चा करावी. | काय करतात? आपल्या कामात कशी मदत करतात? याविषयी ताईने बालकांसोबत चर्चा करावी. | बारकाईने काम करण्यास सांगावे.<br>• बालकाच्या कल्पनेप्रमाणे ते सजविण्यास सांगावे. |

| | | |
|---|---|---|
| • फ्लॅशकाडे वापरून मदतनीस ओळखण्यास सांगावे. मदतनीस आपणास कशी मदत करतात यांविषयी चर्चा करावी.<br>• क्रेयॉन आणि सजावट सामग्री वापरून धन्यवाद कार्ड तयार करण्यास सांगावे. आवश्यक तिथे ताईने बालकांना मदत करावी. | • फ्लॅश कार्ड वापरून मदतनीस ओळखण्यास सांगावे. मदतनीस आपणास कशी मदत करतात, यांविषयी चर्चा करावी.<br>• परिसरातील ताईची प्रतिमा असलेले वैयक्तिक आभार कार्ड बनविण्यास सांगावे. फुले, पाने, मणी, ग्लिटर, स्टिकर्सने ते सजविण्यास सांगावे.<br>• तसेच बालकांकडून आईवडील आजी-आजोबा, मित्र, शिक्षक यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा कार्ड तयार करून घ्यावे. | • त्यांनी ते कसे सजविले ते सांगण्याची संधी द्यावी. अशी आभार कार्ड गुरुपौर्णिमा, मातृदिन या दिवसांना देण्यास सांगावे. तसेच बालकांकडून आईवडील आजी-आजोबा, मित्र, शिक्षण यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा कार्ड तयार करून घ्यावे. |
| विविधता | विविध सजावटीचे साहित्य वापरून विविधता आणता येईल. | |
| **थीम** | मी माझे कुटुंब व परिसर, मदतनीस, वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | मुक्तपणे बालकांना सजावट करू दयावे. मदतनीस करीत असलेल्या णे कामांवर चर्चा घ्यावी. ताईने यासंदर्भात अधिक संदर्भासाठी उपलब्ध वापरावी व त्यानुसार कृती करून घ्याव्यात. वयोगटनिहाय कार्यपुस्तिका वापरा यासंदर्भात उपलब्ध वयोगटनिहाय कृतिपत्रिका वापरावी. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व**<br><br>**अध्ययन निष्पत्ती** | CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>C-4.1 कुटुंब आणि समाजाचा घटक या नात्याने स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करतो.<br>ब, क) LO 4.1.1 स्वतःला कुटुंब, शेजारी, शाळा आणि शहर यांचा एक घटक म्हणून ओळखतो. जेथे वेगवेगळी व्यक्ती वेगवेगळ्या भूमिका निभावत असतात. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | भाषिक कौशल्य, कुतूहल, स्वतःभोवतीच्या व्यक्ती व वस्तूंची माहिती. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) बालक स्वतःच्या संदर्भातील व आजूबाजूच्या गोष्टीविषयी व्यवस्थित माहिती देतो का हे पहावे.<br>ब) विविध मदतनीस ओळखतो का याचे निरीक्षण करावे. | |

## आधारशिला कृती क्र. : 71. Let's Cook : Make Fruit and Vegetable Chaat

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **कोशिंबीर बनवूया.** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **पदार्थ बनवण्याचे साहित्य व बोथट सूरी.** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |

| | | |
|---|---|---|
| • ताईने बालकांना घरून येताना एक एक उकडलेला बटाटा आणायला सांगावे. दुसऱ्या दिवशी ताईने बालकांबरोबर उकडलेला बटाटा बालकांना सोलायला दयावा.<br>• सगळ्या बालकांचा बटाटा सोलून झाल्यावर ताईने बालकांना उकडलेला बटाटा बोथट सुरीने चिरायला सांगावा<br>● . सगळ्यांचा बटाटा एकत्र करून त्यावर चाट मसाला टाकून बालकांना राज खायला द्यावा. याप्रमाणे सोप्या खाऊच्या कृती करून घ्याव्यात. | सॅलेड तयार करणे.<br>● ताईने बालकांना घरून येताना एक एक काकडी, गाजर, टोमॅटो आणायला सांगावे. दुसऱ्या दिवशी बालकांना त्यांनी आणलेले काकडी टोमॅटो, गाजर बोथट सुरीने चिरायला दयावे.<br>● सगळ्या बालकांकडून सॅलेड चिरून घ्यावे.<br>● सगळ्यांचे सॅलेड चिरून झाल्यावर त्यावर थोडेसे मीठ घालून बालकांना खायला दयावे.<br>● खाऊ खाऊन झाल्यावर ताईने बालकांना आपण काय काय कृती केली हे विचारावे. | • कडधान्याची भेळ करण्यासाठी चणे, दाणे, मटकी इत्यादी भिजत घालावे. दुसऱ्या दिवशी मोड आलेले कडधान्य धुऊन घ्यावे.<br>• कांदा, टोमॅटो, कोथिंबीर इत्यादी साहित्य आणावे. भाज्या धुऊन घेणे, निवडणे या कृतीमध्ये एकेका बालकाला एकावेळी संधी देऊन सर्व बालकांना सहभागी करून घ्यावे. चिंचेचा कोळ बालकांच्या समोर करून त्याचे गोड पाणी करावे. ताईने कांदा, पद टोमॅटो आणि कोथिंबीर चिरावी.<br>• प्रमाणात साहित्य घेऊन बालकांना स्वतःपुरती भेळ करण्यास संधी दयावी. सर्व बालकांना कृती लक्षात आणून दयावी. बालकांना खाऊ खायला दयावा. |

| | |
|---|---|
| **विविधता** | चपातीचा/पोळीचा लाडू, शेंगदाण्याचा व गुळाचा लाडू, गाजराची कोशिंबीर इत्यादी पदार्थ करावेत. |
| **थीम** | भाज्या व फळे, ऋतू |
| **ताईसाठी सूचना** | ताईने यासंदर्भात अधिक संदर्भासाठी उपलब्ध वयोगटनिहाय कार्यपुस्तिका वापरावी व त्यानुसार कृती करून घ्याव्यात. यासंदर्भात उपलब्ध वयोगटनिहाय कृतिपत्रिका वापरावी. |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>C-1.1 पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवितो व अन्नपदार्थ वाया घालवत नाही.<br>ब) LO 1.1.3 चित्रकृतींच्या मदतीने साधा नाष्टा/स्नॅक्स बनवितो.<br>क) LO 1.1.3 मोठ्यांच्या साहाय्याने पौष्टिक नाश्ता तयार करण्याच्या प्रक्रियेत सहभागी होतो. (उदाहरणार्थ, उकडलेले चणे, मोड आलेली कडधान्ये घालून भेळ करतो.) |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | सूक्ष्म स्नायूंवर नियंत्रण, निरीक्षणशक्तीचा विकास |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | बालक उत्साहाने सर्व कृतीत सहभागी होते का? याचे निरीक्षण करावे. |

## आधारशिला कृती क्र. 72. Fun with Clay: Compare Creations using Relational Vocabulary

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **मातीशी खेळलो, तुलना करूया.** |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **मातीचा किंवा पीठाचा गोळा** |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| • ताईने बालकांना मातीचा गोळा/क्ले/कणीक खेळण्यास दयावी.<br>• मातीच्या गोळ्याबरोबर बालकांना मुक्तपणे खेळू दया. (बालक मातीत खेळताना त्याचे गुणधर्म जाणून घेत असते त्यामुळे आधी मातीच्या गोळ्यावर थापट्या मारेल, मग कुटून खेळेल, त्यानंतर गुंडाळी करून खेळेल. जसे बालकाला हवे तसे खेळू दयावे.) | • माती, पाणी मिसळून चिखल करण्यास सांगावे. कणकेत पाणी मिसळून घट्ट गोळा करण्यास सांगावे. 上<br>• भिजवलेली माती व भिजवलेली कणीक यांचे योग्य आकाराचे स्वतंत्र गोळे करण्यास सुचवावे.<br>• ओल्या गोळ्यांपासून वळकट्या तयार करण्यास सांगावे. तयार केलेल्या वळकट्यांपासून हा शब्द त्यांच्या परिचयातील विविध त्रिमितीय आकार करण्यासाठी बालकांना सांगावे. (आनुषंगिक होण्यासाठी या कृतीत काही बदल करावे लागतील.) | • माती, पाणी मिसळून चिखल करण्यास सांगावे. कणकेत पाणी 'मिसळून घट्ट गोळा करण्यास सांगावे.<br>• भिजवलेली माती व भिजवलेली कणीक यांचे योग्य आकाराचे स्वतंत्र गोळे करण्यास सुचवावे.<br>• ओल्या गोळ्यांपासून वळकट्या तयार करण्यास सांगावे. तयार केलेल्या वळकट्यांपासून हा शब्द त्यांच्या परिचयातील विविध त्रिमितीय आकार करण्यासाठी बालकांना सांगावे. (आनुषंगिक होण्यासाठी या कृतीत काही बदल करावे लागतील.) |
| विविधता | लहान, मोठा, सर्वांत लहान यांसाठी कृती घेऊन विविधता आणता येईल. उपरोक्त कृतीत लांब, आखूड या तुलनात्मक शब्दांचा समावेश करता येईल. | |

| | |
|---|---|
| थीम | मी, माझे कुटुंब परिसर, पाणी-पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन (आकार) |
| ताईसाठी सूचना | - |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-8 एकापेक्षा जास्त गुणधर्मांच्या आधारे वस्तू गटात आणि उपगटात वेगळ्या करतो.<br>C-8.9 लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी वजन आणि आकारानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधने व एकके निवडतो. |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | तुलना करणे, सर्जनशीलता, भाषिक कौशल्ये |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | तुलनात्मक शब्दांचा योग्य वापर करतात का? बालकांची सर्जनशीलता याचे निरीक्षण करावे. |

**पायाभरणीचे काम क्र. : 73. फूड मॅजिक : वास, चव, पोत आणि स्वयंपाक ओळखा.**

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **खाद्य पदार्थांची गंमत** |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **लवंग, मिरी, वेलची, संत्री, फणस, आंबा, पोहे, उसळ इत्यादी.** |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| कृती १ :<br><br>राज् बालकांना • अंगणवाडी ताईने कापलेली फळे, भाजीपाला यांचे गंध घेण्यास सांगावे.<br>• प्रत्येक बालकाला वैयक्तिक सराव दयावा.<br>• बालकाला डोळे बंद करण्यास सांगावे. | कृती : ओळख वासाची.<br>• बालकांना झाडाखाली बसवून प्रत्यक्षात झेंडू, सुगंधी तेल, लवंग, मिरी, बेलची आणि संत्री, फणस, आंबा यांसारखी फळे, पोहे, उसळ अशा वस्तू आणि खाद्यपदार्थ | कृती : चला खाऊ तयार करू.<br>• दाण्याचा लाडू ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे.<br>• भाजलेल्या दाण्याचा व गुळाचा वास बालकांना घ्यायला दयावा.<br>● बालकांसमोर वर्तमानपत्र अंथरावे, त्यावर प्रत्येक बालकाला मूठभर भाजलेले दाणे सोलण्यासाठी दयावे. |

| | | |
|---|---|---|
| • डोळे बंद केलेल्या बालकाच्या नाकाजवळ एखादे फळ, भाजीपाला न्यावा.<br>• वासावरून त्या पदार्थाचे नाव ओळखण्यास सांगावे.<br>• ही कृती प्रत्येक बालकाकडून वैयक्तिक करवून घ्यावी. | दाखवावे व त्यांना गंधाचा प्रत्यक्ष अनुभव घेऊ दयावा.<br>वास ओळखू या.<br><br>• बालकांचे डोळे बांधून कशाचा गंध आहे, हे ओळखण्यास सांगणे. | • बालकांचे दाणे सोलून झाल्यावर ते सुपात पाखडण्यासाठी दयावे.<br>• दाणे पाखडून झाल्यावर बालकांना गूळ किसण्यासाठी दयावा.<br>• बालकांना दाणे कुटण्यासाठी खलबत्ता दयावा. ताईने दाणे कसे कुटायचे हे एकदा दाखवावे. |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| कृती २ :<br><br>• अंगणवाडी ताईने बालकांना मैदानावर एकत्रित करावे. बालकाला डोळे बंद करण्यास सांगावे.<br>• डोळे बंद केलेल्या बालकाच्या नाकाजवळ एखादा पदार्थ न्यावा. या पदार्थाचा वास घेण्यास सांगावे.<br>• वासावरून या पदार्थाचे नाव ओळखण्यास सांगावे. ही कृती प्रत्येक बालकाकडून वैयक्तिक करवून घ्यावी.<br>• प्रत्येक बालकाला वैयक्तिक सराव दयावा. | | • प्रत्येक बालकाला दाणे कुटण्यास दयावे. सगळ्या बालकांचे दाणे, गूळ सगळे एकत्र करावे. (मिक्सर असल्यास थोडेसे मिक्सरमध्ये थोडे बारीक करून घ्यावे.) ताईने बालकांना ताटलीत बारीक केलेले दाणे, गूळ हे ताटलीत काढून दयावे. बालकांना लाडू कसे करायचा हे दाखवावे व बारीक केलेल्या कुटाचे लाडू करण्यास दयावे.<br>सगळ्या बालकांचे लाडू करून झाल्यावर सगळ्यांना त्यांनी केलेला लाडू खाण्यास दयावे. याप्रमाणे महिन्यातून एकदा बालकांना खाऊ करायला दयावा. |

| | |
|---|---|
| **विविधता** | जास्तीतजास्त उपलब्ध वस्तूचा वापर करून बालकांसोबत हा उपक्रम घ्यावा. तसेच त्याचे दृढीकरण करावे. |
| **थीम** | विशेष गरजा असणाऱ्या बालकांना ताईने मदत करावी. |
| **ताईसाठी सूचना** | विशेष गरजा असणाऱ्या बालकांना ताईने मदत करावी. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व**<br><br>**अध्ययन निष्पत्ती** | CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशलता विकसित करतात.<br>C-2.4 वेगवेगळे गंध आणि चव यांतील फरक ओळखतो.<br>अ) LO 2.4.1 सुगंध आणि दुर्गंध ओळखतो. उदाहरणार्थ, अत्तर, फुले, कचरा इत्यादी.<br>अ) LO 2.4.2 गोड, खारट, कडू, आंबट आणि तिखट चव ओळखतो.<br>ब) LO 2.4.1 फूल, अत्तर, खाद्यपदार्थ यांच्या सुगंधामधील फरक ओळखतो.<br>ब) LO 2.4.2 वेगवेगळया प्रकारच्या खादद्यपदार्थांची चव व पोत यांचा अनुभव घेतो. |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | ज्ञानेंद्रिय विकास, सुगंधातील फरक ओळखतात. जीवनकौशल्य |

**आधारशिला कृती क्र. : 74.कलात्मक साहस: फाडणे आणि पेस्ट करणे**

| | |
|---|---|
| **उपक्रमाच नाव** | **फाडकाम व चिकटकामातून कलानुभव.** |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **रंगीत कागद, बॉक्स इत्यादी.** |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| • बालकाना एक एक कोरा कागद/ कृतिपत्रिका | • ठळक रेखाटन करून जसे झाड, पान, घर, | ● रिकामे खोके, रंगीत कागद, डिंक असे |

| | | |
|---|---|---|
| दयावी.<br>• आता त्यांना दिलेले रंगीत कागद फाडून कोऱ्या कागदावर/ कृतिपत्रिकेवर मुक्तपणे हवे तसे चिकटविण्यास सांगावे.<br>• फाडकाम व चिकटकाम यातून बालकाने कोणती कलाकृती तयार केली आहे? याविषयी संवाद साधावा. त्याचे कौतुक करावे. | फूल इत्यादी ते बालकांना कागद दयावे.<br>• बालकांना विविध रंगीत कागद, डिंक असे साहित्य वाटावे.<br>• दिलेल्या आकारात त्यांना दिलेले रंगीत कागद फाडून चिकटविण्यास सांगावे.<br>• त्यांनी केलेल्या कामाविषयी संवाद साधावा. त्याचे कौतुक करावे. | साहित्य बालकांना उपलब्ध करून दयावे.<br>• दिलेल्या रिकाम्या खोक्यावर रंगीत कागद फाडून चिकटवून त्याला सजविण्यास सांगावे.<br>• दिलेले खोके त्याने ते कसे सजविले याबाबत चर्चा करावी. त्याचे कौतुक करावे. |
| विविधता | सजविण्यासाठी विविध साहित्य वापरून चिकटकाम करण्यास संधी द्यावी. | |
| थीम | मी, माझे कुटुंब परिसर, पाणी-पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन (आकार) दा प्रत | |
| ताईसाठी सूचना | ताईने यासंदर्भात अधिक संदर्भासाठी उपलब्ध वयोगटनिहाय कार्यपुस्तिका वापरावी व त्यानुसार कृती करून घ्याव्यात. यासंदर्भात उपलब्ध वयोगटनिहाय कृतिपत्रिका वापरावी. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-3 सुदृढ व लवचीक शरीर विकसित होते.<br>C-3.3 हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालीमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवतो.<br>अ) LO 3.3.1 साध्या कृतीमध्ये सूक्ष्मस्नायू विकास, हस्त-नेत्र समन्वय आणि स्नायूंमधील बळकटपणा दर्शवतो. (उदाहरणार्थ, गिरगिटणे, कागद फाडणे, चिकटवणे, मुक्तपणे रंगविणे, मातीकाम) | |
| | ब) LO 3.3.1<br>ज्या कृती करताना सूक्ष्म स्नायूंचा वापर केला जातो तसेच हस्त-नेत्र समन्वयात काही प्रमाणात अचूकता लागते अशा कृती करताना स्नायूंवर नियंत्रण दर्शवतो. (उदाहरणार्थ, मोठे आकार कापणे, मोठे मणी ओवणे, बटण लावणे, स्क्रू लावणे, बाटलीचे झाकण लावणे, उघडणे क्रेयॉन्सचा वापर करून चित्र काढणे.)<br>क) LO<br>3.3.1 जास्त अचूकता लागणाऱ्या कृती सूक्ष्म स्नायूंच्या समन्वयाने थोड्या मदतीसह करतो (उदाहरणार्थ, पेन्सिलने चित्र काढणे, सरळ रेषेवर किंवा वक्ररेषेवर कापणे, छोटे मणी ओवणे) | |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | सर्जनशीलतेच्या विकासास, सूक्ष्मकारक कौशल्यांना चालना देता येईल. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | बालकांच्या फाडकाम, चिकटकाम कौशल्याचे निरीक्षण करावे. | |

**आधारशिला क्रिया : ७५. निवारा : गरजेबद्दल बोला आणि विविध साहित्य वापरून तयार करा**

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **सजीवांच्या गरजा** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **विविध प्रकारच्या निवाऱ्याचे चित्र कार्ड, माती, काड्या** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट 5 ते 5 वर्षे** | **वयोगट 5 ते 6 वर्षे** |
| • बालकांनी घरापासून शाळेत येताना काय पाहिले आहे. जसे- प्राणी, पक्षी, वाहने (लोकांसह) यांबद्दल | • बालकांनी घरापासून शाळेत येताना काय पाहिले आहे. जसे- प्राणी, पक्षी, | • माणसाचा निवारा आणि प्राण्यांचा निवारा यातील फरक यावर चर्चा घ्यावी. |

| | | |
|---|---|---|
| मुक्तपणे चर्चा करावी.<br>• बालकांशी विविध प्राणी आणि त्यांच्या निवाऱ्याबद्दल बोलण्यास सांगावे.<br>• ओलसर बारीक वाळूचा खोपा बनविण्यासाठी त्यांना सांगावे. | वाहने (लोकांसह) यांबद्दल मुक्तपणे चर्चा करावी.<br>• बालकांशी विविध प्राणी आणि त्यांच्या निवाऱ्याबद्दल बोलण्यास सांगावे.<br>• ओलसर बारीक वाळूचा खोपा बनविण्यासाठी त्यांना सांगावे. | • घराचे चित्र उपलब्ध कागदावर काढण्यास सांगावे.<br>• काड्या, माती यांपासुन पक्ष्यांची घरटी बनविण्याची संधी द्यावी. त्यासंदर्भात आवश्यक संवाद साधावा. |
| विविधता | साहित्य उपलब्ध करून कृतीत विविधता आणता येईल. | |
| थीम | वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, | |
| ताईसाठी सूचना | मुक्तपणे चर्चा करावी, साहित्य उपलब्ध होण्यास मदत करावी.<br>ताईने यासंदर्भात अधिक संदर्भासाठी उपलब्ध वयोगटनिहाय कार्यपुस्तिका वापरावी व त्यानुसार कृती करून घ्याव्यात. यासंदर्भात उपलब्ध वयोगटनिहाय कृतिपत्रिका वापरावी. | |

| | | |
|---|---|---|
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.1 वेगवेगळया वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.<br>अ) LO 7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना या इतरांच्या मदतीने नावासहित ओळखतो.<br>ब) LO 7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इत्यादी नावासहित ओळखून स्वतः त्याचे वर्णन करतो.<br>क) LO 7.1.3.1 लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती, चित्रे ओळखतो, त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (घराचा मोठा दरवाजा) | |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | सर्जनशीलता, परिसराचे ज्ञान ग्रहण करण्याची क्षमता याला चालना मिळेल. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | भाषिक कौशल्यांचे निरीक्षण करावे, बालकांच्या प्राण्यांविषयी असलेल् भावना बालक कसे व्यक्त करते याचे निरीक्षण करावे. | |
| **आधारशिला कृती क्र. : 76. Create with Clay : Make Different Tools, Discuss and रोल-प्लेसाठी वापरा** | | |
| **उपक्रमाचे नाव** | **कला बदल** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **माती किंवा गव्हाचे पीठ आणि पाणी** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट 4 ते 5 वर्षे** | **वयोगट 5 ते 6 वर्षे** |
| • ताईने बालकांना मातीचा गोळा खेळण्यास दयावा. मातीच्या गोळयाबरोबर बालकांना मुक्तपणे खेळू दया. (बालक मातीत खेळताना त्याचे गुणधर्म जाणून घेत असते त्यामुळे आधी मातीच्या गोळयावर थापट्या मारेल, मग कुटून खेळेल, त्यानंतर गुंडाळी करून खेळेल. जसे बालकाला हवे तसे खेळू दयावे.) | • मातीत पाणी मिसळून चिखल करण्यास सांगावे.<br>• कणकेत पाणी मिसळून घट्ट गोळा करण्यास सांगावे.<br>• भिजवलेली माती व भिजवलेली कणीक यांचे योग्य आकाराचे स्वतंत्र गोळे करण्यास सुचवावे.<br>• ओल्या गोळयांपासून वळकट्या तयार | • मातीत पाणी मिसळून चिखल करण्यास सांगावे.<br>• कणकेत पाणी मिसळून घट्ट गोळा करण्यास सांगावे.<br>• भिजवलेली माती व भिजवलेली कणीक यांचे योग्य आकाराचे स्वतंत्र गोळे करण्यास सुचवावे.<br>• ओल्या गोळयांपासून वळकट्या तयार करण्यास सांगावे. तयार केलेल्या वळकट्यांपासून हा शब्द त्यांच्या परिचयातील विविध त्रिमितीय आकार |

| | | |
|---|---|---|
| | करण्यास सांगावे. तयार केलेल्या वळकट्यांपासून हा शब्द त्यांच्या परिचयातील विविध त्रिमितीय आकार करण्यासाठी | करण्यासाठी |

| | | |
|---|---|---|
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट 4 ते 5 वर्षे | वयोगट 5 ते 6 वर्षे |
| | बालकांना सांगावे. (आनुषंगिक होण्यासाठी या कृतीत काही बदल करावे लागतील.) | बालकांना सांगावे. (आनुषंगिक होण्यासाठी या कृतीत काही बदल करावे लागतील.) |
| विविधता | बालकांना कृतीचे व कल्पकतेचे स्वातंत्र्य देऊन या कृतीत विविधता आणता येईल. बाजारात उपलब्ध असलेली वेगवेगळी माध्यमे वापरून या कृतीत विविधता आणता येईल. | |
| थीम/ विषय | पाणी-पाऊस, भाज्या व फळे, प्राणी (पाळीव व जंगली), वाहन (आकार) | |
| ताईसाठी सूचना | - | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br>सार्वजनिक सेवा<br>C-12.1 विविध आकाराच्या द्विमितीय आणि त्रिमितीय कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो.<br>ब) LO 12.1.3 माती किंवा कणीक यासारखे साहित्य थापून किंवा वळकटी करून त्रिमितीय आकार तयार करतात. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | अ) कलाकृती तयार करण्यासाठी लागणारे साहित्य हाताळण्याचे कौशल्य विकसित होते. साहित्य मिसळण्याचे योग्य प्रमाण बालकांना कळते. हात आणि मेंदू यांचा समन्वय साधता येतो. सुलभाकाच्या सूचनांचे अनुपालन करण्याची क्षमता विकसित होते. गटकार्याची उपयुक्तता लक्षात येते. सहकार्य व समन्वय साधण्याची क्षमता विकसित होते. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | अ) बालकाच्या गटात कार्य करण्याच्या वर्तनाचे निरीक्षण करावे. गटाच्या सुलभक समन्वयक यांच्या सूचनांकडे किती लक्ष देतो याचे निरीक्षण करावे. स्वतःहून काही वेगळे करतो का, याचे निरीक्षण करावे. सहकार्य, समन्वय व सहचार्य याचे निरीक्षण नोंदवावे. | |

| | | |
|---|---|---|
| **आधारशिला कृती : ७७. नाचूया: शरीराच्या हालचालीचे नमुने तयार करा आणि वेगवान/मंद बीट्स करा** | | |
| **उपक्रमाचे नाव** | चला नाचूया | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | वाद्य साहित्य,मोबाईल/टी.व्ही यावर बालगीते | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट 4 ते 5 वर्षे** | **वयोगट 5 ते 6 वर्षे** |
| • ताईने बालकांना समूहात एकत्र करावे.<br>• आधी स्वतः एक टाळी वाजवावी. आपल्या कृतीप्रमाणे बालकांना समूहाने कृती करण्यास सांगावे. सराव घ्यावा.<br>• पुढे पुढे टाळयांची संख्या तीनपर्यंत वाढवत जावी. | • ताईने बालकांना समूहात एकत्र करावे.<br>• आधी स्वतः नृत्याची कृती करून दाखवावी. (पदन्यास किंवा हाताच्या हालचाली.)<br>• आपल्या कृतीप्रमाणे बालकांना | • वयोगट ४ ते ५ वर्ष ची कृती घ्यावी. काठिण्यपातळी वाढवावी. बालकांच्या आवडीचे, परिचयाचे आणि वयानुरूप गाणे लावून त्यावर ताल धरत नृत्य करण्यास प्रोत्साहन दयावे. |

| | | |
|---|---|---|
| सर्वांची लय आणि ताल एक होत नाही तोपर्यंत सराव सुरू ठेवावा.<br>• बालकांच्या आवडीचे, परिचयाचे आणि वयानुरूप गाणे लावून त्यावर ताल धरत नृत्य करण्यास प्रोत्साहन दयावे. | समूहाने कृती करण्यास सांगावे. सराव घ्यावा<br>• पुढे पुढे हालचालीची संख्या तीनपर्यंत वाढवत न्यावी. सर्वांची लय आणि ताल एक होत नाही तोपर्यंत सराव सुरू ठेवावा. | |
| **विविधता** | बालकांच्या विचारांना आणि कृतींना स्वातंत्र्य देऊन आणि विविध साहित्य वापरून तसेच वेगवेगळे प्राणी, पक्षी यांची चित्रे वापरून उपरोक्त कृतीत विविधता आणता येईल. | |
| **थीम** | मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | यासोबतच संगीताच्या तालावर सोपे कवायतीचे प्रकार घ्यावेत. यासाठी उपलब्ध कार्यपुस्तिकेचा वापर करावा. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययननिष्पत्ती** | CG-12 बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br>C-12.4 कला विषयामध्ये सहयोगाने काम करतो. | |
| | अ) LO 12.4.1 व्यक्तीशः किंवा गटात विविध आवाज किंवा हालचाली यांचे प्रयोग करतात.<br>ब) LO 12.4.1 समवयस्कांच्या साहाय्याने विविध संभाषण, हालचाली, ध्वनी आणि दृश्यकलेचे नमुने तयार करतात.<br>क) LO 12.4.1 जोडी किंवा गटामध्ये खेळताना किंवा सादरीकरण करताना संभाषण, हालचाली आणि आवाज यांचे समन्वय करण्याचा प्रयत्न करतात. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | लय, ताल यांची समज विकसित होते. सामूहिक कलेचे कौशल्य. लयबद्ध शारीरिक हालचाली. ताल, लय, ठेका अशा संगीतातील सर्जनशील महत्त्वाच्या बाबींकडे लक्ष वेधणे, पद-नेत्र समन्वय, सर्जनशीलता या सर्वांना चालना मिळण्यास मदत होते. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकाला ठेक्यावर लयबद्ध हालचाल करता येते का, संगीत ऐकत असताना त्यामध्ये तल्लीनता असते का, एकाग्रता दिसते का, चेहऱ्यावरील हावभाव, देहबोली, गीतातले शब्द लक्षात घेऊन स्वतःहून एखादा पदन्यास करते का या गोष्टींचे निरीक्षण करावे. | |
| **आधारशिला कृती : 78. Fun with Patterns Create Art/Craft/Beading/ Body-Movement Patterns** | | |
| **उपक्रमाचे नाव** | वस्तूचा आकृतिबंध | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | वाट्या, ताठ बियर किंवा नायलॉन दोरी, मोठे मणी, फुले, पाने, सुई- दोरी. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट 4 ते 5 वर्षे** | **वयोगट 5 ते 6 वर्षे** |
| • कडक वायर अथवा नायलॉनच्या दोरीमध्ये मोठे मणी ओवायला दयावे.<br>• मणी ओवता यायला लागले की दोन रंगाचे मणी देऊन त्यांना आकृतिबंधात ओवाण्यास सांगावे. उदाहरणार्थ, लाल- निळा, लाल-निळा<br>• या दोन रंगांत लाल निळा, लाल लाल - लाल - - लाल निळा - निळा, - निळा - निळा अशा प्रकारचे | • कडक वायर अथवा नायलॉनच्या दोरीमध्ये मध्यम आकारमानाचे मणी ओवायला दयावे.<br>• दोन वेगवेगळया आकार आणि रंगाचे मणी आकृतिबंधात ओवून दाखवावे. उदा. मोठा लाल-छोटा लाल, मोठा लाल-छोटा निळा, मोठा लाल-छोटा | • बोथट सुईमध्ये जाड/पुडीचा दोरा ओवण्यास द्यावा.<br>• बालकांना एका टोपलीत पाने, फुले गोळा करण्यास सांगावे.<br>• बालकांना पाने, फुले, सुई, दोरा तोरण कसे तयार करायचे त्याचे प्रात्यक्षिक दाखवावे.<br>• बालकांना तोरण तयार करून गटात दाखवायला सांगावे. |

| | | |
|---|---|---|
| आकृतिबंध करून मणी ओवण्यास सांगावे. | लाल-मोठा निळा<br>• बालकांना स्वतः नवीन आकृतिबंध तयार करून तसे मणी ओवण्यास प्रोत्साहित करावे. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट 4 ते 5 वर्षे** | **वयोगट 5 ते 6 वर्षे** |

| | |
|---|---|
| **विविधता** | ५ ते ६ वर्षांच्या बालकांना थर्माकोलचे आकार कापून, खरी फुले पाने ओवायला देता येतील. यामध्ये रंगांचे आकृतिबंध तयार करून देता येतील. रंगीत कागदाचे कपटे करून ते आकृतिबंधात चिकटवायला द्यावेत. भाजीचे किंवा पानाचे ठसे आकृतिबंधात उमटवून घ्यावेत. |
| **थीम/ विषय** | मी, माझे कुटुंब, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, वाहन |
| **ताईसाठी सूचना** | ताईने यासंदर्भात अधिक संदर्भासाठी उपलब्ध वयोगटनिहाय कार्यपुस्तिका वापरावी व त्यानुसार कृती करून घ्याव्यात. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C 8.2 आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्यातील साधे आकृतिबंध ओळखतो आणि त्यांचा विस्तार करतो.<br>अ) LO 8.2.1 8.2.1 आकृतिबंध आकृतिबंध ओ ओळखतो आकार, पाने, फुले यांचा जोड्यांमधील पुनरावृत्तीनुसार आकृतिबंध तयार करणे. (पाने - फुले, अ-ब, अ-ब, अ-ब)<br>ब) LO 8.2.1 आकृतिबंधातील पुनरावृत्ती असणारा घटक ओळखतो. महाराष्३, तेपुठो वस्तू आकार, चित्रे, ध्वनी याना वापरून प्रकारचा आकृतिबंध तयार करतात.<br>क) LO 8.2.1.1 रंग आकार माप या विविध वैशिष्ट्यांनुसार नवीन मसु आकृतिबंध स्वतः तयार करतात. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | सूक्ष्म स्नायू कौशल्य, हस्त-नेत्र समन्वय, सौंदर्यदृष्टीचा विकास |
| **तपासणी** | बालकाला दिलेल्या सूचनेप्रमाणे सुई हातात धरता येते का नाही, दिलेला आकृतिबंध समजतो आहे का नाही याचे निरीक्षण करावे. |
| **आधारशिला कृती : 78.1 Fun with Patterns Create Art/Craft/Beading/ Body-Movement Patterns** | |
| **उपक्रमाचे नाव** | हालचालींचा आकृतिबंध |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | - |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट 4 ते 5 वर्षे** | **वयोगट 5 ते 6 वर्षे** |
|---|---|---|
| • आकृतिबंध - हालचाली हालचालीचे आकृतिबंध पुढील प्रमाणे घ्यावेत. उदाहरणार्थ, हात वर, हात खाली, उभे राहून दोन पाय जवळ, दोन पाय लांब शरीर स्थितीच्या हालचालीत पुनरावृत्ती करून तयार होणारे आकृतिबंध करून दाखवावेत,<br>● त्या कृतीची पुनरावृत्ती करून घ्यावी. उदाहरणार्थ, वारकरी खाली वर टाळया देत | आकृतिबंध - हालचाली<br>• शरीर स्थितीच्या हालचालीत पुनरावृत्ती करून तयार होणारे आकृतिबंध करून दाखवावेत, त्या कृतीची पुनरावृत्ती करून घ्यावी (नृत्य हालचाली) हालचालींची संख्या पायऱ्या (step) वाढवाव्यात. त्याप्रमाणे हालचाली करून घ्याव्यात.<br>• एक ते चार आणि नंतर एक ते आठ अंक म्हणून व्यायामाचे प्रकार करून घ्यावेत. | |

| | |
|---|---|
| चालतात, तालावर झिम्मा खेळणे इत्यादी. | |
| **विविधता** | बालकांना त्यांच्या आवडीने काही हालचालींचे आकृतिबंध तयार करण्यास प्रवृत्त करणे.नसावा यशस्वी होतो. |
| **थीम** | प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक |
| **ताईसाठी सूचना** | यासोबतच संगीताच्या तालावर सोपे कवायतीचे प्रकार घ्यावेत. यासाठी उपलब्ध साहित्याचा वापर करावा. यासाठी उपलब्ध कार्यपुस्तिकेचा वापर करावा शर्शी एकला |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता वा अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकाची गणितीय समज विकसित होत आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C 8.2 आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्यातील साधे आकृतिबंध ओळखता येणे आणि त्यांचा विस्तार करता येणे.<br>अ) LO 8.2.1.3 हालचालीचे आकृतिबंध ओळखतो आणि पुनरावृत्ती करतो. उदाहरणार्थ, हात खाली-वर उडी मार उभा रहा उडी मार उभा रहा.<br>ब) LO 8.2.1.3 तीन वेगवेगळया आवाज किंवा तीन विशिष्ट कृतींमधील आकृतिबंध ओळखतात व विस्तार करतात.<br>CG-12 बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. |
| | C-12.2 संगीत, भूमिकाभिनय, नृत्य आणि विविध हालचाली यांची निर्मिती करण्यासाठी स्वतःचा आवाज, शरीर, जागा आणि विविध वस्तू यांचा चौकसपणे उपयोग करतो व खेळतो.<br>अ) LO 12.2.1 स्वतःच्या आवाजाचा आणि शरीराचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेतो (टाळया, बुटक्या, पावलांचा आवाज, हाताच्या लयबद्ध हालचाली, उड्या, बडबडगीतातील शब्दोच्चार)<br>ब) LO 12.2.1 स्वतःचा आवाज, शरीर, वादय व इतर साधनाचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेताना दूत आणि संथ लय यांच्यात फरक करतो. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्य** | निरीक्षण, सौंदर्यदृष्टी सादरीकरण, कार्यकारण संबंध, श्रवण, आकलन व्याच्या विकासास मदत होईल. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | आकृतिबंध समजतो का, आकृतिबंधाचा विस्तार करता येतो का, नवीन आकृतिबंध तयार करतो का याचे निरीक्षण करावे. |

| | | |
|---|---|---|
| **आधारशिला कृती : 78.2 Fun with Patterns Create Art/Craft/Beading/ Body-Movement Patterns** | | |
| **उपक्रमाचे नाव** | ध्वनीचा आकृतिबंध | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | उपलब्धतेनुसार विविध वादये | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट 4 ते 5 वर्षे** | **वयोगट 5 ते 6 वर्षे** |
| • आकृतिबंध श्रवण<br><br>ताईने - बालकांना आवाजातील आकृतिबंध करून दाखवावा. जसे - टाळया टिचक्यांची विशिष्ट प्रकारे पुनरावृत्ती करावी. सात सुरांचे पलटे म्हणून | आकृतिबंध - श्रवण २ शब्द प<br><br>• दोन वेगवेगळे ध्वनी ऐकवावेत त्यांची पुनरावृत्ती करून ऐकवावे. बालकांकडून पुनरावृत्ती करून घ्यावी. जसे, गरम गरमगर, वासरू रुसवा यात बोल/ध्वनी वाढवावेत हा वाढलेला विस्तार लक्षात घेत त्याप्रमाणे उच्चारण संधी दयावी विस्तार करून घ्यावा. | |

| | |
|---|---|
| घ्यावेत. उदाहरणार्थ, सा रे ग रेगम, सारे सारेग इत्यादी. - रेगरेगम,<br>• बालकांकडून त्याप्रमाणे कृती करून घ्यावी. या कृतीचा सराव ३ ते ४ दिवस घ्यावा.<br>• साधारण दिवाळी नंतर हे आकृतिबंध घ्यावेत. | • आवाज आणि हालचाल असा एकत्र आकृतिबंध आंबा म्हणजे वर उडी, पेरू म्हणजे खाली उडी. |

| | |
|---|---|
| **विविधता** | तळयात मळयात हा खेळ आकृतिबंधाच्या स्वरूपात घेता येईल. |
| **थीम/ विषय** | प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, |
| **ताईसाठी सूचना** | उपलब्धतेनुसार विविध वादय/साहित्य यांच्या साहाय्याने ध्वनीचा आकृतिबंध तयार करावा. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.2 आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्यातील साधे आकृतिबंध ओळखतो आणि त्यांचा विस्तार करतो.<br>अ) LO -8.2.1.2 आवाजामधील आकृतिबंध ओळखतो व पुनरावृत्ती करतो. उदाहरणार्थ, सारेगम धमगध मग याप्रमाणे.<br>ब) LO-8.2.1.3 तीन वेगवेगळया आवाज किंवा तीन विशिष्ट कृतीमधील आकृतिबंध ओळखतात व विस्तार करतात. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | निरीक्षण, सौंदर्यदृष्टी, श्रवणक्षमता, आकलनक्षमता याला चालना मिळण्यास मदत होईल. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | आकृतिबंध समजतो का, आकृतिबंधाचा विस्तार करता येतो का, नवीन आकृतिबंध तयार करतो का याचे निरीक्षण करावे. |

**आधारशिला कृती : 79 Stamping and Painings Things Around Me**

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | ठशातून कलाकृती |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | रंग, पाणी, ब्रश, ठसे घेता येतील अशा वेगवेगळया वस्तू उदाहरणार्थ, पान, भाज्या, फुले इत्यादी प्रत |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट 4 ते 5 वर्षे** | **वयोगट 5 ते 6 वर्षे** |
|---|---|---|
| बालकांना कोरा कागद दयावा. त्याच्या हाताच्या पंजाला रंग लावून दयावा. कागदावर हाताचा पंजा, बोटे याचे ठसे उमटवायला सांगावे | • बालकांना कोरा कागद दयावा कागदावर भेंडी, कांदा, बटाटा, अंगठ्याचे, बोटांचे ठसे रंगात बुडवून कागदावर उमटविण्यास सांगावे. बालकांनी केलेल्या दोन्ही कृतींचे कौतुक करावे. तयार केलेल्या साहित्याचे वर्गात प्रदर्शन भरवावे. | ठसे उमटवता येतील अशा वस्तू गोळा कराव्यात. खोडरबर, खिळा, स्पंज, दोऱ्याचा गुंता, दगड, शिंपले, पाने, फुले, अशा वस्तू रंगात बुडवून त्याचे ठसे उमटवायला सांगावे. पंजा, बोटे, अंगठा यांचे ठसे उमटवून त्यातून निरनिराळी चित्रे तयार करण्यास सांगता येईल. |

| | |
|---|---|
| **विविधता** | प्लास्टिकची पातळ पिशवी हवा भरून बंद करावी व त्याचा फुगा तयार होतो. त्याच्या खालच्या बाजूने ठसा उमटवता येतो.<br>साधा फुगवलेला फुगा रंगात बुडवून त्याचाही ठसा उमटतो |

| | | |
|---|---|---|
| **थीम/ विषय** | भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), पक्षी व कीटक, मदतनीस | |
| **ताईसाठी सूचना** | दिव्यांग बालक असल्यास त्याचा हात धरून ठसा उमटवून घ्यावा. यासाठी वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिकेचा वापर करावा. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br>C-12.1 विविध आकाराच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो.<br>अ,ब) LO - 12.1.4 ब्लॉक्स, स्टेन्सिल, सापडलेल्या वस्तू आणि नैसर्गिक साहित्य यांचे ठसे उमटवतो.<br>क) LO-12.1.4 ब्लॉक्स, स्टेन्सिल, सापडलेल्या वस्तू आणि नैसर्गिक साहित्य यांच्या सोप्या रचना करतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | सूक्ष्म स्नायू कौशल्य, हस्त-नेत्र समन्वय, सौंदर्यदृष्टी याच्या विकासास मदत होईल. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकांना हातावर जोर देऊन ठसा उमटवता येतो का नाही, मोठी बालके ठसे कामातून कोणत्या प्रकारचे चित्र निर्माण करतात याचे निरीक्षण करावे. | |
| **आधारशिला क्रियाकलाप: 80 ओळखा, काढा आणि भावना सामायिक करा** | | |
| **उपक्रमाचे नाव** | मला कसे वाटते ? | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | कागद, रंगीत खडू, रंग, ब्रश, भावना दाखवणाऱ्या चेहऱ्यांची चित्रे इत्यादी. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट 4 ते 5 वर्षे** | **वयोगट 5 ते 6 वर्षे** |
| **१. कृती : गोष्ट ऐकूया**<br><br>बालकांना छोटी गोष्ट सांगावी. गोष्ट सांगताना त्याला अनुसरून चित्रे दाखवावी. | **१. कृती : गोष्ट ऐकूया**<br><br>बालकांना छोटी गोष्ट सांगावी. गोष्ट सांगताना त्याला अनुसरून चित्रे दाखवावी. | **१. कृती : गप्पा - भावना (गोष्टीद्वारे)**<br><br>बालकांना विविध भावनादर्शक गोष्टी सांगाव्या. (उदाहरणासर्थ, धाडसी हत्ती इत्यादी) बालके त्याच्या मनातील राग, |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट 4 ते 5 वर्षे** | **वयोगट 5 ते 6 वर्षे** |
|---|---|---|
| • मनात येणाऱ्या भावनाच्या इमाजा दाखवाव्या. बालकांना काय वाटले असे विचारावे.<br><br>• **गोष्ट :** एक होती चिऊताई. ती खूप आनंदात होती. (आनंदी इमोजी) इकडे तिकडे बागडत होती. कारण तिला खेळताना एक मोती मिळाला होता. तिने तो अलगद घरात नेऊन ठेवला होता. मग तिला भूक लागली म्हणून ती खाऊ शोधायला उडत उडत खूप दूर गेली. तिच्या घराखाली बिळात एक साप राहत होता. चिऊ दूर गेलेले पाहून तो हळूच तिच्या घरी गेला त्याला दिसला मोती. त्याने तो | • बालकांना कागद दयावा व त्यावर त्यांना ऐकलेल्या गोष्टीचे चित्र काढायला सांगावे. चित्रांच्या खाली स्वलिपीत गोष्ट लिहायला सांगावी. बालकांचे चित्र काढून झाल्यावर व त्यांनी गोष्ट लिहिल्यावर त्यांनी काय कशाकशाचे चित्र काढले आहे, हे विचारावे. त्यांची नावे त्यांच्या चित्रावर लिहावीत. तसेच त्यांनी लिहिलेली गोष्ट बाजूला लिहावी. बालकांनी काढलेली चित्रे वर्गात लावावीत. | • आनंद, दुःख, शौर्य इत्यादी भावना व्यक्त करतात. त्यांना तशी बोलण्याची संधी उपलब्ध करून दयावी. विविध स्पर्शानुभव दयावे. उदाहरणार्थ, विविध वस्तू डोळे बंद करून स्पर्शाने अनुभवण्यास सांगावे व भावना प्रकट करण्याची बालकाला संधी द्यावी. विविध भावनांवर आधारित प्रसंग निर्माण करून ते प्रकट करण्याची संधी दयावी. उदाहरणार्थ, दुःख, शौर्य भावनांवर आधारित प्रसंग निर्माण करावे. ताईने बालकांना वेगवेगळया गोष्टी वाचून दाखवाव्यात. ज्यात वेगवेगळ्या भावनांबद्दल बालक ताई दयांच्यामधील प्रसंग असतील. (एखादे बालक शांत असल्यास त्याच्याबरोबर एकट्याने संवाद |

| | | |
|---|---|---|
| घेतला आणि आपल्या बिळात आणला. त्याला खूप आश्चर्य वाटत होते (आश्चर्याचा इमोजी) की चिऊला हा मोती मिळाला कोठे. चिऊताई दमून भागून (दमलेली इमोजी) घरी आली बघत तर काय ? तिला माता कुठेच दिसेना. तिने तो खूप शोधला पण अह तिला तो मिळालाच नाही. चिमणीला मोती हरवला म्हणून खूप दुःख झाले. (दुःखी इमोजी) अशा प्रकारे गोष्ट पुढे न्यावी. | ३) **कृती : निरीक्षणातून भावना ओळखून यश मिळते**<br><br>बालकांचे दैनंदिन निरीक्षण करून शेतो विविध प्रसंगांमध्ये कशाप्रकारे प्रतिसाद देतो याचे नियमित हा अवलोकन करावे. | साधावा. त्याला आवडणाऱ्या गोष्टी विचाराव्यात व नंतर काय झाले यावर बोलावे. बालक बोलत नसल्यास त्याला खूप आग्रह करू नये.)<br>४) **कृती : वर्तनबदल**<br><br>बालकाशी अनौपचारिक गप्पा माराव्या. एखादे बालक शाळेत चिडल्यास, रागावल्यास त्याच्याशी बोलावे. रागाचे कारण विचारावे. वरील साहित्यापैकी त्याला काय करायला आवडेल ते विचारावे. त्याला ते साहित्य दयावे व कृती देण्यास प्रोत्साहन दयावे. |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट 4 ते 5 वर्षे** | **वयोगट 5 ते 6 वर्षे** |
|---|---|---|
| | | जसे - बालकाला राग आला तर तो ठेवलेले कागद फाडेल. राग आल्यानंतर तो शांत करण्यासाठी आवश्यक कृती घ्याव्यात. उदाहरणार्थ, गाणी, गोष्टी, खेळ |
| **विविधता** | प्राणी, पक्षी अशी पत्रे वापरून गोष्टी सांगाव्या. | |
| **थीम** | पाणी-पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | यासाठी वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिकेचा वापर करावा. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>C-4.2 विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो.<br>10-4.2.1.2 सोप् अ) LO-4.2.1.2 सोप्या भावना ओळखतो. जसे : भीती, आनंद, दुःख<br>ब) LO-4.2.1.1 भावनांची चेहऱ्यावरील हावभाव व शब्द यांच्याशी सांगड घालतो.<br>ब) LO-4.2.1.2 भावनांना शब्दाद्वारे तसेच हावभाव व इतर प्रकारे व्यक्त करतात. जसे : चित्र रेखाटन, देहबोलीतून<br>क) LO-4.2.1.2 स्वतःच्या भावना परिचित समवयस्क व इतरांना सांगतो.<br>क) LO-4.2.2.2 जेव्हा रागावलेले किंवा निराश असतात तेव्हा शांत होण्यासाठी कृती बदलण्याचे मान्य करतात. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | अ) भावनिक बुद्धिमत्ता, आपुलकी, मदतीची भावना यांच्या विकासाला चालना मिळेल. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालके एखाद्या घटनेला प्रतिसाद कसा देतात त्यांना काय वाटते याचे निरीक्षण करावे. | |

**आधारशिला कृती : 81. Wonders in our Bin: Reuse and Recycle Safe Waste Creatively**

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | कचऱ्यातून कला आणि खत |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | प्लास्टिकचे ग्लास, कागदी ताटल्या, प्लास्टीकच्या बाटल्या, पुठ्ठ्यांची वेष्टने, ओला कचरा, सुका कचरा |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| • बालकांना खाता न येण्याजोग्या रोजच्या वापरातल्या गोष्टी कोणत्या ते विचारावे.<br><br>• प्लास्टीकचे ग्लास, कागदी ताटल्या, प्लास्टीकच्या बाटल्या, पुठ्ठ्याची वेष्टने इत्यादी बालके कचरा कसा होतो, याबाबत बालकांशी चर्चा करावी.<br><br>• या वस्तू वापरून कोणत्या उपयोगी वस्तू बनवता येतील, याबाबत बालकांशी चर्चा करावी.<br><br>• सोप्या वस्तू बालकांबरोबर बनवाव्या. | | • बालकांबरोबर कुजणाऱ्या आणि न कुजणाऱ्या वस्तूंबाबत चर्चा वी करावी.<br><br>• बालकांना ओला आणि सुका कचरा तसेच काचा, धातू, प्लास्टिक, कागद असे कचऱ्याचे वर्गीकरण करून दाखवावे.<br><br>• ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती कशी करतात याबाबत माहिती देऊन त्याचे प्रात्यक्षिक करावे.<br><br>• खत प्रकल्पाच्या खड्ड्यामध्ये ओला कचरा, पालापाचोळा नियमितपणे टाकण्याची सवय लावावी. |

| | |
|---|---|
| **विविध** | तयार झालेले खत वापरून परिसरात जमिनीत किंवा कुंडीत फुलझाडे |
| **थीम/विषय** | मी, माझे म्कुटुंबष्ट्रव पुरिसर, पाणी पाऊस, ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस वाहन |
| **ताईसाठी सूचना** | यासाठी वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिकेचा वापर करावा. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br><br>C-1.3 शाळा व वर्ग स्वच्छ आणि नीटनेटके ठेवतो.<br><br>अ) LO-1.3.3 इतरांच्या मदतीने कचरापेटीचा वापर करतो.<br><br>ब) LO-1.3.3 कचरा टाकण्यासाठी कचरापेटीचा वापर करायला सुरुवात करतो.<br><br>क) 1.0-1.3.3 नेहमी कचरा टाकण्यासाठी कचरापेटीचा वापर करतो. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता /कौशल्ये** | कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावायची असते याचे सामाजिक भान, यासाठी कचऱ्याचे वर्गीकरण करणे, काही कचऱ्यात जाणाऱ्या वस्तूंचा पुन्हा वापर कसा करता येऊ शकलो, हे समजेल. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | योग्य प्रकारे कचरा वेगळा करतो का? वस्तूंचा पुनर्वापर करताना सर्जनशीलता दाखवतो का? |
| **आधारशिला कृती : 82. चित्रांसह मजा: बाह्यरेखा सोबत कट/फाडणे** | |
| **उपक्रमाचे नाव** | काळजीने वस्तू वापरूया |

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | आग, गॅस, सूरी, सुई, टाचणी, इस्त्री, इलेक्ट्रिक प्लग्ज अशा धोकादायक वस्तूची चित्रे | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • बालकांना वर्तुळात बसवून पुढील गोष्टी कराव्या :<br><br>• आग, गॅस, सूरी, सुई, टाचणी, इस्त्री, इलेक्ट्रिक प्लग्ज अशा धोकादायक वस्तू प्रत्यक्षात / चित्र दाखवून ओळख करून दयावी. प्रत्येक गोष्टीचा उपयोग विचारावा व त्याचबरोबर त्या वस्तूंचा धोका म्हणजे कात्री किंवा सुरीची धार त्यांना दाखवावी. त्या सर्व आपल्या उपयोगाच्या वस्तू आहेत, पण आपण हात लावणे टाळावे हे बालकांना सांगावे.<br><br>• वरील गोष्टींपासून कसा धोका निर्माण होऊ शकतो याची माहिती द्यावी. | • बालकांसमोर वस्तू वाचनासाठी धारदार वस्तू एकेक करून मांडाव्यात सुरी, कात्री, सुई, टाचणी, पिन, इलेक्ट्रिकच्या वस्तूंमध्ये असलेल्या वस्तूबद्दल प्रत्येकास एक वाक्य बोलण्यास सांगावे | • बालकांना वर्तुळात बसवून पुढील गोष्टी कराव्या :<br><br>१) सरळ रेषेवर कापूया कागदावरील सरळ रेषा प्लास्टिकच्या कात्रीने कापून घेणे.<br><br>२) आकार कापूया - कागदावर सोपे वर्तुळ, त्रिकोण, चौकोन असे आकार काढून त्यानुसार प्लास्टिकच्या कात्रीने कापून घेणे.<br><br>३) भाजी चिरूया सुरीने उकडलेले रताळे, बटाटे, दुधी भोपळा अशा प्रकारच्या भाज्या कापण्यास सांगणे,<br><br>४) टाचणी टोचूया बोथट टाचणीने दोन कागद जोडण्यास सांगणे.<br><br>५) गवत काढूया बोथट खुरप्याने बागेतील गवत काढण्यास सांगणे, |
| **विविध** | कोणत्या वस्तूंपासून काळजी घ्यावी हे सांगावे, | |
| **थीम/विषय** | मी माझे कुटुंब व परिसर, भाज्या व फळे, ऋतू, वाहन, | |

| | |
|---|---|
| **ताईसाठी सूचना** | ताईने यासंदर्भात अधिक संदर्भासाठी उपलब्ध वयोगटनिहाय कार्यपुस्तिका वापरावी व त्यानुसार कृती करून घ्याव्यात. या संदर्भातील वयोगट निहाय कृतिपत्रिका सोडवून घेऊया |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br><br>CG-1.4 वस्तू आणि सोप्या साधनाचा सुरक्षितपणे बापर करतो.<br><br>अ) LO-1.4.1 आग, गॅस, सुरी, सुई, टाचणी, इस्त्री, इलेक्ट्रिक प्लग्ज अशा धोकादायक गोष्टींना हात लावणे टाळतो.<br><br>ब) LO-1.4.1 कात्री सुरी, आगपेटी अशा धोकादायक आणि हानिकारक वस्तू काळजीपूर्वक हाताळतो.<br><br>क) LO-1.4.1 कात्री, सुरी या वस्तु देखरेखी खाली वापरतो. |

| | | |
|---|---|---|
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | कारक कौशल्य आणि जीवन कौशल्य निरीक्षण क्षमता वाढते आणि वस्तू हाताळून आनंद मिळतो. धोकादायक वस्तू ओळखतो. असुरक्षित वस्तूची माहिती | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | ओला कचरा कोणता आणि सुका कचरा कोणता, हे समजले आहे का याचे निरीक्षण संवादादरम्यान करावे, | |
| **आधारशिला कृती : 83. Music Patterns: Create, Compare**<br>**उच्च/निम्न खेळपट्टी, मोठा/मऊ आवाज** | | |
| **उपक्रमाचे नाव** | वाजवून पाहूया, ऑवाजे करूया | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | बाळूपखेडे डोंको, बियां) कडधान्ये भरलेल्या बाटल्या, खंजिरी, ताटली,चमचा, परण्या अग प्रत | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| **कृती १ :** बाटल्यामध्ये वाळू, खडे, डाळी, कडधान्ये, बिया भराव्यात व बालकाना ते बाजवायला द्यावे.ताटली-चमचा किंबा वाटी-चमचा देऊन बाजवायला सांगावे<br><br>**कृती २:** शारीरिक अवयव आणि हालचाली यांचा वापर करून आवाजावर टाळया वाजवणे, पाय आपटणे, वाकणे, डोलणे, उड्या मारणे अशा हालचाली तालात करून घ्याव्यात. | स्थानिक बोलीभाषेतील सथ लयीतील गीते, ऐकाबाबीत<br><br>शारीरिक अवयव आणि हालचाली याचा वापर करून आवाजावर टाळया वाजवणे, पाय आपटणे, वाकणे, डोलणे, उड्या मारणे अशा हालचाली संथ व जलद तालात करून घ्याव्यात. | बालकांना संथ लयीत टाळया वाजवण्यास सांगावे<br><br>वेळेच्या अंतराने एकच कृती जलद करण्यास सांगाबी, उदाहरणार्थ, हात हलबणे, चालणे, खजिरी वाजवणे, वाटी चमचा वाजवणे<br><br>बडबड गीत संथ व जलद गतीने म्हणावे.<br><br>संथ आणि जलद यातील फरक लक्षात आल्यावर, संथ, मध्यम |

| | | |
|---|---|---|
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे<br><br>• उपलब्ध असलेल्या विविध वस्तूंचा, वाद्याचा वापर करून संथ व जलद तालात आवाज निर्मिती करून घ्यावी.<br><br>• स्थानिक बोलीभाषेतील जलद लयीतील गीते, ऐकावावीत. | वयोगट ५ ते ६ वर्षे<br><br>या विविध आणि जलद अशा तीन वेगवेगळया लयीत कृती करून घ्यावी.<br><br>• संथ, मध्यम, जलद अशा कृती एका मागे एक करण्यास सांगावे. उदाहरणार्थ, ठेक्याची लय क्रमाने म्हणजे संथ मध्यम जलद अशी वाढवत नेऊन त्या वेगाप्रमाणे शारीरिक हालचाली करून घ्याव्यात.<br><br>• संथ, मध्यम व जलद ठेका वाजवून त्यावर विविध गीते म्हणावयास सांगावे. उदाहरणार्थ, बडबडगीत, कृतिगीत इत्यादी. |
| **विविध** | बालकांची हजेरी घेताना हजर असे म्हणताना प्रत्येकाने एखादा आवाज काढावा व हजर म्हणावे असा खेळ घ्यावा | |

| | | |
|---|---|---|
| **थीम/विषय** | मी माझे कुटुंब, पाणी-पाऊस, वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | मुक्त संगीत निशितीसाठी बालकांना विविध वस्तू उपलब्ध करून द्याव्यात. बालकांना परिसरातील विविध वादये दाखवून त्यांचा आवाज ऐकवावा. उदाहरणार्थ, झोज, टाळ, तबला, टाळ, तबला, पखवाज, ढोलकी, सूरपेटी, ताशा, तारपा परिसरात म्हटली जाणारी लोकगीते ऐकवावीत. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गाने कलेद्वारे व्यक्त करतात.<br><br>C-12.2 संगीत, भूमिका अभिनय, नृत्य आणि विविध हालचाली यांची निर्मिती करण्यासाठी स्वतःचा आवाज, शरीर, जागा आणि विविध वस्तू यांचा चौकसपणे उपयोग करतो व खेळतो.<br><br>अ) LO 12.2.1 स्वतःच्या आवाजाचा आणि शरीराचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेतो. (टाळया, चुटक्या, पावलांचा आवाज, हाताच्या लयबद्ध हालचाली, उड्या, बडबडगीतातून शब्दोच्चार)<br><br>ब) LO 12.2.1 स्वतःचा आवाज, शरीर, वाद्य व इतर साधनांचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेताना दूत आणि संथ लय यात फरक करतो.<br><br>क) LO 12.2.1 आवाज, शरीर, वाद्य व इतर साधनांचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेताना दूत आणि संथ लय यात फरक करतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | संगीतातील ताल, लय या संकल्पना, संगीताचा आनंद घेणे आणि स्वमनोरंजन कसे करावे हे समजेल. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | संगीत लावल्यावर लय, ताल समजतो का हे शारीरिक हालचालींचे निरीक्षण करून समजून घ्यावे. | |
| **आधारशिला कृती: 83.1. Music Patterns Create Compare-High/Low Pitch, मोठा / मऊ आवाज** | | |
| **उपक्रमाचे नाव** | लयीत गाऊया | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य :** | वादध म्हणू वापरता येईल अशा विविध वस्तू | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| **कृती: बडबडगीत म्हणणे**<br><br>स्थानिक बोलीभाषेतील संथ लयीतील गीते, ऐकावावीत.<br><br>शारीरिक अवयव आणि हालचाली यांचा वापर करून आवाजावर टाळया वाजवणे, पाय आपटणे, वाकणे, डोलणे, उड्या मारणे | **कृती: बडबडगीत म्हणणे**<br><br>स्थातिक बोलीभाषेतील संथ लयीतील गीते, ऐकाबावीत.<br>शारीरिक अवयव आणि हालचाली याचा वापर करून आवाजावर टाळया वाजवणे, पाय आपटणे, वाकणे, डोलणे, उड्या मारणे अशा | **कृती: गाणी म्हणणे**<br><br>बालकांना वेगवेगळी वाक्ये स्वतःच्या आवाजात म्हणण्यास सांगावे.<br>एकच वाक्य परत परत वेगवेगळे भाव व्यक्त करत म्हणून घ्यावे.<br><br>उदाहरणार्थ, मला खाऊ दे (प्रेमाने म्हणणे हसत |

| | | |
|---|---|---|
| अशा हालचाली संथ व जलद तालात करून घ्याव्यात<br><br>उपलब्ध असलेल्या विविध वस्तूचा बाद्याचा वापर करून संथ व नतर जलद तालात आवाज निर्मिती करून घ्यावी<br><br>कृती शारीरिक हालचाली आणि आवाज<br><br>तोंडाने विविध आवाज करण्यास सागावे उदाहरणार्थ, प्राण्याचे | हालचाली सथ व जलद तालात करून घ्याव्यात.<br><br>उपलब्ध असलेल्या विविध वस्तूचा, वाद्याचा वापर करून सथ व नंतर जलद तालात आवाज निर्मिती करून घ्यावी | म्हणणे रहत म्हणणे रागाने म्हणणे इत्यादी)<br><br>बालकांना वेगवेगळी छोटी गीते स्वतःच्या आवाजात, वेगवेगळे भाव व्यक्त करत म्हणण्यास सागावे उदाहरणार्थ, ज्या गीतात<br><br>अंक अक्षरे याचा वापर आहे. अशी गीते एक लहान बोट, एक लहान बोट, टाळया वाजवा दोन<br><br>लहान बोटे, दोन लहान बोटे, टाळया बाजवा, तीन वाकणे, |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| आवाज, गाड्यांचे आवाज, आ, आ, टप टप, धपधप इतर.<br><br>शारीरिक अवयव आणि हालचाली याचा वापर करून आवाजावर टाळया वाजवणे, पाय आपटणे, वाकणे, डोलणे, उड्या मारणे अशा हालचाली तालात करून घ्याव्यात<br><br>सुरुवातीला एक हालचाल सांगावी सराव झाल्यावर हालचाली दोन, तीन अशा क्रमाने बाढवत न्याव्यात. | कृती आवाज<br><br>शारीरिक हालचाली आणि<br><br>ताईने बालकांसाठी घुंगरू काठीने ताल धरावा त्या तालावर बालकांनी पायाने ठेका वाजवावा. | लहान बोटे, तीन लहान बोटे, टाळया वाजवा, चार लहान बोटे, चार लहान बोटे, टाळया वाजवा, पाच लहान बोटे पाच लहान बोटे, टाळया वाजवा |
| **विविध** | बालकांची हजेरी घेताना हजर असे म्हणताना प्रत्येकाने एखादा आवाज काढावा व हजर म्हणावे असा खेळ घ्यावा. | |
| **थीम/विषय** | मी, मांझे कुटुंब व परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस<br>वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | 'मुक्त सगीत' निर्मितीसाठी बालकाना विविध वस्तू उपलब्ध करून द्याव्यात<br><br>बालकांना परिसरातील विविध वादचे दाखवून त्याचा आवाज ऐकवाना उदाहरणार्थ, झाज, टाळ, तबला पखवाज, ढोलकी, सूरपेटी, ताशा, तारपा परिसरात म्हटली जाणारी लोकगीते ऐकवावीत. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-12 बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात. त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गाने कलेद्वारे व्यक्त करतात.<br><br>C-12.2 संगीत, भूमिका अभिनय, नृत्य आणि विविध हालचाली यांची निर्मिती करण्यासाठी स्वतःचा आवाज, शरीर, जागा आणि विविध वस्तू यांचा चौकसपणे उपयोग करतात व खेळतात. | |

| | | |
|---|---|---|
| | ब) LO 12.2.1 स्वतःचा आवाज, शरीर, वाद्य व इतर साधनांचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेताना दूत आणि संथ लय यात फरक करतो. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | अ, ब) LO 12.2.3 आवाज, शरीर, बादध व इतर साधनांचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेताना दूत आणि सथ लय यात फरक करतो.<br><br>क) LO 12.2.1 आवाज, शरीर, वादव व इतर साधनांबरोबर खेळताना दूत, मध्यम आणि संथ लय यांच्यात फरक करतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | गाण्यातून आनंद मिळवणे व स्वमनोरंजन, भाषाविकास, भाषासमृद्धी, शब्दसंपत्तीमध्ये वाढ या सर्वांना चालना मिळेल. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | आवाजातील चढ-उतार करता येणे, त्यातील गंमत समजणे त्यावेळी आनंद घेत गाणी म्हणणे हे बालके करतात का याचे निरीक्षण करावे | |
| **आधारशिला क्रिया : ८४. रेषा ओळखा आणि तयार करा - वक्र, झिग-झॅग, सरळ रेषा** | | |
| **उपक्रमाचे नाव** | रेषाची रचना करूया | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | | |
| परिसरातील पाने, फुले, बिया, काड्या, दगड, सुतळी | माती, बिया, खेडे, काड्या, सुतळी | वेगवेगळया पोताचे, आकाराचे, रंगाचे, घनतेचे साहित्य |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| **१) कृती: रचना करूया**<br><br>ताईने बालकांना परिसरातील पाने, फुले, बिया, काड्या, दगड अशा बस्तू गोळा करून आणायला सांगव्या. जमिनीवर सरल, वक्राकार किंवा झिकझेंक रेषा काढाव्यात व त्यावर पाने, फुले, बिया, काड्या, दगड बस्तू वापरून रचना करायला सांगावी.<br><br>बालकांच्या केलेल्या रचना बघाव्यात. ताईने बालकांना योग्य तिथे मदत करावी, बालकाला मातीत, वाळूत पायाने, हाताने, बोटाने, काठीने, काटकीने वेगवेगळया आकाराच्या आणि लांबीच्या रेघोट्या मारावयास सांगावे. 'तू काय काढले आहेस?' हे. विचारावे. | **१) कृती रचना करूया शेव**<br><br>काड्या, सुतळी अशा वस्तु व्याख्यादर्शक गप्पा अल्झरल, वक्राकार झिकझंक रेषा तयार ठेवी सावता<br><br>• जमिनीवर विविध प्रकारच्या रेघा काढाव्यात व त्यावरून बालकांना चालायला व उड्या मारत जायला सांगावे<br><br>**२) कृती : चिकटकाम**<br><br>रंगीत कागदाचे छोटे तुकडे बालकांना वाटावेत त्याचे चुरगळून छोटे छोटे बोळे करण्यास सांगावे. त्या बोळयानी विविध रेषा तयार करण्यास सांगातील, | **• ३ ते ४ व ४ ते ५ वर्षे वयोगटाच्या कृती घ्याव्यात.**<br><br>ताईने बालकांना वेगवेगळया वाकड्यातिकड्या रेषा असलेला कागद द्याबा, बालकांनी त्या रेषा आकारातून चित्र काढायचे आहे. बालकांना काही ठिकाणी मदत लागल्यास करावी.<br><br>ताईने बालकांना सुतळी, चौकोनी आकाराचा एक-एक पुठ्ठा दयावा बालकांनी पुठ्ठा घेऊन त्याबर डिक लाऊन रेषा उभ्या, आडव्या वेगवेगळया रेषा तयार कराव्या व त्या रेषांवर डिंक सुतळी चिकटवावी. याप्रमाणे सर्व बालकांची ही कृती करून घ्यावी |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| **२) कृती : चिकटकाम**<br><br>कागदावर सरळ, बक्राकार किंवा झिकझेंक रेषा काढाव्यात वेगवेगळ्या आकाराच्या आणि रंगाच्या टिकल्या चिकटवयाला सांगावे. पुठ्ठ्याच्या २ x १० इच आकाराच्या पट्ट्या कापून घ्याव्यात. त्यावर वर दिलेल्या आकारामध्ये सुतळी किंवा जाड दोरी चिकटवावी. बालकाना त्या सुतळीच्या आकारावर बोटे फिरवण्यास सांगावे. | | |

| | |
|---|---|
| **विविध** | का, बिया, झाकण, फुल, पान, बांगड्या, दगड |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुब व परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, |
| **ताईसाठी सूचना** | ताईने यासदर्भात अधिक संदर्भासाठी उपलब्ध वयोगटनिहाय कार्यपुस्तिका वापराबी |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-12 बालकेद्र दृकुणे आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि पथ संवेदनशीलता विकसित करतात. आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि णि आनंददायक मार्गाने कलेद्वारे व्यक्त करतात.<br><br>C-12.1 संबंध आकशिच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो.<br><br>अ) LO 12.1.1 योग्य कलासाहित्य साधने आणि उपकरणे हाताळतो, क) LO 12.1.1 साहित्य आणि साधने वापरताना विविध प्रकारांनी पकडतो आणि हाताळतो. (उदाहरणार्थ, काड्या, बिया, खडे, दगड, खडू, दोरा, पेन्सिल, ब्रश, भुकटी, कात्री इत्यादी) |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्य** | सूक्ष्म स्नायू विकास हस्त-नेत्र समन्वय, सौंदर्यदृष्टीचा विकास, सर्जनशीलता, साध्य होण्यास मदत होईल. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | सूक्ष्म स्नायूंचा वापर कसा होतोय, वेगळ्या कल्पना सूचत आहेत का याचे निरीक्षण करावे |

| **आधारशिला कृती : 85 Fun with Patterns: Create Art/Craft/Beading/ Body-Movement Patterns** | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाब** | आकारावर बिया, पाने, फुले लावू |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** बिया, पाने, फुले, बागडीच्या काचा, काड्या, खडे | |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| बालकांना मोठा सोपा आकार जमिनीवर काढून दयावा. उदाहरणार्थ, चेंडू, हसरा चेहरा इत्यादी.<br><br>या आकारावर बिया, पाने, फुले, बांगडीच्या काचा लावायला दयाव्यात.<br><br>बालकांना स्वतः बिया, काचा, खडे यांनी आकार बनवायला सांगावे.<br><br>कोणता आकार बनवला त्याबाबत बोलण्यास प्रोत्साहन दयावे. | बालकांना रांगोळी सारखे चित्र जमिनीवर काढून दयावे. उदाहरणार्थ, ५ पाकळयांचे फूल<br><br>या आकारात आणि रेषेवर बिया, काड्या, खडे लावण्यास सांगावे. १ ३<br><br>अशाप्रकारे बिया, काड्या, दगड यांनी आकार बनवण्यास सांगावे.<br><br>कोणता आकार बनवला त्याबाबत बोलण्यास प्रोत्साहन दयावे. | बालकांना परिसरात नेऊन जोडीजोडीने तेथे पडलेल्या गोष्टी (पाने, फुले, रंगीत दगड, काड्या, बिया इत्यादी.) गोळा करून आणण्यास सांगावे.<br><br>आलेल्या वस्तूंपासून वर्ग सजावटीसाठी जोडी जोडीने रचना करण्यास सांगावी.<br><br>फुला-पानांचे तोरण, दगडाची, बियाण्यांची रांगोळी इत्यादी. वर्ग सजावट करताना उंचावरील वस्तू मागणे, तोरण बांधणे इत्यादींसाठी मावशी, काका यांची मदत घेण्यास सांगावे. |
| **विविध** | वर्तुळ, त्रिकोण, चौकोन, झाडाचे चित्र, फुलाचे चित्र | |
| **थीम/विषय** | वनस्पती (फुले, शेती, रंग), वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | ताईने यासंदर्भात अधिक संदर्भासाठी उपलब्ध वयोगटनिहाय कार्यपुत्तिका वापरावी. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकाची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br><br>C-8.2 आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्यातील साधे आकृतिबंध ओळखतो आणि त्यांचा विस्तार करतो.<br><br>अ) LO 8.2.1.1 आकृतिबंध ओळखतो. आकार, पाने, फुले यांचा जोड्यामधील पुनरावृत्तीनुसार आकृतिबंध तयार करतात. (पान-फूल, पान-फूल, अ-ब, अ-ब, अ-ब)<br><br>नवीन आकृतिबंध स्वतः तयार करतो.<br><br>CG-12 बालके दृक् आणि ललित कलामध्ये आपली क्षमता आणि<br><br>क) LO 8.2.1 रंग, आकार, आकार, माप या विविध वैशिष्ट्यानुसार | |
| | संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br><br>C-12.1 विविध आकाराच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (2D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो.<br><br>अ) LO 12.1.1 योग्य कलासाहित्य साधने आणि उपकरणे हाताळतो.<br><br>अ) LO 12.1.2 दृश्य कलाकृतींमध्ये ठसे, रेघा, आणि इतर ट्विमितीय आणि त्रिमितीय | |

| | | |
|---|---|---|
| | प्रतिमा तयार करताना लहान व मोठे आकार शोधतो.<br><br>ब-क) LO 12.1.1 साहित्य आणि साधने वापरताना विविध प्रकारानी पकडतो आणि हाताळतो. (उदाहरणार्थ, काड्धा, बिया, बड़े, दगड, खडू, दोरा, पेन्सिल, ब्रश, भुकटी, कात्री, इत्यादी.)<br><br>ब-क) LO.12.1.2 समवयस्क, सुलमक आणि स्थानिक समुदायाच्या सहभागाने मोठ्या स्वरूपाची कामे करतो. (उदाहरणार्थ,<br><br>जमिनीवरील रांगोळी, भित्तीचित्रे, शिल्पकृती), | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्य** | आकाराची सकल्पना स्पष्ट होणे, सूक्ष्मस्नायू विकास, हस्त नेत्र समन्वय<br><br>सौदर्यदृष्टीचा विकास, सर्जनशीलता साध्य होण्यास मदत होईल. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | आकार सकल्पना, आकार ओळखता येतात का याचे निरीक्षण करावे. | |
| **आधारशिला कृती: 86 Floor Art: Rangoli (Shapes, Pattern and more)** | | |
| **उपक्रमाचे नाव** | रागोळी काढूया | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य :** विविध रंगाच्या रागोळया, छोट्या प्लास्टिक बॉटल | | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| ताईने बालकांना प्लास्टिकच्या छोट्या बाटल्यांमध्ये रंगीत रांगोळी भरून दयावी. बाटलीच्या झाकणाला भोक पाडलेले असावे. खाली वर्तमानपत्राचा कागद अंथरून दद्यावा, त्यावर बाटली उलटी करून रांगोळी काढण्यास सागाव. | ताईने प्रथम ३-३ बालकांचे गट करून घ्यावे. या गटात रांगोळी दयावी, गटातील बालकांना मिळून पाच बोटांनी रांगोळी काढायला सांगावी. बालकांना येईल तशी रांगोळी काढून क्यावी. | ताईने बालकांना रांगोळी भरण्यासाठी जमिनीवर चित्र काढून दयावे. पाच बोटांनी रांगोळी भरायला सांगावे. प्रत्येक बालकाला एक-एक चित्र काढून दयावे. रांगोळीत रंग भरण्यासाठी वाटीत ६ ते ७ रंग दयावेत, एक रंग भरून झाल्यावर दुसरा रंग घ्यावा ही सूचना दयावी. बालक जसे रंग भरतील तसे मान्य करावे, |

| | |
|---|---|
| **विविध** | वेगवेगळे चित्र काढून दयावे त्यात रांगोळी भरायला दयावी. मुक्त रागोळी हाताने घालायला दधावी |
| **थीम/विषय** | मी माझे कुटुंब, पाणी पाऊस, वनस्पती (फुले, शेती, रंग), |
| **ताईसाठी सूचना** | ताईने यासदर्भातील वयोगट निहाय कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. वयोगट ३ ते ४ वर्षे साठी ताईने आकारावर डिक लावून दयावा दिव्यांग बचुकानादेखील आवश्यक मदत करावी |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-12 बालके दृक् आणि ललित कलामध्ये आपली क्षमता आणि सवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. |

| | |
|---|---|
| | CG-12.1 विविध आकाराच्या द्विमितीय (21)) आणि त्रिमितीय (2D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो.<br><br>अ) LO 12.1.2 दृश्य कलाकृतींमध्ये ठसे, रेघा, आणि इतर विमितीय आणि त्रिमितीय प्रतिमा तयार करताना लहान व मोठे आकार शोधतो<br><br>ब-क) 10.12.1.2 समवयस्क, सुलभक आणि स्थानिक समुदायाच्या सहवागले मोठ्या वरूपाची कामे करतो. (उदाहरणार्थ, जुमिनीवरील रांगोळी, भित्तीचित्रे, शिल्पकृती) |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्य** | स्नायू विकास होटाने चिमटीने रागोळी घालता येणे |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | स्नायू विकास, बोटाने, चिमटीने रांगोळी घालता येते का हे बधावे. |

**आधारशिला कृती : 87 Let's Create: Common Spaces in Neighbourhood**

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | प्रतिकृती बनवूया |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य :** | कागद, तेलीखडू, कार्डबोर्ड, कात्री, डिंक |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे.<br><br>अंगणवाडीत येताना काय काय दिसते यावर चर्चा करावी.<br><br>बालकांना त्यांच्या शेजारची सामान्य ठिकाणे ओळखण्यास आणि त्यांची नावे देण्यास मदत | ताईने बालकांना लागणारे हस्तकलेचे साहित्य दयावे. उदाहरणार्थ, कागद, तेलीखडू, कार्डबोर्ड, कात्री, डिंक वापरून शेजारच्या जागेची साधी चित्रे किंवा मॉडेल्स तयार करण्यात बालकांना मदत करावी. | ताईने बालकांना लागणारे हस्तकलेचे साहित्य दयावे. (उदाहरणार्थ, कागद, तेलीखडू, कार्डबोर्ड, कात्री, डिंक) बालकांना विविध प्रकारच्या हस्तकला साहित्याचा वापर करून शेजारच्या अंगणवाडीच्या |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| करावी. (उदाहरणार्थ, घरे, उदयाने, शाळा, खेळाची मैदाने).<br><br>बालकांना अंगणवाडीत येताना ते दररोज पाहत असलेल्या वेगवेगळया ठिकाणांची सकल्पना समजण्यास मदत करावी. उदाहरणार्थ, तुम्ही जाताना/येताना तुम्हाला काय दिसते ते सांगावे. | बालकांना त्यांच्या परिसरात काय काय दिसते ते विचारावे. उदाहरणार्थ, तुम्हाला खेळाच्या मैदानाबद्दल काय आवडते ? बागेच्या जवळ काय काय दिसतें. त्याप्रमाणे चित्र किंवा मॉडेल्स तयार करायला सांगावे. | जागेचे अधिक तपशीलवार मॉडेल तयार करण्यासाठी मदत करा. उदाहरणार्थ, मातीची घरे, घरापुढील झाडे, वस्तू इत्यादींचा शोध घेत असताना सर्जनशीलता आणि कल्पनाशक्ती वाढवा. त्यांना मॉडेल्स करताना अजून काय काय घालता येईल यासाठी मदत करावी. |

| | |
|---|---|
| **विविध** | बालकांना कृतीचे व कल्पकतेचे स्वातंत्र्य देऊन या कृतीत विविधता आणता येईल. बाजारात उपलब्ध असलेली वेगवेगळी माध्यमे वापरून या कृतीत विविधता आणता येईल. |
| **थीम/विषय** | भी माझे कुटुब प्राणी (पाळीव व जंगलातील), वाहन |

| | |
|---|---|
| **ताईसाठी सूचना** | धारदार वस्तू तोईन स्वत च्यो निगराणीमध्ये बालकांना वापरण्यास दद्याव्यात ताईने यासंदर्भात अधिक संदर्भासाठी उपलब्ध वयोगटनिहाय कार्यपुस्तिका वापरावी व त्यानुसार कृती करून घ्याव्यात. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-12 चलतेष्ट्र दृवणे आणि ललितकलामध्ये आपली क्षमता आणि सवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण पथ बाणि आजदायक भागांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br><br>C-12.1 विविधा आक्रमणाच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (211) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतात.<br><br>अ) LO 12.1.1 ब-क) LO 12.1.1 योग्य कलासाहित्य साधने आणि उपकरणे हाताळतो. साहित्य आणि साधने वापरताना, विविध प्रकारांनी पकडतो आणि हाताळतो (उदा. काड्या, बिया, खडे, दगड, खड्डू, दोरा, पेन्सिल, ब्रश, भुकटी, कात्री इ.) |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | कलाकृती तयार करण्यासाठी लागणारे साहित्य हाताळण्याचे कौशल्य विकसित होते. साहित्य मिसळण्याचे योग्य प्रमाण बालकांना कळते. हात आणि मेंदू याचा समन्वय साधता येतो. सुलभकाच्या सूचनांचे अनुपालन करण्याची क्षमता विकसित होते. गटकार्याची उपयुक्तता लक्षात येते. सहकार्य व समन्वय साधण्याची क्षमता विकसित होते. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकाच्या गटात कार्य करण्याच्या वर्तनाचे निरीक्षण करावे. गटाच्या सुलभक, समन्वयक यांच्या सूचनाकडे किती लक्ष देतो याचे निरीक्षण करावे. स्वतःहून काही वेगळे करतो का याचे निरीक्षण करावे. सहकार्य, समन्वय व साहचर्य याचे निरीक्षण नोंदवावे. बालवाटिका २ पेक्षा बालक बालवाटिका ३ मध्ये जास्त आत्मविश्वासाने गोष्टी हाताळते का? |

**आधारशिला कृती: 88 Festivals Celebrate and Learn / Appreciate Diversity (covered in other activities)**

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | सण साजरे करूया | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** विविध धर्माच्या सणांचे चित्रकार्ड | | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| ताईने संबंधित आठवड्यात येणाऱ्या सण आणि उत्सव याचे नियोजन करावे. सणाच्या आधीच्या दिवशी बालकांना परिपाठात सबंधित सण व उत्सव याची माहिती सांगावी. आवश्यकतेनुसार संबंधित सणासंदर्भातील खादद्यपदार्थ आणण्याविषयी तसेच आनुषंगिक वेशभूषा करून येण्यासंदर्भात बालकांना अवगत करावे. | | |
| **विविध** | शाळेत काही सणांचे छोट्या स्वरूपात आयोजन करता येईल. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू प्राणी (पाळीव व जूगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | | |

| | |
|---|---|
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता<br>अध्ययन निष्पत्ती** | CG-12 राष्ट्र दृकुणे आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण कलेद्वारे व्यक्त करतात.<br><br>3-12 मा प्रेम माध्यमातून स्वतःच्या कल्पना आणि भावना व्यक्त करण्यासाठी सर्जनशीलता व कल्पकतेने काम करतो.<br><br>अ) LO-12.3.1 परिसरातील स्थानिक सस्कृती आणि कलेचे नमुने यांचे निरीक्षण करतो आणि त्यांचा सहसंबंध जोड़तात.<br><br>ब) LO-12.3.1 कलेच्या माध्यमातून स्वतःच्या कल्पना साधने आणि कार्यपद्धती यांची देवाण-घेवाण करतो व परिचित उदाहरणातून सुधारणा करतात.<br><br>क) LO-12.3.1 कलेच्या माध्यमातून विविध अभिव्यक्ती कल्पना व भावना लक्षात घेतो व त्यांचा अर्थ लावतो तसेच स्वतःच्या कलात्मक आविष्कारांमध्ये या बाबींचा उपयोग करतात |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्य** | सामाजिक भावनिक विकास, सांस्कृतिक एकात्मता |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकांच्या सहभागाचे तसेच चित्रातील त्यांच्या सर्जनशीलतेचे निरीक्षण करावे. |

| **आधारशिला कृती : 89. वर्गाचे नियम पोस्टर/भिंत बनवणे** | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | नियम तयार करू | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | सूचनांचे चित्र कार्ड, सूचना पट्ट्या/फलक | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • वर्गात पाळायच्या नियमाबाबत बालकांशी चर्चा करावी.<br><br>शाळेत आल्यानंतर प्रत्येक वेळी वागताना आवश्यक तेथे दिसतील अशी सूचनांची चित्रे लावून ठेवावी.<br><br>• बालकांना वेळोवेळी या सूचना दाखवाव्या.<br><br>• सूचनांचे पालन करण्यास सांगावे.<br><br>• ताईंनी स्वतःच्या कृतीतून वर्गासाठीचे नियम लक्षात आणून दयावे. उदाहरणार्थ, जसे चप्पल रांगेत ठेवणे. डब्याची पिशवी जागेवर ठेवणे, पाण्याची बाटली जागेवर | • बालकांसोबत वर्गातील नियम तयार करून घ्यावे. उदाहरणार्थ वर्गकार्य करतांना कसे बसावे? हात धुतांना रांगा कशा कराव्यात याप्रमाणे त्या प्रसंगी बालकांना सूचना द्याव्या.<br><br>• सूचनेनुसार बालकांकडून नियमांचे पालन करून घ्यावे. यावेळी बालकांना मदत लागल्यास ती करावी. नियमांचे पालन का करावे? याविषयी चर्चा करावी.<br><br>• सुरुवातीला बालकांना सूचना द्याव्यात त्यानंतर शिव त्यांना स्वतःहून नियम पाळण्याची संधी दयावी. | • सूचना फलक बालकांसाठी सोप्या सूचनांचे फलक तयार करावे.<br><br>> हात धुवा<br><br>> खेळणी आवरा<br><br>> डबे उघडा<br><br>> पुस्तक वाचा<br><br>> दार लावा<br><br>> सतरंजीची घडी करा.<br><br>• या सूचना फलकांवर प्रत्येक सूचनेबरोबर |

| | | |
|---|---|---|
| ठेवणे.<br><br>• बालकांना त्याप्रमाणे कृती करण्यास सांगावे. घरात मोठी व्यक्ती पाळत असलेल्या नियमांवर चर्चा करावी. जसे बाहेरून आल्यावर हात पाय धुणे. | | एक योग्य चित्र लावावे.<br><br>सूचना वाचून दाखवा चित्र बघण्यास सागा आणि ठिकठिकाणी हे फलक वर्गात लावून ठेवा ते वाचून सूचनांचे पालन करण्यास शिकवावे.<br>कृती :वर्गाबाहेरचे नियम<br><br>• ताईंनी वर्गस्तरावर उपक्रम आयोजित करताना त्यासाठी बालकांच्या मदतीने नियम तयार करून घ्यावे.<br><br>• जसे : नेचर वॉक (परिसरात<br><br>फेरफटका) हा उपक्रम आयोजित करताना कसे जावे, जेणे करून इतरांना त्रास होणार नाही. दोन दोनच्या रांगेत चालत गेल्यास इतरांना बघताना मदत होईल. याप्रमाणे नियम पळताना इतरांना |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| | | मदत व्हावी याकरिता काही बालकांना सहभागी करून घेता येईल. जसे लहान बालवाटिकेच्या बालकांचे रांगेत चालताना मोठ्यांनी बालकांनी हात पकडणे. आजूबाजूला असणाऱ्या पक्षी, प्राणी यांना पाणी ठेवण्यास सांगावे. उरलेले, सांडलेले अन्न त्यांना देण्यास सांगावे. झाडांना पाणी घालणे यासारख्या कृती करण्यास प्रोत्साहन दयावे. चांगले काम करणाऱ्या गटाचे सर्वांसमोर कौतुक करावे वर्गातील बालकाने जर जेवणाचा डबा आणला नसेल तर त्याला इतर बालकांनी त्यांच्या डब्यातील एक एक घास दयावा. हे ताईने बालकाना सांगावे |
| **वितरित** | वर्गातील जियांना सारखे इतर कुठे नियम असतात? ते काय असतात याबाबत चर्चा करावी | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब | |
| **ताईसाठी सूचना** | सूचना फलक तयार करताना मराठी सोबतच इंग्रजी भाषेतील सूचनादेखील समाविष्ट कराव्यात. यासाठी कार्यपुस्तिकेचा संदर्भ घ्यावा | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता ब अध्ययन निष्पत्ती** | CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br><br>C-4.5 शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन | |

| | |
|---|---|
| | करतात.<br><br>अ) LO-4.5.2 शिक्षकांच्या मदतीने साध्या सूचनांचे पालन करतो.<br><br>ब) LO-4.5.2 साध्या लहान सूचनांचे पालन करतो.<br><br>क) LO-4.5.2 शाळेत मोठ्यांनी आठवण करून दिल्याशिवायही साध्या नियमांचे पालन करतो.<br><br>CG-13 बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात. यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते. |

| | | |
|---|---|---|
| | C-13.4 वर्गखोली नियामके मनःपूर्वक व समजपूर्वक नियामके स्वीकारतो आणि पालन करतो.<br><br>अ) LO-13.4.1 वर्गातील नियमकांसाठी प्रौढ व्यक्तींच्या वर्तनाचे निरीक्षण व अनुकरण करतो.<br><br>ब) LO-13.4.1 ताईंनी दिलेल्या संकेतानुसार वर्गातील नियम पाळतो.<br><br>क) LO-13.4.1.1 वर्गातील नियम पाळतो व इतरांना पाळण्यास मदत करतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्य** | श्रवण कौशल्य विकसित होते, निरीक्षण शक्ती विकसित होते. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | सूचनांचे पालन करता येते का, एकावेळी किती सूचना समजतात. | |
| **आधारशिला कृती : 90. Wrap It Up: Shapes, Boxes, and Decorations** | | |
| **उपक्रमाचे नाव** | वस्तू गुंडाळणे | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | वर्तमानपत्राची रद्दी, वर्गात किंवा नेहमीच्या वापरातील निरनिराळ्या वस्तू | |
| • बालकांना वर्गातील छोट्या वस्तू दयाव्यात. उदाहरणार्थ, एखादे खेळणे, छोटा बॉक्स, पेन्सिल, छोटी डबी इत्यादी<br><br>• बालकांना आकाराबाबत त्या प्रोत्साहित करावे. राज वस्तूंच्या बोलण्यास<br><br>• या वेगवेगळया वस्तूंना वर्तमानपत्राचे वेष्टन घालण्यास सांगावे.<br><br>• वेष्टन घातलेल्या ओळखण्यास सांगावे. वस्तू | • बालकांना मध्यम आकाराच्या वस्तू दयाव्यात. उदाहरणार्थ चेंडू, बॉक्स, कोणाच्या आकारातील टोपी बालकांना त्या वस्तूंच्या आकाराबाबत बोलण्यास प्रोत्साहित करावे.<br><br>• या थत्वेगवेगळया कल वस्तूंना वर्तमानपत्राचे वेष्टन घालण्यास सांगावे. कोणत्या वस्तूला वेष्टन घालणे सोपे किंवा अवघड होते, हे विचारावे. | • ४ ते ५ वर्षे वयोगटाची कृती घ्यावी. वेष्टन घातलेले काढायला सांगावे.<br><br>• वस्तूंना घातलेले वेष्टन काढायला सांगणे.<br><br>• कोणत्या वस्तूला वेष्टनासाठी कमी कागद लागला? कोणत्या वस्तूला जास्त लागला ? याबाबत निरीक्षण करण्यास सांगावे. |

| | | |
|---|---|---|
| • वेष्टन काढून आतील वस्तू बरोबर ओळखली का ते पाहावे. | | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| **विविध** | वेगवेगळया वस्तूंना वेष्टन घालण्यास सांगावे. उदाहरणार्थ, मित्र-मैत्रिणीसाठी काही भेटवस्तू दयायची असेल त्या वस्तू, घरातील कोणाला भेट दयायची असेल त्या वस्तू | |
| **थीम/विषय** | मी माझे कुटुंब, वनस्पती (फुले, शेती, रंग), वाहन | |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| **ताईसाठी सूचना** | ताईने भेटवस्तूची वेष्टने, रंगीत कागद, खाकी कागद, वर्तमानपत्र, प्लास्टिक कागद इत्यादी संग्रहित करून या कृतीसाठी वापरावे. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-3 सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते.<br><br>C-3.3 हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवतो.<br><br>अ) LO-3.3.1 साध्या कृतीमध्ये सूक्ष्म स्नायू विकास हस्त-नेत्र समन्वय आणि स्नायूंमधील बळकटपणा दर्शवितो. (उदाहरणार्थ, गिरगिटणे, कागद फाडणे, चिकटवणे, मुक्तपणे रंगविणे, मातीकाम)<br><br>ब) LO- 3.3.1 ज्या कृती करताना सूक्ष्म स्नायूंचा वापर केला जातो, तसेच हस्त नेत्र समन्वयात काही प्रमाणात अचूकता लागते अशा कृती करताना स्नायूंवर नियंत्रण दर्शवतो. (उदाहरणार्थ, मोठे आकार कापणे, मोठे मणी ओवणे, बटण लावणे, स्क्रू लावणे, बाटलीचे झाकण लावणे, उघडणे, क्रेयॉन्सचा वापर करून चित्र काढणे.)<br><br>क) LO-3.3.1ध जास्त अचूकता लागणाऱ्या कृती सूक्ष्म स्नायूंच्या समुच्त्वयाने थोड्या मदतीसह करतो. (उदाहरणार्थ, पेन्सिलने चित्र काढणे, सरळ रेषेवर किंवा वक्र रेषेवर कापणे, छोटे मणी ओवणे.)<br><br>CG-12 बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br><br>C-12.1 विविध आकाराच्या द्विमितीय 2D आणि त्रिमितीय 2D कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो.<br><br>अ) LO- 12.1.1 दृश्य कलाकृतींमध्ये ठसे, रेषा आणि इतर द्विमितीय व त्रिमितीय प्रतिमा तयार करताना लहान व मोठे आकार<br>शोधतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | वेष्टनातील वस्तूच्या आकारावरून व आकारमानावरून वस्तू ओळखता येणे म्हणजेच | |

| | | |
|---|---|---|
| | निरीक्षण कौशल्य | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | वस्तू बरोबर ओळखली का, वस्तूचे वर्णन करताना सांगता येते का, की वस्तू कशावरून ओळखली. | |
| **आधारशिला कृती : ९१. स्वतःचे यमक/गाणे बनवा (अपेक्षित क्रियाकलाप कुठेही समाविष्ट केलेले नाहीत)** | | |
| **उपक्रमाचे नाव** | माझे गाणे | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य :** | | |
| • साभिनय छोट्या बडबडगीतांचे गायन घ्यावे. यमक असणाऱ्या शब्दांवर जोर दयावा. बालकांना सुरुवातीला मागे म्हणायला लावून नंतर सोबत गायनसराव घ्यावा.<br><br>**गाणी १ : डाळिंब**<br><br>डाळिंब असते लाल लाल सफरचंदाचे तर गुलाबी गाल आंबा हा तर फळांचा राजा मला आवडतो पेरू ताजा<br><br>राज<br><br>**गाणी २ : जेवण**<br><br>पीठ चाळा सरसर कणीक भिजवा भर भाजी कर चमचमीत दशमी कर खुसखुशीत कोशिंबीर कर चटकन जे टाकून पटकन | **कृती :**<br><br>• ताईने एक कोणतेही ओळखीचे छोटे बडबडगीत म्हणावे व त्याच चालीत स्वतःचे काही शब्द गुंफून गाणे तयार करून दाखवणे.<br><br>उदाहरणार्थ,<br><br>चिऊताई चिऊताई येऊ का घरात येरे बाबा कावळे दादा लवकर ये घरात घर माझे शेणाचे पावसाने पाडले घर तुझे मेणाचे छान छान राहिले<br><br>**• नवीन शब्द घालून कविता :**<br><br>१२ चिमणी आणि पोपट एकदा झाडावर भेटले पणे पावसामुळे ामुळे दोघे होते खूप खूप भिजले पोपट म्हणे चिऊताई घर माझे खूप लांब चिऊ म्हणे पोपटाला घरी माझ्या थांब चिऊ म्हणे पोपटाला घरी घर माझे आहे त्या फळांच्या झाडावरी पाऊस थांबेल तेव्हा जा तू तुझ्या घरी दोघे भुर्रकन उडाले फळांच्या झाडावर जाऊन बसले खूप फळे पाहून पोपटदादा आनंदले पाऊस थांबल्यावर उडून गेले<br><br>• सर्व बालकांनी मिळून केलेली कविता कशी असू शकेल :<br><br>चिऊताईच्या घरी एकदा कावळेदादा आले<br>चल दोघे चहा पिऊ, चिऊला म्हणाले झाडावर बसले काव काव ओरडले | |
| | चिऊ म्हणाली आवाज नको करू बाळ माझे झोपले बाळ माझे उठल्यावर देईन तुला चहा आत्ता तू कोपऱ्यामध्ये जाऊन बस जरा बोलू नको ओरडू नको नाहीतर रागवेन तुला - मनीषा अष्टपुत्रे. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| **विविध** | अ) ५ ते ६ वर्षे वयोगटासाठी यमक जुळवून एकेक ओळ सांगायला लावणे.<br><br>ब) कवितेच्या ठेक्यात बोलायचा एक दिवस ठेवणे | |

| | |
|---|---|
| **थीम/विषय** | भाज्या व फळे, प्राणी (पाळीव व जंगलातील), मदतनीस वाहन |
| **ताईसाठी सूचना** | ताईने शब्द दयावेत शब्द गुंफण्यास मदत करावी. बालकांना शब्द देण्यास सांगावे. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-9 बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्य विकसित करतात.<br><br>C-9.1 साधी गाणी, बडबडगीते आणि कविता ऐकतो आणि आवड व्यक्त करतो<br><br>अ) LO-9.1.1 विविध प्रकारची गाणी आणि कविता ऐकतो.<br><br>ब) LO-9.1.2 साधे गाणे, बडबडगीते ऐकून म्हणतो.<br><br>क) 0-9.1.1 हावभाव व आवाजातील चढउतारासह गाणी म्हणतो.<br><br>C-9.2 स्वतःहून साधी गाणी आणि कविता तयार करतो.<br><br>अ) LO- 9.2.1 परिचित गाणी आणि कवितांचा आनंद घेतो.<br><br>ब) LO-9.2.1 गाणी आणि कवितांमधला यमकबद्ध शब्दांचा आनंद घेतो.<br><br>क) LO-9.2.1 परिचित कवितांमधील यमक असलेला शब्द ओळखतात. आणि यमक असलेले नवीन शब्द तयार करतो. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | श्रवण आकलन, स्मरण कौशल्य विकसित होणे. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | श्रवण आकलन, स्मरण कौशल्य यांचा वापर करतो का? आधीचे बडबडगीते म्हणता येतात का याचे निरीक्षण करावे. |

| **आधारशिला कृती : 92. Craft and Creativity: पेपर-मचे आर्ट आणि ऑब्जेक्ट्स तयार करा (क्रियाकलाप इतरत्र समाविष्ट केले आहेत)** | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | कागदी लगद्याच्या वस्तू बनवूया | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | कागदी लगदा, साचे करण्यासाठी वस्तू, जसे-पेला, वाटी, रंगविण्यासाठी रंग व रंगाचे ब्रश. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| **कृती : कागदी लगद्याचे काय करता येईल?**<br><br>• ताईने तयार केलेला कागदाचा लगदा बालकांना थोडा थोडा दयावा हाताला कसा लागतोय याचे काय करता येईल ते करा या | **कृती : कागदी लगद्याचे काय करता येईल ?**<br><br>• ताईने कागदी लगदा बालकांना वाटावा आणि त्यांच्या रोजच्या खेळण्यातील जोड | **कृती: कागदी लगद्याचे काय करता येईल ?**<br><br>• ताईने बालकांना कागदी लगदा तयार करण्याच्या पूर्ण प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे यासाठी साधारण तीन दिवस |

| | | |
|---|---|---|
| पद्धतीने खेळू दयावे.) | तोड खेळण्याचे वेगवेगळे भाग बालकांना देऊन त्याचे छाप कागदी लगदा उठवायला सांगावेत.<br><br>ज्ञानस्व तु साफल्यम्<br><br>• उठवलेला छाप दुसऱ्या दिवशी रंगवायला दयावा. прате | लागतात.<br><br>• यामध्ये आठवड्यातील पहिल्या दिवशी वर्तमानपत्राच्या कागदाचे एकदम बारीक तुकडे करण्याचे फाडकाम दयावे. ते सर्व तुकडे बद, पाण्यात भिजत घालावेत.<br><br>• तीन दिवसांनी तुकडे छान भिजलेले असतील. त्यादिवशी ते सर्व तुकडे बाहेर काढून कुटायचे काम दयायचे, हाताने कुस्करायचे काम दयायचे. बालकांचे करून झाले की ताईने स्वतः तो लगदा एकदम मातीसारखा बारीक करायचा. वाळता कामा नये<br><br>• दुसऱ्या दिवशी त्यात थोडा डिंक किंवा खळ घालावी व त्याचा छान गोळा करून तो बालकांना वाटावा. त्याच्यापासून वस्तू तयार करण्यास सांगावे. |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |

| | |
|---|---|
| | • वस्तू वाळल्यावर रंगकाम ही कृती नियोजित करावी आणि त्याच वस्तू रंगवण्यास द्याव्या. |
| **वितरित** | अ) कागदाच्या लगद्यापासून टोपल्या वाट्या अशा वस्तू तयार करण्यास देता येतील त्यासाठी प्लास्टिकच्या छोट्या टोपल्या, वाट्या याला बाहेरून लगदा चिकटवून वाळल्यावर तो आकार मिळतो.<br><br>ब) फुगवलेल्या फुग्यावर बाहेरून लगदा चिकटवून वाळल्यावर आतला फुगा टाचणीने फोडून टाकायचा आणि त्या फुग्याच्या आकारावर चेहरा रंगवायचा. |
| **थीम/विषय** | मी माझे कुटुंब, पाणी-पाऊस, वनस्पती (फुले, शेती, रंग), पक्षी व कीटक, मदतनीस |
| **ताईसाठी सूचना** | ताईने या कृतीसाठी पटसंख्या पटसंख्य विचारात घेऊन बालकांच्या मदतीने पुरेसा कागदी लगदा तयार करून ठेवावा. यासाठी उपलब्ध कार्यपुस्तिकेचा संदर्भ घ्यावा. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व**<br><br>**अध्ययन निष्पत्ती** | C-12 बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br><br>12.1 विविध आकाराच्या दिवमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) C-12.1 कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो.<br><br>अ) LO-12.1.2 दृश्य कलाकृतींमध्ये ठसे, रेघा आणि इतर द्विमितीय व त्रिमितीय प्रतिमा |

| | | |
|---|---|---|
| | तयार करताना लहान व मोठे आकार शोधतात.<br><br>अ) LO- 12.1.3 साहित्य एकत्रित मिसळून छाप व आकृती तयार करतात (उदाहरणार्थ, माती आणि पाणी, वाळू आणि पाणी, पीठ आणि पाणी, रंग आणि पाणी.)<br><br>ब व क) LO- 12.1.3 माती आणि कणिक यांसारखे साहित्य थापून किंवा बळकटी करून त्रिमितीय आकार तयार करतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | स्पर्श, अवधान कक्षा, एकाग्रता, सूक्ष्म स्नायू कौशल्य, हस्त-नेत्र समन्वय, सौंदर्यदृष्टी विकसित होते. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | नवीन प्रकारचे माध्यम हाताळताना नकारात्मक आहे का सकारात्मक आहे. | |
| **आधारशिला कृती : 93. Draw What You See: Perspective Based Drawing** | | |
| **उपक्रमाचे नाव** | रेषा व आकार शोधूया. | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | पाने, फुले, बिया, कागद, पेन्सिल, दगड, चित्रे, चार्ट, नेहमीच्या वापरातील लहान भांडी, साबणाची, औषधांच्या बाटल्यांचे छोटे डबे, लहान खोके इत्यादी. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • बालकांना बघितलेल्या प्रथम त्यांनी अवतीभोवतीच्या वस्तूंची नावे विचारावी.<br><br>• सध्या भोवताली दिसणाऱ्या वस्तू जवळ आणण्यासाठी सांगावे. या वस्तूंची नावे विचारावी.<br><br>• या वस्तूंचे आकार कसे आहेत ते बालकांना विचारावे. या वस्तूंचे आकार ढोबळमानाने बालकांना सांगावे. उदाहरणार्थ, चौकोनी डबा, दंडवर्तुळ, कोन, पिरामिड इत्यादी<br><br>• या वस्तूंच्या कडा आणि पृष्ठभाग यांचे निरीक्षण करण्यास सांगावे.<br><br>• त्या वस्तूसारखी दिसणारी दुसरी वस्तू पहिली आहे का? कुठे पहिली आहे हे विचारावे.<br><br>• ही वस्तू मधे ठेवून बालकांना वर्तुळाकार बसवावे आणि वस्तू कशी दिसते आहे, तसे त्या वस्तूचे चित्र काढ; असे बालकांना सांगावे.<br><br>• सर्व बालकांची चित्रे एकमेकांना दाखवून | • बालकांना प्रथम त्यांनी बघितलेल्या अवतीभोवतीच्या वस्तूंची नावे विचारावी.<br><br>• सध्या भोवताली दिसणाऱ्या वस्तू जवळ आणण्यासाठी सांगावे. या वस्तूंची नावे विचारावी.<br><br>• या वस्तूंचे आकार कसे आहेत ते बालकांना विचारावे. या वस्तूंचे आकार ढोबळमानाने बालकांना सांगावे. उदाहरणार्थ, चौकोनी डबा, दंडवर्तुळ, कोन, पिरामिड इत्यादी.<br><br>• वस्तू परत जागच्या जागी ठेवण्यास सांगावे.<br><br>• या वस्तूंच्या कडा आणि पृष्ठभाग यांचे निरीक्षण करण्यास सांगावे.<br><br>• ही वस्तू मधे ठेवून बालकांना वर्तुळाकार बसवावे आणि वस्तू कशी दिसते आहे तसे त्या हे तसे त्या वस्तूचे चित्र काढ; असे बालकांना सांगावे.<br><br>• सर्व बालकांची चित्रे एकमेकांना दाखवून त्याबाबत चर्चा करावी. | |

| | |
|---|---|
| त्याबाबत चर्चा करावी. आहे, तसे त्या वस्तूचे चित्र काढ; असे बालकांना सांगावे. | |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| **विविधता** | अ) एकच वस्तू वेगवगेळया बाजूने कशी वेगवेगळी दिसते याबाबत चर्चा करावी.<br><br>ब) द्विमितीय चित्र आरशात कसे दिसते, त्रिमितीय वस्तूची द्विमितीय सावली कशी पदके याकडे बालकांचे लक्ष वेधावे. | |
| **थीम/विषय** | वनस्पती (फुले, शेती, रंग), वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-12 बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br><br>C-12.1 विविध आकाराच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो.<br><br>अ) LO-12.1.2 दृश्य कलाकृतींमध्ये ठसे, रेघा आणि इतर द्विमितीय आणि त्रिमितीय प्रतिमा तयार करताना लहान व मोठे आकार शोधतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | अ) बालकाला महार विध वस्तूंचे आकार आकार समजतात. बालकाला वस्तू हाताळण्याचे कौशल्य प्राप्त होते<br><br>ब) एकाच वस्तूचे निरनिराळे उपयोग करता येतात याची जाणीव बालकाला होते.<br><br>मसूदा प्रत अनुभव, आपल्या क) आपले अनुभव, आपल्या भावभावना या द्विमितीय आणि त्रिमितीय वस्तूंच्या योजनेतून प्रकट करायला मिळू शिकते. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालके वस्तू हाताळताना, रचताना काय विचार करतात? त्यांना काय सांगायचे असते? त्याला एखादी गोष्ट कशी भासते याबाबत बालकांच्या कलाकृतीचे निरीक्षण करून आणि त्यांच्या गप्पा मारून जाणून घ्यावे. | |

| आधारशिला कृती : 94. छोटे लेखक: तुमचे स्वतःचे चित्र पुस्तक तयार करा | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | माझ्या चित्रातील गोष्ट |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | भावविश्वातील संबंधित विविध गोष्टीचा संग्रह, चित्रकार्ड, लेखनकार्ड, खडू, पेन्सिल क्रेऑनचे रंग, रांगोळी, परिसरातील उपलब्ध साहित्य (काडी, खडे, माती) |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| कृती :<br><br>मी काढलेले चित्र<br><br>• बालकाने काढलेल्या चित्राबद्दल चर्चा करावी. ताईने बालकास काढलेल्या चित्राबद्दलची माहिती स्वलिपीत लिहिण्यास प्रेरित करावे. बालकाने काढलेल्या चित्राची माहिती स्वलिपीत लिहिण्यास ताईने प्रेरित करावे.<br><br>• चित्राबद्दलची लिहिलेली माहिती बालकाने तोंडी सांगणे अपेक्षित. ताईने बालकास स्वतःचे नाव स्वलिपीत लिहिण्यास सांगावे.<br><br>• गोष्टीचे चित्र बालकांना त्यांना आवडलेली गोष्ट कोणती ते विचारावे. ही गोष्ट सांगण्यासाठी चित्रे काढण्यास सांगावे.<br><br>• एका गोष्टीची वेगवेगळ्या बालकांची चित्रे एकमेकांना दाखवून ती गोष्ट सांगण्यास प्रोत्साहित करावे. | कृती : स्वलिपीची ओळख<br><br>• ताईने बालकांना वर्तुळाकार बसवावे. बालकांना त्यांची कल्पना वापरून स्वलिपीत लिहिण्यास सांगावे.<br><br>• बालकांनी मांडलेल्या कल्पक विचार, भावना, यावर गप्पा माराव्यात. बालकांनी लिहिलेल्या स्वलिपीतील लेखनाचा स्वीकार करावा व कौतुक करावे.<br><br>• बालकांनी लिहिलेल्या स्वलिपीचे निरीक्षण करून त्यात आवश्यक तेथे सूचना देतात. आकार भेदाचे अवयव टिंबाने जोडून दाखवावे व कृतीचे वर्णन करावे. बालकांनी लिहिलेल्या स्वलिपीतील मजकुरावर गटात चर्चा घ्यावी, गप्पा माराव्यात.<br><br>कृती : माझ्या चित्रातील गोष्ट<br><br>• माझ्या चित्रातील गोष्ट बालकांना स्वतः गोष्ट रचण्यास प्रवृत्त करावे. त्या गोष्टीला साजेशी चित्रे काढण्यास सांगावे. त्या चित्रांच्या आधारे बालकांना वर्गात गोष्ट सांगण्यास सांगावे. त्यांच्या प्रयत्नाचे कौतुक करावे.<br><br>• बालकांना गोष्टीला नाव देण्यास सांगावे.<br><br>• चित्रांना क्रमांक घालून त्या गोष्टीचे पुस्तक बनवण्यास मदत करावी.<br><br>• वर्गातील गोष्टीच्या पुस्तकात अशी पुस्तके ठेवावी. | |
| **विविधता** | चित्रे जमवायला प्रोत्साहन देऊन त्यावरून गोष्ट तयार करण्यासाठी प्रोत्साहित करावे. | |
| **थीम/विषय** | मी माझे कुटुंब, पाणी-पाऊस, वनस्पती | |
| **ताईसाठी सूचना** | ताईने बालकांना चित्र काढण्यासोबतच काही तयार चित्रे/मासिके/ वर्तमानपत्रे/जुनी शुभेच्छापत्रे वापरूनदेखील गोष्ट तयार करण्यास सांगावी. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-10 बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.<br><br>C-10.8 स्वतःला समजलेल्या गोष्टी सांगण्यासाठी व स्वतःचे अनुभव व्यक्त करण्यासाठी | |

| | |
|---|---|
| | लेखन करतात.<br><br>अ) LO-10.8.2.2 आपण काढलेल्या चित्राबद्दल स्वलिपीमध्ये लिहितो. चित्र व स्वलिपीतील लेखन वेगवेगळे दिसते. |

| | |
|---|---|
| | अ) LO-10.8.2.3 आपण स्वलिपीत लिहिलेला मजकूर तोंडी सांगतात.<br><br>अ) LO-10.8.2.4 स्वतःचे नाव स्वलिपीत लिहू शकतात.<br><br>ब) LO-10.8.2.1 स्वलिपीत केलेल्या लेखनात पारंपरिक अक्षरे नसली तरीही लेखी भाषेची वैशिष्ट्ये दिसतात, जसे : स्वलिपीतील दोन शब्दांमध्ये अंतर सोडणे, स्वलिपीतील शब्दांवर शिरोरेषा देणे. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | अभिव्यक्ती विकास, वाचनपूर्व तयारी कौशल्य, सूक्ष्म स्नायू विकास मौखिक, भाषिक विकास, सर्जनशीलता, आकलन क्षमता, नवनिर्मितीचा आनंद उपयोजन, भावनिक विकास, लेखन विकास, निरीक्षण एकाग्रता. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) ताईने बालकाच्या स्वलिपीचा स्वीकार करावा.<br><br>ब) बालक स्वतः काढलेल्या चित्राबद्दल स्वलिपीत कसे लिहितो, याचे निरीक्षण करावे व नोंदी घ्याव्यात.<br><br>क) बालकांनी लिहिलेल्या लेखनात भाषेची वैशिष्ट्ये, दोन शब्दांत योग्य अंतर, शिरोरेषा, शब्दांचा आकार, बालकांचा सहभाग, आकलन कौशल्य यांचे निरीक्षण करावे. |

## आधारशिला कृती : 95. मी जिथे आहे तिथे मला ठेवा: वस्तू योग्यरित्या क्रमवारी लावा आणि साठवा

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **मला माझ्या जागेवर ठेवा** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **डबा, पिशवी, बाटली, बूट, कचरा पेटी, टोपली इत्यादी.** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| डबा, पिशवी, बाटली, बूट | कचरा पेटी/टोपली | |
| कृती : वस्तू जागेवर ठेवूया.<br><br>पूर्वतयारी :<br><br>• डबा, बाटली, शूज या वस्तूंच्या नियोजित | कृती : माझा खाऊ मला दया.<br><br>• ताईने बालवाटिकेच्या परिसरात कचरापेटी/टोपली ठेवावी. ताईने बालकांना बालवाटिकेच्या परिसरात | कृती : वर्गातील साहित्य जागेवर ठेवूया.<br><br>• छोट्या छोट्या नियमांची निर्मिती बालकांच्या मदतीने करून घ्यावी. जसे रंगकांड्या वापरल्यावर कुठे ठेवायच्या? पुस्तके बघितल्यावर |

| | | |
|---|---|---|
| ठिकाणी ताई चित्रे किंवा स्टिकर्स लावतील वर्गात बालके आल्यानंतर ताईंनी बालकांना एकत्र बसायला सांगावे. ताईने डबा बाटली हातात घेऊन तसेच पायात बूट घालून उभे राहावे. ताईने बूट काढण्याच्या जागी जाऊन बूट ठेवावे. | बालकांना घेऊन जावे. मोकळया जागी पडलेली पाने, काठ्या, कागद, प्लॅस्टिक उचलून कचरापेटी/टोपलीत टाकण्यास सांगावे. | कुठे ठेवायची? कशी ठेवायची? खेळणी ठेवावी ? खेळल्यावर कशी<br><br>• वस्तूंच्या जागा लक्षात राहण्यासाठी चित्रे काढून लावावीत. |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| तसेच डबा, बाटली यांच्यासाठी ठरवलेल्या जागी त्या-त्या वस्तू नेऊन ठेवाव्या.<br><br>ताईने बालकांना त्यांच्या वस्तू ठरवलेल्या जागी ठेवण्याच्या सूचना द्याव्या. तसेच वस्तू ठेवताना तिथे लावलेली चित्रे किंवा स्टिकर बालकांना दाखवावी. जिथे जे चित्र आहे, तिथेच वस्तू ठेवूया असेही सांगावे. | | बालकांना<br><br>• अशी चित्रे काढण्यासाठी प्रोत्साहित करावे.<br><br>• स्वतःहून नियमांचे पालन करून दयावे.<br><br>• रिकामे बॉक्स वापरून वस्तूंसाठी जागा बनवण्यास प्रोत्साहित करावे. बालकांना |

| | |
|---|---|
| विविधता | बालके वर्गात वापरत असणाऱ्या वस्तूंच्या जागा ठरवाव्या आणि त्या ठिकाणी स्टिकर/चित्रे लावून बालकांना त्याची ओळख करून द्यावी. उदाहरणार्थ, खेळणी ठेवण्याच्या जागा, पुस्तके ठेवणीची जागा इत्यादी. पेन्सिल, कागद इत्यादी वस्तूंचा वापर करून झाल्यानंतर झालेला कचरा उचलून जागा स्वच्छ करण्यास सांगणे. |
| थीम/विषय | मी, माझे कुटुंब व परिसर, ऋतू |
| ताईसाठी सूचना | यासंदर्भात वायोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व<br><br>अध्ययन निष्पत्ती | CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br><br>CG-1.3 शाळा व वर्ग स्वच्छ व नीटनेटके ठेवतो.<br><br>अ) LO-1.3.1 स्वतःच्या वस्तू जसे की पिशव्या, बाटल्या, बूट, रुमाल इत्यादी यांच्याबद्दल सजग असतो.<br><br>ब) LO-1.3.1 स्वतःच्या वस्तू योग्य जागी ठेवतात आणि योग्य जागेवरून घेतो.<br><br>ब) LO-1.3.3 कचरा टाकण्यासाठी कचरापेटीचा वापर करायला सुरुवात<br><br>करतो.<br><br>क) LO-1.3.1 स्वतःच्या वस्तूंची चांगल्या प्रकारे देखभाल करतो.<br><br>क) LO-1.3.3 नेहमी कचरा टाकण्यासाठी कचरापेटीचा वापर करतो. |

| | | |
|---|---|---|
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | अनुकरण, नीटनेटकेपणा, स्वच्छतेचे महत्त्व, स्वावलंबन, नीटनेटकेपणा. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | बालके स्वतःच्या वस्तू नियोजित ठिकाणी आहेत की नाही याबद्दल सजग आहे की नाही याचे निरीक्षण करावे. वर्गात झालेला कचरा पाहून बालके स्वच्छता करतात की नाही, कचरा टाकण्यासाठी कचरा पेटीचा वापर करतात की नाही याचे निरीक्षण करावे. | |
| **आधारशिला कृती : 96. Grow a Plant: Nurture, Understand Parts and Function** | | |
| उपक्रमाचे नाव | वनस्पतींची ओळख | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | खुरपे, झारी, झाडांच्या बिया (कुंड्या, माती) मोकळी जागा. वनस्पतींच्या प्रकारांचे चित्रकार्ड. | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| कृती : बिया लावूया.<br><br>• जांभूळ, सीताफळ, चिंचोके, चिक्कू अशा बिया जमा करण्यास सांगाव्या. ताईनेपण बिया गोळा कराव्यात. शाळेत आणून त्या बिया लावण्यास प्रोत्साहन द्यावे.<br><br>• खड्डे अगोदरच खणून ठेवावे. रोज पाणी घालण्यास सांगावे. राज एखादे बालक आजारी असेल तर ते लक्षात आणून दयावे व त्याच्या झाडाला पाणी कोण घालणार म्हणून बालकांना पाणी घालण्याची संधी द्यावी. | • बालकांना परिसरातील दोन तीन झाडे ओळखण्यास मदत करावी. झाडाचे वेगवेगळे भाग, उपयोग, त्याला वाढायला काय लागते याची बालकांना ओळख करून दयावी. | • ३ ते ५ वर्षे वयोगटाच्या कृती करून घ्याव्या. बालकांना झुडूप, मोठे झाड, रोप, वेल यातील फरकाची ओळख करून द्यावी.<br><br>• बालकांना झाडाचे, त्याच्या भागांचे चित्र काढण्यास प्रोत्साहित करावे. झाडाची काळजी कशी षद, घ्यावी याबाबत, 'बालकांशी चर्चा करावी. शेताबाबत |
| **विविधता** | वेगवेगळया प्रकारच्या झाडांची चित्रे दाखवावीत. | |
| **थीम/विषय** | वनस्पती (फुले, शेती, रंग) | |
| **ताईसाठी सूचना** | यासंदर्भात वायोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात म्हणजे त्यांनी स्वतःच्या भावना समजून घेऊन त्यांचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता होय.<br><br>C 4.6 गरजेच्या वेळी इतरांना (प्राणी आणि वनस्पतीसह) मदत करतो आणि दयाभाव दर्शवितात.<br><br>CG-6 बालके स्वतः भोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शवितात.<br><br>C 6.1 सर्व प्रकारच्या जीवांची काळजी घेतो व त्यांच्यासोबत राहण्याबाबत आनंद प्रकट | |

| | | |
|---|---|---|
| | करतात.<br><br>अ) LO-6.1.1 वनस्पती आणि प्राण्यांचे निरीक्षण करताना कुतूहल दर्शवितात.<br><br>ब) LO-6.1.1 झाडे आणि प्राणी यांना विनाकारण इजा करत नाहीत.<br><br>क) LO-6.1.1.1 स्थानिक वातावरणातील झाडे आणि प्राणी यांच्या सहवासात आनंद व्यक्त करतात. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | आपुलकी, प्रेम व दयाभाव निर्माण होतो. जबाबदारीची जाणीव होते.<br>सेवावृत्ती/मदत/सहकार्य | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | बालके पशु, पक्षी, प्रौढ, इतर बालके यांच्याशी प्रेमाने आपुलकीने वागतात का? याचे निरीक्षण करावे. | |
| **आधारशिला कृती : 97. स्कॅव्हेंजर हंट: वेगवेगळया रंगाच्या आणि/किंवा आकाराच्या वस्तू शोधा** | | |
| उपक्रमाचे नाव | रंगीबेरंगी आकारांचा खेळ खेळूया | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | | |
| विविध आकार, बांगड्या, खोके,<br><br>झाकण, बटणे, पेन्सिलचे रिकामे<br><br>खोके. | विविध आकार, बांगड्या, खोके, झाकण, बटणे, पेन्सिलचे रिकामे खोके. | लाल त्रिकोण, निळे त्रिकोण, विविध आकार. |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती २ :<br><br>• वर्तुळ, त्रिकोण, चौकोन या आकारांची ओळख करून द्यावी.<br><br>• आकार ओळख करून देतांना त्या आकाराच्या भरपूर वस्तू दाखवाव्यात. | कृती १ : आकार व वस्तूची जोडी लावणे.<br><br>• बालकांना वर्तुळात बसवावे ताईने ट्रेमध्ये वर्तुळ, त्रिकोण, चौकोन घ्यावे. त्याच ट्रेमध्ये बांगड्या, खोके, झाकण, बटणे, त्रिकोणी- | कृती १ : आकाराचा खेळ<br><br>• बालकांना वर्तुळात बसवावे. जमिनीवर एका बाजूला लाल त्रिकोण मांडावे. एका बाजूला निळे त्रिकोण मांडावे. दोन्ही वेगवेगळे मोजायला सांगावे आणि |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| वरील कृतींचा सराव झाल्यावर ताईने बालकांना त्यातील फरक बालकांना विचारावा. | पेन्सिलचे रिकामे खोके, समोसा असलेला चित्र, ताटली, लाकडी ठोकळ्यांमधील / रंगोमेटरी तुकडे घ्यावेत. | नंतर एकूण त्रिकोण किती आहेत हे मोजायला सांगावे.<br><br>कृती २ : आकारांचे तुकडे उचलणे. |

| | | |
|---|---|---|
| | • ट्रेमधील वस्तू बालकांच्या समोर ठेवाव्यात व एका एका बालकाला त्याच्या जोड्या लावायला दयाव्यात. उदाहरणार्थ, वर्तुळ- बांगडी, चौकोन- खोक, वर्तुळ- ताटली इत्यादी.<br><br>• ताईने सगळ्या बालकांना जोड्या लावण्याची संधी दयावी. हा खेळ झाल्यावर ताईने बालकांना आकारांची नावे सांगावी.<br>कृती २ :<br><br>• वर्तुळ, चौकोन, त्रिकोण ही आकार सारखेच आहेत का त्यात काही फरक आहे, हे बालकांना विचारावे. काय फरक आहे हे एक एक करून बालकांना विचारावे.<br>• ताईने आकार हातात घेऊन आकरांची ओळख करून द्यावी. चौकानाला ४ टोके आहेत, वर्तुळ आकार घेऊन त्याला टोके नाहीत, हे सांगावे. त्रिकोणी, आकार घेऊन त्याला किती टोके आहेत ते मोजायला सांगावे. | • ताईने बालकांना वर्गाच्या बाहेर न्यावे. बालकांना एकमेकांचे हात धरून मोठा वर्तुळ करण्यास सांगावे. वर्तुळ करून झाल्यावर हात सोडण्यास सांगावे.<br><br>• ताईने बालकांच्या मोठ्या वर्तुळाच्या आत एक लहान वर्तुळ काढून त्याच आकारांचे तुकडे ठेवावेत. खेळ सुरू करण्याआधी सूचना दयाव्यात. कृती २ : आकारांचे तुकडे उचलणे.<br><br>• ताईने बालकांना वर्गाच्या बाहेर न्यावे. बालकांना एकमेकांचे हात धरून मोठा वर्तुळ करण्यास सांगावे. वर्तुळ करून झाल्यावर हात सोडण्यास सांगावे.<br><br>• ताईने बालकांच्या मोठ्या वर्तुळाच्या आत एक लहान वर्तुळ काढून त्याच आकारांचे तुकडे ठेवावेत. खेळ सुरू करण्याआधी सूचना दयाव्यात.<br><br>षद,<br><br>• ताईने टाळया वाजवायला सुरुवात केली, की मोठ्या वर्तुळावर पळायचे आहे. ताईने टाळया वाजवणे बंद केले, की ताईने सांगावे उदाहरणार्थ, ३ चौकोन उचलावे, ४ वर्तुळ, ६ त्रिकोण, २ वर्तुळ अशा प्रकारे हा खेळ पूर्ण करावा. (बालकांच्या संख्येनुसार आकारांचे प्रमाण असावे. किमान १५ ते २० आकारांचे तुकडे घ्यावेत.) बालकांना असे खेळण्यास दिल्यास आकार आणि संख्या नाम लक्षात राहण्यासाठी मदत होईल. |
| वितरित | आकारांच्या वस्तू, वेगवेगळया आकाराची खोकी, कोणताही प्रकल्प विषय चालेल लपवण्याच्या वस्तू त्या प्रकल्पाला अनुसरून घ्याव्या. मी, माझा परिसर - घरातील वस्तू ओळखूया. | |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| **थीम/विषय** | भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), पक्षी व कीटक, वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | विविध बालकांच्या संख्येनुसार आकारांचे प्रमाण असावे. किमान १५ ते २० आकारांचे तुकडे घ्यावेत. यासंदर्भात वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकाची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे | |

| | |
|---|---|
| | यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br><br>C 8.1 एकापेक्षा जास्त गुणधर्मांच्या आधारे वस्तू आणि उपगटात वेगळया करतो.<br><br>अ) LO-8.1.1 आकार, लांबी, उंची वजन यांवर आधारित वस्तू दोन गटात वेगळया करतो. (लहान-मोठा, लांब-आखूड)<br><br>ब) LO-8.1.1 आकार, लांबी, उंची वजन यांवर आधारित वस्तू तीन गटात वेगळया करतो.<br><br>क) LO-8.1.1 गुणधर्मानुसार / गुणधर्मावर आधारित वस्तूंचे गट करतात.<br><br>C-8.8 मूलभूत भौमितिक आकार ओळखतात व तयार करतात, त्याचे वर्गीकरण करतात, समजून घेतात आणि समजावून सांगतो.<br><br>अ) LO-8.8.1.2, आकार, रंग आणि मापे यांसारख्या एका घटकाद्वारे तुलना आणि वर्गीकरण करतो.<br><br>ब) LO-8.8.1.2 दोन घटकांनुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो. (उदा. आकार-रंग-माप)<br><br>क) LO-8.8.1.2 तीन घटकांद्वारे वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो. (उदा. आकार, रंग, माप)<br><br>C-8.12 राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संकल्पनांचे आकलन होण्यासाठी आणि संकल्पना व्यक्त करण्यासाठी सुयोग्य व पुरेशी शब्दसंपत्ती विकसित करतो.<br><br>अ) LO-8.12.1 आकारांची नावे व त्यांचे काही गुणधर्म सांगतो.<br><br>ब) LO-8.12.1.1 संख्यानामे आणि आकारांच्या नावांचा उपयोग करून साध्या सूचनांचा अर्थ लावतो.<br><br>ब) LO-8.12.1.2 संख्यानामे व आकारांच्या नावांचा योग्य प्रकारे उपयोग करतो |

| | |
|---|---|
| | |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | आकारांची नावे व त्यांचे काही गुणधर्म सांगतात, प्रभावी संवाद, साक्षरता विषयक कौशल्य माहिती, चिकित्सक विचार आकारनामे. |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | दिलेले आकार ओळखता येतात का याचे निरीक्षण करावे. परिसरातील दिसलेल्या आकाराचे नाव घेतो का हे बघावे. आकारासंबंधी सांगितलेली कृती अचूक करतो का, आकार आणि वस्तू यांची जोडी लावता येते का, याचे निरीक्षण करावे. |
| आधारशिला कृती : 98. Loud or Soft: Identify Sounds, | |

| Distinguish and Create Different Pitch Sounds | | |
|---|---|---|
| उपक्रमाचे नाव | आवाजातील फरक ओळखूया. | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | मोबाईल, स्पीकर्स ग्लास, चमचा, खजिंरी, डफ, घंटा, घुंगरू | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| कृती : आवाज ओळखा ( एकत्रित)<br>• ताईने मोबाइल आणि स्पीकर्सच्या साहाय्याने प्राणी, पक्षी, वाहने असे विविध आवाज ऐकवावे. आवाज ऐकवून झाल्यावर कोणता आवाज कशाचा आहेय असे ताईने बालकांना विचारावे.<br>• बालकांना रोज ऐकत असणाऱ्या विविध आवाजांबद्दल ताईने विचारावे आणि आवाज काढून दाखवायला सांगावे. | कृती : आवाज पातळीवर टाळ्या<br>• वरील साहित्यापैकी कोणतेही साहित्य वापरून ताईने आधी हळू आवाज ऐकवेल.<br>त्यानंतर आवाजाची पातळी वाढवून वस्तूंचा आवाज ऐकवेल.<br>खूप मोठ्या आवाजात वस्तूचा आवाज ऐकवेल.<br>ताई वस्तू वापरून ज्या पातळीचा आवाज करेल तो ऐकून 'बालकांनी त्याच पातळीच्या आवाजात टाळ्या वाजवण्याची कृती करावी. | कृती : आवाज मध्यम पातळी<br>वरीलपैकी एक वस्तू वापरून तीन पातळ्यांमध्ये त्या वस्तूच्या आवाजात ताईने करून दाखवावे.<br>• मध्यम पातळीचा आवाज ऐकू आला की बालकांनी ताईला आवाज थांबवायला सांगावे. |
| https://w w w .y o u t u be. comwatch?v=pzw2_PAWjUw आवाज ओळखा (प्राणी),<br>आवाज ओळखा (पक्षी),<br>आवाज ओळखा (वाहने) | | |
| विविधता | बालकांचे डोळे रुमालाने बांधावे व वर्गातील इतर बालकांना बोलण्यास सांगून कुणाचा आवाज आहे, हे ओळखण्यास सांगावे. अशी संधी अधिकाधिक बालकांना देता येईल.<br>घरातील वस्तू वापरून आवाज करावेत. | |
| थीम/विषय | मी, माझे कुटुंब, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, वाहन | |
| ताईसाठी सूचना | | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. | |

| | |
|---|---|
| | C-2.3 आवाजातील चढ-उतार (आरोह-अवरोह) सूर-ताल-लय यांनुसार आवाजातील फरक ओळखतो.<br><br>अ) LO-2.3.1 मानव, प्राणी, वाहने, टाळ्या यांचा आवाज, पाण्याचा आवाज, वस्तूंचा आवाज, इत्यादी वातावरणातील आवाज यातील वेगळेपणा ओळखतो.<br><br>ब) LO-2.3.1 पक्षी, प्राणी, वाद्य आणि मानवी आवाज यांच्या आवाजपातळीमधील चढ-उतारातील फरक ओळखतो.<br><br>क) LO-2.3 आवाजाच्या पातळीमधील माध्यम स्वर ओळखतो. |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | श्रवण क्षमता, वर्गीकरण, एकाग्रता |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | अ) परिसरातील विविध प्रकारचे आवाज ओळखता येतात की नाही हे पाहणे.<br>ब) बालके विविध पातळीमधील आवाज ओळखू शकतात की नाही हे पाहणे.<br><br>क) बालके तीनही पातळीतील आवाज ओळखू शकतात की नाही ते पाहणे. |

## आधारशिला क्रिया : 99. स्वच्छ, स्वच्छ, स्वच्छ : हात का, केव्हा आणि कसे धुवावे हे जाणून घ्या

| | | |
|---|---|---|
| उपक्रमाचे नाव | स्वच्छता | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | पाणी व हँडवॉश, फ्लॅशकार्ड, हात पुसण्याचा रुमाल. | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| कृती : हातांची स्वच्छता<br>• हात धुण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवावे.<br>•चित्रफीत किंवा फ्लॅशकार्ड दाखवावे.<br>• बालकांशी चर्चा करावी.<br>• शी करायला जाण्यापूर्वी व नंतर इतरांची मदत घेऊन हात धुवायला व पुसायला सांगावे.<br>• जेवणापूर्वी व नंतर इतरांची मदत घेऊन हात धुवायला व पुसायला सांगावे. | | |
| विविधता | अ) डोळ्यांची स्वच्छता, नाकाची स्वच्छता, पायाची स्वच्छता याचप्रमाणे डोळे, नाक व पाय या इतर अवयवांची स्वच्छता करण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवणे.<br>गाणे https://www.youtube.com/watch?v=GKF31SfshS8<br>https://www.youtube.com/watch?v=7ffrsB_vyeE<br>https://www.youtube.com/watch?v=sAhrMTijyHs | |

| | | |
|---|---|---|
| थीम/विषय | मी, माझे कुटुंब व परिसर, पाणी-पाऊस, | |
| ताईसाठी सूचना | यासंदर्भात उपलब्ध हात धुण्याची पद्धतदर्शक तक्ता वापरावा किंवा कार्यपुस्तिकेचा संदर्भ घ्यावा | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>C-1.2 स्वतःची मूलभूत काळजी आणि स्वच्छता यांचा अवलंब करतो.<br>अ) LO-1.2.1 शौचाला जाण्यापूर्वी व नंतर तसेच जेवणापूर्वी व नंतर इतरांची मदत घेऊन हात धुतो आणि पुसतो.<br>ब) LO-1.2.1 शौचाला जाण्यापूर्वी व नंतर, तसेच जेवणापूर्वी व नंतर हात धुतो आणि पुसतो, या क्रिया स्वतःहून करण्यास सुरुवात करतो.<br>क) 1.0-1.2.1 शौचाला जाण्यापूर्वी व नंतर तसेच जेवणापूर्वी व नंतर, नियमितपणे हात धुतो आणि पुसतो. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | स्वतःच्या अवयवांची स्वच्छता राखण्याची क्षमता विकसित होईल. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | बालक स्वतःची योग्य पद्धतीने स्वच्छता करत आहे की नाही याचे निरीक्षण करावे व त्याप्रमाणे बदल सुचवावे. | |
| आधारशिला क्रिया : 100. निसर्ग शोध: चित्रे/वस्तूंचे गटांमध्ये वर्गीकरण करा | | |
| उपक्रमाचे नाव | परिसरातील प्राणी पक्षी यांची ओळख | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | प्राणी, पक्षी, भाज्या व फळे यांची चित्रकार्डे | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| कृती १ :<br>• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. प्राण्यांची चित्रकार्डे दाखवा. प्राणी आणि पक्षी यांचे वेगवेगळे गट करायला सांगा. बालकांना प्राणी आणि पक्ष्यांची नावे विचारा.<br>कृती २ :<br>• फळे/भाज्या यांचे चित्रकार्ड दाखवावे. चित्र बालकांना दयावे, प्रत्येकाचे नाव सांगा. | कृती १ :<br>ताईने बालकांना वर्तुळात उभे करावे. पक्षी, प्राण्यांचे चित्रकार्ड बालकांच्या वर्तुळात ठेवावे. ताईन खंजिरी वाजवावी व बालकांनी वर्तुळाबाहेर पळावे. ताईने प्राणी असे म्हणाल्यावर बालकांनी प्राणी असलेले कार्ड उचलावे आणि पक्षी असे म्हणल्यावर बालकांनी पक्ष्याचे चित्र असलेले कार्ड उचलावे. याप्रमाणे प्राणी, पक्षी वेगवेगळे गट करायला सांगा.<br><br>कृती २ : वस्तूवर्णन | कृती १ : चित्र ओळखा, वर्णन करा.<br>बालकांना एखादे चित्र दाखवून त्यातील वस्तू, प्राणी, पक्षी ओळखण्यास सांगावे. बालकांना या चित्रातील वस्तूचे अधिक वर्णन करण्यास सांगावे. उदाहरणार्थ,<br>खुर्ची : खुर्ची लाकडाची किंवा प्लास्टिकची आहे. खुर्ची बसण्यासाठी असते. खुर्ची उंच किंवा बुटकी आहे/मोठी किंवा छोटी आहे. लाल किंवा निळया रंगाची आहे.<br>पोपट : पोपट हिरवा आहे. पोपटाची चोच लाल आहे. पोपट मिरची, पेरू खातो. पिंजऱ्यातल्या पोपटाला उडता येत नाही, म्हणून त्याला वाईट वाटते. |

| | | |
|---|---|---|
| | • बालकांना परिसरातील विविध वस्तू अथवा त्यांची चित्रे दाखवून त्यांची नावे विचारावी, न आठवल्यास ताईने सांगावी. त्या वस्तू बालक कोठे पाहते? ती वस्तू कोण वापरते? कशासाठी वापरते? याबाबत प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून माहिती विचारावी.<br>• त्या वस्तूच्या आधारे/बाबतीत ताईनी रोजच्या जीवनात घडलेली एखादी घटना/अनुभव बालकांना सांगून त्यांना त्यांच्या अनुभवांविषयी, आजूबाजूला घडलेल्या घटनांविषयी बोलते करावे. बालकाने सांगितलेल्या (काल्पनिक, प्रत्यक्ष घडलेल्या, दुसऱ्या बालकाचे असूनही स्वतःचे म्हणून सांगितलेल्या) अनुभवांविषयी नकारात्मक भाष्य न करता ऐकून घ्यावे.<br>• बालकाने सांगितलेल्या अनुभवातील चांगल्या, कृती, सवयी, गोष्टींना प्रोत्साहित करावे. अशाच प्रकारे व्यक्ती चित्रे दाखवून नात्याची काही खास गोष्ट/अनुभव बालकाला विचारावा. बालकाला चित्र दाखवून चित्रातील प्राणी, पक्षी यांचे वर्णन करण्यास सांगावे. (आवाज, रंग, चाल इत्यादी) हे प्राणी, पक्षी कुठे दिसतात, कुठे राहतात, काय खातात, कसे खातात हे बालकांना विचारावे आणि योग्य तिथे दुरुस्ती करावी. | गाय : आमची गाय पांढरी आहे. ती हिरवे गवत खाते. ती दूध देते.<br>अशाप्रकारे पूर्ण वाक्यांमध्ये बोलण्यास बालकांना प्रोत्साहित करावे |
| विविधता | अ) परिसरातील परिचित वस्तू, प्राणी, पक्षी, यांची चित्रकार्डे दाखवून ती काय खातात, कुठे रहातात याची चर्चा करावी.<br>ब) घटनेची चित्रे दाखवून त्यांनी या प्रकारच्या घटना बघितल्या आहेत का ते विचारावे उदाहरणार्थ, बाजार, दुकान, बस स्टॉप.<br>क) विविध व्यक्ती आजोबा, आजी, दादा, ताई, बाळ अशी चित्रे दाखवून तुमच्या घरी कोण आहे ते विचारावे. त्यांच्याबद्दल बोलावे. | |
| थीम/विषय | प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक | |

| | |
|---|---|
| ताईसाठी सूचना | ताईने शक्य त्या बाबी प्रत्यक्ष दाखवाव्यात. त्यानंतर उर्वरित बाबी दाखविण्यासाठी संबंधित चित्रकार्डे यांचा वापर करावा. |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.1 वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तंमूधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.<br>अ) LO-7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना या इतरांच्या मदतीने नावासहित ओळखतो.<br>ब) LO-7.1.2 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इत्यादी नावासह ओळखून स्वतः त्याचे वर्णन करतो.<br>क) LO-7.1.3 लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती, चित्रे ओळखतो. त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (घराचा मोठा दरवाजा) |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | अ) बालकांना वस्तू, प्राणी, पक्षी यांची वैशिष्ट्ये कळतात.<br>ब) बालकांच्या कल्पनाशक्तीचा विकास होतो.<br>क) बालकांच्या भाषिक विकासास चालना मिळते.<br>ड) बालकांच्या स्मरणशक्तीला गती मिळते. |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | निरीक्षण करावयाच्या बाबी बालकांच्या स्मरणशक्तीचे, कल्पनाशक्तीचे निरीक्षण करावे. बालकांच्या उच्चारांचे निरीक्षण करावे. |

## आधारशिला कृती : 101. आपण सर्व वापरतो: ऑब्जेक्ट्स त्यांच्या वापरांशी जुळवा

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **वस्तू आणि उपयोग** |

**उपक्रमाला लागणारे साहित्य**

| **खडू, पाटी, खोक, वाटी, चमचा** | **कागद, वही, चटई, झाडू** | **चमचा, पाटी, कागद, पेन्सिल, पट्टी, वही** |
|---|---|---|
| कृती :<br>• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. ताईने बालकांच्या समोर खडू, पाटी, खोक, वाटी, चमचा या वस्तू ठेवाव्यात. एक वस्तू हातात उचलावी.<br>खडू बालकांना दाखवावा आणि हा खडू तुम्ही कशासाठी वापरता हे विचारावे.<br>बालक खडू आपण फळ्यावर जमिनीवर चित्र काढायला, चित्र काढायला वापरतो. | कृती :<br>• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. ताईने बालकांच्या समोर कागद, वही, चटई, झाडू या वस्तू ठेवाव्यात. एक वस्तू हातात उचलावी. झाडू बालकांना दाखवावा आणि हा झाडू तुम्ही कशासाठी वापरता हे विचारावे. वर्ग, घरात, जमिनीवर झाडण्यासाठी वापरतो असे सांगतील. | आवश्यक पूर्वज्ञान/पूर्वतयारी : बालकांना वस्तूंचा वापर माहिती आहे.<br>कृती: गप्पा<br>• बालकांना वस्तू परिचय देताना वस्तूचे उपयोग सांगावे. आणखी कोणते उपयोग बालकांना माहीत आहेत ते त्यांना विचारून घ्यावे.<br>• सरावाच्या वेळी निरनिराळ्या वस्तू कशासाठी वापरतात ते विचारावे. |

<table>
<tr><td>याप्रमाणे बालकांना एक एक करून वस्तू दाखवाव्या आणि त्या आपण कशासाठी वापरतो हे विचारावे.</td><td>याप्रमाणे बालकांना एक एक करून वस्तू दाखवाव्यात आणि त्या आपण कशासाठी वापरतो हे विचारावे.</td><td>वस्तूंची नावे : चमचा, पाटी, कागद, पेन्सिल, पट्टी, वही इ.</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">बालकांना विविध उपयोग सांगून त्यासाठी कोणत्या वस्तू वापरायच्या ते विचारावे उदा. कपडे शिवणे सुई/दोरा, झोपणे गादी, उशी, पांघरूण, थंडी वाजत असल्यास स्वेटर, लिहिण्यासाठी पेन, पेन्सिल इ.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, मदतनीस.</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">ताईने उपलब्ध वस्तूंशिवाय इतर उपयोगी वस्तूंची चित्र कार्ड दाखवून त्या वस्तूंच्या उपयोगाविषयी चर्चा करावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.1 वेगवेगळ्या वर्गातील / गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.<br>अ, ब, क) LO-7.1.3.4 वस्तू आणि त्यांचा वापर यांच्यात संबंध निर्माण करतो. (उदा. चमचा खाण्यासाठी, बादली अंघोळीसाठी)</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये</td><td colspan="2">अ) बालकांना वर्गीकरण करता येते.<br>ब) बालकांना वस्तूंचे उपयोग माहीत होतात.<br>क) उपयोगानुसार वस्तूंचे गट बालकांना माहीत होतात.<br>ड) बालकांना वस्तूंचे अनेक वैशिष्ट्ये माहीत होतात.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">बालके एका वस्तूचे जास्त उपयोग सांगतात याचे निरीक्षण करावे.</td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला क्रिया : 102. हवेचा प्रयोग: वारा काय वाहतो आणि काय नाही ते पहा</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">हवेचे प्रयोग</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">कागदाचे कपटे, वाटी, साबणाचे पाणी, स्ट्रॉ, कागदाच्या नळया</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
<tr><td>कृती :• बालकांना नाकाने श्वास घ्यायला सांगून समोर तळहात धरून तोंडाने सोडायला सांगा. तोंडातून हवा बाहेर आली<br>• नुसती फुंकर मारायला सांगा आणि कागदाचे कपटे उडवायला सांगा</td><td>कृती :बालकांना नाकाने श्वास घ्यायला सांगून समोर तळहात धरून तोंडाने सोडायला सांगा. तोंडातून हवा बाहेर आली.<br>प्रत्येकाला छोट्या वाटीत साबणाचे पाणी देऊन स्ट्रॉ किंवा कागदाच्या</td><td>कृती :• बालकांना नाकाने श्वास घ्यायला सांगून समोर तळहात धरून तोंडाने सोडायला सांगा. तोंडातून हवा बाहेर आली.<br>• प्रत्येकाला छोट्या वाटीत साबणाचे रंग घातलेले पाणी देऊन स्ट्रॉ, कागदाच्या नळया बनवून दया आणि फुंकर मारून वाटीत</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | नळ्या बनवून दया आणि फुंकर मारून साबणाचे फुगे करायला सांगा. | साबणाचा रंगीत फेस करायला सांगा. तो फेसाचा गोळा उचलून कागदावर टाकायला सांगा. ते फेसाचे फुगे फुटले की त्या जागी साबणाच्या फुग्यांची रंगीत नक्षी तयार होते. |
| **विविधता** | अ) रुमाल धुऊन वाळत घालायला सांगणे. ते हलतात कसे त्याचे निरीक्षण करायला सांगणे. का हलत असतील ते बालकांना विचारावे. नंतर ताईंनी हळूहळू संवादातून सांगावे की हवा सगळीकडे आहे ती हलली की त्याला वारा म्हणतात. त्यामुळे कपडे वाळतात.<br>ब) फुगा, पतंग का उडतात?<br>क) कागदाचे भिरभिरे हातात धरून पळत गेले, की का फिरते ? असे प्रयोग करून घ्यावे. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | प्रयोग करत असताना आधीच उत्तरे सांगू नयेत. बालकांशी संवाद साधून, उत्तरे शोधून काढायला लावावीत. यासाठी आवश्यकतेनुसार कार्यपुस्तिकेचा वापर करावा. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.<br>C-2.6 अनुभवांची सर्वंकष जाणीव होण्याकरता, ज्ञानेंद्रियांमार्फत प्राप्त संवेदनांचे एकात्मीकरण करण्यास सुरुवात करतो.<br>अ) LO-2.6.1 जोराने श्वास बाहेर सोडणे. (उच्छवास)<br>ब) LO-2.6.1 हलक्या वस्तू जोरात फुंकर घालून उडवतो. उदा. कागद<br>CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरता/ पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेतो.<br>क) LO-7.2.1.3 कार्यकारणभाव जोडतो. (उदा. अब्दुल आजारी असल्यामुळे तो शाळेत आला नाही, पाऊस न पडल्यामुळे रोप जगले नाही.) | |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | तार्किक विकसन, निरीक्षण क्षमता, कार्यकारणभाव विकसन | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | प्रयोग समजला आहे का, तो सांगता येतो का, प्रयोग करता येतो का याचे निरीक्षण करावे | |
| आधारशिला कृती : 103. वर्गीकरण क्रियाकलाप: रंग, आकार, आकार आणि इतर निकषांच्या आधारे क्रमवारी लावा | | |
| उपक्रमाचे नाव | रंग व आकारांचे वर्गीकरण | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | | |
| वेगवेगळ्या रंगांच्या वस्तू विविध व मापांचे आकार | उंच आणि बुटक्या आणि मोठ्या वेगवेगळे रंग आणि आकार असणारे | वेगवेगळ्या रंगांच्या वस्तू विविध व मापांचे आकार कटआऊट किंवा कार्ड, लाल, पिवळया, |

| | | |
|---|---|---|
| कृती १ : पळा पळा थांबा.<br>• बालकांना वर्गात वेगवेगळया रंगांच्या वस्तू दयाव्यात किंवा घरून एकेका बालकाला एकेक रंगाची वस्तू आणायला सांगावी. त्या वस्तू वर्गात विखरून ठेवाव्यात.<br>• पळा पळा पळा थांबा हा खेळ घेऊन बालके थांबल्यावर त्यांना एका रंगाचे नाव सांगून त्या रंगाच्या वस्तू एका वर्तुळात ठेवायला सांगाव्या.<br>• सर्वांनी वर्तुळात त्या रंगाच्या वस्तू ठेवल्यावर त्या परत वर्गात विखरून ठेवाव्या. पुनः खेळ सुरू करून दुसरा रंग सांगावा.<br>कृती २ : पळा पळा थांबा अनेकातील एक गुणधर्म<br>• बालकांना वर्तुळात उभे करावे. बालकांच्या हातात आकार दयावेत.<br>• विविध आकार बालकांना देऊन, त्यांना वर्तुळात फिरायला सांगावे. फिरताना जो आकार दाखविला जाईल, तो आकार असलेल्या बालकांनी गट करावा. याचप्रमाणे विविध रंगाचे आकारही बालकांना देता येतील. | एकाच प्रकारच्या बाटल्या, वेगवेगळे द्विमितीय आकार (लहान व मोठे) त्रिकोण, चौरस, आयत, वर्तुळ आकार वेगवेगळया आकारांचे चेंडू, खोकी, लहान-मोठ्या शंकूच्या टोप्या, विविध मापाच्या, रंगाच्या आकारांच्या, परिसरातील वस्तू.<br>कृती १ : वर्गीकरण - उंची<br>• सगळया बाटल्या एकत्र ठेवाव्यात व बालकाला एक बाटली वेगळी करून दाखवावी व यासारख्या दुसऱ्या बाटल्या काढून दाखवायला सांगाव्यात.<br>• बाटलीची उंची लक्षात येण्यासाठी आपण काढलेली बाटली हाताळायला द्यावी.<br>वर्गीकरण : भौमितिक आकारासारख्या दिसणाऱ्या, मात्र वेगळया मापाच्या आकारांचे कटआऊट किंवा कार्डे बालकांपुढे मांडावीत. उदा. लहान-मोठ्या आकारांचे या त्रिकोण, लहान- • मोठ्या आकारांचे चौरस, लांबी आणि रुंदीचे गुणोत्तर सारखे पद असलेले हा वेगवेगळया मापांचे आयत, सर्व त्रिकोण किंवा दुसरा एखादा आकार असणारी सर्व कार्डे एकत्र करून, त्यांपैकी एक बाजूला काढावे. बालकांना या मापाची इतर कार्डे काढण्यास सांगावे.<br>कृती २ : आकारांच्या गप्पा<br>सारख्या वस्तू<br>• बालकांना वर्तुळात बसवावे. विविध मापांचे आकार दयावे.<br>• बालकाला वस्तू मुक्तपणे हाताळू दयाव्या नंतर एकाच आकाराचे परंतु वेगवेगळया मापांचे तुकडे देऊन सारखे आकार एकत्र करण्यास सांगावे.<br>• याचप्रमाणे विविध रंगांचे, विविध मापांचे तुकडे देऊन, रंग व आकार एकत्र सांगून सूचनेप्रमाणे गट करण्यास | निळया रंगाचे, विविध मापाचे त्रिकोण, चौकोन, (फोम यांचे कटआऊट/कार्डे, त्रिमितीय किंवा रंगोमेट्रीमधील)<br>कृती १ : शोधूया रंग आणि आकार<br>सर्व कार्ड एकत्र करावीत. बालकांना पुढीलप्रमाणे सूचना दयाव्यात.<br>मला लाल रंगाचा त्रिकोण काढून दे, मला निळया रंगाचे वर्तुळ काढून दे, मला पिवळया रंगाचा चौकोन काढून दे.<br>कृती २ : आकारांच्या गप्पा- वेगवेगळया वस्तू<br>• परिसरातील वस्तू गोळा करण्यास सांगावे. यात पाने, फुले, गोट्यांचे तुकडे इ.<br>गोळा केलेल्या वस्तूंचे गट करण्यास सांगावे. बालकाला वस्तू मुक्तपणे हाताळू दयाव्या. त्याच वस्तूंचे पुन्हा वेगळया निकषांच्या आधारे गट करण्यास सांगावे.<br>जसे, हिरव्या रंगाच्या वस्तू व हिरव्या नसणाऱ्या वस्तू हा एक निकष तसेच झाडाचा भाग असणारी व भाग नसणारी. |

| | | |
|---|---|---|
| | सांगावे. जसे - लाल रंगाचे त्रिकोण एकत्र कर. | |
| **विविधता** | मणी, बिया, काड्या, वस्तूंचे गट करायला दयावे. | |
| **थीम/विषय** | भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), मदतनीस, वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.<br>C-2.1 आकार, रंग आणि त्याच्या छटा यांच्यामधील फरक ओळखतो.<br>अ) LO 2.1.2 वस्तूंची त्यांच्या रंगांनुसार विभागणी, गट करतो. उदाहरणार्थ, सगळ्या लाल वस्तू एकत्रित करतो.<br>ब) LO 2.1.2 लांबी, रुंदी, उंची या त्रिमितींच्या आधारावर वस्तूंचे गट करतो.<br>क) LO 2.1.2 1.2 रंग आणि आकार यांच्या वैशिष्ट्यांनुसार वस्तूंचे गट करतो. सगळे लाल त्रिकोण, सर्व मोठी हिरवी पाने एकत्र करतो.<br>CG-8 मसटा बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत, जग समजून घेऊ शकतात.<br>CG-8.8 मूलभूत भौमितिक आकार ओळखणे आकार व मापे यांचा वापर करत, जग समजून घेऊ शकतात.<br>अ) LO 8.8.1 आकार, माप किंवा रंग यांपैकी एका वैशिष्ट्यानुसार जोड्या लावतो.<br>अ) LO 8.8.2 आकार, रंग आणि माप यांसारख्या एका घटकाद्वारे तुलना आणि वर्गीकरण करतो.<br>ब) LO 8.8.1 भिन्न माप आणि रंग यांच्याआधारे आकारांच्या जोड्या लावतो.<br>ब) LO8.8.2 दोन घटकांनुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो.<br>ब) LO 8.8.3 विविध घनाकृती/आकार यांच्या भौतिक वैशिष्ट्यांचे त्याच्या स्वतःच्या भाषेत वर्णन करतो.<br>क) LO 8.8.1.2 तीन घटकांनुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो. (आकार, माप, रंग) | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | संभाषण, वर्गीकरण, विश्लेषण, निर्णय क्षमता, तर्क क्षमता, कार्यकारणसंबंध, रंगज्ञान, शोधकवृत्ती, आकार, आकारमान, रंग यांपैकी एका वैशिष्ट्यानुसार जोड्या लावणे, तुलना करणे, वर्गीकरण करणे ही साक्षरताविषयक कौशल्ये विकसित होण्यासाठी मदत होईल. चिकित्सक विचार, समस्या निराकरण, दोन घटकांनुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करणे ही कौशल्ये विकसित होण्यास मदत होईल. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | दिलेल्या वस्तूंच्या समूहामधून विशिष्ट रंगाची वस्तू बालक वेगळी करू शकते का?, विशिष्ट रंगाच्या वस्तूंचा एक गट तयार करता येतो का? विविध आकार ओळखतो का? रंगानुसार आकाराचे वर्गीकरण करतो का? बालके सूचना समजून सूचनांचे पालन करतात का? वर्ग स्तरावर विविध कृती घेताना सूचना समजून घेतात का? वर्गीकरण करताना विविध | |

| | | |
|---|---|---|
| | गुणधर्मांचा विचार करतात का? बालके सूचनेनुसार तीन गुणधर्मांचा विचार करून, वस्तू देतात का? ते बघावे. | |
| **आधारशिला कृती : 103.1 वर्गीकरण क्रियाकलाप: रंग, आकार, आकार आणि इतर निकषांच्या आधारे क्रमवारी लावा** | | |
| **उपक्रमाचे नाव** | **त्रिमितीय आकारांचे गट करूया** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | | |
| मणी, दगड, रंगीत मणी (वेगवेगळया आकाराच्या त्रिमितीय वस्तू उदा. वेगवेगळया आकाराचे चेंडू, शंकूच्या टोप्या, विविध रंगाचे व आकाराचे तुकडे) विविध रंगाचे त्रिकोण, चौकोन व वर्तुळाकार आकारांचे कागदाचे/कापडाचे/ काडबोर्डचे तुकडे. | | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती १ : गट करूया.<br>• तीन-चार बालकांना गटात बसवावे.<br>प्रत्येक गटात वस्तू दयाव्यात.<br>एका भांड्यात मणी व दगड एकत्र करून बालकांपुढे ठेवावे. मग मणी व दगड वेगळे करण्यास सांगावे. | कृती १ : वर्गीकरण त्रिमितीय आकार<br>वेगवेगळया आकारांच्या त्रिमितीय वस्तू एकत्र कराव्यात.<br>उदा: वेगवेगळया आकारांचे चेंडू, खोकी, लहान मोठ्या शंकूंच्या टोप्या. | कृती १ : आकाराचे खेळ वर्गीकरण<br>तीन रंग लाल, पिवळा, हिरवा तीन आकार : चौकोन, त्रिकोण, वर्तुळ, आकारमान लहान, मध्यम, मोठा असे तुकडे घ्यावेत. बालकांना वर दाखवल्याप्रमाणे एकत्र करून दयावेत. |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| • गट करूया रंगीत मण्यांचे वेगवेगळया रंगांप्रमाणे वेगवेगळे गट करण्यास सांगावे. काही दिवसांच्या सरावानंतर बालके आपले आपण गट करतील. त्यानंतर हा गट कशाचा ? याप्रमाणे प्रश्न विचारून कशानुसार गट केला हे बालकांना विचारावे. • | आपण एक वस्तू काढून दाखवावी व त्याच आकाराच्या व मापाच्या दुसऱ्या वस्तू काढून दाखवण्यास सांगावे.<br>• कृती २ : वर्गीकरण - दोन गुणधर्म खेळणी<br>• बालकांना वर्तुळात बसवावे.<br>विविध मापांचे आकार द्यावेत.<br>• एकाच आकाराचे, परंतु वेगवेगळया मापांचे तुकडे देऊन, सारखे आकार एकत्र करण्यास सांगावे.<br>• याचप्रमाणे विविध रंगांचे विविध मापांचे तुकडे देऊन रंग व आकार एकत्र सांगून, सूचनेप्रमाणे गट करण्यास सांगावे.<br>जसे लाल रंगाचे त्रिकोण एकत्र कर. | त्यावरून एक एक सूचना दयावी. उदा. पिवळया रंगाचा लहान गोल शोधा. हिरव्या रंगाचा सर्वांत मोठा त्रिकोण शोधा. लाल रंगाचा सगळयात लहान चौकोन शोधा.<br>• याप्रमाणे सूचना दयाव्यात व वर्गीकरण खेळ घ्यावा. याप्रमाणे कृती करण्यासाठी ताईने प्रत्येक बालकाला संधी दयाव्या.<br>• बालकांना या सूचना समजत नसतील, तर फक्त रंग आणि आकार सांगावा.<br>उदा. लाल वर्तुळ दे, हिरवा त्रिकोण दे, पिवळा चौकोन दे. |

| | |
|---|---|
| **विविधता** | **मणी, बिया, काड्या, वस्तू यांचे गट करायला दयावे.** |
| **थीम/विषय** | **वाहन** |
| **ताईसाठी सूचना** | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | C-2.1 आकार, रंग आणि त्याच्या छटा यांच्यामधील फरक ओळखतो.<br>अ) LO 2.1.2 वस्तूंची त्यांच्या रंगांनुसार विभागणी, गट करतो. उदाहरणार्थ, सगळया लाल वस्तू एकत्रित करतो.<br>अध्ययन निष्पत्ती<br>ब) 1.02.1.2 लांबी, रुंदी, उंची या त्रिमितींच्या आधारावर वस्तूंचे गट करतो.<br>क) LO 2.1.2 रंग आणि आकार यांच्या वैशिष्ट्यांनुसार वस्तूंचे गट करतो. जसे - सगळे लाल त्रिकोण, सर्व मोठी हिरवी पाने एकत्र करतो.<br>CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत, जग समजून घेऊ शकतात.<br>CG-8.8 मूलभूत भौमितिक आकार ओळखणे आकार व मापे यांचा वापर करत, जग समजून घेऊ शकतात.<br>ब) LO 8.8.3 विविध घनाकृती /आकार यांच्या भौतिक वैशिष्ट्यांचे त्याच्या स्वतःच्या भाषेत वर्णन करतो.<br>क) LO 8.8.1.2 तीन घटकांनुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो. (आकार, माप, रंग)<br>अ) LO 8.8.1 आकार, माप किंवा रंग यांपैकी एका वैशिष्ट्यानुसार जोड्या लावतो.<br>अ) LO 8.8.2 आकार, रंग आणि माप यांसारख्या एका घटकाद्वारे तुलना आणि वर्गीकरण करतो.<br>ब) LO 8.8.1 भिन्न माप आणि रंग यांच्याआधारे आकारांच्या जोड्या लावतो.<br>ब) LO8.8.2 दोन घटकांनुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो. |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | संभाषण, वर्गीकरण, विश्लेषण, निर्णय क्षमता, तर्क क्षमता, कार्यकारण संबंध, रंगज्ञान, शोधकवृत्ती, आकार, आकारमान, रंग यांपैकी एका वैशिष्ट्यानुसार जोड्या लावतो, तुलना करतो, वर्गीकरण करतो, साक्षरताविषयक कौशल्य माहिती, चिकित्सक विचार, समस्या निराकरण, दोन घटकानुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो, चिकित्सक विचार, सर्जनशील विचार, तीन घटकांनुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | दिलेल्या वस्तूंच्या समूहामधून, विशिष्ट रंगाची वस्तू वेगळी करू शकतो का ते पहावे.<br>विशिष्ट रंगाच्या वस्तूंचा एक गट तयार करता येतो का ते पहावे.<br>विविध आकार ओळखतो का? याचे निरीक्षण करावे. रंगानुसार आकाराचे वर्गीकरण करतो का? याचे निरीक्षण करावे. बालके सूचना समजून सूचनांचे पालन करतात का? याचे निरीक्षण करावे.<br>वर्ग स्तरावर विविध कृती घेताना, सूचना समजून घेतात का? याचे निरीक्षण करावे व वर्गीकरण करताना विविध गुणधर्मांचा विचार करतात का? बालके सूचना समजून सूचनांचे |

| | | |
|---|---|---|
| | पालन करतात का? याचे निरीक्षण करावे, वर्ग स्तरावर विविध कृती घेताना, सूचना समजून घेतो का? याचे निरीक्षण करावे व वर्गीकरण करताना विविध गुणधर्मांचा विचार करतात का? बालके सूचनेनुसार तीन गुणधर्मांचा विचार करून वस्तू देतात का ते बघावे. | |
| | | |
| **आधारशिला कृती : 104. Means of Transport: Identify, Describe and Compare** | | |
| **उपक्रमाचे नाव** | **वाहतुकीचे साधन** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्यउपक्रमाला लागणारे साहित्य** | **वाहनाची चित्रकार्डे** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती :<br>• वाहन परिचय कृतीची पद्धत बालकांसमोर विविध वाहनांची चित्रे ठेवावी. एकेक चित्र दाखवून त्याचे नाव विचारावे. त्याचा रंग, ते वाहन कुठे पाहिले आहे, कशासाठी वापर करतात असे प्रश्न विचारावे. | कृती : गट करूया.<br>बालकांसमोर विविध वाहनांची चित्रे ठेवावी. आकाशातून जाणारी, रस्त्यावर चालणारी आणि पाण्यातून जाणारी वाहने असे गट करण्यास सांगावे. | कृती : कोणते वाहन वापरूया.<br>बालकांना प्रसंग सांगावा आणि अंतर, लोकांची संख्या यांचा विचार करून, कोणत्या वाहनाने लवकर जाता येईल असा खेळ खेळावा. उदा- तीन माणसांना गव्हाची पोती घेऊन, एका गावातून शेजारच्या गावी जायचे आहे. त्यांनी कोणत्या वाहनाचा वापर केला पाहिजे. |
| **विविधता** | नवीन वाहनांचा परिचय देऊन, विविधता आणता येईल. | |
| **थीम/विषय** | | |
| **ताईसाठी सूचना** | ताईने यासाठी आवश्यकतेनुसार वयोगटनिहाय उपलब्ध कार्यपुस्तिकेचा वापर करावा. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>पत<br>C-7.1 वेगवेगळया वर्गातील/गटांतील वस्तंमूधील फरक व वस्तंचूा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.<br>अ) LO-7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इ. इतरांच्या मदतीने या नावासहित ओळखतो.<br>ब) LO-7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना, इ. नावासहित ओळखून, स्वतः त्याचे वर्णन करतो. | |

| | | |
|---|---|---|
| | क) LO-7.1.1 लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती, चित्रे ओळखतो, त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (उदा. घराचा मोठा दरवाजा) | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | शब्दसंपत्ती, तार्किक विचार | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | वाहनांची नावे सांगता येत आहेत का, तसेच त्यांचे उपयोग माहीत आहेत का हे पाहावे. | |
| **आधारशिला कृती : 105. माझे कुटुंब कसे दिसते!: चिकणमाती वापरून चित्र काढा, रंगवा, तयार करा** | | |
| **उपक्रमाचे नाव** | **हे आहे माझे कुटुंब.** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **कागद, खडू, रंगीत क्रेऑन** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती : कुटुंबाचे चित्र काढूया.<br>• बालकांना कागद, खडू दयावे. प्रत्येक बालकाला त्याची आई, बाबा, भावंड, घरातील इतर सदस्य यांचे चित्र काढण्यास सांगावे. बालकांनी काढलेली चित्रे ताईंनी समजून घ्यावी आणि कुटुंबाबद्दल बोलते करावे. आईचे नाव काय ? बाबांचे नाव काय ? ते काय काम करतात ? इत्यादी. | कृती : कुटुंबाचे चित्र काढूया.<br>कृतीची पद्धत :<br>• बालकांना कागद खडू दयावे. घरातील सदस्यांचे चित्र काढण्यास सांगावे. चित्र काढताना नाक, कान डोळे काढण्यासाठी प्रोत्साहन दयावे.<br>• बालकांनी काढलेली चित्रे समजून घेऊन, त्या चित्रांना नावे दयावीत, तसेच बालकांशी शैधरीतीलसंश्सदस्यांबद्दल क्षणप्पारिषद, माराव्यात. घरात एकूण किती माणसे आहेत ? कोण कोण कल्प राहते ? घरात सगळयात मोठे कोण आहे? सगळयात लहान कोण आहे? इत्यादी. | कृती : कुटुंबाचे चित्र काढूया.<br>कृतीची पद्धत :<br>बालकांना कागद खडू दयावे. घरातील सदस्यांचे चित्र काढण्यास सांगावे. चित्र काढताना नाक, कान, डोळे काढण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. बालकांनी काढलेली चित्रे समजून घेऊन, त्या चित्रांना नावे दयावी, तसेच बालकांशी घरातील सदस्यांबद्दल गप्पा माराव्यात, तसेच घरी कोणते पदार्थ केले जातात? तुम्ही कोणते सण साजरे करता? आईनी / बाबांनी केलेला कोणता पदार्थ सगळयात जास्त आवडतो? इ. |
| **विविधता** | विस्तारित कुटंबातील सदस्यांचा समावेश करून विविधता आणता येईल. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब. | |
| **ताईसाठी सूचना** | ताईने यासाठी आवश्यकतेनुसार, वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका आणि कार्यपुस्तिकेचा वापर करावा. | |

| | | |
|---|---|---|
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>C-4.1 कुटुंब आणि समाजाचा एक घटक या नात्याने, स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करतो.<br><br>अ) LO-4.1.1 स्वतःची स्वतंत्र व्यक्ती (unique) म्हणून ओळख दर्शवतो आणि आवड सांगतो (उदा. आवडता शर्ट, बॅग, वस्तू.)<br>ब, क) LO-4.1.1 स्वतःला कुटुंब, शेजारी, शाळा आणि शहर यांचा एक घटक म्हणून ओळखतो, जिथे वेगवेगळ्या भूमिका निभावत असतो.<br>C-4.3 इतर बालके आणि प्रौढ यांच्याशी सहजतेने संवाद साधतो.<br>अ, ब) LO-4.3.1.1 कुटुंबातील जवळच्या/ठरावीक सदस्यांना ओळखतो, नावे सांगतो. | |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | संभाषण, लेखनपूर्व तयारी | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | बालकाला कुटुंबाविषयी बोलता येते की नाही, तसेच भावना व्यक्त करता येतात की नाही हे पाहावे. | |
| | | |
| **आधारशिला कृती : 106. नेचर वॉक: वेगवेगळ्या वस्तूंची क्रमवारी आणि वर्गीकरण करा** | | |
| **उपक्रमाचे नाव** | **परिसरातील वस्तूंचे गट करूया.** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **परिसरातील विविध आकार, कमी-जास्त वजनाच्या वस्तू जसे पाने, फुले, काड्या इ. दगड,** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती : गट करूया.<br>• बालकांना वर्गाबाहेर घेऊन जावे. विविध वस्तू गोळा करायला सांगाव्या. गोळा केलेल्या वस्तूंचे दगड, पाने, काड्या असे विविध गट करण्यास सांगावे. | कृती : गट करूया.<br>परिसरातील विविध आकारमानाच्या म्हणजे लहान- मोठ्या वस्तू गोळा कराव्यात. गोळा केलेल्या वस्तूंमधून लहान आणि मोठ्या वस्तू ओळखून, गट करण्याचा खेळ घ्यावा. | कृती : गट करूया.<br>परिसरातील विविध वजन असणाऱ्या वस्तू दयाव्यात. त्यांतून सर्वांत जड व सर्वांत हलकी वस्तू कोणती हे ओळखून गट करण्याचा खेळ घ्यावा. |
| **विविधता** | अ) फुले, पाने यांच्या रंगांनुसार, आकारमानानुसार वर्गीकरण.<br>ब) फुले त्यांच्या वासानुसार<br>क) पाने त्यांच्या स्पर्शानुसार<br>ड) दगड त्यांच्या स्पर्शानुसार, आकारमानानुसार | |
| **थीम/विषय** | पाऊस-पाणी, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक | |

| | |
|---|---|
| **ताईसाठी सूचना** | ताईने यासाठी आवश्यकतेनुसार, वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार व मापे यांचा वापर करत, जग समजून घेऊ शकतात.<br><br>C-8.1 एकापेक्षा जास्त गुणधर्मांच्या आधारे, वस्तू गटात आणि उपगटात वेगळ्या करतो.<br>अ) LO-8.1.1 आकार, लांबी, उंची, वजन यांवर आधारित वस्तू दोन गटांत वेगळ्या करतो. (लहान-मोठा, लांब-आखूड)<br>ब) LO-8.1.1 आकार, लांबी, उंची व वजन यांवर आधारित वस्तू तीन गटांत वेगळ्या करतो. (लहान आकाराचे, मोठ्या आकाराचे, अधिक मोठ्या आकाराचे)<br>क) LO-8.1.1 गुणधर्मानुसार / गुणधर्मावर आधारित वस्तूंचे गट करतो. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | वर्गीकरण, तार्किक विचार |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | परिसरातील वस्तूंचे वर्गीकरण करता येते की नाही हे पाहणे. |

**आधारशिला क्रिया : 107. माझ्या सभोवतालचे प्राणी, कीटक आणि पक्षी : ओळखा, नाव द्या आणि वर्णन करा**

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **परिसरातील प्राणी, पक्षी व कीटक जाणून घेऊया.** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **प्राणी, पक्षी, कीटक यांचे चित्र किंवा चित्रकार्ड** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती : प्राणी, पक्षी, कीटक परिचय<br>• प्राणी, पक्षी, कीटक यांची चित्रे बालकांना वेगवेगळ्या दिवशी दाखववावी.<br>• त्यांची नावे, रंग यांबद्दल चर्चा करावी. | कृती : गट करूया.<br>बालकांसमोर पक्षी प्राणी कीटक यांची चित्रे एकत्रित ठेवावी.<br>• चित्रांचे तीन गट करण्यास सांगावे.<br>• काय विचार करून चित्रांचे तीन गट केले, यावर चर्चा करावी.<br>• प्राणी, पक्षी कीटक यांच्या गुणवैशिष्ट्यांच्या आधारे गट करण्यासाठी मार्गदर्शन करावे. | कृती : फरक सांगूया.<br>बालकांसमोर प्राणी, पक्षी, कीटक यांची चित्रे ठेवावी. त्यांच्या दिसण्यामध्ये काय फरक आहे ते विचारावे.<br>ते काय खातात? कुठे दिसतात ?<br>• प्राणी, पक्षी कीटक यांच्या गुणवैशिष्ट्यांच्या आधारे गट करण्यासाठी मार्गदर्शन करावे.<br>आपल्याला त्यांचा उपयोग कसा होतो ?<br>माणूस आणि प्राणी, पक्षी, कीटक यांच्यामध्ये काय फरक आहे? अशी चर्चा करावी. |
| **विविधता** | परिसरातील वेगवेगळे निरीक्षण | |

| | |
|---|---|
| **थीम/विषय** | प्राणी (पाळीव व जंगली), पक्षी व कीटक, |
| **ताईसाठी सूचना** | ताईने यासाठी आवश्यकतेनुसार, वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका आणि उपलब्ध कार्यपुस्तिकेचा वापर करावा. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.1 वेगवेगळया वर्गातील/गटांतील वस्तंमूधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.<br>अ) LO-7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इ. इतरांच्या मदतीने नावासहित ओळखतो.<br>ब) LO-7.1.1 वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इ. नावासहित ओळखून, स्वतः त्याचे वर्णन करतो.<br>क) LO-7.1.1 लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती ओळखतो, त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (उदा. घराचा मोठा दरवाजा) |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | गट करता येणे. गट केल्यानंतर त्याचे निकष सांगता येणे. फरक सांगता |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | गट करता येतात की नाही. गट केल्यानंतर त्याचे निकष सांगतात की नाही, फरक सांगता येतो की नाही हे पाहणे. |

## आधारशिला कृती : 108. रोल आणि स्लाइडः अंदाज, प्रयोग, शोधा

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | घसरणे आणि घरंगळणे |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य :** | चेंडू, पेन, पेन्सिल, रबर, गोटी, ठोकळा, सेल, बाटली, वेगवेगळया आकाराच्या वस्तू, फळी किंवा मोठी पाटी. |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| कृती :<br>• परिसरातील प्रकारच्या लहान-लहान वस्तू बालकांना देऊन फळीवरून सोडायला सांगाव्यात आणि त्याचे निरीक्षण करू द्यावे. असे दोन तीन वेळा झाल्यावर ताईने स्वतः त्या वस्तू सोडून ही वस्तू घसरली की घरंगळली ते सांगावे. | कृती :<br>• परिसरातील वेगवेगळया प्रकारच्या लहान-लहान वस्तू बालकांना देऊन फळीवरून सोडायला सांगाव्यात आणि त्याचे निरीक्षण करू द्यावे. वस्तू सोडून झाल्यावर ही वस्तू घसरली की घरंगळली ते विचारावे, सगळयात | कृती :<br>परिसरातील वेगवेगळया प्रकारच्या लहान-लहान वस्तू बालकांना देऊन फळीवरून सोडायला सांगाव्यात आणि त्याचे निरीक्षण करू द्यावे.<br>वस्तू सोडून झाल्यावर ही वस्तू घसरली की घरंगळली ते विचारावे, सगळयात शेवटी त्याचे दोन गटात वर्गीकरण करायला सांगावे. |

| | | |
|---|---|---|
| | शेवटी त्याचे दोन गटात वर्गीकरण करायला सांगावे.<br>(घसरलेल्या वस्तू व घरंगळलेल्या वस्तू) | (घसरलेल्या वस्तू व घरंगळलेल्या वस्तू) व अशा परिसरातील अजून कोणत्या कोणत्या गोष्टी फळीवरून घसरतील / घरंगळतील. ते अंदाजाने सांगण्यास सांगावे. शंका असल्यास परत प्रत्यक्ष अनुभव घ्यायला द्यावा. |
| विविधता | बालकांना घरी असा प्रयोग विविध वस्तूंच्या माध्यमातून करून पाहण्यास सांगावे व घसरलेल्या वस्तू व घरंगळलेल्या वस्तू यांची नावे विचारावीत तसेच एखादी वस्तू का घरंगळली असेल यावर चर्चा करावी. | |
| थीम/विषय | मी, माझे कुटुंब व वाहन (आकार) | |
| ताईसाठी सूचना | ताईने यासाठी आवश्यकतेनुसार वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात<br>C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरता /पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेतो<br>LO-7.2.1.2 वस्तूंवरील साध्या क्रियांचे परिणाम स्पष्ट करतो. (उदा. चेंडूला जोरात लाथ मारल्यावर तो पुढे जाईल.)<br>क) LO -7.2.1.3 कार्यकारणभाव जोडतो. (उदा. अब्दुल आजारी असल्यामुळे तो शाळेत आला नाही, पाणी न मिळाल्यामुळे रोप जगले नाही.)<br>क) LO-7.2.2 निरीक्षण करून सामान्यीकरण करतो. (उदा. गोल फिरणाऱ्या वस्तूंचे अवलोकन/निरीक्षण करतो. चाके, बांगड्या यांचा आकार वर्तुळाकार असतो.)<br>CG-8 बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत, जग समजून घेऊ शकतात.<br>C-8.1 एकापेक्षा जास्त गुणधर्मांच्या आधारे, वस्तू गटात आणि उपगटात वेगळ्या करतो.<br>अ) LO-8.1.1 आकार, लांबी, उंची व वजन यांवर आधारित वस्तू, दोन गटांत वेगळ्या करतो. (लहान-मोठा, लांब-आखूड) | |
| साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये | बौद्धिक विकास, घसरणे घरंगळणे ही संकल्पना समजणे. | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | बालके गुणधर्मांनुसार वर्गीकरण करतात का, याचे निरीक्षण करावे. | |
| | | |
| | | |

| आधारशिला कृती : 109. What am I feeling?: Talk, Label, Understand Emotions | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **माझ्या भावना** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य :** | | |
| **चित्रकार्ड, विविध भाव दर्शवणारी बालकांची चित्रे** | **विविध भाव दर्शवणारी चित्रकार्डे (बालकांच्या संख्येनुसार)** | **गोष्ट, चित्रे** |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती : भावना ओळखा.<br>कृती : गंमत बोल<br>• ताईंनी बालकांना अर्धवर्तुळात बसवावे.<br>• खेळ :<br>ताई : मसालेभात मसालेभात<br>बालक : आम्ही नाही खात, आम्ही नाही खात.<br>ताई : का नाही खात, का नाही खात<br>बालक : मीठ नाही त्यात, मीठ नाही त्यात.<br>वरील खेळातील वाक्य ताईंनी वेगवेगळ्या भावना वापरून म्हणायचे.<br>उदा. हसत-हसत, जोरात ओरडत, रडत-रडत, सावकाश हळू आवाजात, रागात असे म्हणावे.<br>• ताईने बालकांना वेगवेगळ्या • भावनांचे इमोजी दाखवावे व काय वाटते आहे ते सांगायला सांगावे. | कृती १ : मला कसे वाटते ?<br>• सर्व फोटो, चित्रे एकत्र समोर ठेवावी.<br>• भावना निर्माण होतील, अशी वाक्ये बालकांना सांगावी व कशी भावना असेल? व त्याचे चित्र उचलण्यास सांगावे.<br>चित्रावरून भावनेचा भा शब्द बालकांना सांगावा व चित्र सांगून सर्वांना शब्द २/३ वेळा म्हणण्यास / उच्चारण्यास सांगावे. उदा.<br>१) मला आज मावशीने खाऊ आणला. - आनंद<br>२) मी आज खेळताना पडले. दुःख<br>कृती २ : गोष्ट ऐकणे.<br>• वेगवेगळे हावभाव असलेली गोष्ट बालकांना ऐकवणे.<br>• गोष्ट वाचताना त्यातील हावभाव चेहऱ्यावर दिसतील असे असावे.<br>बालक खेळताना पडला, तर रडणारा बालक, हसणारी मुलं, रागवणारी आजी इ.अशा वेगवेगळ्या उपक्रमांतून भावना ओळखायला द्याव्यात.<br>कृती ३ : निरीक्षणातून भावना ओळखणे.<br>• बालकांचे दैनंदिन निरीक्षण करून, तो विविध प्रसंगांमध्ये कशाप्रकारे प्रतिसाद देतो याचे नियमित अवलोकन करावे | कृती : डोंगराला आग लागली पळा भावना<br>• भावनांची चित्रे बालकांना वाटून दयावी.<br>डोंगराला आग लागली पळा पळा म्हणून बालकांना पद, वर्तुळात धावण्यास सांगावे.<br>• कोणत्याही एका भावनेचा उच्चार करावा.<br>उदा. राग या भावनेचे चित्र असणाऱ्या बालकांनी वर्तुळामधे यावे. भावनेप्रमाणे ती भावना आपल्या मनात केव्हा निर्माण झाली हे बालकाने सांगावे.<br>• हा खेळ २ दिवसांनी परत भावनांची कार्डे अदलाबदल होतील अशा पद्धतीने घ्यावा.<br>भावना दाखविणारे गाणे घ्यावे.<br>• गप्पा - मला कसे वाटते? वर्गामध्ये एखादी घटना घडल्यास बालकांना काय वाटले? असे विचारावे. उदा. शिल्पा पडली, अमन झोपला. बालकांना वेगवेगळ्या घटना सांगून, त्यांना काय वाटते यावर गप्पा माराव्यात. आईने आवडता खाऊ केला. बहिणीने/ मैत्रिणीने खेळणे घेतले. |

| | |
|---|---|
| **विविधता** | अ) पपेटच्या माध्यमातून बालकांना भावनांची ओळख करून देता येईल.<br>अ) वेगवेगळया इमोजी बालकांना दाखवून तुम्हांला असे कधी वाटते ते विचारावे ?<br>भावनाप्रधान - नाटुकले<br>क) गोष्टीचे नाट्यीकरण करून घ्यावे व बालकांना पात्रांनुसार भावना दाखवण्यास प्रोत्साहन दयावे.<br>ड) बालकांशी त्यांच्या वर्तनात बदल असल्यास गप्पा माराव्यात व कारण विचारून घ्यावे.<br>इ) असेच मला कोणते खेळ असेच मला कोणते खेळ खेळायला आवडतात, कुठे फिरायला जायला आवडते, मला कधी राग येतो, कधी खूप आनंद होतो अशा प्रकारची चित्रे काढायला द्यावीत. |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, मदतनीस |
| **ताईसाठी सूचना** | कलानुभवाच्या माध्यमातून, बालकांच्या भावनांना मोकळीक मिळण्याची संधी द्यावी. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br><br>C-4.2 विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो.<br>अ) LO-4.2.1.2 सोप्या भावना ओळखतो. जसे भीती, आनंद, दुःख.<br>ब) LO-4.2.1.2 भावना शब्दाद्वारे, तसेच हावभाव व इतर प्रकारे व्यक्त करतो. जसे : चित्र रेखाटन, देहबोलीतून<br>ब) LO-4.2.1.1 भावनांची चेहऱ्यावरील हावभाव व शब्द यांच्याशी सांगड घालतो.<br>क) LO-4.2.1.1 स्वतःच्या भावना ओळखून त्याबाबत कारणे सांगतो. जसे - त्याने माझा मनोरा तोडला, म्हणून मला राग आला. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | ब) भावनांची ओळख व व्यक्त करणे, बौद्धिक विकास, भाषिक विकास, कुतूहल निर्माण होणे.<br>ब) बालके सांगितलेल्या वाक्यावरून भावनांचे चित्र उचलतात का? भावनेबद्दल योग्य शब्द सांगतात का? याचे निरीक्षण करावे. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | भावना समजतात का? भावनांवर नियंत्रण ठेवता येते का? याचे निरीक्षण करावे. |

## आधारशिला कृती : 110. तुम्ही मला शोधू शकाल का? : सामायिक केलेल्या निकषांवर आधारित वस्तू शोधा

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | शोधा म्हणजे सापडेल. | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | विविध आकाराच्या व रंगाच्या वस्तू | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |

| | | |
|---|---|---|
| कृती : शोधा म्हणजे सापडेल.<br>• ताईंनी निरनिराळ्या वस्तू वर्गात निरनिराळ्या ठिकाणी लपवून ठेवाव्यात. त्या एकेका वस्तूची चित्रे बालकांना दाखवून त्यांना संकेत (क्लू) दयावेत. उदा. ठोकळा दारामागे लपवला असेल तर चित्र दाखवायचे व कुठे शोधायचा हे सांगण्यासाठी म्हणायचे, 'आपण जिथून वर्गात येतो त्या बाजूला बघा'. | कृती : शोधा म्हणजे सापडेल.<br>वस्तू वर्गात वेगवेगळ्या रंगांच्या पिशव्यांमध्ये किंवा कापडात गुंडाळून लपवून ठेवाव्यात. रंगाचे • वर्णन करू न वस्तू शोधायला सांगावे.<br>अ) आकाशासारख्या रंगात पेन्सिल बसलीय दडून, शोधून काढा. तिला पळत पळत.<br>ब) कुंकवाच्या रंगात पुस्तक रंगले, बालकांनी ते शोधून काढले. | कृती : शोधा म्हणजे सापडेल.<br>• ३ ते ४, ४ ते ५ च्या कृती आधी घ्याव्यात.<br>ताईने एका बालकाला चित्रकार्ड दाखवावे व त्यावरून चित्रातील कृती करायला सांगावी. इतर बालकांनी चित्रकार्ड बघून, बालक कोणती कृती करते आहे हे ओळखावे.<br>जसे : खाण्याची कृती असलेले चित्रकार्ड<br>झोपण्याची कृती असलेले चित्र कार्ड<br>पाणी पिण्याची कृती<br>झाडून घेण्याची कृती<br>दात घासण्याची कृती<br>अंघोळ करण्याची कृती<br>पळण्याची कृती |

| | |
|---|---|
| **विविधता** | बालकांच्या जोड्या कराव्यात. दोघांनीही एकेक वस्तू लपवावी. त्यांना एकमेकांची वस्तू शोधून काढायला सांगावी. वस्तू शोधली, की त्याबद्दल एक वाक्य बोलण्यास सांगावे. |
| **थीम/विषय** | भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), मदतनीस, वाहन (आकार) |
| **ताईसाठी सूचना** | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-10 बालके भाषा एक (LI) मध्ये, सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.<br>10.7 छोट्या बातम्या, सूचना, पाककृती आणि प्रकाशित साहित्य C-10.7 महारा वाचतो आणि त्यांतील अर्थांचे आकलन करून घेतो. क) LO-10.7.1 साध्या, सोप्या, लिखित सूचनांचा छोटा संच वाचतो<br>मसट आणि त्याप्रमाणे त्यांचे पालन करतो.<br>साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये<br>वाचन, चित्रशब्द वाचन करता येते, स्वलेखन करता येते. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | वाचन, चित्रशब्द वाचन करता येते, स्वलेखन करता येते का, याचे निरीक्षण करावे. |

## आधारशिला कृती : 111. Touch, Feel, Recognise : Understand and Compare Textures

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | कडक व मऊ स्पर्श समजणे. |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | विटेचा तुकडा, आंब्याची कोय, चिंचोके, सागरगोटे, बोरांच्या बिया, स्पंजचा तुकडा, पिकलेले फळे, कापूस, कापडी खेळणी, काथ्याची दोरी, सुताची दोरी, खडबडीत दगड, गुळगुळीत दगड, कोमट आणि माठातले/फ्रीज मधील पाणी असलेले दोन पेले, उन्हात |

| | | |
|---|---|---|
| | तापलेला व सावलीतील दगड, पॉलिश/सँड पेपर, घोटीव कागद, परिसरातील झाडांची खोडे, पक्ष्यांची पिसे, मळलेली कणीक, पावडर, रांगोळी, भांडी घासायची स्क्रब घासणी. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती :<br>• कठीण/कडक मऊ स्पर्शाचे अनुभव देणे : विटेचा तुकडा, आब्याची कोय, चिंचोके, सागरगोटे, बोरांच्या बिया, स्पंजचा तुकडा, पिकलेली फळे, कापूस, कापडी खेळणी हे साहित्य एकत्र करून बालकांच्या समोर ठेवावे. बालकांना या साहित्याला प्रत्यक्ष स्पर्श करण्यास सांगावे.<br>• हात लावल्याबरोबर बालकांना कसे वाटले ते विचारावे. बालकांनी त्यांच्या बोलीभाषेमध्ये त्यांचा अनुभव सांगितल्यावर वीट, आंब्याची कोय, इ. गोष्टी हाताला कडक किंवा कठीण लागतात म्हणून सांगावे व स्पंजचाच तुकडा, कापूस, कापडी खेळणी यांसारख्या गोष्टी हाताला मऊ लागतात म्हणून सांगावे.<br>• कठीण/कडक मऊ हे शब्द बालकांना माहीत झाल्यावर, वर दिलेल्या साहित्यासारखे इतर साहित्य एकत्र करून बालकांना त्याचा स्पर्श अनुभवायला सांगावा व तो कसा आहे ते विचारावे व कठीण/कडक-मऊ हे शब्द वारंवार सांगावेत व बालकांकडून म्हणवून घ्यावेत. | कृती :<br>बालकाचे डोळे कापडाच्या पट्टीने हलकेच बंद करावे.<br>• कठीण/कडक-मऊ अशा वस्तू एकेका हातामध्ये दयाव्यात.<br>• बालकांना दोन्ही वस्तूंना स्पर्श करून, ते कसे आहेत ते विचारावे. | कृतीचे नाव : क्रमवारी - स्पर्श<br>कृती :<br>बालकांसमोर दगड, खोडरबर, स्पंज अशा वस्तू ठेवाव्यात. डोळे मिटून स्पर्शाने या तीन वस्तूंची कडक ते मऊ किंवा मऊ ते कडक अशी क्रमवारी लावण्यास सांगावे.<br>• याच प्रकारे तीन स्तरांत वेगवेगळया वस्तूंचा स्पर्शाच्या साहाय्याने क्रम लावण्यास सांगावे. |
| **विविधता** | अ) विविध प्रकारच्या स्पर्श पाट्या तयार करून घ्याव्यात. या पाट्यांना स्पर्श करण्यास बालकांना सांगावे.<br>ब) परिसरातील विविध वस्तूंना स्पर्श करून, तो कसा लागतो हे विचारावे. बालकांच्या पावलांच्या अंतरावर वाळू, खडीचा चुरा, कापूस, स्पंजचे तुकडे, माती, पावडर इ. गोष्टी अंथरून स्पर्शरस्ता तयार करावा.<br>क) बालकांना या रस्त्यावरून अनवाणी चालण्यास सांगावे. प्रत्येक पावलागणिक स्पर्श कसा वाटतो हे विचारावे.<br>ड) शक्य झाल्यास बालशाळेच्या परिसरात स्पर्श उद्यान तयार करावे.<br>https://www.facebook.com/share/r/5JMq2eTuq7BxBaGz/?mib extid=0VwfS7 | |

| | |
|---|---|
| **थीम/विषय** | मी माझे कुटुंब, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, |
| **ताईसाठी सूचना** | स्पर्श संवेदनेसाठी जास्तीत जास्त प्रत्यक्ष अनुभव दयावेत. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.<br>C-2.5 विविध प्रकारच्या स्पर्शामधील फरक करण्याची क्षमता विकसित होते.<br>अ) LO 2.5.1 कठीण/कडक-मऊ, गार-गरम, खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत या स्पर्शामधील फरक समजतो.<br>ब) 4.0 2.5.1 शोधदोन वस्तूंमधील कठीण/कडक-मऊ, गार-गरम, महाराष्खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत, अशी स्पर्शाची तुलना करू शकतो.<br>क) LO 2.5.1 पाच वस्तूंची कठीण/कडक मऊ, गार-गरम, मसुदखरखरीत, गुळगुळीत अशा स्पर्शानुसार क्रमवार मांडणी करू शकतो. (उदा. अति मऊ, मऊ, टणक, अति टणक) |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | स्पर्श, सूचना समजून, त्यानुसार वर्तन करणे. विविध वस्तू ओळखता येणे. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | परिसरामध्ये वावरताना बालक विविध स्पर्शांसाठी योग्य शब्द वापरत आहे का, ते पाहणे. |

**क्रिया क्र. : 111.1 स्पर्श करा, अनुभवा, ओळखा: टेक्सचर समजून घ्या आणि तुलना करा.**

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | खडबडीत व गुळगुळीत स्पर्श समजणे. |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | विटेचा तुकडा, आंब्याची कोय, चिंचोके, सागरगोटे, बोरांच्या बिया, स्पंजचा तुकडा, पिकलेली फळे, कापूस, कापडी खेळणी, काथ्याची दोरी, सुताची दोरी, खडबडीत दगड, गुळगुळीत दगड, कोमट आणि माठातले / फ्रीजमधील पाणी असलेले दोन पेले, उन्हात तापलेला व सावलीतील दगड, पॉलिश / सँड पेपर, घोटीव कागद, परिसरातील झाडांची खोडे, पक्ष्यांची पिसे, मळलेली कणीक, पावडर, रांगोळी, भांडी घासायची स्क्रब घासणी. |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| कृती :<br>• स्पर्श ओळख : खडबडीत / गुळगुळीत खडबडीत दगड, गुळगुळीत दगड, काचेच्या गोट्या सागरगोटे, चिंचोके, बोराची बी, फणसाची बी, आंब्याची कोय, बाभळीची बी, खर, कागदाचे वेगवेगळे नमुने, रांगोळी, भांडी घासायची स्क्रब घासणी हे साहित्य एकत्र करून बालकांच्या समोर ठेवावे. | कृती :<br>• ३ ते ४ वयोगटाच्या कृती घ्याव्यात.<br>• त्यानंतर बालकाचे डोळे कापडाच्या पट्टीने हलकेच बंद करावे.<br>• खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत • अशा वस्तू एकेका हातामध्ये दयाव्यात. बालकांना दोन्ही वस्तूंना स्पर्श करून, ते कसे आहेत ते विचारावे. | कृती : क्रमवारी - स्पर्श<br>• बालकासमोर जास्त गुळगुळीत, कमी गुळगुळीत व खडबडीत असे तीन दगड ठेवावे. बालकाला तीनही दगडांना स्पर्श करून बघण्यास सांगावे.<br>ते तीनही दगड गुळगुळीतपणाच्या क्रमानुसार रांगेने ठेवावे.<br>• बालकाला सर्वांत जास्त |

| | | |
|---|---|---|
| • बालकांना प्रत्यक्ष स्पर्श करण्यास सांगावे. हात लावल्याबरोबर बालकांनाच कसे वाटले ते विचारावे.<br><br>बालकांनी त्यांच्या बोलीभाषेमध्ये त्यांचा अनुभव सांगितल्यावर, वीट, खडबडीत दगड, बोराची बी, आंब्याची कोय इ. गोष्टी हाताला खडबडीत लागतात म्हणून सांगावे व गुळगुळीत दगड, काचेच्या गोट्या, सागरगोटे, चिंचोके, बाभळीची बी यांसारख्या गोष्टी हाताला गुळगुळीत लागतात म्हणून सांगावे, तसेच खर कागदाचे वेगवेगळे नमुने, रांगोळी, भांडी घासायचा स्क्रब हे खरखरीत लागतात, असे सांगावे. खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत हे शब्द बालकांना माहीत झाल्यावर, वर दिलेल्या साहित्यासारखे इतर साहित्य एकत्र करून बालकांना त्याचा स्पर्श अनुभवायला सांगावा व तो कसा आहे ते विचारावे व खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत हे शब्द वारंवार सांगावेत व बालकांकडून म्हणवून घ्यावेत. | | गुळगुळीत दगड दाखवून सांगा, की हा सर्वांत जास्त गुळगुळीत दगड आहे. नंतर यापेक्षा कमी गुळगुळीत दगड दाखवून सांगा, की हा यापेक्षा कमी गुळगुळीत दगड आहे व नंतर खडबडीत दगड दाखवावा.<br>• आता तीनही दगड एकत्र ठेवून, बालकाला गुळगुळीतपणानुसार रांगेने मांडण्यास सांगावे. |

| | |
|---|---|
| **विविधता** | अ) विविध प्रकारच्या स्पर्श पाट्या तयार करून घ्याव्यात. या पाट्यांना स्पर्श करण्यास बालकांना सांगावे.<br>ब) परिसरातील विविध वस्तूंना स्पर्श करून तो स्पर्श कसा आहे, हे विचारावे<br>क) बालकांच्या पावलातील अंतर लक्षात घेऊन वाळू, खडीचा चुरा, कापूस, स्पंजचे तुकडे, माती, पावडर इ. गोष्टी अंथरून स्पर्श रस्ता तयार करावा.<br>ड) बालकांना या रस्त्यावरून या रस्त्यावरून अनवाणी चालण्यास सांगावे. प्रत्येक पावलागणिक स्पर्श कसा वाटतो हे विचारावे. X<br>इ) शक्य झाल्यास, बालशाळेच्या परिसरात स्पर्श उदयान तयार करावे.<br>https://www.facebook.com/share/r/5JMq2eTuq7BxBaGz/?mibextid=0VwfS7 |
| **थीम/विषय** | भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, |
| **ताईसाठी सूचना** | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.<br>C-2.5 विविध प्रकारच्या स्पर्शांमधील फरक करण्याची क्षमता विकसित होते. |

| | | |
|---|---|---|
| | अ) LO 2.5.1 कठीण/कडक-मऊ, गार-गरम, खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत, स्पर्शांमधील फरक समजतो.<br>ब) LO 2.5.1 दोन वस्तूंमधील कठीण/कडक-मऊ, गार-गरम, खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत अशी स्पर्शाची तुलना करू शकतो.<br>LO 2.5.1 तीन ते पाच वस्तूंची कठीण / कडक मऊ, गार-गरम, खरखरीत, गुळगुळीत अशा स्पर्शानुसार क्रमवार मांडणी करू शकतो. (उदा. अति मऊ, मऊ, टणक, अति टणक) | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | स्पर्श सूचना समजून त्यानुसार वर्तन करणे. विविध वस्तू ओळखता येणे. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | परिसरामधे वावरताना बालक विविध स्पर्शासाठी योग्य शब्द वापरते आहे का ते पाहावे, स्पर्श ओळखून सांगता येतात का याचे निरीक्षण करावे. | |
| | | |
| **कृती क्र.: 112. ड्रेसिंग: गरज, विविधता समजून घेणे आणि स्वायत्ततेचा सराव करणे** | | |
| **उपक्रमाचे नाव** | जसा ऋतू तसा वेश | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | हिवाळा, उन्हाळा व पावसाळा या ऋतूत वापरले जाणारे कपडे व वस्तू, कागदाचे कपडे, कागदाची बाहुली. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती : कपडे घाला बाहुलीला<br>• ताईने बालकांना वर्तुळावर बसवावे. वर्तुळाच्या मध्यात बाहुलीचे मोठे चित्र ठेवावे.<br>कागदावर चित्र काढून, कागदाचे विविध कपडे तयार करावेत.<br>ऋतू आणि रंग, सण आणि रंग असे वर्णन सांगून बाहुलीसाठी कपड्याची निवड करण्यास सांगावे. उदा. अ. आली आली थंडी बाहुलीला भरली हुडहुडी बोला बोला कपडे कोणते दयाल ? बाहुली निघाली लग्नाला. टिकल्यांचा लाल फ्रॉक हवाय तिला. | कृती :<br>ताईने बालकांना आपण स्वेटर, शेटोपीक हातमोजे, पायमोजें है पद हार कपडे कधी घालतो ते विचारावे वा प्रत्यक्ष दाखवावे<br>• थंडीतच हे सगळे कपडे का घालतो ? खूप गरम होते, तेव्हा कसे कपडे घालतो ? | कृती : कपडे घाला एकमेकांना<br>ताईने दोन बालके/दोन बालिका अशा जोड्या लावाव्या.<br>• त्यांना एक प्रसंग दयावा. ऋतू, रंग, सण आणि रंग यांनुसार प्रत्येक बालकाला घरून कोणतातरी ड्रेस आणायला सांगावा.<br>रेनकोट, स्वेटर, बाहेर जायचे कपडे, रंगपंचमीला घालता येतील असे कपडे, जोडीने उभे राहून एकमेकांना घालून दाखवायला सांगावे. |
| **विविधता** | सर्व प्रकारचे कपडे एकत्र ठेवून रंग, उपयोग, ऋतु, स्त्री-पुरुष, बाळ अशा वेगवेगळया प्रकारे वर्गीकरण करण्याची संधी बालकांना द्यावी. | |
| **थीम/विषय** | ऋतू | |

| | | |
|---|---|---|
| **ताईसाठी सूचना** | ताईने यासाठी आवश्यकतेनुसार वयोगटनिहाय उपलब्ध कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरता / पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेतो.<br>ब) LO 7.2.3.1 उन्हाळा आणि हिवाळा ओळखतो.<br>क) LO 7.2.3.1 उन्हाळा आणि हिवाळा ऋतुनुसार कपडे आणि अन्न- पदार्थ ओळखतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | हवामानानुसार कपडे घालण्याची समज विकसित होण्यास मदत होईल. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | हवामानातील बदल सांगता येतात का, ऋतू समजतात का, त्याबद्दल बोलतात का याचे निरीक्षण करावे. | |
| क्रिया क्र. : 113. अपंगत्व आणि समावेश: ओळखा, समाविष्ट करा, समजून घ्या आणि आदर करा | | |
| **उपक्रमाचे नाव** | मदत करूया | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | रुमाल, दोरी, दिव्यांग व्यक्तीची चित्रकार्ड, कापूस | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
| कृती :<br>• ताईने बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. बालकांना विचारा, ज्या अंध व्यक्ती असतात त्यांना दिसत नाही, ते कसे चालत असतील, वस्तू कशा ओळखत असतील. एकेका बालकाला बोलावून, त्याच्या डोळ्याला रुमाल बांधावा आणि विचारावे काही दिसत आहे का? या बालकाच्या हातात एखादी वस्तू दयावी. | कृती :<br>• ३ ते ४ वयोगटाची कृती घेऊन मग ही कृती घ्यावी.<br>विशेष गरजा असणाऱ्या बालकांचा समावेश करून खेळाकडे लक्ष  दयावे. श्रवणक्षमतेचे अनुकरण करण्यासाठी कानात कापसाचे बोळे घालावे. अपंगत्वासाठी पायाभोवती पट्ट्या बांधा. चालताना काय अडचण आली यावर चर्चा करावी. | कृती :<br>• ३ ते ५ या वयोगटाच्या कृती आधी घ्याव्यात. अपंगत्व आणि इतर बालकांबद्दल चर्चा करावी. बालकांना दिव्यांग व्यक्तीची चित्रकार्ड आणि प्रत्येक बालक किंवा व्यक्ती इतरांपेक्षा कसे वेगळे आहे याबद्दल बोलण्यास सांगावे.<br>अपंग व्यक्तींनी वापरलेल्या साधनांची चित्रे सादर करा, त्यांची नावे आणि उद्देश स्पष्ट करून, त्यावर चर्चा करावी. |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| कोणती वस्तू आहे हे हातात असल्यावर ओळखता येते का? असे प्रश्न विचारावे. याप्रकारे चर्चा करावी. | बालकांना येणाऱ्या अडचणींची चर्चा करा आणि त्याचा वास्तविक जीवनातील अनुभवांशी संबंध ठेवा. | आपल्या आजूबाजूला जर अशा व्यक्ती असतील तर, आपण यांना कोणती मदत करावी, याबद्दल बालकांना सांगावे. |

| | | |
|---|---|---|
| | आपल्या आजूबाजूला जर अशा व्यक्ती असतील, तर आपण त्यांना कोणती मदत करावी, याबद्दल बालकांना सांगावे.<br>• कानात बोळा घालून ऐकायला येते का हे विचारावे.<br>• ज्या लोकांना ऐकायला येत नाही, ते कसे बोलत असतील.<br>• आपल्या आजूबाजूला जर अशा व्यक्ती असतील तर, आपण यांना कोणती मदत करावी, याबद्दल बालकांना सांगावे. | |
| **विविधता** | आपल्या आजूबाजूला अशा दिव्यांग व्यक्ती असतील, तर त्यांचे अनुभव किंवा त्यांना त्यांनी कशी मदत केली यावर चर्चा करावी. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, प्राणी (पाळीव व जंगलातील) | |
| **ताईसाठी सूचना** | ताईने सुलभ संदर्भासाठी उपलब्ध कार्यपुस्तिकेचा वापर करावा. त्यानुसार उपलब्ध चित्रकार्ड यांचा वापर करून चर्चा करावी. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>C-4.4 इतर बालकांबरोबर सहकार्यवृत्तीने वागतो.<br>अ) LO 4.4.1 इतर बालकांबरोबर खेळायला सुरुवात करतो.<br>ब) LO 4.4.1 इतर बालकांबरोबर खेळताना आनंद घेतो.<br>क) LO 4.4.1 इतर बालकांबरोबर खेळायला सुरुवात करतो आणि खेळासंबंधी योजना आखतो. (उदा. काय खेळू, कसे खेळू, कधी खेळू)<br>C-4.6 गरजेच्या वेळी इतरांना (प्राणी आणि वनस्पतींसह) मदत करतो आणि दयाभाव दर्शवितो.<br>ब) LO 4.6.1 इतर बालके आणि प्रौढांप्रति आपुलकी दर्शवतो.<br>क) LO.6.1 कारण सामग्री4.<br>C-4.7 इतर बालकांचे विचार, त्यांचे प्राधान्य, भावनिक गरजा लक्षात घेऊन, त्यांना सकारात्मक प्रतिसाद देतो.<br>ब) LO 4.7.1 बालक सर्व बालकांशी, त्यांची पार्श्वभूमी व क्षमतांबद्दल विचार न करता, खेळतो व संवाद साधतो.<br>क) LO 4.7.1 बालकांमधील सारखेपणा, वेगळेपणा ओळखण्यास सुरुवात करतो. (उदा. उंची, लिंगभाव, बोलण्याची पद्धती, खाण्याच्या आवडीनिवडी) | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता/कौशल्ये** | संवेदनशीलता, समानानुभूती | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | इतरांबद्दल काळजी, प्रेम वाटते का, काळजी घेतात का हे बघावे. | |

**कृती क्र.: 114. Let's discuss : Safe and unsafe situations around us (चला चर्चा करूया: आपल्या सभोवतालच्या सुरक्षित आणि असुरक्षित परिस्थिती विषयी)**

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **जरा हळू, जरा जपून** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **जाड दोरी व त्याला एकेका फुटावर गाठ मारलेली असावी, खडू, रांगोळी, चुना, ट्रॅफिक सिग्नल.** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती : दोर धरून चालूया<br>• एक जाड दोरी किंवा ओढणी घेऊन तिला साधारण एका फुटावर गाठी माराव्यात. प्रत्येक बालकाला एकेक गाठ पकडून उभे राहण्यास सांगावे.<br>• बालकांना सांगावे, की मोठ्या रस्त्यावर जाताना, प्रत्येकाने दोरीची गाठ धरून चालायचे आहे आणि बागेत आलो की झाडाखाली बसून, खाऊ खाताना दोरी सोडायची आहे.<br>• आता ताईने सांगावे, की आपण खेळ खेळू या "आपण मोठ्या रस्त्याने चाललो आहोत." असे म्हटले, की बालकांनी दोरी धरून चालावे आणि "बागेत झाडाखाली बसलो." असे म्हटले, की दोरी सोडून खाली बसावे.<br>https://www.youtube.com/shorts/erIjxnFjCTs | पूर्वज्ञान : डावा व उजवा या दिशादर्शक संकल्पना माहीत असणे.<br>कृती- रस्त्याच्या उजव्या बाजूने<br>• वर्गामध्ये किंवा वर्गाबाहेर खडूने पण् सरळ तसेच वळणावळणांचा<br>रस्ता आखावा<br>• बालकांना रस्त्याच्या उजव्या बाजूने चाला अशी सूचना दयावी. 'उजव्या बाजूने चालल्यावर आपल्याला समोरून येणारी वाहने दिसतात व अपघात होत नाहीत.'<br>• ताईने उजव्या बाजूने म्हणजे कुठून, ते चालून दाखवावे.<br>• बालकांना रस्त्यावर विविध ठिकाणी उभे करावे.<br>• ताईने टाळ्या वाजवल्यावर बालकांनी रस्त्याच्या उजव्या बाजूला येऊन चालायला सुरूवात करावी.<br>• टाळ्या वाजवायचे थांबल्यावर, बालकांनी रस्त्याच्या बाहेर जाऊन उड्या मारायच्या आणि टाळ्या वाजवायला सुरुवात केल्यावर, पुन्हा उजव्या बाजूने चालायला सुरुवात करावी.<br>• रस्ता संपल्यावर उलट्या दिशेने चालण्यास सुरुवात करावी तेव्हा डावी बाजू कोणती आहे हे बालकांच्या लक्षात आणून दयावे. | कृती: ट्रॅफिक सिग्नल खेळ लाल, पिवळा, व हिरवा हे सिग्नल समजणे.<br>• बालकांना सहज दिसतील व समजातील अशा प्रकारे (खडू, पद, रांगोळी किंवा चुना वापरून) रस्ते व चौक आखावेत. चौकामध्ये झेब्रा क्रॉसिंग आखावे.<br>• बालकांना लाल सिग्नल म्हणजे थांबा, पिवळा म्हणजे सावधपणे चाला व हिरवा म्हणजे पुढे जा असे सिग्नलचे अर्थ समजावून सांगावेत.<br>• बालकांना खेळण्यातील गाड्या घेऊन रस्त्यावर चालवायला सांगावे.<br>• ताइन लाल सिग्नल दाखवावा व क्रॉस लाईनच्या पूर्वी थांबण्याची सूचना करावी नंतर हिरवा सिग्नल दाखवावा व बालकांना पुढे जाण्यास सांगावे.<br>• तर पिवळा सिग्नल दाखवावा व बालकांना सावधपणे पुढे जाण्यास सांगावे.<br>• बालकांना सिग्नल चांगले समजल्यावर वर्गातील एखादया बालकाला सिग्नल दाखवण्यास सांगावे.<br>कृती क्र. २<br>कृती: झेब्रा क्रॉसिंगचा खेळ.<br>• झेब्रा क्रॉसिंग व क्रॉस लाईन आखावी बालकांना खेळण्यातील बद, गाड्या घेऊन चालवायला सांगावेत. रस्त्यावर<br>• ताईने लाल सिग्नल दाखवावा व क्रॉस लाईनच्या पूर्वी थांबण्याची सूचना करावी.<br>• क्रॉस लाईनच्या आधी वाहने थांबल्यावर, |

<table>
<tr><td></td><td>• आजोबांबरोबर चालूया बालकांच्या जोड्या कराव्यात. एका बालकाला मोठ्या माणसाची भूमिका दयावी.<br><br>• रस्ता आला म्हटल्यावर, लहान बालकाने मोठ्या माणसाचा हात धरावा आणि झाडाखाली बसलो म्हटल्यावर हात सोडावा. क्षण परि<br>• पुढील गाणे तालासुरात आणि हावभावांसहित म्हणावे. गाणे-<br>चिऊताईच्या पिला, खरं खरं सांग मला<br>आभाळातले रस्ते कसे सापडतात तुला<br>आभाळातील रस्त्यांवर पांढऱ्या खुणा असतात का?<br>लाल, हिरव, पिवळ दिव पोलीसदादा असतात का?<br>वाट विसरून चुकलास, तर गेटावर नेतात का?<br>नाव ,गाव, पत्ता विचारून गोळया, बिस्किट देतात का?</td><td>इतर बालकांना झेब्रा क्रॉसिंगवरून रस्ता पार करण्यास सांगावे.<br>• नंतर हिरवा सिग्नल दाखवावा व बालकांना गाड्या पुढे जाऊदया असे सांगावे. त्यावेळी बालकांना पादचारी यांनी रस्ता पार करू नये म्हणून सांगावे.<br>• नंतर पिवळा सिग्नल दाखावावा व बालकांना सावधपणे पुढे जाण्यास सांगावे.<br>• बालकांना सिग्नल चांगले समजल्यावर वर्गातील एखादया मुलाला सिग्नल दाखविण्यास सांगावे.<br>कृती क्र. ३<br>कृती : रहदारी चिन्ह परिचय<br>• यू टर्न, अरुंद पूल आहे, पुढे शाळा आहे, पुढे दवाखाना आहे, नो पार्किंग, पुढे रेल्वे क्रॉसिंग आहे ही चिन्हे कार्डबोर्डवर तयार करावीत. रस्त्यावर ही चिन्हे लावावीत व बालकांना त्याचा अर्थ सांगून, त्याप्रमाणे कृती करवून घ्यावी.<br>https://www.youtube.com/watch?v=UDfYSz6EHEE</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">रस्त्याने चालताना कोणती काळजी घ्यावी. रस्त्यावरील सांकेतिक चिन्हांचा अर्थ समजून घेऊन वागणे याविषयी वर्गात नाट्यीकरण करून घ्यावे. शहरातील रस्त्यांवरील चौक, सिग्नल या संदर्भातील मोठ्या चित्रकार्डाचे चित्रवाचन करून घ्यावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब, वाहन</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">ताईने सुलभ संदर्भासाठी उपलब्ध कार्यपुस्तिका वापरावी, तसेच त्यामध्ये दिलेल्या सूचनेनुसार चित्रांच्या आधारे कृती करून घ्याव्यात.</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये</td><td colspan="2">CG-1 बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>CG-1.5 हालचालींमध्ये सहजता दाखवतो आणि योग्यरीतीने वागतो. (चालणे, धावणे, सायकल चालविणे)<br>अ) LO 1.5.1 रस्त्यावरील सुरक्षितता महत्त्वाची आहे हे ओळखतो, रस्त्याने मोठ्यांचा हात पकडून चालतो.<br>ब) LO 1.5.1 रस्ता ओलांडताना दोन्ही बाजूला पाहतो, बरोबरच्या बालकांचे किंवा प्रौढांचे हात पकडून सुरक्षितपणे चालतो.<br>क) LO 1.5.1.1 स्वतंत्रपणे रस्ता सुरक्षिततेचे नियम पाळतो. (रस्त्याच्या कडेने चालणे, रस्ता ओलांडणे इ.)<br>क) LO 1.5.1.1 वाहतुकीची चिन्हे ओळखतो. (सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग, यू टर्न, पूल/रेल्वे पूल इ.)</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>C-4.5 शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन, त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो.<br>अ) LO 4.5.2 ताईंच्या मदतीने साध्या सूचनांचे पालन करतो.<br>क) LO 4.5.2 शाळेत मोठ्यांनी आठवण करून दिल्याशिवायही साध्या नियमांचे पालन करतो. | |
| अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती | जीवन कौशल्यांचा विकास, सामाजिक विकास, स्वयंशिस्त, सूचनांचे अनुसरण, रंगांची ओळख, नियम व कायदे यांबाबतचा आदर जागरूक होण्यास मदत होईल म्हस्यम | |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | दैनंदिन जीवनात बालके या प्रकारे नियमांचे पालन करत आहेत का, याचे निरीक्षण करावे | |
| | | |
| **कृती क्र.: 115. Logo Wall / Word Wall** | | |
| **उपक्रमाचे नाव** | **चित्र बघूया व वाचूया** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | | |
| **साबण/बिस्कीट/चहा/पेस्ट/ पेन्सिल/दूध यांचे रॅपर्स. गोष्टीची पुस्तकं.** | **पुस्तके, वर्तमानपत्रे, दिनदर्शिका, तक्ते, निमंत्रण पत्रिका इत्यादी लिखित स्वरूपातील विविध नमुने.** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती: रॅपर्स पाहून वस्तू ओळखूया<br>ताईने साबण/बिस्कीट/चहा/ पेस्ट/पेन्सिल/दूध यांसारख्य वस्तूंचे कागद (रॅपर्स) यांच संग्रह करावा.<br>• वर्गामध्ये खाली जमिनीवर वरील रॅपर्स मांडून ठेवावी. बालकांना मांडलेल्या रॅपर्सचे निरीक्षण करावयास सांगावे. प्रत्येक रॅपरवर बोट ठेवून, हे कोणत्या वस्तूचे रॅपर आहे असे विचारावे. ताईने प्रत्येकाचे दोन दोन रॅपर जमवावे. बालकांना त्याच्या जोड्या लावायला दयाव्यात. ताईकडे अशा रॅपरचा संग्रह असावा. | कृती १ : माहिती मिळवूया.<br>• ताईने बालकांना रस्त्यावर असलेले बोर्ड, पुस्तकातील चित्रे, मासिकातील जाहिराती दाखवाव्यात. यातून काय काय माहिती मिळते, याबाबत बालकांबरोबर चर्चा करावी.<br>• वर्तमानपत्रातील खाऊच्या जाहिरातीचे चित्र, फळांचे, भाज्यांचे चित्र यांवर आधी चर्चा घ्यावी. उदा.<br>कृती २ : नावे ओळखूया.<br>• ताईने वर नमूद केलेले विविध लिखित स्वरूपातील नमुने गोळा करून, त्याचे वर्गात प्रदर्शन करावे. उदा. टूथपेस्ट, दूध, खाद्यपदार्थांच्या पॅकेटवरील नावे असलेली कार्डे<br>• बालकांना प्रदर्शनाचे निरीक्षण करण्यास सांगावे.<br>पाहिलेल्या लिखित नमुन्यांबद्दल पुढील प्रश्न विचारावे.<br>• प्रश्न हे आधी पाहिले आहे का? कुठे पाहिले आहे? याचा उपयोग कशासाठी करतात? यामध्ये कशाकशाची माहिती असते ? | |
| **विविधता** | बालकांना विविध प्रकारचे रॅपर्स घरून आणावयास सांगावे आणि सारख्या दिसणाऱ्या रॅपर्सच्या जोड्या लावण्याचा खेळ घ्यावा. वर्गात पुस्तकांचा वाचन कोपरा तयार करावा. त्यामध्ये मोठ्या व रंगीत, आकर्षक चित्र असणाऱ्या पुस्तकांचा वर्तमानपत्रांचा संग्रह करावा | |

| | |
|---|---|
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब व परिसर, वाहन |
| **ताईसाठी सूचना** | ताईने सुलभ सदर्भासाठी उपलब्ध कार्यपुस्तिका वापरावी, तसेच त्यामध्ये दिलेल्या सूचनेनुसार, चित्रांच्या आधारे कृती करून घ्याव्यात. वयोगटनिहाय उपलब्ध करून देण्यात आलेल्या कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-10 बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात. मसूदा प्रत<br>C-10.2 पुस्तकाची मूलभूत रचना/स्वरूप, मुद्रित अक्षरांची कल्पना ओळखतो, मुद्रित झालेल्या मजकुराची दिशा समजून घेतो व पुस्तकातील प्राथमिक विरामचिन्हे ओळखतो.<br>अ) LO 10.2.1 सर्वसामान्य चिन्हे, प्रतीके, मुद्रा (लोगो) ओळखतो. (उदा. बिस्किट किंवा साबणाचे आवरण किंवा रंगावरून विशिष्ट बिस्किट किंवा साबण ओळखतो.)<br>अ) LO 10.2.2 मुद्रित मजकूर आणि चित्रांमध्ये फरक करतो.<br>ब) LO 10.2.1 पुस्तक पकडतो, उघडतो व चाळण्यासाठी पान पलटतो.<br>ब) LO 10.2.2 डावीकडून उजवीकडे आणि वरून-खाली शब्दांचे अनुसरण करतो.<br>क) LO 10.2.1 मुद्रित साहित्यातून माहिती मिळते असे वर्णन करतो (उदा पस्तक, वर्तमानपत्र, माहितीपत्रक), |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | निरीक्षण, साम्यभेद, वाचन पूर्वतयारी. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | रॅपर्स वरील लोगो, चिन्ह पाहून वस्तू ओळखता येतात का ते पाहावे. बालके पुस्तक हातात उचलून, पाने उलटण्याची योग्य क्रिया करत आहेत की नाही याचे निरीक्षण करावे. पुस्तके पाहिल्यानंतर त्याबद्दल बोलता येते की नाही हे पाहावे. |

## कृती क्र.: 116. Big Feelings : Express Release and Manage

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **चित्र बघून भावना ओळख.** |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **विविध इमोजी, चित्रकार्ड, चेंडू** |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| • ताईने आनंद, दुःख, निराश, रागीट, आश्चर्य अशा इमोजीज बालकांना दाखवाव्यात.<br><br>• बालकांना एक एक इमोजी दाखवून, त्यांना त्या ओळखण्यास सांगावे, तसेच त्यांना कोणतेही एक भावनाकार्ड दाखवून, त्यांना असे कधी वाटते? याबद्दल चर्चा करावी. | • बालकांना वर्तुळाकार बसवावे.<br>• वर्तुळामध्ये संगीताच्या तालावर चेंडू शेजारच्या बालकाकडे पास करण्यास सांगावे.<br>• संगीत बंद झाले, की ज्याच्या जवळ चेंडू असेल, त्याने वर्तुळामध्ये यावे. ताईने त्या बालकास कानात एक भावना सांगावी,ती भावना बालकाने आपल्या हावभावातून व्यक्त करावी. किंवा त्या संदर्भात प्रसंग सांगावा. | कृती : चित्र काढूया भावना मला कशाकशाचा राग येतो ताईने बालकांना कागद दयावा.<br><br>• त्यावर त्यांना कशाकशाचा राग येतो याचे चित्र काढायला सांगावे.<br>चित्र काढताना ताईचे सगळया बालकांकडे लक्ष असावे.<br>द. बालकांचे चित्र काढून झाल्यावर, त्यांना विचारून त्यांनी कशाकशाचे चित्र काढले आहे. त्याची नावे त्यांच्या चित्रावर लिहावी. |

| | | |
|---|---|---|
| | • वर्तुळातील उर्वरित बालकांनी ती भावना ओळखावी.<br>• असा खेळ सर्व मुलांना संधी मिलेपर्यंत खेलावा | (काही बालके चित्र काढणार नसतील, तर त्यांना जबरदस्ती करू नये.)<br>• बालकांनी काढलेली चित्रे वर्गात लावावीत. |
| **विविधता** | गप्पा - मला कसे वाटते ?<br>वर्गामध्ये एखादी घटना घडल्यास, बालकांना याबाबत तुम्हांला काय वाटले? असे विचारावे.<br>उदा. शिल्पा पडली, अमन झोपला.<br>बालकांना वेगवेगळ्या घटना सांगून त्याबद्दल काय वाटते यावर त्यांच्याशी गप्पा माराव्यात. आईने आवडता खाऊ केला. बहिणीने / मैत्रिणीने खेळणे घेतले.<br>पपेटच्या माध्यमातून बालकांना भावनांची ओळख करून देता येईल. वेगवेगळ्या इमोजी बालकांना दाखवून, तुम्हांला असे कधी वाटते ते विचारावे ? | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक | |
| **ताईसाठी सूचना** | जादुई पेटाऱ्यातील भावनाविषयक साहित्याच्या आधारे कृती करून घ्याव्यात.<br>ताईने सुलभ संदर्भासाठी उपलब्ध कार्यपुस्तिका वापरावी, तसेच वयोगटनिहाय उपलब्ध करून देण्यात आलेल्या कतिपत्रिका सोडवन घ्याव्यात. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>C-4.2 विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो.<br>अ) LO 4.2 सोप्या भावना ओळखतो. जसे भीती, आनंद, दुःख.<br>ब) LO 4.2 भावनांची चेहऱ्यावरील हावभाव व शब्द यांच्याशी सांगड घालतो.<br>अ) LO 4.2.1.1 स्वतःच्या भावना ओळखून, त्याबाबत कारणे सांगतो.. जसे त्याने माझा मनोरा तोडला म्हणून मला राग आला. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | भावनिक बुद्धिमत्ता, आपुलकी मदतीची भावना, बौद्धिक विकास, भाषिक विकास, कुतूहल निर्माण होण्यास मदत होईल. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालके एखाद्या घटनेला प्रतिसाद कसा देतात, त्यांना काय वाटते, याचे निरीक्षण करावे.<br>बालके सांगितलेल्या वाक्यावरून भावनांचे चित्र उचलतात का? भावनेबददल योग्य शब्द सांगतात का? याचे निरीक्षण करावे. | |

## कृती क्र.: 117. Shadow Game : Understand, Create and Guess

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | हा खेळ सावल्यांचा | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | टॉर्च विविध सामग्रीसह कागद, मासिके, दगड आणि रिकाम खोके | |
| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |

| | | |
|---|---|---|
| • ताईने बालकांना वर्गाच्या बाहेर घेऊन जावे.<br>• झाडांच्या, वनस्पती, प्राण्यांच्या सावल्या आणि स्वतःच्या सावलीचे त्यांना निरीक्षण करण्यास प्रोत्साहित करा.<br>• बालकांना वेगळे काही दिसते का, हे विचारावे.<br>• झाडांच्या खाली जमिनीवर काय दिसते हे विचारा, उन्हात बघायला सांगा आणि परत झाडाखाली बघायला सांगा, मग विचारा, काय फरक दिसतो, का सारखेच दिसते आहे. बालकांना त्यांची सावली पडते का हे बघायला सांगा. कशाकशाच्या सावल्या असतात, सावल्यांचे प्रकार सांगा. | • ताईने बालकांना वर्गाच्या बाहेर घेऊन जावे.<br>• झाडांच्या सावल्या, वनस्पती, प्राणी आणि स्वतः त्यांना निरीक्षण करण्यास प्रोत्साहित करा.<br>• बालकांना वेगळे काही दिसते का, हे विचारावे.<br>• झाडांच्या खाली जमिनीवर काय दिसते हे विचारा. उन्हात बघायला सांगा आणि परत झाडाखाली बघायला सांगा, मग विचारा. काय फरक दिसतो, का सारखेच दिसते आहे. बालकांना त्यांची सावली पडते का हे बघायला सांगा. कशाकशाच्या सावल्या असतात, सावल्यांचे प्रकार सांगा. दुसऱ्या दिवशी बालकांना वर्गाबाहेर सावल्यांचे प्रकार सांगा.<br>• दुसऱ्या दिवशी बालकांना वर्गाबाहेर घेऊन जा. पण वेगवेगळ्या वेळेत आणि आता सावली कशी दिसते याबद्दल विचारा.<br>• बालकांना घरी गेल्यावर पण या कृती करायला सांगा. दिवसाच्या वेगवेगळ्या वेळा (सकाळ, दुपार, संध्याकाळ) | • ताईने बालकांना वर्गाच्या बाहेर घेऊन जावे.<br>• झाडांच्या सावल्या, वनस्पती, प्राणी आणि स्वतः त्यांना निरीक्षण करण्यास प्रोत्साहित करा.<br>• वेगवेगळ्या वस्तूंमधून प्रकाश परावर्तित होतो हे दाखवा.<br>• खोलीत सावली नाही हे दाखवण्यासाठी, खोलीत सावली का नाही यावर चर्चा करा. |
| **विविधता** | वर्गात असणारे प्राण्यांचे कट आऊट्स किंवा रबरी खेळणी अशा वस्तू बाहेर वर्गासमोरील मोकळ्या जागेत न्या. त्याच्या समोर कागद ठेवा. त्यावर त्या चित्राची जी सावली पडेल, त्या सावलीचे चित्र गिरवायला सांगा. | |
| **थीम/विषय** | ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, | |
| **ताईसाठी सूचना** | ताईने सुलभ संदर्भासाठी उपलब्ध कार्यपुस्तिका वापरावी, तसेच वयोगटनिहाय उपलब्ध करून देण्यात आलेल्या कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने, सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरता / पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेतो.<br>अ) LO 7.2.2 निरीक्षणावर आधारित कल्पनांचा किंवा युक्त्यांचा उपयोग करतो. (उदा. गरम अन्नावर फुंकर घालण्याच्या प्रौढांच्या कृतीचे अनुकरण करतो.)<br>ब) LO 7.2.2 ज्ञात माहितीचा नवीन संदर्भात वापर करतो. (उदा. पुस्तकातील चित्राप्रमाणे ठोकळ्यांचा महाल /मनोरा बनवतो.)<br>ब) LO 7.2.5 शिक्षक व समवयस्कांच्या मदतीने, पर्यावरणातील घटना व प्रसंगांबाबतच्या सोप्या प्रश्नांची उत्तरे देतो.<br>क) LO 7.2.2 निरीक्षण करून सामान्यीकरण करतो. | |

| | | |
|---|---|---|
| | क) LO 7.2.5 नैसर्गिक घटनांबाबत चिकित्सक प्रश्न विचारून, उत्तरे मिळविण्यासाठी समवयस्कांसोबत समन्वय साधतो/शोध घेतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | निरीक्षणकौशल्य | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालके स्वतःहून वेगवेगळ्या कोनात उभे राहून, सावली न्याहाळतात का हे पहावे. | |
| | | |
| **कृती क्र.: 118. Life cycle : Discuss and Understand Different Life Forms** | | |
| **उपक्रमाचे नाव** | | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | | |
| **विविध वयोगटातील व्यक्तींची चित्रे** | **फुलपाखराची जीवनचक्रदर्शक चित्रफीत किंवा स्टिक पपेट** | **बेडकाची पूर्ण जीवनचक्र चित्रफीत किंवा स्टिक पपेट, कुंडी व बिया** |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती १ : लहान कोण मोठे कोण ?<br>• ताईने बालकांना वेगवेगळ्या वयोगटातील माणसांची क्षणचित्रे (फ्लॅश कार्ड) दाखवावीत यांच्यापैकी सर्वांत मोठे कोण आहे? सर्वांत लहान कोण आहे? म्हातारे कोण आहे? बाळ कोणते आहे? असे प्रश्न विचारावेत. तुमच्या घरात सर्वांत लहान कोण आहे? जो लहान आहे, तो मोठा होणार आहे का? असा संवाद साधावा. म्हातारी व्यक्ती लहान होईल का? | कृती १ : कसे झाले बीपासून झाड ?<br>• ताईने बालकांना छोट्या कुंड्या किंवा नारळाच्या करवंट्या किंवा प्लॅस्टिक डबे देऊन, त्यात माती भरून, बिया पेरायला द्याव्यात.<br>• रोज निरीक्षण करायला सांगावे. जे दिसत राहील, त्याचे चित्र एकाच कागदावर काढण्यास सांगावे.<br>बालके अगोदर नुसती माती, मग कोंब, मग जे दिसत जाईल त्याप्रमाणे चित्र काढतील. | कृती १ : कसे झाले फुलपाखरू ?<br>• ताईने जीवनचक्र फुलपाखराचे पूर्ण तयार करावे. (क्षणचित्रांच्या साहाय्याने, स्टिक पपेट्सच्या, फिंगर पपेटच्या साहाय्याने) त्यावर संवाद साधावा.<br>कृती २ :<br>जलचक्र<br>• ताईने चित्रकार्डाच्या मदतीने जलचक्र समजावून सांगावे.<br>• त्यानंतर त्यांतील विविध प्रक्रियेतील चित्रकार्डे उलट्या सुलट्या क्रमाने ठेवावी.<br>• बालकांना जलचक्राचा योग्य क्रम लावण्यास सांगावे. |
| **विविधता** | जलचक्र दाखवता येईल, ऋतू या विषयावर बोलता येईल. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, वनस्पती (फुले, शेती, रंग), प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक | |
| **ताईसाठी सूचना** | ताईने सुलभ संदर्भासाठी उपलब्ध कार्यपुस्तिका वापरावी, तसेच वयोगटनिहाय उपलब्ध करून देण्यात आलेल्या कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. | |

| | |
|---|---|
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने, सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो स दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरता /पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेतो.<br>अ) LO 7.2.2 निरीक्षणावर आधारित कल्पनांचा किंवा युक्त्यांचा उपयोग करतो. (उदा. गरम अन्नावर फुंकर घालण्याच्या प्रौढांच्या कृत्तीचे अनुकरण करतो.)<br>ब) LO 7.2.2 ज्ञात माहितीचा नवीन संदर्भात वापर करतो. (उदा. पुस्तकातील चित्राप्रमाणे ठोकळ्यांचा महाल/मनोरा बनवतो.)<br>ब) LO 7.2.5 शिक्षक व समवयस्कांच्या मदतीने, पर्यावरणातील घटना व प्रसंगांबाबतच्या सोप्या प्रश्नांची उत्तरे देतो.<br>क) LO 7.2.2 निरीक्षण करून सामान्यीकरण करतो.<br>क) LO 7.2.5 नैसर्गिक घटनांबाबत चिकित्सक प्रश्न विचारून, उत्तरे मिळविण्यासाठी समवयस्कांसोबत समन्वय साधतो/शोध घेतो. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | निरीक्षण, तार्किक विचारशक्ती |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकाच्या भाषिक कौशल्यांचे; जसे प्रश्नांची उत्तरे देणे, तसेच सहभागाचे निरीक्षण करावे. |

## आधारशिला कृती क्र : 119. Countries and Culture : Know and Understand About the World

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | ओळख माझ्या भारत देशाची |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | |
| भारताचा नकाशा, भारताच्या विविध राज्यांचे कटआऊट्स, पझल्स | भारताच्या विविध राज्यातील लोकांचा पेहराव, जेवण, घरे यांची चित्रे. विविध राज्यांतील वैशिष्ठ्ये दर्शवणारे व्हिडिओ, राज्यनिहाय नृत्य प्रकार. |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| कृती १ :<br>देशप्रेमावरील छोटी गीते, बालगीते म्हणून घ्यावीत.<br>• भारताच्या विविध राष्ट्रीय प्रतीकांची ओळख चित्रकार्डाच्या माध्यमातून करून द्यावी. त्यावर चर्चा करावी. राज्<br>• भारताचा झेंडा दाखवावा. त्यामधील रंग ओळखण्यास सांगावे.<br>• तिरंगा झेंडा बालकांनी कुठे व केव्हा पहिला आहे? अशाप्रकारे प्रश्न विचारावेत व | कृती १ : राष्ट्रीय प्रतीकांची चित्रे रंगवणे, तिरंगा झेंडा चित्र रंगवणे.<br>• बालकांना भारताच्या तिरंगा झेंड्याचे चित्र रंगविण्यास सांगावे, तसेच राष्ट्रीय फूल, फळ, प्राणी व पक्षी व झाड यांची चित्रे शे (आऊट सं लोईन) वदऊन क्षचित्र रंगवण्यास सांगावे.<br>• व्हिडिओच्या प्रवमाध्यमातून बालकांना भारतातील विविध राज्यांतील वैशिष्ट्यपूर्ण बाबी दर्शवणारे | कृती १ : तिरंगा झंडा चित्र काढून रंगवणे.<br>• बालकांना भारताच्या तिरंगा झेंड्याचे चित्र काढून रंगविण्यास सांगावे, तसेच राष्ट्रीय फूल, फळ, पक्षी व झाड यांची चित्रे बद रंगवण्यास सांगावे.<br>• विविध राज्यांतील वैशिष्ट्यपूर्ण खाद्यपदार्थ बालकांना राज्यांचे विविध पदार्थ दर्शवणारी चित्रकार्डे दाखवावीत.<br>• ताईंनी आवश्यकतेनुसार संबंधित माहिती सांगावी. |

| | | |
|---|---|---|
| चर्चा करावी. | व्हिडिओ दाखवावे व चर्चा करावी. | कृती २ :<br>करूया सफर<br>• भारताच्या विविध भागात लोक कसे राहतात, कोणते कपडे घालतात, काय खातात, घरे कशी असतात, घरे विशिष्ट पद्धतीची का असतात, यांविषयी चित्रफीत दाखवावी. |
| **विविधता** | आपल्या गावची वैशिष्ट्ये, स्थानिक संस्कृती यांची ओळख करून द्यावी; जसे की, विशिष्ट खाद्यपदार्थ, पोशाख, सण-उत्सव. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, मदतनीस, | |
| **ताईसाठी सूचना** | ताईने सुलभ संदर्भासाठी उपलब्ध कार्यपुस्तिका वापरावी, तसेच वयोगटनिहाय उपलब्ध करून देण्यात आलेल्या कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br>C-12.5 विविध कला, स्थानिक संस्कृती आणि वारसा यांची निर्मिती करताना आणि अनुभव घेताना, विविध प्रकारच्या प्रतिक्रियांना प्रतिसाद देतो व प्रशंसा करतो.<br>अ) LO 12.5.1 कलाकृतींबाबत आवडीनिवडी व इतर मते व्यक्त करताना शाब्दिक / अशाब्दिक प्रतिसाद देतो.<br>ब) LO 12.5.1 कलाकृती किंवा स्थानिक सांस्कृतिक अभिव्यक्ती यांच्या विविध पैलूंबाबत संवाद साधतो. (उदा. एखादया पात्राचा मोठा आणि थरथरणारा आवाज)<br>क) LO 12.5.1 विविध कलाकृती/रचना किंवा सांस्कृतिक अभिव्यक्ती यांची तुलना करतो आणि विविध प्रतिसाद शब्दांमध्ये स्पष्ट करतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | सौंदर्यदृष्टी आणि संस्कृतीची ओळख. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | उपक्रमातील बालकांच्या सहभागाचे निरीक्षण करावे. | |
| | | |
| **आधारशिला कृती क्र : 120 Celebrating Heroes : Stories of National Pride** | | |
| **उपक्रमाचे नाव** | ओळख थोरा मोठ्यांची | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | थोर व्यक्तींचे, राष्ट्र पुरुषांचे फोटो | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती : ओळख थोरांची | कृती : ओळख थोरांची, गोष्टी मोठ्यांच्या | |

| | |
|---|---|
| • वर्गात विविध क्षेत्रांतील थोरांची चित्रे, फोटो लावून ठेवावेत. त्यांची नावे सांगावीत. कोणत्या क्षेत्रात मोठे नाव आहे ते सांगावे. | • काही थोर व्यक्तींच्या थोरांच्या गोष्टी सांगाव्यात.<br>• २६ जानेवारी व १५ ऑगस्टचे महत्त्व सांगावे व दिनविशेष साजरे करावेत. विविध क्षेत्रांत नाव कमावलेल्या व्यक्तीची ओळख करून द्यावी. |
| **विविधता** | चित्रांबरोबर चित्रफिती वापरून, तसेच स्थानिक महापुरुषांचा समावेश करून, विविधता आणता येईल. |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन |
| **ताईसाठी सूचना** | दिनविशेषाचे औचित्य साधून, संबंधित देशभक्त, राष्ट्रीय महापुरुष यांच्या जयंती, पुण्यतिथी कार्यक्रम परिपाठाच्या दरम्यान घ्याव्यात. यासंदर्भाने उपलब्ध कार्यपुस्तिकेतील माहितीचा वापर करावा. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-12 बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br><br>C-12.5 विविध कला, स्थानिक संस्कृती आणि वारसा यांची निर्मिती करताना आणि अनुभव घेताना विविध प्रकारच्या प्रतिक्रियांना प्रतिसाद देतो व प्रशंसा करतो. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | संवेदनशीलता, राष्ट्राभिमान |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अनुषंगिक उपक्रमात विद्यार्थी सहभागाचे निरीक्षण करावे. |

## आधारशिला कृती क्र : 121 Throw and Catch The Ball

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | चेंडू फेकूया आणि झेलूया. |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | मोठा रंगीत चेंडू, प्लॅस्टिकचा चेंडू, पकागदाचा चेंडू, कापडाचा चेंडू, विविध आकारांचे चेंडू, फुगे, रिंग, फ्रिसबी इ. |

| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
|---|---|---|
| कृती : चेंडू झेलूया, पकडूया आणि उडवूया.<br>• आडव्या ओळीत बालकांना उभे करावे. एकेका बालकाबरोबर ताईंनी खालील कृती करून घ्याव्यात.<br><br>१) ताईने घरंगळत सोडलेला मोठा रंगीत चेंडू, बालकाने दोन्ही हातांनी पकडावा. ताईंनी कमी अंतरावरून (अंदाजे तीन फूट) चेंडू बालकाकडे फेकावा आणि बालकाने | कृती :<br>चेंडू झेलूया आणि फेकूया.<br>• बालकांना वर्तुळात उभे करा. ताईने दोन्ही हातांनी फेकलेला चेंडू बालकाने झेलावा. बालकाला पुन्हा ताईकडे फेकण्यास सांगावे.<br>• ताईने काही अंतरावरून (अंदाजे पाच फूट) चेंडू बालकाकडे फेकावा आणि | कृती : चेंडू फेकूया, झेलूया.<br>• बालकांना वर्तुळात उभे करावे. जोडीदाराबरोबर समोरासमोर विविध आकारांचे चेंडू जोर लावून, ठरावीक अंतरावरून फेकण्याचा आणि झेलण्याचा सराव करण्यास सांगावे.<br>• ताईने वर उडवलेला फुगा झेलावा. |

| | | |
|---|---|---|
| दोन्ही हातांनी चेंडू पकडावा.<br>२) ताईने बालकाला मोठा चेंडू वर फेकायला सांगून, तो झेलण्यास सांगावे. | बालकाने दोन्ही हातांनी चेंडू पकडावा. | |

| | |
|---|---|
| **विविधता** | प्लॅस्टिकचा चेंडू, कागदाचा चेंडू, कापडाचा चेंडू वापरावा. तुमच्याकडील अशा वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू वापरून, बालकांसोबत हा उपक्रम घ्यावा, तसेच त्याचे दृढीकरण करावे. |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन. |
| **ताईसाठी सूचना** | चेंडू फेकण्याच्या व झेलण्याच्या वेगवेगळया पद्धती जाणून घेण्यासाठी उपलब्ध कार्यपुस्तिकेचा वापर करावा. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-3 सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते.<br>C-3.1 विशिष्ट कृती करताना, ज्ञानेंद्रियांच्या संवेदना व शारीरिक हालचाली यांत समन्वय दर्शवतो.<br>अ) LO 3.1.1 चेंडू पकडणे, फेकणे आणि चेंडू लाथेने उडवणे या कृती नियंत्रितपणे करतो.<br>ब) LO 3.1.1 मोठा चेंडू झेलणे, फेकणे आणि लाथेने वेगाने चेंडू पुढे मारणे या कृती जोर लावून करू शकतो.<br>ब) LO 3.1.2 जवळच्या लक्ष्यावरील चेंडू काही प्रमाणात अचूकतेने फेकतो.<br>क) LO 3.1.1 वेगवेगळया आकारांचे चेंडू झेलणे, फेकणे, आणि लाथेने उडवणे या कृतींमध्ये सुधारणा करतो. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | स्थूल आणि सूक्ष्म स्नायू, कारक विकास, हस्तनेत्र समन्वय |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | खेळातील सहभाग, उत्साह कसा आहे याचे निरीक्षण करावे.<br>चेंडू फेकतो, झेलतो, पायाने उडवतो या क्रिया करताना, बलाचा वापर करतो का हे बघणे.प्रत्यक्ष झेलणे, पडकणे, चेंडू पायाने उडवणे इत्यादी. कृतीचे निरीक्षण करणे. |

## आधारशिला कृती क्र : 121.1 Throw and Catch The Ball

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | चेंडू खेळया- ढकलूया व पायाने उडवूया. |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | मोठा रंगीत चेंडू, प्लॅस्टिकचा चेंडू, कागदाचा चेंडू, कापडाचा चेंडू, विविध आकारांचे चेंडू, फुगे, रिंग, फ्रिसबी इ. |

| वयोगट ३ ते ४ वर्षे | वयोगट ४ ते ५ वर्षे | वयोगट ५ ते ६ वर्षे |
|---|---|---|
| कृती : चेंडू झेलूया, पकडूया आणि उडवूया.<br>• आडव्या ओळीत बालकांना उभे करावे. एकेका बालकाबरोबर ताईने खालील कृती करून घ्याव्यात. | कृती १ : चेंडू फेकूया.<br>• जोडीदाराकडे उंचावरून चेंडू फेकण्यास सांगावे. ठरावीक अंतरावून | कृती १ : चेंडू फेकूया.<br>• विद्यार्थ्याने एक दोन पावले टाकत समोरच्या दिशेने चेंडू फेकणे. |

| | | |
|---|---|---|
| १) ताईने बालकाकडे चेंडू फेकावा व त्याने तो झेलावा. त्याला ताईकडे पुन्हा फेकण्यास सांगावे.<br>२) बालकाला पायाच्या चवड्याच्या (अंगठ्याकडील) बाजूने चेंडू ढकलण्यास/लाथ मारण्यास सांगणे. | चेंडू बास्केट/बादलीमध्ये फेकण्यास सांगावे.<br>• ठरावीक अंतरावरून चेंडूने लगोरी फोडण्यास सांगावे.<br>• ठरावीक अंतरावरून उभे राहून भिंतीवर चेंडू फेकण्यास सांगावे.<br>कृती २ : चेंडू पायाने ढकलूया.<br>• बालकाला पायाच्या चवड्याच्या (अंगठ्याकडील) बाजूने चेंडू ढकलण्यास सांगणे.<br>• ताईने घरंगळत सोडलेला चेंडू, बालकाने त्याच्या पायाने ढकलणे. सर्व बालकांना चेंडू<br>पायाने ढकलण्यास दयावा. | • जोडीदाराकडे बल लावून चेंडू फेकणे.<br>कृती २ : चेंडू फेकूया, उडवूया आणि ढकलूया.<br>• विशिष्ट अंतरावर कोन किंवा बाटली (उपलब्ध वस्तू) चेंडूने उडवणे.<br>• चेंडू रिंगमधून टाकणे.<br>• मोठ्या चेंडूला पायाने किक मारणे/उडवणे/ढकलणे. |
| **विविधता** | प्लॅस्टिकचा चेंडू, कागदाचा चेंडू, कापडाचा चेंडू वापरावा. तुमच्याकडील अशा वेगवेगळया प्रकारच्या वस्तू वापरून, बालकांसोबत हा उपक्रम घ्यावा. तसेच त्याचे दृढीकरण करावे. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन. | |
| **ताईसाठी सूचना** | चेंडू खेळण्याच्या वेगवेगळया पद्धती जाणून घेण्यासाठी, उपलब्ध कार्यपुस्तिकेचा वापर करावा. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-3 सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते.<br>C-3.1 विशिष्ट कृती करताना, ज्ञानेंद्रियांच्या संवेदना व शारीरिक हालचाली यांत समन्वय दर्शवतो.<br>अ) LO 3.1.1 चेंडू पकडणे, फेकणे आणि चेंडू लाथेने उडवणे या कृती नियंत्रितपणे करतो.<br>ब) LO 3.1.1मोठा चेंडू झेलणे, फेकणे आणि लाथेने वेगाने चेंडू पुढे<br>उडवणे या कृती जोर लावून करू शकतो. ब) LO 3.1.2 जवळच्या लक्ष्यावरील चेंडू काही प्रमाणात अचूकतेने फेकतो.<br>क) LO 3.1.1 वेगवेगळया आकारांचे चेंडू झेलणे, फेकणे, आणि लाथेने उडवणे या कृतींमध्ये सुधारणा करतो. | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | स्थूल आणि सूक्ष्म स्नायू, कारक विकास, हस्तनेत्र समन्वय | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | खेळातील सहभाग, उत्साह कसा आहे याचे निरीक्षण करावे.<br>चेंडू फेकतो, झेलतो, पायाने उडवतो या क्रिया करताना बलाचा वापर करतो का, हे बघणे.<br>प्रत्यक्ष झेलणे, पडकणे, चेंडू पायाने उडवणे इ. कृतीचे निरीक्षण करणे. | |
| | | |
| | | |

| आधारशिला कृती क्र : 122 Keep your Balance | | |
|---|---|---|
| उपक्रमाचे नाव | तोल सांभाळुया | |
| उपक्रमाला लागणारे साहित्य | - | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती : आधार घेऊन एका पायावर उभे राहूया. राज<br>• ताईने बालकांना भिंतीचा आधार घेऊन, एका पायावर उभे राहून दाखवणे.<br>• आता ताईने बालकांना भिंतीचा आधार घेऊन उभे राहण्याची सूचना देणे आणि बालकांकडून कृती करून घेणे. | कृती : एका पायावर जास्त काळ उभे राहूया<br>• ताईने एका पायावर उभे राहणे. बालकांना एक ते पाच अंक म्हणायला सांगणे.<br>• बालकांचे अंक म्हणून होईपर्यंत, म ताईने एक पायावर तोल साधत उभे राहणे.<br>• आता हीच कृती ताईने बालकांना करायला सांगणे. ताईने एक ते पाच अंक म्हणणे, तेव्हा बालकांना एका पायावर तोल साधत उभे राहायला सांगणे. | कृती : लंगडी घालूया.<br>• ताईने जमिनीवर १० ते १५ गोल षद, एकमेकांना चिकटून आखून घेणे.<br>• ताईने लंगडी घालत एका गोलातून दुसऱ्या गोलात पुढे जावे आणि आखलेले सगळे वर्तुळ पूर्ण करावे. |
| **विविधता** | अ) बालकांना मित्रांच्या जोडीने एका पायावर उभे राहायला सांगणे.<br>ब) बालकांना टेबलाला किंवा खुर्चीला धरून एका पायावर उभे राहायला सांगणे.<br>क) हातात काठी घेऊन जास्तीत जास्त वेळ एका पायावर उभे राहणे. क) ताईने ४/५ टाळ्या वाजवणे व तोपर्यंत मुलांनी एका पायावर उभे राहाणे.<br>ड) वर्गाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत लंगडी घालत जायला सांगणे. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, पाणी-पाऊस, | |
| **ताईसाठी सूचना** | ताईने यासंदर्भात उपलब्ध कार्यपुस्तिकेचा वापर करून, कृती करून घ्याव्यात. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-3 सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते.<br><br>C-3.2 विविध शारीरिक कृतींमध्ये तोल, समन्वय आणि लवचिकता दर्शवतो.<br>अ) LO 3.2.1 आधाराने किंवा मदतीने एका पायावर उभे राहू शकतो.<br>ब) LO 3.2.1 एका पायावर जास्त काळासाठी आधाराशिवाय उभे राहू शकतो.<br>क) LO 3.2.1 १० ते १५ पावले एका पायावर उ मारतो. (लंगडी घालतो.) | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | तोल साधणे, लवचिकता, कारककौशल्य, तोल सांभाळणे, समन्वय साधणे. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकांना आधार न घेता उभे राहता येते की नाही ते पाहणे. | |

## आधारशिला कृती क्र :122.1 Keep your Balance

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **क्रियाकार्ड** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **जादूई पिटारामधील क्रियाकार्ड** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती :<br><br>• ताईने बालकांना रांगेत उभे करावे.<br>• ताईने क्रियाकार्डातील एक एक क्रियाकार्ड दाखवावे व बालकांना त्याप्रमाणे क्रिया करण्यास सांगावे. सुरुवातीला थोडावेळ क्रियाकार्डानुसार क्रिया करून घ्यावी. हळूहळू वेळ वाढवावा. | कृती :<br>• ३ ते ४ वयोगटाच्या कृती घ्याव्यात. चार चार बालकांचा एक गट करून, गटागटाने सामूहिक कृतिकार्ड दाखवावे. कोणता गट जास्त वेळ कार्डाप्रमाणे कृती करेल, तो गट जिंकेल. याप्रमाणे गटागटाने खेळ घ्यावा. | कृती : डोंगराला आग लागली पळा पळा<br>• खेळ घेऊन, ज्यावेळी जागेवर उभे राहण्यास सांगण्यात येईल तेव्हा ताईने एक क्रियाकार्ड दाखवावे.<br>• वर्तुळातील जे बालक सर्वांत शेवटपर्यंत स्वतः त्या क्रियेमध्ये जास्त वेळ उभे राहील. ते जिंकेल. याप्रमाणे वेगवेगळी क्रियाकार्ड दाखवून हा खेळ घ्यावा. |
| **विविधता** | वृक्षासन : जास्त वेळ कोण वृक्षासन करू शकेल, असा खेळ खेळणे. (बालकांना ताईने वृक्षासनाची स्थिती दाखवणे) | |
| **थीम/विषय** | मी माझे कुटुंब, वनस्पती (फुले, शेती, रंग), पक्षी व कीटक, | |
| **ताईसाठी सूचना** | महाराष्ट्राच्या जादुई पिटारामधील समाविष्ट क्रियाकार्डाचा वापर करावा. आवश्यकतेनुसार अधिकची क्रियाकार्डे स्वतः तयार करावी. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-3 सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते.<br>C-3.2 विविध शारीरिक कृतींमध्ये तोल, समन्वय आणि लवचिकता दर्शवतो.<br>अ) LO 3.2.1 आधाराने किंवा मदतीने एका पायावर उभे राहू शकतो.<br>ब) LO 3.2.1 एका पायावर जास्त काळासाठी आधाराशिवाय उभे राहू शकतो.<br>क) LO 3.2.1 १० ते १५ पावले एका पायावर उ मारतो. (लंगडी घालतो.) | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | तोल साधणे, लवचिकता, कारककौशल्य, तोल सांभाळणे, समन्वय साधणे. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालकांना आधार न घेता उभे राहता येते की नाही, ते पाहणे. | |

## आधारशिला कृती क्र : 123. Yoga Exercises : Breathe, Stretch, Extend

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | योगासन | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | बसण्यासाठी चटई | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |

| | | |
|---|---|---|
| कृती : उच्छवास (जोराने श्वास बाहेर सोडणे.)<br>• बालकांना अर्धवर्तुळाकार बसवावे. बालकांना दीर्घश्वास घेणे व सोडणे या कृती करून दाखवाव्या.<br>• बालकांकडून कृती अनुकरणासह करून घ्यावी.<br>• बालकांना परिपाठाच्या वेळी ताईने जोरात श्वास सोडण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवावे. बालकांना उच्छवास कसा करावा, ते सांगून प्रत्यक्ष कृती घ्यावी. (उदा. पाच वेळा श्वास जोराने घेणे व सोडण्याची कृती करून घ्यावी.)<br>छातीवर/पोटावर हात ठेवून, दीर्घ श्वास घेण्यास सांगावे व जोराने सोडण्यास सांगावे.<br>https://www.youtube.com/watch?v=BBiVu4JLDgg | कृती :<br>३ ते ४ वयोगटाच्या कृती करून घ्याव्यात व त्यानंतर पुढील कृती करून घ्याव्यात.<br>• सोपे व्यायाम प्रकार करून घ्यावे.<br>१) खाली पुढे वाकणे.<br>२) खाली बसून पायाचे अंगठे धरणे.<br>३) डाव्याबाजूस, उजव्याबाजूस बाजूस वाकणे.<br>४) उडी मारताना डाव्या उजव्या बाजूस वळणे.<br>५) स्वतःभोवती गिरक्या मारणे, डाव्या आणि उजव्या पायाने हवेत लाथ मारणे.<br>६) डाव्या आणि उजव्या हाताने हवेत फटकारणे.<br>• बालकांना जमिनीवर झोपण्यास सांगावे. बालकांना अंग सैल सोडण्यास सांगावे. त्यांना त्यांचे पोट कसे वर खाली होत आहे त्याकडे लक्ष देण्यास सांगावे.<br>https://www.youtube.com/watch?v=4LGcbkpPVGM | कृती :<br>• ३ ते ५ च्या कृती करून घ्याव्यात.<br>• बालकांना वर्तुळाकार बसवावे.<br>• चित्रफितीद्वारे बालकांना श्वासोच्छवास प्रात्यक्षिक करून दाखवावे. उदा. योगा प्रात्यक्षिक व्हिडिओ.<br>• बालकांना स्तब्ध बसवून डोळे बंद करून दीर्घश्वास घ्यायला लावावा.<br><br>• श्वास आत-बाहेर करायला सांगून, तो ओळखायला लावावे. गार-गरम<br>• श्वास नियंत्रण होण्यासाठी आवश्यक सराव घ्यावा.<br>• सोपी आसने - वृक्षासन, ताडासन अशी सोपी आसने घ्यावीत. ताईने आधी अशी आसने करून दाखवावीत. |
| **विविधता** | अ) बालकांना मांडी घालून शांत बसण्यास सांगावे.<br>ब) ध्यानमुद्रेत बसवून, बालकांकडून नाकाने श्वास सोडून ओम म्हणून घेणे.<br>क) बालकांकडून दररोज प्रार्थनेच्या वेळी डोळे मिटून श्वासावर नियंत्रण करून ठेवण्याचा सराव करून घ्यावा. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | ताईने विविध योगासने घेण्यासाठी उपलब्ध कार्यपुस्तिकेमध्ये दिलेल्या सूचनांचा वापर करावा. सूचनेनुसार बालकांकडून सोपी योगासने करून घ्यावीत. सदर योगासने ताईने परिपाठाच्या वेळी एक दिवसाआड घ्यावीत. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.<br>C-2.6 अनुभवांची सर्वंकष जाणीव होण्याकरिता, ज्ञानेंदियांमार्फत प्राप्त संवेदनांचे एकात्मिकरण करण्यास सुरुवात करतो.<br>अ) LO 2.6.1 जोराने श्वास बाहेर सोडणे. (उच्छवास)<br>ब) LO 2.6.2 अल्पकाळासाठी स्थिर बसतो किंवा पडून राहू शकतो. (शवासन करणे.)<br>क) LO 2.6.1 लयबद्धरीतीने श्वासोच्छवास.<br>क) LO 2.6.2 स्थिर बसून अल्पकाळासाठी आपल्या श्वासावर लक्ष केंद्रित करतो/नियंत्रित ठेवतो. | |

| | | |
|---|---|---|
| | CG-3 सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते.<br>C-3.2 विविध शारीरिक कृतींमध्ये तोल, समन्वय आणि लवचिकता दर्शवतो.<br>अ) LO 3.2.1 आधाराने किंवा मदतीने एका पायावर उभे राहू शकतो.<br>अ) LO 3.2.2 अल्प वेळासाठी एक पायावर संतुलन साधू शकतो.<br>ब) LO 3.2.1 एका पायावर जास्त काळासाठी आधाराशिवाय उभे राहू शकतो.<br>क) LO 3.2.2.2 चांगले शारीरिक संतुलन दर्शवितो. जसे मदतीशिवाय सायकल चालवितो | |
| | अ) शारीरिक हालचालींवर नियंत्रण येणे. ब) श्वासावर नियंत्रण करता येते.<br>क) दीर्घश्वास घेतो व सोडतो. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | बालके श्वास आत बाहेर करण्याची क्रिया योग्यरीतीने करतात की नाही, या बाबींचे निरीक्षण करावे. बालके शवासनाची कृती योग्य पद्धतीने करतात का. याचे निरीक्षण करावे. | |
| | | |
| **आधारशिला कृती क्र : 124. Kick a Ball and Repeat** | | |
| **उपक्रमाचे नाव** | फुटबॉल खेळूया. | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | मोठा चेंडू | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती : चेंडू पायाने ढकलूया.<br>• बालकाला पायाच्या चवड्याच्या (अंगठ्याकडील) बाजूने चेंडू ढकलण्यास सांगणे.<br>• ताईने घरंगळत सोडलेला चेंडू बालकाने त्याच्या पायाने ढकलणे.<br>• सर्व बालकांना चेंडू पायाने ढकलण्यास दयावा. | कृती : चेंडू पायाने ढकलूया.<br>• बालकाला पायाच्या चवड्याच्या (अंगठ्याकडील) बाजूने चेंडू ढकलण्यास सांगणे.<br>• ताईने घरंगळत सोडलेला चेंडू बालकाने त्याच्या पायाने ढकलणे..<br>• सर्व बालकांना चेंडू पायाने ढकलण्यास द्यावा. | कृती : चेंडू फेकूया, उडवूया आणि ढकलूया.<br>• विशिष्ट अंतरावरील कोन किंवा बाटली (उपलब्ध वस्तू) चेंडूने उडवणे. चेंडू रिंगमधून टाकणे. मोठ्या चेंडूला पायाने किक् मारणे/उडवणे/ढकलणे. |
| **विविधता** | प्लॅस्टिकचा चेंडू, कागदाचा चेंडू, कापडाचा चेंडू वापरावा. तुमच्याकडील अशा वेगवेगळया प्रकारच्या वस्तू वापरून, बालकांसोबत हा उपक्रम घ्यावा, तसेच त्याचे दृढीकरण करावे. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन. | |
| **ताईसाठी सूचना** | ताईने यासंदर्भात उपलब्ध कार्यपुस्तिकेचा वापर करून चेंडूला किक् मारून फुटबॉल खेळण्याच्या कृती करून घ्याव्यात. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व** | CG-3 सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते. | |

| | |
|---|---|
| **अध्ययन निष्पत्ती** | C-3.1 विशिष्ट कृती करताना ज्ञानेंद्रियाच्या संवेदना व शारीरिक हालचाली यांत समन्वय दर्शवितो.<br>अ) LO 3.1.1 चेंडू पकडणे, फेकणे आणि चेंडू लाथेने उडवणे या कृती नियंत्रितपणे करतो.<br>ब) LO 3.1.1 मोठा चेंडू झेलणे, फेकणे आणि लाथेने वेगाने चेंडू पुढे उडवणे या कृती जोर लावून करू शकतो.<br>ब) LO 3.1.1 जवळच्या लक्ष्यावरील चेंडू काही प्रमाणात अचूकतेने फेकतो<br>क) LO 3.1.1 राष्वेगवेगळ्या आकारांचे चेंडू झेलणे, फेकणे आणि लाथेने उडवणे या कृतींमध्ये सुधारणा करतो. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | स्थूल आणि सूक्ष्म स्नायू, कारक विकास, हस्तनेत्र समन्वय |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | अ) खेळातील सहभाग, उत्साह कसा आहे याचे निरीक्षण करावे.<br>ब) चेंडू फेकतो, झेलतो, पायाने उडवतो या क्रिया करताना बलाचा वापर करतो का हे बघणे.<br>क) प्रत्यक्ष झेलणे, पडकणे, चेंडू पायाने उडवणे इ. कृतींचे निरीक्षण करणे. |

## आधारशिला कृती क्र : 125 Walking Straight, Walking Curved

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | मजेशीर चालूया आणि उड्या मारूया. | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | खंजिरी, टाळ, खडू, दोरी, इ. | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती : सरळ रेषेत चालूया चवड्यावर चालणे आणि धावणे.<br>• जमिनीवर सरळ रेष आखावी.<br>• ताईने सरळ रेषेवरून चालण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवावे.<br>• बालकांना एकेकाने किंवा ओळीत उभे करून सरळ रेषेत चालण्यास सांगावे.<br>• चालताना समोर, वर, उजव्या आणि डाव्या बाजूला टाळ्या वाजवत चालण्यास सांगावे.<br>उलट पावली चालूया.<br>• वरील प्रमाणेच ताईने सरळ रेषेवरून उलट पावली चवड्यावर चालण्याचे प्रात्यक्षिक दाखवून, बालकांना अनुकरण करण्यास सांगावे.<br>धावूया.<br>• चालण्याचा पुरेसा सराव झाला,ज की बालकांना धावण्यास सांगावे. | कृती १ : उड्या मारूया.<br>• पुढील प्रकारे वेगवेगळ्या उड्या मारण्याचे प्रात्यक्षिक दाखवून, बालकांना तशा उड्या मारण्यास सांगावे.<br>उड्या मारूया.<br>• जागेवर एक उडी आणि अनेक उड्या मारण्यास सांगावे. जिन्यावरून उड्या मारूया.<br>• जिन्याच्या सर्वांत खालच्या पायरीवर उभे राहून, तिथून खाली उडी मारण्यास सांगावे.<br>उंच उड्या मारूया.<br>• जागेवर साधी उडी आणि उंच उडी मारण्यास सांगावे.<br>उड्या प्राण्यांच्या<br>• पक्ष्यांचे आणि प्राण्यांचे आवाज आणि हातवारे करत उड्या मारणे. उदा. बेडूक उडी, माकड उडी, सशाची उडी<br>• टाळ्या वाजवत वरील सर्व प्रकारच्या उड्या मारायला सांगावे.<br>• छोटा पाट, छोटे डेस्क, छोटे स्टूल अशा चढत्या क्रमाने दोन ते अडीच फूट उंचीवरून उड्या मारण्यास सांगावे. | |

| | |
|---|---|
| **विविधता** | • सरळ रेष आखण्याऐवजी शिडीसारखे चौकोन आखून, चौकोनातून किंवा फरशीच्या चौकोनातून अथवा फरशीच्या कडेवरून चालण्यास सांगावे. मसूदा प्रत<br>• झांज किंवा घंटी वाजवत, सरळ रेषेत चालण्यास सांगावे. तोल सावरत चालूया.<br>• टेबल, डेस्क, खुर्ची, छोट्या उंचीचा कट्टा अशा उंच वस्तूवरून तोल सावरत चालण्यास सांगावे.<br>• दोन किंवा तीन बालकांचा गट करून, त्याचा चेंडू फेकणे आणि झेलणे, लाथेने ढकलणे आणि अडवणे अशा कृती करत खेळण्यास वाव द्यावा. |
| **थीम/विषय** | प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, |
| **ताईसाठी सूचना** | ताईने सुलभ संदर्भासाठी उपलब्ध कार्यपुस्तिका वापरावी, तसेच वयोगटनिहाय उपलब्ध करून देण्यात आलेल्या कृतिपत्रिका सोडवून घ्याव्यात. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-3 सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते.<br>C-3. 4. बस्स वा नेताना, चालताना, पळताना.<br>अ) LO 3.4.1.1 सरळ रेषेत चालतो.<br>ब) LO 3.4.1.1 सरळ, नागमोडी, वक्ररेषेवर सहजतेने चालते.<br>क) LO 3.4.1.1 शारीरिक हालचालींचा सहजतेने समन्वय साधत चालतो व धावतो.<br>क) LO 3.4.1.2 हात डोक्यावर ताणून धरून, दहा मीटरपर्यंत चवड्यावर चालतो. (ताडासन) |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | अ) सूचनांचे पालन करता येते. पाय आणि नेत्र समन्वय<br>ब) शारीरिक हालचालींवर नियंत्रण येणे. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | सूचनांचे पालन करता येते का? पाय आणि नेत्र समन्वय आहे का? शारीरिक हालचालींवर नियंत्रण आहे का? सगळया बालकांमध्ये खेळतो का? सर्व खेळांत सहभागी असतो का/असते का? याचे निरीक्षण करावे. |

## आधारशिला कृती क्र : 126. Playing Statues

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | मूर्ती बनूया. | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |

कृती १ : आवाज ऐकून कृती करा.
• ताईने बालकांना वर्गाबाहेर घेऊन जावे.
• बालकांना वर्तुळाकार उभे करावे.
• ताईने मोबाइलवर बालकांना संगीत ऐकवावे.
• संगीत सुरू झाले, की पळायचे आणि संगीत थांबल्यावर पळणे थांबवायचे.
• याप्रमाणे खेळ घ्यावा.
कृती २ : मूर्ती बना/पुतळा
• ताईने बालकांना वर्गाबाहेर घेऊन जाणे.

| |
|---|
| • बालकांना वर्तुळाकार उभे करणे.<br>• ताईने बालकांना तोंडी सूचना दयाव्यात.<br>• (ताईने) पळा पळा पळा पळा असे म्हणत रहावे. जेव्हा ताई अचानक मूर्ती असे म्हणणार, तेव्हा एक मुर्ती / पुतळा बनून बालके उभी राहतील.<br>जसे : कोणाचे हात वर, कोणी तरी खाली बसलेले, डोक्यावर हात, व्यायाम करताना इत्यादी कोणतीही हालचाल न करता उभे राहावे. जी बालके हालचाल करतील ती आऊट होतील.<br>• याप्रमाणे मूर्ती हा खेळ घ्यावा. |

| | |
|---|---|
| **विविधता** | सूचना ऐकून असे वेगवेगळया कृतीचे खेळ घ्यावे. |
| **थीम/विषय** | ऋतू, मदतनीस |
| **ताईसाठी सूचना** | ताईने वर्गाबाहेर जागा नसल्यास वर्गात हा खेळ घ्यावा. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-12 बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br>C-12.2 संगीत, भूमिकाभिनय, नृत्य आणि विविध हालचाली यांची { निर्मिती करण्यासाठी स्वतःचा आवाज, शरीर, जागा, आणि विविध वस्तू यांचा चौकसपणे उपयोग करतो व खेळतो.<br>अ) LO 12.2.4 रोजच्या प्रसंगामध्ये शांतता आणि स्थिरता यांचा वापर<br>महाराष्कर तागे.<br>ब) LO 12.2.4 संगीत, नाट्य आणि हालचाली यांच्या साहाय्याने शांतता आणि स्थिरता यांच्या बाबतीत प्रयोग करतो.<br>मुसुदा<br>क) LO 12.2.4<br>संगीत, नाट्य आणि हालचाली यांच्या साहाय्याने शांतता आणि स्थिरता यांच्या बाबतीत प्रयोग करतो. |
| साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये | श्रवण कौशल्य, ऐकून कृती करण्याचे कौशल्य विकसित होण्यास मदत होईल. |
| निरीक्षण करावयाच्या बाबी | संगीत आणि सांगितलेल्या कृती ऐकून करणे बालकाला जमते आहे का याचे निरीक्षण करावे. ज्या कृती सांगितल्या आहेत, त्याप्रमाणे बालक ऐकता आहेत का? याचे निरीक्षण करावे. |

## आधारशिला कृती क्र :127. Creeping, Crawling, Rolling like Anima

| | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | प्राण्यांसारख्या हालचाली | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती : दिशा किंवा गती बदलून चालणे किंवा धावणे. | आवश्यक पूर्वतयारी : रेषा आखणे<br>कृती : सरळ, नागमोडी, वक्ररेषेवर चालणे. | |

| | |
|---|---|
| • बालकांना वर्गात विखरून उभे करावे.<br><br>• ताईने कृती सांगून, त्या कृतीचे प्रात्यक्षिक करून दाखवावे.<br><br>उदा. सरळ पुढे चाला/पळा. सरळ मागे चाला/लवकर लवकर चाला. उजवीकडे वळून चाला/ पळा. डावीकडे वळून चाला / पळा. मागे वळून सरळ चाला/ पळा.<br><br>• ताईने सूचना देऊन बालकांना त्या कृती करण्यास सांगावे.<br><br>• ताईने हातांच्या हालचाली करत चालण्यास सांगावे. आणि पळण्यास<br><br>उदा. हात वर करून चाला/ पळा, हात समोर करून चाला/ पळा, हात बाजूला करून चाला/ पळा, हात पंखांसारखे हलवत चाला/पळा.. | • जमिनीवर सरळ, नागमोडी, वक्ररेषा आखाव्या.<br>https://www.youtube.com/shorts/vP3050JMVZw<br>https://www.youtube.com/watch?v=QalsroJzf9k<br>• ताईने वरील सगळ्या रेषांवर चालण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवावे व बालकांना त्याप्रमाणे अनुकरण करण्यास सांगावे.<br>तोल सांभाळत चालूया.<br>६ इंच रुंदी असलेल्या फळीवरून तोल सांभाळून चालण्यास सांगावे.<br>• जिना चढूया-उतरूया<br>• एका वेळी एकाच पायाचा वापर करून, जिना चढण्यास व उतरण्यास सांगावे<br>• बोगदा पार करूया.<br>• मोठ्या रिकाम्या खोक्याचा बोगदा बनवून, त्यातून अलीकडे, पलीकडे जाण्यास सांगावे. |
| **विविधता** | अ) चालताना किंवा पळताना टाळ्या वाजवण्यास सांगावे.<br>ब) झांज किंवा घंटेच्या तालाप्रमाणे, हळूहळू किंवा भरभर चालण्यास किंवा पळण्यास सांगावे. |
| **थीम/विषय** | प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक |
| **ताईसाठी सूचना** | ताईने सुलभ संदर्भासाठी उपलब्ध कार्यपुस्तिकेचा वापर करून, विविध प्रकारे प्राण्यांच्या चाली या कृती करून घ्याव्यात. उपलब्ध कृतिपत्रिकेचा वापर करावा. |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-3 सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते.<br>C-3. 4. बस्स वा नेताना, चालताना, पळताना.<br>अ) LO 3.4.1.4 दिशा व गती बदलून सहजतेने चालतो किंवा धावतो.<br>ब) LO 3.4.1.1 सरळ, नागमोडी, वक्ररेषेवर सहजतेने चालतो.<br>क) LO 3.4.1.1 शारीरिक हालचालींचा सहजतेने समन्वय साधत चालतो, धावतो. |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | प्राण्यांसारख्या उड्या मारण्याचे कौशल्य, शारीरिक लवचिकता निर्माण होण्यास मदत होईल. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | पाय आणि नेत्र समन्वय साधता येतो का? |
| | |
| | |

| आधारशिला कृती क्र :127.1 Creeping, Crawling, Rolling like Animals | | |
|---|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | जिन्यावरचा खेळ | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | खडू, दोरी, लहान बाक, शिटी | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती १ : जिना चढूया, उडी मारूया<br><br>• ताईने पुढील क्रियांचे प्रात्यक्षिककरून दाखवावे आणि बालकांनाकरण्यास सांगावे.<br>• बालकांना जिन्याची एक पायरी चढून, तिथून खाली उडी मारण्यास सांगावे.<br>• बालकांना जिन्याच्या खालच्या पायरीवरून दुसऱ्या पायरीवर उडी मारण्यास सांगावे.<br>कृती २ : उडी मारताना टाळी<br>• बालकांना एका रेषेत किंवा वर्तुळाकार उभे करून उडी मारताना, हवेत असताना एक टाळी वाजवण्यास सांगावे.<br>• दोन दोन बालकांना समोरासमोर उभे करून, त्यांना उडी मारा आणि हवेत असताना एकमेकांना टाळी द्या असे सांगावे. तीन किंवा जास्त बालकांना वर्तुळाकारात उभे करून, त्यांना उडी मारताना शेजारच्या बालकास देण्यास सांगावे. टाळी<br>कृती ३ :<br>लंगडी घालूया<br>•डाव्या पायाने लंगडी घालत सरळ रेषेत जाण्यास सांगावे. नंतर हीच कृती उजव्या पायाने लंगडी घालत करण्यास सांगावे.<br>कृती ४ :<br>उड्या मारूया<br>•एक फूट उंच बाकावरून खाली उडी मारण्यास सांगावे. | कृती १ : जिना चढूया, उडी मारूया<br>• ताईने पुढील क्रियांचे प्रात्यक्षिक करून दाखवावे आणि बालकांना करण्यास सांगावे.<br>• बालकांना जिन्याच्या दोन पायऱ्या चढून तिथून खाली उडी मारण्यास सांगावे.<br>• बालकांना जिन्याच्या खालच्या पायरीवरून एक पायरी गाळून वर दुसऱ्या पायरीवर उडी मारण्यास सांगावे.<br>कृती २ : उडी मारताना टाळी<br>• बालकांना एका रेषेत किंवा वर्तुळाकार उभे करून उडी मारताना, हवेत असताना एक टाळी वाजवण्यास सांगावे.<br>• दोन दोन बालकांना समोरासमोर उभे करून त्यांना उडी मारा आणि हवेत असताना एकमेकांना टाळी द्या असे सांगावे. तीन किंवा जास्त बालकांना वर्तुळाकारात उभे करून, त्यांना उडी मारताना शेजारच्या बालकास देण्यास सांगावे. टाळी<br>कृती ३ :<br>लंगडी घालूया<br>• डाव्या पायाने लंगडी घालत सरळ रेषेत जाण्यास सांगावे. नंतर हीच कृती उजव्या पायाने लंगडी घालत करण्यास सांगावे.<br>कृती ४ :<br>उड्या मारूया | कृती १ : जिना चढूया, उडी मारूया<br>• ताईने पुढील क्रियांचे प्रात्यक्षिक करून दाखवावे आणि बालकांना करण्यास सांगावे.<br>• बालकांना जिन्याच्या दोन पायऱ्या चढून तिथून खाली उडी मारण्यास सांगावे.<br>• बालकांना जिन्याच्या खालच्या पायरीवरून एक पायरी गाळून वर दुसऱ्या पायरीवर उडी मारण्यास सांगावे.<br><br>कृती २ : उडी मारताना टाळी<br>• बालकांना एका रेषेत किंवा वर्तुळाकार उभे करून उडी मारताना, हवेत असताना एक टाळी वाजवण्यास सांगावे.<br>• दोन दोन बालकांना समोरासमोर उभे करून त्यांना उडी मारा आणि हवेत असताना एकमेकांना टाळी द्या असे सांगावे. तीन किंवा जास्त बालकांना वर्तुळाकारात उभे करून, त्यांना उडी मारताना शेजारच्या बालकास देण्यास सांगावे. टाळी<br>कृती ३ :<br>लंगडी घालूया<br>• डाव्या पायाने लंगडी घालत सरळ रेषेत जाण्यास सांगावे. नंतर हीच कृती उजव्या पायाने लंगडी घालत करण्यास सांगावे.<br>कृती ४ :<br>उड्या मारूया<br>एक फूट उंच बाकावरून खाली उडी मारण्यास सांगावे. |

| | | |
|---|---|---|
| | • एक फूट उंच बाकावरून खाली टपणे.<br>उडी मारण्यास सांगावे. | |
| **विविधता** | उड्या मारण्यासाठी बालकांना वेगवेगळया वस्तू दयाव्यात. कांदा फोडी सारखा खेळ. | |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन | |
| **ताईसाठी सूचना** | ताईने सुलभ संदर्भासाठी उपलब्ध कार्यपुस्तिकेचा वापर करून विविध प्रकारे या कृती करून घ्याव्यात. उपलब्ध कृतिपत्रिकेचा वापर करावा. | |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-3 सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते.<br>C-3. 4. बस्स वा नेताना, चालताना, पळताना.<br>अ) LO 3.4.2.1 एका जागी उड्या मारतो. छोट्या अडथळयावरून उडी मारतो.<br>अ) LO 3.4.2.2 उंचावरून उडी मारून पायवरून स्थिर उभे राहतो. (उंची-२.५ ते ३ फुट)<br>ब) LO 3.4.2 दोन्ही पायांनी उडी मारतो आणि एखाद्या कमी उंचीच्या वस्तूवरून कोणाच्या तरी सहाय्याने किंवा सहाय्य न घेता उडी मारतो.<br>क) LO 3.4.2 साधारण उंचीवरून सहजतेने उडी मारतो. (२ किंवा ३ पायऱ्यांवरूनच किंवा तीन फुटाच्या बाकावरून) | |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | उड्या मारण्याचे कौशल्य, शारीरिक लवचिकता निर्माण होण्यास मदत होईल. | |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | पाय आणि नेत्र समन्वय साधता येतो का? | |
| | | |
| **आधारशिला कृती क्र :128 Run, Partner, Run!** | | |
| **उपक्रमाचे नाव** | चला पळुया | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | ओढणी/दोरी, पोत, चेंडू | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती १ :<br>• ताईने वर्गाच्या बाहेर जमिनीवर एक सरळ रेषा काढावी. त्या रेषेपासून ठरवीक अंतरापर्यंत बालकांना पळायला सांगावे. एका वेळी ४ बालकांना पळायला सांगावे.<br>कृती २ :<br>• बालकांना वेगवेगळया प्रकारे धावायला सांगा. मागे धावणे, सोबत धावणे, हात हलवत धावणे.<br>कृती ३ :<br>• ताईने बालकांच्या जोड्या तयार कराव्या. एका बालकाने मधल्या रेषेपर्यंत पळत जाणे | ३ ते ४ वयोगटाच्या कृती घ्याव्यात त्यानंतर पुढील कृती घ्याव्यात.<br>कृती १ :<br>पोत्याची उडी<br>• ताईने बालकांना एका ओळीत उभे करावे. एका वेळी ४ बालकाना पळायला सांगावे. प्रत्येक बालकाला एक एक पोते दयावे.पोत्यात पाय घालून उड्या मारावयास सांगावे आणि कौशल्य | ३ ते ५ वयोगटाच्या कृती घ्याव्यात. त्यानंतर पुढील कृती घ्याव्यात.<br>कृती : डॉच बॉल<br>• ताईने बालकांना मोठ्या वर्तुळात "उभे करावे.<br>• दोन बालकांना वर्तुळाच्या आत पळण्यासाठी पाठवावे.<br>• वर्तुळात पळणाऱ्या बालकांना बाहेरच्या वर्तुळातील बालकांनी कमरेच्या खाली चेंडू मारून आऊट करायचे असे सांगावे. |

<table>
<tr><td>व दुसऱ्या बालकाकडे चेंडू पास करणे व पुढे शेवटच्या रेषेच्या बाहेर चेंडू घेऊन जाणे.</td><td>आत्मसात झाल्यावर पोते उडीची स्पर्धा घ्यावी.<br>कृती २ : तीन पायांची शर्यत<br>• ताईने बालकांच्या जोड्या करून दयाव्यात. दोन बालकांना बाजूला उभे राहून एकाचा उजवा पाय दुसऱ्या बालकाच्या डाव्या पायाला बांधावा. तीन पायाने चालावयास सांगावे आणि कौशल्य प्राप्त झाल्यावर तीन पायाची शर्यत घ्यावी.</td><td>• वर्तुळात पळणाऱ्या बालकांनी चेंडू आपल्याला लागणारच नाही असे पळावे.<br>• ज्या बालकांच्या कमरेखाली चेंडू लागला, तो आऊट असा खेळ पूर्ण करायचा.</td></tr>
<tr><td>विविधता</td><td colspan="2">अ) प्राण्यांच्या चाली, वेगवेगळया अडथळयांच्या शर्यती, उड्या मारताना वेगवेगळया हालचाली अशा कृती करण्यास सांगावे. उदा. टाळया वाजवणे किंवा हात वर, समोर, बाजूला किंवा पक्ष्यासारखे हालवण्यास सांगावे.<br>अ) झांज किंवा घंटेच्या तालाप्रमाणे हळूहळू किंवा भरभर उड्या मारण्यास सांगावे.</td></tr>
<tr><td>थीम/विषय</td><td colspan="2">मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन</td></tr>
<tr><td>ताईसाठी सूचना</td><td colspan="2">विशेष बालकांसाठी सोपे खेळ निवडावे. त्यांना खेळताना मदत करावी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती</td><td colspan="2">CG-3 सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते.<br>C-3. 4. बस्स वा नेताना, चालताना, पळताना.<br>अ) LO 3.4.2.1 एका जागी उड्या मारतो. छोट्या अडथळयावरून उडी मारतो.<br>अ) LO 3.4.2.2 उंचावरून उडी मारून, पायावर स्थिर उभे राहतो. (उंची २.५ ते ३ फूट)<br>) LO 3.4.2 दोन्ही पायांनी उडी मारतो आणि एखाद्या कमी उंचीच्या वस्तूवरून कोणाच्या तरी सहाय्याने किंवा सहाय्य न घेता घेता उडी मारतो.<br>क) LO 3.4.2 साधारण उंचीवरून सहजतेने उडी मारतो. (२ किंवा ३ पायऱ्यांवरूनच किंवा तीन फुटाच्या बाकावरून)</td></tr>
<tr><td>साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये</td><td colspan="2">पळण्याचे कौशल्य, शारीरिक लवचिकता निर्माण होण्यास मदत होईल.</td></tr>
<tr><td>निरीक्षण करावयाच्या बाबी</td><td colspan="2">पाय आणि नेत्र समन्वय साधता येतो का? सूचनांचे पालन करता येते का?</td></tr>
<tr><td colspan="3"></td></tr>
<tr><td colspan="3">आधारशिला कृती क्र :129 Jump Up, Jump Down, Jump All Around</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे नाव</td><td colspan="2">वर खाली उड्या मारूया</td></tr>
<tr><td>उपक्रमाला लागणारे साहित्य</td><td colspan="2">दोरी, १ ते १० अंक / संख्या पत्ते किंवा बटाटा, लहान टेबल, खेळातील कोन, रिंग/टायर</td></tr>
<tr><td>वयोगट ३ ते ४ वर्षे</td><td>वयोगट ४ ते ५ वर्षे</td><td>वयोगट ५ ते ६ वर्षे</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| कृती : उड्या मारूया<br>• पुढील प्रकारे वेगवेगळया उड्या मारण्याचे प्रात्यक्षिक दाखवून बालकांना तशा उड्या मारण्यास सांगावे.<br>उड्या मारूया.<br>• जागेवर एक उडी आणि अनेक उड्या मारण्यास सांगावे.<br>जिन्यावरून उड्या मारूया.<br>• जिन्याच्या सर्वांत खालच्या पायरीवर उभे राहून, तिथून खाली उडी मारण्यास सांगावे.<br>उंच उड्या मारूया<br>• जागेवर साधी उडी आणि उंच उडी मारण्यास सांगावे.<br>उड्या प्राण्यांच्या<br>• पक्ष्यांचे आणि प्राण्यांचे आवाज काढत आणि हातवारे करत उड्या मारणे. उदा. बेडूक उडी, माकड उडी, सशाची उडी<br>• टाळया वाजवत वरील सर्व प्रकारच्या उड्या मारायला सांगावे.<br>छोटा पाट, छोटे डेस्क, छोटे स्टूल अशा चढत्या क्रमाने २ ते अडीच फूट उंचीवरून उड्या मारण्यास सांगावे. | कृती : उडी मारणे.<br>• ताईने जमिनीवर दोरी ठेवावी व त्यावरून उडी मारून दाखवावे.<br>व त्याप्रमाणे बालकांना कृती करण्यास सांगावे.<br>कृती २ :<br>अंक ऐकून उड्या मारणे. बालकांना ताईने मोठ्या वर्तुळात उभे करावे. बालकांना खालील अंक सांगून उड्या मारायला सांगणे.<br>१) दोन पाय जुळवून उड्या मारणे.<br>२) एक पाय वर, दुसरा खाली -१-२, १-२ अशा उड्या मारणे.<br>३) मागे उडी मारणे.<br>४) पुढे उडी मारणे.<br>५) डावीकडे उडी मारणे. | कृती : शर्यत<br>• ताईने पुढील क्रियांचे प्रात्यक्षिक करून दाखवावे आणि बालकांना करण्यास सांगावे.<br>कृती १ : सोबत बटाटा, चालूया पटापटा<br>• प्रथम एका तळहातावर बटाटा घेऊन सरळ रेषेत चालण्यास सांगावे. नंतर दोन्ही तळहातांवर बटाटा घेऊन चालण्यास सांगावे. सरळ रेषेत<br>कृती २ : अडथळयाची शर्यत<br>• जमिनीवर अडथळयासाठी वेग- वेगळया वस्तू ठेवून, बालकांची अडथळयाची शर्यत घ्यावी. |

| | |
|---|---|
| **विविधता** | • उड्या मारताना वेगवेगळया हालचाली करण्यास सांगावे. उदा. टाळया वाजवणे किंवा हात वर, समोर, बाजूला किंवा पक्ष्यासारखे हलवण्यास सांगावे.<br>• झांज किंवा घंटेच्या तालाप्रमाणे हळूहळू किंवा भरभर उड्या मारण्यास सांगावे. |
| **थीम/विषय** | मी, माझे कुटुंब, परिसर, पाणी पाऊस, भाज्या व फळे, वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, प्राणी (पाळीव व जंगलातील), पक्षी व कीटक, मदतनीस, वाहन |
| **ताईसाठी सूचना** | - |
| **अभ्यासक्रम ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती** | CG-3 सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते.<br>C 3. 4. बस्स वा नेताना, चालताना, पळताना.<br>अ) LO 3.4.2.1 एका जागी उड्या मारतो. छोट्या अडथळयांवरून उडी मारतो.<br>अ) LO 3.4.2.2 उंचावरून उडी मारून, पायावर स्थिर उभे राहतो. (उंची २.५ ते ३ फूट)<br>ब) LO 3.4.2 दोन्ही पायांनी उडी मारतो आणि एखाद्या कमी उंचीच्या वस्तूवरून कोणाच्या तरी सहाय्याने किंवा सहाय्य न घेता उडी मारतो.<br>क) LO 3.4.2 साधारण उंचीवरून सहजतेने उडी मारतो. (२ किंवा ३ पायऱ्यांवरूनच किंवा तीन फुटाच्या बाकावरून) |
| **साध्य होणाऱ्या क्षमता / कौशल्ये** | उड्या मारण्याचे कौशल्य, शारीरिक लवचिकता निर्माण होण्यास मदत होईल. |
| **निरीक्षण करावयाच्या बाबी** | पाय आणि नेत्र समन्वय साधता येतो का? सूचनांचे पालन करता येते का? |

| | | |
|---|---|---|
| **आधारशिला कृती क्र :130. Ribbon Dance** | | |
| **उपक्रमाचे नाव** | **रिबन डान्स करूया** | |
| **उपक्रमाला लागणारे साहित्य** | **रंगीबेरंगी रिबीन प्रत्येक बालकासाठी दोन रिबीन** | |
| **वयोगट ३ ते ४ वर्षे** | **वयोगट ४ ते ५ वर्षे** | **वयोगट ५ ते ६ वर्षे** |
| कृती : रिबन डान्स/चेंडू फेकणे/स्थिर थांबणे (पुतळा बनणे)<br>कृती १ : रिबन डान्स<br>• अंगणवाडी ताईने बालकांना वर्तुळात उभे करून, स्वतः वर्तुळात उभे रहावे. आपण डान्स करणार आहोत, याबद्दल बालकांना कल्पना द्यावी. प्रत्येक बालकाला प्रत्येकी दोन रिबीन दयाव्यात आणि त्यांना प्रत्यक्ष कृती करून दाखवावी. मोबाइलवर गाणी लावून किंवा ढोल/डफली वाजवून त्या तालावर डान्स करायला सांगावे. | कृती १ : रिबन डान्स<br>• अंगणवाडी ताईने बालकांना वर्तुळात उभे करून, स्वतः वर्तुळात उभे रहावे. आपण डान्स करणार आहोत, याबद्दल बालकांना कल्पना यावी. प्रत्येक बालकांना प्रत्येकी दोन रिबीन दयाव्यात आणि त्यांना प्रत्यक्ष कृती करून दाखवावी. मोबाइलवर गाणी लावणे, गाण्याचा आवाज जसा लहान मोठा होईल, त्याप्रमाणे तालावर डान्स करायला सांगावे. | |
| **विविधता** | रिबीनचा वापर करून डान्स करणे, आवाजानुसार दोरीवरील उड्या, जागेवर उड्या मारणे. | |
| **थीम/विषय** | वनस्पती (फुले, शेती, रंग), ऋतू, | |
| **ताईसाठी सूचना** | | |

# नवचेतना कॅलेंडर २०२४

(जन्म ते ०३ वर्षांपर्यंतच्या उद्दीपन कृतींचे वेळापत्रक)



# गर्भधारणा

दरम्यानच्या काळात

**उपक्रम: पोषक आहार**

**पाय-या:**

१.गरोदरपणात मातेला पोषक आहार मिळेल याची खबरदारी कुटुंबाने घेतली पाहिजे.
२.तिने भरपूर प्रमाणात पाणी पिले पाहिजे.

३.आरोग्यदायी गर्भारपण आणि यशस्वी बाळंतपणासाठी तिला आवश्यक पूरक व पौष्टिक आहार देखील दिला पाहिजे.

**उपक्रमाचे महत्त्व** : यामुळे आई आणि बाळ निरोगी आणि सदृढ होण्यास मदत होईल.





**उपक्रम: शारीरिक हालचाल आणि व्यायाम**

**पाय-या :**

१. गर्भवती मातेला नियमितपणे चालणे, सोपी योगासने यासारखे व्यायाम करण्यास प्रोत्साहन द्यावे.
२. घरातील कामांचे नियोजन करून गर्भवती मातेला जड कामे देणे टाळावे आणि तिच्या रोजच्या विश्रांतीची काळजी घ्यावी.

**उपक्रमाचे महत्त्व:** यामुळे माता आणि बालकाचे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य वाढीस लागेल.

**उपक्रम: सकारात्मक आणि आनंदी वातावरण**

**पाय-या:**

१.गरोदर मातेला असलेले सर्व प्रकारचे ताण दूर करून तिच्याशी प्रेमाने वागावे,आधार द्यावा आणि काळजी घ्यावी.
२. रंगकाम,विणकाम किंवा यासारखे मनाला शांतपणा देणारे कलाकुसरीचे छंद जोपासण्यास प्रोत्साहन द्यावे.
३. सुखावणारे संगीत ऐकणे, ध्यान करणे.

**उपक्रमाचे महत्त्व:** यामुळे माता तनावमुक्त,आनंदी,सकारात्मक राहील व गर्भातील बाळ निरोगी आणि सुदृढ राहते.





**उपक्रम: गर्भातील बाळाशी संवाद साधणे**

**पाय-या**

१.आईवडलांना गर्भातील बाळाशी गप्पा मारण्यास प्रवृत्त करावे.
२. गरोदर मातेने रोजच्या घटना,गोष्टी सांगणे, हळुवार आवजात गाणी म्हणणे हे नियमित करावे.

**उपक्रमाचे महत्त्व:** यामुळे गर्भाला मानसिक आणि भावनिक चालना मिळत असल्याने गर्भाचा विकास सुरक्षित वातावरणात होतो.